चरित्र १०० स. १८९९

ले. लक्ष्मण गोविंद घाणेकर

माझीनी (चरित्र)

(श्री प्रिंटर्स अँण्ड स्टेशनर्स ठाणे)

माझीनी


[ सर्व हक्क प्रकाशकांनीं स्वाधीन राखिले आहेत. ]

बडोदें, "पूर्णचंद्रोदय" छापखान्यांत छापिलें.

संग्रहालय. ठाणे.

प्रसिद्ध इतालियन देशभक्त

# माझीनी.



मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

ग्रंथसंपादक व प्रकाशक मंडळीची ग्रंथमाला.
ग्रंथ १० वा.

प्रसिद्ध इतालियन देशभक्त

# माझीनी

याचें चरित्र.

मूळ इंग्रजी ग्रंथावरून लिहिणार,
रा. सा. लक्ष्मण गोविंद घाणेकर, बी. ए.
मुन्सफ, बडोदें राज्य.

प्रकाशक
दामोदर सांवळाराम आणि मंडळी.
बडोदें आणि मुंबई.

सन १८९९.

किंमत १ रुपया.

# प्रस्तावना.

स्वदेशोन्नतीसाठीं आजपर्यंत जे जे थोर पुरुष झटले त्यांत माझीनी याची प्रमुखत्वेंकरून गणना आहे. याचा जन्म प्रस्तुत शतकाच्या आरंभीं इताली देशांत झाला. त्या वेळीं त्या देशाची स्थिति अत्यंत शोचनीय झाली होती. त्याचें पूर्वीचें सर्व वैभव व स्वातंत्र्य हीं पार नष्ट झालेलीं होतीं. नांवाला लहान लहान राज्यें इतालींत स्वतःला स्वतंत्र ह्मणविणाऱ्या राजांच्या हाताखालीं होतीं. पण त्यांना वास्तविक अधिकार फारच थोडा होता. आपणाला कोणतीही गोष्ट करणें झाल्यास ती फ्रान्स आणि ऑस्ट्रिया येथील राज्यकर्त्यांस कितपत रुचेल याचा ते जितका विचार करीत, तितका ती आपल्या किंवा आपल्या प्रजेच्या हिताची आहे कीं नाहीं याचा विचार करीत नसत. या प्रकारच्या शोचनीय परावलंबी स्थितींतून आपल्या देशास सोडवावें, तेथें स्वातंत्र्य नांदावें, प्रजा सुखी असावी, व तेथील राज्यपद्धति इतर राष्ट्रांस अनुकरणीय व्हावी, ही प्रस्तुत चरित्रनायकाची अत्यंत उत्कट इच्छा असून त्या दिशेनें त्याचे प्रयत्न आमरण सुरू होते. या प्रयत्नांमुळें इताली देशावर त्याचे फार उपकार झाले आहेत, व त्या देशाला हल्लीं बऱ्याच अंशीं सुखावह स्थिति प्राप्त झाली आहे. एखादा देश विपत्तींत बुडाला असतां त्याचा उद्धार करूं इच्छिणाराच्या अंगीं जे गुण अवश्य असावे लागतात, ते गुण माझिनीच्या अंगीं पूर्णपणें वसत होते. त्याची आपल्या देशजननीच्या ठायीं अत्यंत निष्ठा होती, व तिला दुःखांतून सोडविण्याकरितां पाहिजे तें करण्यास व पाहिजे तीं संकटें सोसण्यास तो तयार होता. त्याचा स्वभाव अगदीं सरळ व वर्तन अगदीं साधें असे, त्यामुळें कसलाही स्वार्थत्याग करावा लागला तरी तो कधींही माघार घेत नसे. देशहितापुढें त्याला स्वहिताची पर्वा नव्हती. आपल्या कर्तव्याविषयीं तो अत्यंत तत्पर असे. आपल्या प्रतिपक्ष्यांचे बेत काय चाललेले आहेत याची बातमी मिळविण्यांत तो फारच पटाईत होता; व याप्रमाणें मिळविलेल्या बातमीवरून त्याचें धोरण कोणत्या प्रकारचें असलें पाहिजे याची त्याला यथायोग्य कल्पना सुचून, आपल्या शत्रूंचा डाव साधूं नये याविषयीं तो फार त्वरित उपाय योजीत असे.

त्याचीं राजकारणीं मतें राजसत्ताकव्यवस्थेच्या॰ विरुद्ध होतीं. राजाच्या अमदानींत प्रजेस कधींही सुख लागणार नाहीं असें त्यानें ठाम ठरविलें होतें. पण सामान्यजनसमूहाचे विचार आपल्या इतके पुढें गेलेले नाहींत, व राजसत्ताक व्यवस्थाच त्यांस अधिक इष्ट वाटते असें पाहून त्यानें स्वतःचें मत एकीकडे ठेवून लोकांचें व आपलें ह्मणणें जितकें जुळत होतें, तितकीच मजल प्रथम मारण्याचा निश्चय करून आपणाकडून होईल तितकी मदत राजसंस्थेसच करून ती बळकट व स्वावलंबी करण्याची खटपट केली. पण राजपक्षीय मंडळी अतिशय संशयी असल्यामुळें, व त्याच्या स्वार्थत्यागाची किंमत त्यांस न कळल्यामुळें, तसेंच कांहीं अंशीं इतालियन लोकांच्या चंचल स्वभावामुळें, माझिनीला त्या खटपटींतही यश आलें नाहीं.

'मनुष्याचीं कर्तव्यें' आणि 'युरोपांत लोकसत्ता रूढ होण्यासंबंधानें विचार' या नांवाचीं दोन पुस्तकें त्यानें लिहिलीं आहेत, त्यांवरून त्याचे राजनीतीसंबंधाचे विचार स्पष्ट होतात.

एकनिष्ठपणें कोणतेंही काम कसें करावें, व समाजाला बरोबर घेऊन देशोन्नती कशी करावी या गोष्टी माझिनीच्या चरित्रावरून चांगल्या कळून येणार आहेत. त्या वाचकांच्या मनांत उत्तम रीतीनें ठसोत एवढेंच ईश्वरापाशीं मागणें आहे.

# प्रकाशकांची प्रस्तावना.

ग्रंथसंपादक आणि प्रसारक मंडळीनें जीं पुस्तकें अगदीं आरंभींच छापावयास घेतलीं होतीं त्यांपैकीं हें पुस्तक असल्यामुळें व त्यावेळीं मंडळीनें प्रसिद्ध केलेलीं पुस्तकें अमुक एक सांच्याचीं असावीं असें ठरलेलें नसल्यामुळें या पुस्तकाचा सांचा 'हिंदुस्थानच्या इतिहासा'सारखा ठेवण्यांत आलेला नव्हता. पुढील सर्व ग्रंथांचा सांचा मुक्रर झाला असून पांचशें पानांच्या आकाराचीं पुस्तकें मोठ्या सांचाचीं ह्मणजे हिंदुस्थानच्या इतिहासाच्या सांच्याचीं व त्यांहून लहान पुस्तकें 'दुर्गेशनंदिनी' या पुस्तकाच्या आकाराचीं ठेवण्यांत येतील. बाइंडिंग पूर्ववत् कायमच्या आश्रयदात्यांच्या प्रतीस कापडी मजबूत पुठ्याची असून नियमाप्रमाणें किंमत आकारण्यांत येईल. कायमच्या ग्राहकांशिवाय इतरांस मुख पृष्ठावर दिलेली किंमत पडेल.

ग्रंथसंपादक आणि प्रसारक मंडळीच्या देखरेखीखालीं आजपर्यंत एकंदर नऊ पुस्तकें छापून प्रसिद्ध झालीं व आज हें १० वें पुस्तक वाचकांच्या हातांत देण्यांत येत आहे. प्रसिद्ध झालेल्या नऊ पुस्तकांची यादी याखालीं दिली आहे.

| पुस्तकाचें नांव. | पुस्तकाची मूळ किंमत. | | कायमच्या वर्गणीदारांस किं. | |
|---|---|---|---|---|
| | कापडी पुठ्ठा. | साधा पुठ्ठा | कापडी पुठ्ठा. | साधा पुठ्ठा. |
| १ पानपतची मोहीम.... | ३-८-० | ......... | २-१०-० | ......... |
| २ अर्थशास्त्र. ... ... | १-८-० | १-४-० | १-०-० | ०-१२-० |
| ३ विषवृक्ष. ... ... | १-१२-० | १-८-० | १-२-० | ०-१४-०० |
| ४ मुसलमानी रियासत. | २-८-० | १-१२-० | १-११-० | १-४-० |
| ५ देवी सत्यभामा. ... | १-८-० | १-४-० | १-०-० | ०-१२-० |
| ६ वीरमती. ... ... | १-०-० | ०-१२-० | ०-१२-० | ०-८-० |
| ७ सती राणकदेवी. ... | १-०-० | ०-१२-० | ०-१२-० | ०-८-० |
| ८ वाईकर भटजी. ... | १-०-० | ०-१२-० | ०-१२-० | ०-८-० |
| ९ दुर्गेशनंदिनी. ... | १-८-० | ......... | ०-१२-० | ......... |

## हल्लीं छापत असलेलीं पुस्तकें.

| नंबर. | पुस्तकाचें नांव. | ग्रंथकाराचें नांव. |
|---|---|---|
| १ | वक्तृत्वकला.... ... .... ... | रा.रा. लक्ष्मण त्र्यंबक पारनाईक, व. |
| २ | आरोग्यशास्त्र... ... ... ... | रा.ब.डा. कृष्णराव विश्वनाथ धुरंधर. |
| ३ | हिंदुस्थानची राजनीति (इंडियन पॉलिटिक्स).... ... ... ... | रा.रा. मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, बी.ए. |
| ४ | स्वामी विवेकानंदकृत सुलभपरमार्थज्ञानमाला–राजयोग (पुस्तक १ लें) | प्रो. चिंतामण गंगाधर भानू, बी. ए. |
| ५ | सदर कर्मयोग... ... ... ... | रा.रा. शंकर विठ्ठल कदम, बी. ए. |
| ६ | *अर्वाचीन कविता. ... ... ... | कै.रा.रा.दत्तात्रय कोंडो घाटे, बी.ए. |
| ७ | कृषिकर्मविद्या... ... ... ... | रा, सा. रामचंद्र आबाजी राजे. |
| ८ | हिं. अ. इतिहास भाग २ मराठा रि. | रा.सा.गोविंद सखाराम सरदे. बी.ए. |

मंडळीचा सन १८९७ व ९८ सालांचा रिपोर्ट बाहेर पडला आहे त्यावरून मंडळीचा उद्योग पुढें कसा चालू आहे हें लक्षांत येणार आहे. मंडळीचा उद्योग सुरळीत चालण्यास कायमच्या आश्रयदात्यांची संख्या निदान एक हजार तरी पाहिजे आहे. आमचे हल्लीचे आश्रयदाते एकेक वर्गणीदार जरी मिळवुन देण्याचें श्रेय घेतील तरी मंडळीच्या उद्योगास पुष्कळ मदत होणार आहे.

**दामोदर सांवळाराम आणि मंडळी.**

# माझीनी.

## भाग १.

### सन १८०५–१८३१.

दोन धंदे करून निर्वाह करणाऱ्या लोकांस जोसेफ माझीनी ह्याची जी थोडीबहुत माहिती आहे ती येवढीच कीं, आस्त्रिया व इतालींतील वारीकसारीक संस्थानें ह्यांच्या गुलामगिरीची लाज वाटून परचक्राचें जूं आपल्या मानेवरून झुगारून देण्याचें जें वारें इताली देशांतील लोकांच्या अंगांत अतोनात भरलें होतें, तें ह्याच्या बुद्धिसामर्थ्याचें, उत्साहाचें, आणि एकनिष्ठतेचें फल होय. आपल्या देशाच्या दास्य विमोचनाचें काम तडीस नेण्यास ह्याला जे प्रयास पडले, जीं संकटें व दुःखें भोगावीं लागलीं, तीं सांगतां येत नाहींत. स्वदेशबंधमोचन ह्या गोष्टीसच तो ब्रह्म ह्मणत असे, व तत्प्राप्ति करून घेण्याच्या कामीं माझीनीपेक्षां कच्या अधिकाराचा जर एकादा मनुष्य असता तर त्याच्या हातून तें काम कधींच पार पडलें नसतें. स्वदेशप्रीतीचें हें जरी नमुना घेण्यासारखें उदाहरण आहे, तथापि एवढ्याचवरून ह्या थोर पुरुषाचें हें लहानसें चरित्र लिहिण्यास कांहीं विशेषसें कारण नाहीं. जे कोणी खरे इंग्रेज आहेत ते प्राण देतील; परंतु परकीय त्यांच्या तोंडांत मारून त्यांचा देश जिंकितील, व ते मेंढ्यासारखे उगीच बसतील, असें कधींही व्हावयाचें नाहीं. ह्मणूनच, आपला देश सोडविण्याचा अभिमान माझीनीच्या मनांत उत्पन्न व्हावा हें त्यांस स्वाभाविक वाटेल; परंतु माझीनीच्या स्वदेशप्रीतीचें कारण हा नुसता अभिमान नसून त्याहीपेक्षां तें विशेष प्रशंसनीय आहे. विलियम लाईड ग्यारिसन नांवाच्या ग्रंथकर्त्यानें माझीनीविषयीं असें ह्मटलें आहे ( व तें अगदीं यथार्थ आहे ) कीं, 'स्वदेशप्रीति ही एक संकुचित मनोवृत्ति आहे, कारण हिच्या ठिकाणीं आपपरभाव आहे; व हा देशप्रीतिरूपी अग्नि जरी माझीनी ह्याच्या हृदयांत नेहमीं धगधगलेला असे, व त्याचे विचार आणि आचार ह्या सर्वांची त्या अग्नीस आहुति होत असे, तरी एकटा इतालीदेश विद्याभूषित व सदा-

चारसंपन्न होऊन स्वतंत्र व्हावा अशी ह्याची वृत्ति नसून, इतालीदेश अशा रीतीनें स्वतंत्र होणें ह्मणजे सर्व युरोपखंडाच्या स्वातंत्र्याचा आरंभ होणें असें तो मानीत असे. केवळ तद्देशस्थ ह्मणूनि जर गांजलेल्या इतालियन लोकांविषयीं ह्याची बंधुप्रीति व कळवळ मला दिसून आली असती, ( मग ह्या त्याकामीं कितीही स्वार्थविमुख असो ), तर आज ह्या पुरुषाविषयीं जी पूज्यबुद्धि आहे, व जी निरंतर कायम राहील, ती मला कधींही वाटली नसती. ही देशभक्ति स्तुत्य आहे खरी, तरी ती विश्वाच्या कल्याणार्थ नव्हे. माझीनीचा ' वसुधैव कुटुंबकं ' असा बाणा असल्यामुळें, व त्याच्या स्वातंत्र्यप्रियतेंत ' माझें तुझें ' ही क्षुद्र कल्पना नसल्यामुळें, त्यानें माझें चित्त लोहचुंबकाप्रमाणें आपल्याकडे आकर्षित केलें. ह्या पुरुषाच्या ठिकाणीं गर्व अगदीं नव्हता. ऐहिक महत्वाकांक्षा त्याच्या ठिकाणीं अगदीं वास करीत नसे; व हा आपला देश, तो आपला नव्हे, अशी कल्पना ह्याच्या मनांत कधींही आली नव्हती. त्याची सर्वत्र समदृष्टि असे, व त्यामुळें आह्मी आमच्या राष्ट्राचे, तुह्मी तमच्या राष्ट्राचे, ही मात्सर्यमूलक ऐट त्यास कधींच आवडत नसे. कारण हिजमुळें परस्पर बंधुत्वाचें नातें दूरावतें, व परस्परांच्या ज्ञानाचा विनिमय होण्यास अडचणी आल्यानें सर्वांच्याच ज्ञानाची वाढ खुंटते. '

एकंदरींत, ज्या प्रदेशांत आपण जन्मास आलों, त्याच्या ठिकाणीं प्रेम आणि पूज्यबुद्धि ठेवणें हें आपलें कर्तव्यकर्म आहे, असें तो मानीत असे. कारण, तो देश हेंच परमेश्वरानें आपणासाठीं निर्माण केलेलें घर असून त्यांतील लोक आपलीं भांवडें होत,—व भाषा, धर्म आणि इतिहास ह्यांचें ऐक्य, हेंच कुटुंबाचें बंधन होय, अशी त्याची समजूत होती. निरनिराळीं राष्ट्रें हीं त्याच्या मतें मनुष्यजातीचीं कुटुंबें असून, एकाद्या कुटुंबचालकानें त्या कुटुंबांच्या हिताहिताकडे दुर्लक्ष करून फक्त कुटुंबाचें पोषण मात्र यथास्थित केलें, तर त्यानें इहलोकचीं सर्व कर्तव्यें बजाविलीं असें जसें ह्मणता येणार नाहीं, तसेंच आपल्या देशासाठीं देह झिजविला ह्मणून देशभक्तीची सार्थकता झाली, असें होणार नाहीं. मानवी जातीच्या हितास कांहींतरी हातभार लाविला पाहिजे. सागर, नद्या, पर्वत इत्यादि आधिभौतिक चिन्हांवरून, व भाषा, लोकस्वभाव व त्यांचे कल ह्यांवरून जशा एकाद्या देशाच्या ढोबळ मर्यादा दिसतात, त्याप्रमाणेंच माझीनीच्या मतें त्या देश-

च्या लोकांच्या अंगचें बुद्धिसामर्थ्य व कर्तबगारी ह्यांवरून त्यांच्या हातून जी कामगिरी व्हारी ह्मणून ईश संकेत असतो तो व्यक्त होतो.

प्रपंचाचा भार वहात असतां मनुष्यास जसें स्वातंत्र्य अवश्य कर्तव्य आहे, तसेंच आपल्या देशाची राजकीय अंतर्व्यवस्था हवी तशी लावण्याचा हक्क त्या देशास असून तसें करण्यास व्यत्यय आणणें ह्मणजे घोर पाप आहे, असें माझीनीचें ठाम मत असे. दरएक मनुष्याच्या हातून व दरएक राजाच्या हातून ईश्वरी नियमाप्रमाणें कांहीं कार्यें घडावयाचीं असतात, व तीं सांगोपांग घडावयास त्यांच्या आंगीं सामर्थ्य यावें लागतें, व त्याजवर तीं करण्याची जबाबदारी असावी लागते. पण जेथें स्वातंत्र्य नाहीं तेथें सामर्थ्य कोठून येणार? आणि जबाबदारीही कशी रहाणार? ह्मणूनच वर लिहिलेलें राजकीय स्वातंत्र्य कोणच्या राष्ट्रास असावें हें प्रथम ठरवावं असें माझीनी ह्मणे; कारण तें ठरल्याशिवाय एका राष्ट्रास दुसऱ्यावर चढाई करण्याचा प्रतिबंध करण्याकरितां, व सर्व राजांसच नव्हे तर लोकांसही सलोख्यानें रहातां यावें ह्मणून, कोणाच्या ताब्यांत किती मुलूख असावा, व निरनिराळ्या राष्ट्रांनीं आपापलीं कामें कशीं वांटून घ्यावीं, हें ठरवितां येणार नाहीं.

मनुष्याची गोष्ट घ्या किंवा राष्ट्राची गोष्ट घ्या, स्वतःच्या कृत्याबद्दल जबाबदार होण्यास प्रत्येकानें तें कृत्य स्वसंतोषानें केलें असलें पाहिजे. जगन्नियंत्यानें मनुष्याच्या हृदयांत विवेकदीपक प्रज्वलित केला आहे; आणि त्याच्या प्रकाशानें आपापले व्यवसाय करण्याचें त्याचें कर्तव्य आहे. स्वातंत्र्य ह्मणजे बऱ्यावाइटांपैकीं इच्छेस येईल तर वाइटाची निवड करण्याचा हक्क नव्हे, तर अनेक सन्मार्गांपैकीं कांहींचा अवलंब करणें हें होय. हा हक्क यच्चावत् मानवी प्राण्यास सारखा आहे. मग तो प्राणी कोणच्याही जातीचा असो, व स्त्री असो कीं पुरुष असो. कारण ईश्वरेच्छेनुरूप वर्तन व जबाबदारी, हीं वर लिहिलेल्या हक्काच्या अभावीं असूं शकणार नाहींत. सृष्टिक्रमानें हळू हळू राजसंस्था व अमीरउमराव हीं नाहींशीं होऊन प्रबल व्हावीं असा विधात्याचा लेख आहे. भविष्यकालीं राष्ट्र ह्मणजे आपापले उद ' निर्वाहाचे धंदे करून भावंडांप्रमाणें समाधानवृत्तीनें व एकमेकांच्या आश्रयानें रहाणारे लोक, असा अर्थ होईल. हे एकमेकांच्या स्वातंत्र्यांत कधींही हात न घालितां साधेल तितकें समाजाचें हित साधतील.

व ह्या राजकुटुंबास बंधुप्रीति, धर्मैक्य, व इतिहासज्ञान हीं आळा घालून सुव्यवस्थित ठेवितील.

अशा रीतीनें आटून एक कुटुंब बनलेल्या राष्ट्रांत जातिभेद नष्ट होतील; व 'बडे बापके बेटे,' यांचें हक्क व मानमतराब लयास जाऊन सद्गुण व लोकोत्तरबुद्धि हींच पूजास्थानें होऊन बसतील. हे उमराव, हे मध्यम वर्गांतले, हें खूळ मोडेल. सर्व लोक आपापल्या बुद्धीचें व सामर्थ्याचें भांडवल एकत्र करून त्यापासून सर्वांचें हित साधितील; व सर्वांची समाईक मिळकत जी जमीन तिचा यथान्याय विभाग करतील. ह्याच क्रमानें निरनिराळीं राष्ट्रें हीं मानव जातीचीं कुटुंबें होतील. हें संस्थान, हें सार्वभौम राज्य, हें पहिल्या प्रतीचें राष्ट्र व तें दुसऱ्या प्रतीचें, हे भेद नाहींसे होऊन मानवजातीच्या हितासाठीं सर्वजण आपलें सामर्थ्य खर्चून आनंदानें रहातील. एकजण आपला पगडा दुसऱ्यावर बसविणार नाहीं; व सर्व सामान्य पृथ्वीचा आपापल्या हिश्श्याप्रमाणें उपभोग करितील. हें घडून येण्यापूर्वी कदाचित् युगेंही लोटतील.

परंतु असें होणार हें खचित. विजयश्रीनें माळ घातल्यामुळें मदांध झालेल्या युरोपखंडाच्या राजांनीं जेव्हां एकवट होऊन आपआपल्या सत्तेचें जूं अधिकच आवळलें; ज्यावेळीं दश दिशा धुंद होऊन गेल्या; व जिकडेतिकडे गाढ अंधकार झाला आणि लोक भयानें अगदीं त्रस्त झाले, व कोणाच्यानें हूं कां चूं करवेना; अशा ह्या प्रलयरात्रीं ह्या इतालीच्या बहादरानें गर्जून सांगितलें कीं,—राजे, बादशहा, हें सर्व झूट आहे; मनुष्य फक्त ईश्वराचा दास आहे, आणि शास्त्राच्या आज्ञा मात्र तो उल्लंघणार नाहीं.

वरील गर्जनेंत सांगितलेले शब्द खरे करण्यासाठीं माझीनी ह्यानें आपलें सर्व आयुष्य खर्ची घातलें. सन १८४९ सालच्या अल्पायु प्रजासत्ताक राज्याच्या झेंड्यावर ह्यानें जीं 'ईश्वर व त्याची प्रजा' अशीं अक्षरें लिहून ठेविलीं होतीं तीं ह्याच्या धार्मिक व राजकीय विचारांची 'तत्त्वमसि' होतीं. फार काय सांगावें, तीं ह्याच्या हृत्पटावर खोदलेलीं असून निरंतर ह्याच्या डोळ्यासमोर दिसत होतीं. लोकांच्या कल्याणार्थ ह्या पुरुषाचा अवतार झालेला होता. भावि कालीं लोकांचें साम्राज्य व्हावें असा ईशसंकेत असल्याबद्दलची ह्याची खात्री होती. आणि तें साम्राज्य चालविण्याची योग्यता लोकांच्या अंगांत यावी म्हणून ह्यानें यावज्जीव सन्मार्गोपदेशाचें

व्रत धारण केलें होतें. सर्व मनुष्यप्राणी तेथून एकच असा ह्याचा समज असे, आणि लक्षावधि मनुष्यांस बंधांतून मुक्त करण्याचा ह्यानें विडा उचलिला होता; ह्मणून ह्यास बड्या लोकांच्या दरज्जाचा व हक्काचा मनापासून तिटकारा असे; आपल्या स्वतःच्या गुणांवर व मनगटाच्या जोरावर मिळविलेलें वर्चस्व मात्र ह्यास मान्य असे, आणि राष्ट्रानें आपल्या व्यवस्थेसाठीं केलेले कायदेकानू हा फार पूज्य मानीत असे.

ह्या मानुष लोकांतून नुकत्याच अस्तंगत झालेल्या ह्या विख्यात पुरुषाचें हुबेहुब चित्र काढून तुमच्यापुढें मांडण्याचें सामर्थ्य माझ्या अंगीं मुळींच नाहीं. तसें करण्यास ह्याच्या लांब कारकीर्दीमध्यें जे ह्यास जीवापाड श्रम झालें, जीं संकटें भोगावीं लागलीं, आणि जें नुकसान सोसावें लागलें, त्या सर्वांचें एक मोठें भारूड लिहून आपल्यापुढें ठेवावें लागेल. ही गोष्ट माझें सामर्थ्य आणि योग्यता ह्या दोहोंच्याही बाहेरची आहे. माझीनी ह्याचें यथासांग चरित्र ज्याला लिहावयाचें असेल, त्यानें ह्याच्याच कारकिर्दीचा इतिहास लिहून उपयोग नाहीं, तर सर्व देशांचा तत्कालीन इतिहास लिहिला पाहिजे. मी ह्याच्या अद्भुत आणि हृदयद्रावक अशा चरित्राचें ढोबळ आणि अपुरें असें चित्र काढण्याचा यत्न करणार आहें. राजकीय सत्ता लोकनिष्ठ करण्याचें कामीं परिश्रम करणाऱ्या इतालीच्या आणि सर्व यूरोपखंडांतील लोकांच्या विचारसरणीस माझीनीनें जें वळण लाविलें तें आडून आणि गुप्तरीतीचें असल्यानें, व तेंही परदेशांत राहून लाविलें, गेल्यानें, ह्याच्या समकालीन लोकांस ह्याच्या लोकोत्तर बुद्धीचें व अद्भुत वर्तनक्रमाचें खरें स्वरूप कळलें नाहीं. कारण हा ज्यांच्या द्वारें तें तें वळण लावी ते त्यास भलतीच दिशा देत, व त्यामुळें होणाऱ्या परिश्रमाकडे दृष्टि देऊन लोक माझीनीविषयीं अटकळ बांधीत. कारण त्यांसही ह्याचें खरें स्वरूप कळण्यास दुसरें कांहीं साधन नव्हतें. प्रकाश मंद असून दिशा धुंद झाल्या असतां एकाद्या दूरच्या पदार्थाकडे पाहिलें ह्मणजे जसा त्या पदार्थाच्या स्वरूपाचा बोध होत नाहीं, व नाहींत त्याच आकृति आणि नाहींत तेच रंग दिसतात; त्याप्रमाणेंच माझीनी ह्यास कोणी देशभक्त, तर कोणी बंडखोर, कोणी मुत्सद्दी, कोणी उलाढाल्या, कोणी तत्ववेत्ता, तर कोणी अजागळ मनोराज्य करणारा, असें ह्मणतात. ज्या थोड्याबहुत लोकांस ह्याची खरी माहिती होती ते मात्र जाणत असत कीं, माझीनी हा

लोकसमजुतीपेक्षां निराळ्या प्रकारचा आणि विलक्षण होता. असल्या अद्भुत आणि अष्टपैलू बुद्धीच्या मनुष्याचें चरित्र पूर्णपणें लिहिण्यास सर्व आयुष्य वेंचलें पाहिजे; आणि ह्मणूनच मी तें करण्याची खटपट न करितां तुह्मांपुढें त्याच्या अंतःकरणाची लहानशी आणि ओबडधोबड का होईना, पण जशीची तशी प्रतिमा मांडण्याचा प्रयत्न करणार आहें. ह्यानें आपल्या देशाच्या आणि मानवजातीच्या हिताकरितां जें कांहीं केलें तें तर मला सांगतां येतच नाहीं, पण ह्याच्या मनाचा जो ठाम निश्चय झाला होता, आणि जे हेतु मनांत धरून ह्यानें आपलें तारूं हाकारिलें, तें मी तुह्मांस स्पष्ट करून सांगणार आहे. एका सत्पुरुषाचें असें वाक्य आहे कीं, ' बोले तैसा चाले, त्याचीं वंदावीं पाउलें. ' पुढील हकीकतीवरून मी तुह्मांस असें दाखवून देईन कीं, आपल्या सर्व आयुष्यांत, ह्या महावाक्यार्थाचा माझीनी ह्यास क्षणभरही विसर पडला नव्हता. माझी खात्री आहे कीं, स्वदेशहिताची ज्यास खरी कळकळ आहे, त्यास हें चरित्र वाचून इष्टकार्य सिद्धीस नेण्यास अधिकच स्फुरण येईल.

जोसेफ् माझीनी ह्याचें जन्म जिनोआंतील स्ट्राडा लोमेलिनी येथें ता. २२ जून सन १८०५ रोजीं झालें. ह्याचा बाप गायाकोमो माझीनी हा नामांकित वैद्य असून जिनोआ येथील पाठशाळेंत तो शारीरशास्त्राचा अध्यापक होता. ह्याची आई मराया माझीनी ही कायाव्हेरी प्रांतांतली होती. ही स्त्री रूपानें फारच सुंदर, तीक्ष्णबुद्धीची आणि स्वभावानें फार मायाळू होती. आपल्या सर्व मुलांवर हिचें फार प्रेम असे, आणि त्यांतही जोसेफ तर तिचा जीव कीं प्राण असे. ह्यांस काळ्या पाण्याची शिक्षा झाल्यावर हा फार दिवस परदेशांत रहात होता; आणि त्या सर्व कालांत ह्या माउलीस अतोनात विरह दुःख झालें. जोसेफ्च्या गुणांकडे पाहिलें ह्मणजे हें सर्व यथायोग्य दिसतें. लहानपणीं हा फारच नाजूक आणि नेभळा असे. आणि हा दिसण्यांत जरी सदृढ दिसे तथापि इतका अशक्त होता कीं, ज्या वयांत पोरें एकटीं दुडदुडां धांवूं लागतात त्या वयांत ह्या हणगोबास उभें देखील रहातां येत नव्हतें. ह्याच्या बापानें मुद्दाम ह्याच्याकरितां एक खुर्ची तयार करवून तिजवर आंथरुणाची सोय लावून ती खुर्ची मरायाच्या खोलींत ठेविली होती. जोसेफ ह्या खुर्चीवर फतकल मारून बसे, आणि ह्या स्थितींत त्याचीं बरींच वर्षें लोटलीं. हा सहा व-

र्षांचा झाला तेव्हां ह्यास धडसें चालतां येऊं लागलें, व मग तो हळूहळू अंगणांतल्या चिमुकल्या बागेच्या बाहेर जाऊं येऊं लागला.

प्रथम ज्या दिवशीं मराया ह्यास आपल्या बरोबर घराबाहेर घेऊन गेली, त्या दिवशीं एक चमत्कारिक गोष्ट घडून आली, ह्मणून तो दिवस तिला सोन्याचा उगवला असें वाटलें, व पुढें त्या दिवसाची हकीकत ती वारंवार मोठ्या धन्यतेनें सांगत असे. ती गोष्ट अशी कीं, त्या दिवशीं हीं मायलेंकरें घराबाहेर थोडीशीं पावलें गेलीं नाहींत तोंच जोसेफ अडून उभा राहिला, आणि एका देवळाच्या पायऱ्यांवर एक वृद्ध भिक्षेकरी बसला होता त्याजकडे न्याहाळून पाहूं लागला. मुलगा असा अगदीं थिजल्यासारखा झाला कीं, बोवाच्या त्या रंगीबेरंगी चिंध्या, लांबलचक पांढरी दाढी आणि सोडगा ही पाहून मूल भेदरलें, असें मरायास वाटलें; व ती ओणवी होऊन मुलास उचलणार, तोंच हा तिच्या हातांतून निसटला, व तडक त्या भिकाऱ्याकडे धांवत जाऊन त्याच्या गळ्यास त्यानें मिठी मारिली, आणि त्याचे वारंवार मुके घेऊन आईस ह्मणाला ‘ बये, बये, ह्याला कांहीं तरी दे. ’ त्या वृद्ध फकीराचा गळा दाटून आला, आणि त्याच्या डोळ्यास पाणी आलें. त्यानें त्या मुलास कुरवाळून शुद्ध रोमन वाणीनें ह्मटलें, ‘ बाई ह्या मुलाला जपा बरें, हा सर्व देशाचे पांग फेडील. ’ मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात ते असे, असें ती ह्मणे, व तें खरेंच आहे. तिनें ही गोष्ट कितीवेळां सांगितली असेल तें सांगवत नाहीं. सुमारें ४० वर्षांनंतर तिनें ती मला सांगितली, आणि ती सांगतांना तिचे डोळयांत आंसवें भरून आलीं, व ह्यावरूनच दिसतें कीं आपल्या पुत्राच्या भावि थोरपणाचें हें चिन्ह तिच्या हृदयास किती आल्हाद देत असे! ह्याच वेळीं तिनें मला असेंही सांगितलें कीं, दुसऱ्याचें दारिद्र्य आणि दुःख पाहून ह्यास कळवळा व गहिंवर यावा असें एकदोनदां नाहीं, पण शेंकडो वेळां घडून आलें आहे. कित्येक अनाथ लोक, कीं ज्यांच्याकडे कोणी ढुंकून देखील पहात नसतील, त्यांस यानें जाऊन मिठ्या माराव्या. वर सांगितलेली गोष्ट घडण्यापूर्वी, ह्मगजे जेव्हां हा आपल्या खोलींतून कधीं बाहेर पडला नव्हता आणि जगांतील दैन्य ह्याच्या दृष्टीस देखील पडलें नव्हतें, तेव्हांही जर कोणी भिकारी आला, व त्यानें आपल्या हालअपेष्टांची हकीकत चाकर माणसांस सांगितली, व ती त्यांनीं ह्याच्या आईस

कळविली परंतु तिनें कांहीं मिळणार नाहीं ह्मणून सांगून भिकाऱ्यास कां-ढून लावण्यास सांगितलें, तर हा रडून रडून आकांत करी, आपल्या झिंज्या तोडी, व सारखा ओरडे कीं, बये, त्या गरिबाला कांहीं तरी दे, व भाकर तुकडा किंवा पैसा आधेला कांहीं तरी देवविल्याखेरीज पिच्छा सोडीत नसे, आणि दिल्यावर मात्र लाडांत येई, खिदळूं लागे, व त्याच्या डोळ्यांतून खळखळां पाणी वहात असे.

हा लहान असतानांच ह्याचा स्वभाव साठ वर्षांच्या आजोबाप्रमाणें पोक्त असे. लहानपणीं मुलांस आवडणाऱ्या खेळण्यांस हा कधीं हात लावीत नसे. एवढ्या लहानपणींच व्यक्त झालेली ह्याच्या बुद्धीची प्रौढी पाहून, हा शरीरानें अगदीं दुर्बळ असल्यानें ह्याचा बाप ह्यास वाचावयास शिकवूं देईना. तथापि हा पुरा ४ वर्षांचा देखील झाला नव्हता तोंच ह्याच्या आईस समजून आलें कीं, ह्यास चांगलें घडघडां वाचतां येत आहे. जवळच्या खोलींत ह्याच्या बहिणी आपले धडे पाठ करीत असत, त्यांचें ऐकून ऐकून हा वाचावयास शिकला, पण तें कोणाच्या लक्षांत आलें नव्हतें. जेव्हां एखाद्या सणावाराच्या दिवशीं किंवा वाढदिवसानिमित्त आईनें ह्यास विचारावें कीं, बाळा, तुला काय खेळणें आवडतें? तेव्हां ह्याचें एक ठरींव उत्तर असे कीं, मला पुस्तक आवडतें. ह्याला ज्यांनीं ब्यावा त्यांला ह्यानें ह्मणावें गोष्ट सांगा, आणि ती जरा थट्टा मस्करीची असली तर ह्यानें पोट धरधरून हांसावें, पण तीच जर खरी असली तर ती एकाग्रचित्तानें ऐकावी. दुसऱ्या मुलांस त्याच गोष्टी पुन्हां पुन्हां सांगितल्या, तरी चालतें; पण ह्याला तें अगदीं खपत नसे. हा लहानपणीं जरी अगदीं वशा असे आणि आपली खोली सोडून इकडे तिकडे जात नसे, तरी त्यास रोगराई अगदीं नव्हती आणि तो फार शांत असे. ह्याच्या वयाच्या पांचव्या वर्षीं एके दिवशीं हा आपल्या छोट्याशा बिछान्यावर बसून मोठ्या गंभीर मुद्रेनें एका नकाशाकडे अगदीं निरखून पहात आहे, व बिछान्यावर आणि आजूबाजूस जमीनीवरही पुस्तकें पडलीं आहेत अशा स्थितींत एका गृहस्थानें ह्यास पाहिलें व तो ह्मणाला, हा लिव्हिपट येथील तत्ववेत्त्यासारखा दिसतो. हा गृहस्थ जोसेफच्या आईचा चुलतभाऊ असून तो तोफखान्यावरचा कामगार होता, व ह्यावेळीं तो आपल्या बहिणीस भेटण्यासाठीं जिनोआ येथें आला होता. त्यास हा सर्व प्रकार पाहून जें पराकाष्ठेचें कौ-

तुक वाटलें, तें, दोन वर्षांनंतर मराया हिनें आपल्या भावास जेव्हां कशा प्रकारचें शिक्षण द्यावें ह्मणून पत्रद्वारें विचारिलें, तेव्हां त्यानें दिलेल्या उत्तरावरून स्पष्ट होतें. हे सर गोलंदाजही विलक्षण बुद्धीचे असावे. नाहींपेक्षां ज्याच्या ओंठावरचा जार देखील अद्याप सुकला नव्हता, असा मुलगा पुढें इतका विद्वान् निवेल हें त्यांस असें तंतोतंत कळलें नसतें. ह्या भविष्यवाची लेखांत हे गृहस्थ ह्मणतात ' ताई, मी तुला खरेंच सांगतों कीं, माझा भाचा विद्येनें प्रतिसूर्य होईल, आणि आपल्या तेजानें युरोपखंडांतील सर्व पंडितांचे हा डोळे दिपवून टाकील. सवत्र सर्व लोकांनीं असें समजावें कीं, हा एक ठेवाच आपल्यास लाधला आहे. ह्या मुलास जी अलौकिक बुद्धीची जोड देवानें दिली आहे, तिचा सत्कारणीं उपयोग होईल अशी तजवीज ठेवणें ह्यांत सर्वांचें हित आहे. आपल्या शतकाचें नांव अजरामर करण्यासाठीं नररत्नें निर्माण होत असतात, आणि तीं आपले पराक्रम पाळण्यांतच दाखवितात. व ह्मणूनच पाहिजे त्या आपत्ति सोडून असल्या मुलांस विद्याविभूषित करणें हें आपलें काम आहे ' त्याच पत्रांतील पुढल्या मजकुरांत हे साहेब ह्मणतात, हा मुलगा स्मरणाचा फार धड आहे, व ह्याची ग्रहणशक्ति ही फार चांगली आहे, ह्मणून कोणत्या विषयांचा अभ्यास त्याच्याकडून करविला असतां ह्या दोन्ही शक्तींचा चांगला विकास होईल त्या विषयांचीं त्यांचीं नांवें दिलीं आहेत. पुढें हे ह्मणतात कीं, ' ह्या मुलास उपजतच व्यासंगाची अशी काय आवड आहे कीं, ह्यानें एक विषय संपवून दुसऱ्याकडे, व त्याकडून तिसऱ्याकडे, अशा भराभर उड्या मारल्या तरी ह्याच्या मनांत मुळींच घोंटाळा व्हावयाचा नाहीं, व ह्याच्या स्मरणशक्तीस भार व्हावयाची भीति नाहीं. ह्या पत्रांतील शेवटचा जो मजकूर आहे तो तर जणूं भविष्य जाणून लिहून ठेवल्यासारखा आहे. ' ह्या मुलास खरें ज्ञानच संपादन करूं दे. ज्यांत नुसत्या उपपत्ति किंवा ग्रंथकर्त्यांचीं नुसतीं मतें असतील अशीं पुस्तकें ह्याच्या हातीं देऊं नको. ' असा बहिणीस उपदेश करून शेवटीं हे गृहस्थ ह्मणतात, ' उपपत्ति व मतें ह्यांत बऱ्या वाइटाची निवड हा आपली आपण करून घेईल, अथवा क्रमक्रमानें हा नवीन मतांचें स्थापनही करील. '

ज्या पत्रांत भाकित केलेल्या गोष्टी अक्षरशः घडून आल्या, त्याची मिती ' पेन्हिया आगष्ट २८ सन १८११ ' ही आहे.

माझीनी ह्याचे आरंभीचे शिक्षक एक वृद्ध पाद्री गृहस्थ होते, ते ह्यास नांवाला सर्व कांहीं शिकवीत होते, पण खरोखर त्यांनीं लातिन भाषा मात्र शिकविली. ह्यास वाचण्याची हौस विलक्षण होती. युरोपांतील अर्वाचीन भाषा ह्यास सहज अवगत झाल्या. कोणतेंही पुस्तक ह्याच्या हातीं पडलें कीं पुरे, कीं त्यांत जें कांहीं असेल तें ह्यास आलेंच; असें असल्यानें ह्यास पुष्कळ शिक्षकांची गरजच पडली नाहीं. माझीनी अगदीं लहान असतां तो, मला आपल्या वडिलांच्या पुस्तकामागें फ्रेंच लोकांच्या राज्यक्रांतीसंबंधाचे राजकीय व नास्तिक प्रकरणांचे ग्रंथ सांपडले, आणि ते मीं फारच आधाशी-पणानें वांचले ह्मणून नेहमीं सांगत असे. ह्याच्या वयाच्या तेराव्या वर्षीं ह्यास जिनोआ येथील विश्वविद्यालयांत पाठविण्यांत आलें. ह्याच्या सहाध्यायानें माझीनीसंबंधाचें त्या काळचें आपलें मत असें लिहून ठेविलें आहे. ' जोसेफ हा तात्विक प्रश्नांसंबंधानें वादविवाद करण्यांत फार कुशल होता, ह्मणून त्याच्या बरोबरच्या विद्यार्थ्यांत त्याची फार चाहा असे, व ते ह्यास फार मान देत असत. त्या काळीं पाठशाळांतील विद्यार्थ्यांस लवण-भंजन, ताजीम व तवाजीम, हीं फार करावीं लागत असत; व तीं ह्यास करितां येईनात ह्मणून म्हणा, किंवा ह्यास आवडत नसत ह्मणून म्हणा, पण अध्यापक लोकांकडून ह्यास वारंवार उपद्रव होत असे. शाळेंतील क्रमिक विषय सर्व शिकून, खाजगी रीतीनें, गणितशास्त्र, संगीत, इंग्रजी भाषा, व दांडपट्टा, इतक्या विषयांचा अभ्यास तो करीत असे. त्यानें कोणतीही गोष्ट करावयाचें मनांत आणलें कीं पुरे, ती त्यास साध्य झालीच समजा; असें असल्यानें हा सर्व गोष्टी फारच अल्प प्रयासानें शिकला. लहानपणीं हा फार अशक्त असे, पण जों जों ह्याच्या बुद्धीचा विकास होऊं लागला तों तों ह्याचें शरीरही बळावत चाललें. व मानसिक श्रमानें ह्याच्या शरी-रावर वाईट परिणाम न घडतां उलटा फायदाच झाला.

ह्याच्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांवर ह्याची पराकाष्टेची छाप असे, आणि हा ह्मणेल तें करण्यास ते एक पायावर तयार असत. हा स्वभावानें फार सुशील, व जीवाला जीव देणारा आणि उदार असे. जर एकाद्या विद्यार्थ्यास कोणीं दुखविलें, तर हा लागलीच त्याचा कैवार घेऊन त्याचा बचाव करी,

[library stamp]

मग तो गुन्हेगार कोणी विद्यार्थी असो किंवा अध्यापक असो अशी ह्याची न्यायप्रियता असे. ह्या सर्व गुणांमुळे हा फार लोकप्रिय होता. ह्याची रहाणी साधी व बाताबेताची असे. त्यामुळे ह्याला स्वतःला ठाकुरकीनें राहून आपल्या स्नेह्यासोबत्यांच्या गरजा करितां येत असत. हा किंचित् फाजील उदार होता असें म्हटलें तरी चालेल. कारण हा पुस्तकें किंवा पैसेच देऊन रहात असे असें नाहीं, तर आपल्या गरीब सहाध्यायांस आपले कपडे देखील देऊन टाकी. ह्याचा* पोशाख साधा असे, आणि ह्याला लहानपणापासून काळा पोशाख करण्याची संवय लागली ती पुढें मोठेपणींही सुटली नाहीं.

माझीनी ह्याचा स्वाभाविक कल भाषेचा अभ्यास करण्याकडे असे. हा तेरा वर्षांचा झाला तेव्हां ह्यानें कांहीं निबंध लिहिले, ते साव्होना येथील विद्वत्परिषदेनें नांवाजले, व त्या सभेनें ह्यास सभासद नेमिलें, पण हा निबंधकार तेरा वर्षांचें अर्भक असेल असें त्यांच्या गांवींही नव्हतें. त्याचा पहिला व खऱ्या महत्वाचा ग्रंथ ह्मटला ह्मणजे एका युरोपीय भाषेंतील ग्रंथसंग्रहावर निबंध हा होय. ह्याच्या ज्या निग्रहावरून व विचारांवरून, इताली देशास एकीचा उपदेश करण्यासाठीं ईश्वरानें धाडिलेला हा प्रेषित

---

* स्वचरित्राविषयीं माझीनिचे हातचे लेख फार थोडे आहेत. आणि स्मिथ् व एल्डर ह्यांनीं छापलेल्या ह्याच्या चरित्रांत व ग्रंथांत जे थोडेबहुत आढळतात त्यांत ह्याच्या पोशाखाविषयीं असा उल्लेख आहे कीं, 'मी फार लहान असतांनाच, व जेव्हांपासून माझ्या मनांत अशी कल्पना भरली कीं इतालीयन लोक एकी करून जर आपलें कर्तव्य करूं लागतील तर परकीयांच्या गुलामगिरी पासून ते सुटतील, तेव्हांपासून ही संवय ( काळा पोशाख करण्याची ) मला लागली.' तो म्हणतो, 'आपल्या देशाची सुटका कोणत्या रीतीनें करावी ह्याची जेव्हां मला कल्पना देखील करतां येईना, मग हातानें तें करण्याचें दूरच राहिलें, तेव्हां माझी कंबर अगदीं खचली. माझे सहाध्यायी आपापले कामांत अगदीं चूर असत, आणि जिकडे तिकडे धूम गर्दी असे, अशा वेळीं मी मात्र अगदीं खिन्न आणि चिंताक्रांत असें. जणूं कांहीं एकदम मला साठावें वर्ष लागलें, असें दिसे. आपलें स्वातंत्र्यकुंकूं हरपलें, आणि आपण वैधव्यडोहांत बुडालों आहोंत असें माझ्या पोर विचारास वाटे, व तेवढ्यासाठीं मीं काळा पोशाख ( पाश्चात्य रीतीप्रमाणें, अशौच दर्शक ) करण्याचा निश्चय केला. ही गोष्ट एवढ्या थरास जाऊन पोंचली कीं, हा आत्महत्या करितो कीं काय, अशी माझ्या आईस धास्ती पडली.

दूत आहे, व युरोपांतील सर्व लोकांच्या भावि साम्राज्याची ही आकाशवाणी आहे, असें लोक ह्मणूं लागले, ते विचार व निग्रह या ग्रंथांत बीजरूपानें दृष्टीस पडतात. पूर्वी निर्दिष्ट केलेल्या आत्मचरित्रटिपणांत हा म्हणतो, 'भाषेचा व्यासंग मला सोडावा लागला, ही माझी फार मोठी हानि झाली.' हजारों ऐतिहासिक नाटकें व कादंबऱ्या ह्यांचे कल्पनाकल्लोळ माझ्या मनांत उभे रहात असत, व उदास आणि विविक्त झालेल्या पुरुषाचें अंतःकरणास एकाद्या रमणीचें मधुर दर्शन जसें अमृतसेकाप्रमाणें आल्हाददायी होतें, तसें हे तरंग माझें मन मोहित करून सोडीत. त्या वेळच्या कालदेशवर्तमानास अनुसरून व स्वदेशाच्या निकृष्टावस्थेची लाज वाटूं लागून मला राजकीय भानगडींत शिरावें लागलें, परंतु वस्तुतः माझ्या मनाचा कल तिकडे मुळींच नसे.'

ज्यास लहानपणींच इतकें कळूं लागलें होतें, त्याच्या मनांत देशाभिमानाची कल्पना प्रथम केव्हां आली हें शोधून काढणें दुरापास्त आहे. आपल्या देशाची दुर्दशा आणि गुलामगिरी पाहून आधींच पुष्कळ वेळां ह्याचे अंगावर कांटा उभा राहिला असेल ह्यांत संशय नाहीं. तथापि माझीनी म्हणतो, जेव्हां जिनोआ येथें दोघां बंडवाल्यांस फांशीं दिलें, आणि सन १८२१ सालच्या फितुराबद्दल हद्दपार केलेल्या लोकांसाठीं जेव्हां त्याच शहरीं भररस्त्यांत वर्गणी गोळा करण्यांत आली, तेव्हांपासून आपल्या मनास इतालीच्या स्वातंत्र्याविषयींची आकांक्षा माहीत झाली. पांच वर्षें विश्वविद्यालयांत राहून उपपद घेतल्यानंतर माझीनीस वकीलीची सनद मिळाली. हा दिवस त्याचे आईबापांस मोठा सुदिन वाटला. कारण त्यांस वाटे कीं, सरस्वतीचा वरदहस्त आपल्या मुलाच्या मस्तकीं आहे त्यामुळें त्याचा धंदा फार चांगला चालेल. माझीनी स्वतः अगदीं खिन्न व खट्टू झाला. त्यानें पूर्वींच आपल्या मनाशीं निश्चय करून ठेविला होता कीं, आपलें आयुष्य देशास ऊर्जित दशेंत आणण्यांत घालवावयाचें, व वकिलीचा धंदा करावयाचा नाहीं. ह्मणून आईबापांच्या आशेचा मोड होईल हा विचार मनांत येऊन त्यास दुःख वाटे.

त्यावेळीं इतालींतील वकिलांस पहिलीं दोन वर्षे नादार कोडतांत काम करावें लागे, व तेथें गरीब दुबळ्या लोकांचे खटले फुकट चालवावे लागत. ह्यानें हें काम थोडकेच दिवस केलें, परंतु तेवढ्यांत ह्याची कीर्ति चहूंकडे

पसरली. कारण हा हातीं घेतलेल्या कामांतील बारीकसारीक आणि कधीं कधीं कंटाळवाण्या होणाऱ्या गोष्टी देखील शांतपणानें आणि लक्षपूर्वक करी, व आपल्या गरीब अशीलांचीं कामें मनोभावें करीत असे. खटला चालवितेवेळीं ह्याची प्रमाणसरणि फार चांगली असे; ह्याची वक्तृत्वशक्ति अगाध असून त्याचे अंगीं समयसूचकता चांगली असे, व प्रसंगोपात हंशा पिकविण्याची विद्याही ह्यास चांगली साधली होती. हा अगदीं काटकोळा व पोरवय दिसे, त्यामुळें लोक ह्याला 'पोर वकील' असें ह्मणत असत. ह्याची यशस्विता उत्साह आणि दया ह्यांविषयीं असा लौकिक होता कीं, प्रत्येक नादाराचा, आपल्यातर्फे पोर वकील नेमण्याचा यत्न असे, व तरच त्यास खटला जिंकण्याची आशा वाटे.

ह्या सुमारास माझीनी एक कारबोनारी नांवाची गुप्त मंडळी असे, तींत शिरला होता. ह्या सभेंत त्यास एका हेरानें प्रविष्ट केलें, व विश्वासघात करून पुढें ह्याचें नांव जाहीर केलें. हा एवढा लहान होता, तरी खांद्यावर तरवार ठेवणें, सर्वांनीं मद्यप्राशन करणें, वगैरे टोळींत शिरण्याचे जे प्रवेशक समारंभ, ते ह्यास केवळ चावटपणाचे दिसून आले. व ते चालू असतांना ह्यास भीति तर वाटली नाहींच, परंतु पराकाष्ठेचें हंसूं कोसळलें, व तें त्यानें मोठ्या प्रयासानें दाबलें. हें सर्व सव्यापसव्य आटोपल्यानंतर त्या सभेविषयीं त्यानें विचार केला, तेव्हां त्यास दिसून आलें कीं, आपल्यास जी शपथ देण्यांत आली होती, तींत फक्त प्रमुखाची आज्ञा पाळण्याचें बंधन असून, सरकाराशीं लढाई करावयाचा जो तिचा मुख्य उद्देश आणि इतिकर्तव्यता, त्यांविषयीं त्या शपथेंत अवाक्षरही नाहीं. हें समजून आल्यावर त्यास फार आश्चर्य वाटलें. व त्या मंडळीविषयीं किंचित् बेभरंवसाही उत्पन्न झाला. सन १८२०-२१ सालचीं बंडें निष्फळ कां झालीं, याविषयीं विचार करतांना कारबोनारी मंडळीच्या मतांविषयीं त्यास बरीच माहिती झाली होती. माझीनीस त्यांचा तो गौप्याचा प्रकार व खुणा मुद्रा मुळींच आवडल्या नाहींत. त्यास असेंही दिसून आलें कीं, आपल्या देशाचें स्वातंत्र्य अशा प्रकारें मिळवावयाचें, त्यासंबंधानें त्या मंडळीचा कांहींच सिद्धांत ठरला नव्हता. परंतु माझीनीच्या अंगीं त्या वेळीं आपण स्वतः होऊन एकादी सभा स्थापन करण्याचें सामर्थ्य नव्हतें. असल्या मंडळ्यांचें महत्व त्यास ठाऊक होतें.

व कारबोनारीचे अंगीं त्यास एक सद्गुण दिसून आला होता. तो हा कीं, जरी ह्या मंडळीच्यानें इतली देश स्वतंत्र करण्याचें काम कधींच तडीस गेलें नसतें (व हा ह्या सभेचा उद्दिष्ट हेतु होता), तथापि तींतील लोकांचा असा कृत निश्चय झाला होता कीं, मनीं मांडे खात न बसतां हातानें कांहीं तरी कृति करून दाखवावयाची. ह्या मंडळींतील लोकांस फांशीच्या किंवा बहिष्काराच्या शिक्षेची पर्वा नसे. ह्यांनीं आपलें शिर नेहमीं तळहातावर घेतलेलें असे. एक जाळें मोडलें नाहीं, तोंच दुसरें विणण्यास जसा कोळी सुरवात करीतो, त्याप्रमाणें ह्यांचा एक यत्न फसला तर दुसरा करण्यास हे निरंतर सिद्ध असत. माझीनी ह्मणतो 'एवढ्याच गुणांमुळें मी त्या मंडळींत शिरलों आणि आपलें कायावाचामन तीस अर्पण केलें. हें काम करण्यांत माझे काळयाचे पांढरे झाले आहेत. आणि इतक्या दिवसांच्या अनुभवावरून मी सांगतों कीं, लोकांस बिनचूक मार्ग दाखविणें हें काम अत्यंत दुर्घट खरेंच, पण, पुढाऱ्यापासून केव्हां व कशा रीतीनें जावें, हें समजणें ही त्याच्या खालोखाल कठिण आहे. वरील माझें ह्मणणें वऱ्याचा रस्ता दाखविणाऱ्याचें अनुकरण ककरण्यासंबंधाचें आहे. ते तरुण लोक आपल्या अहंपणाच्या तोऱ्यांत राहून कोणत्याच मंडळीस किंवा पक्षांस मिळत नाहींत—इतलींत काय आणि इतर देशांत काय अशीच संख्या फार मोठी असते.—ते एकादा पक्ष प्रबळ होऊन राजसत्तेचीं सूत्रें त्याच्या हातीं आलीं कीं लागलीच त्याचे पायावर लोटांगणें घालून त्याचे गुलाम बनतात. फ्रान्सदेशांत नुकत्याच झालेल्या राज्यक्रांतीचे इतिहासास हे शब्द किती अक्षरशः लागू पडतात!!

माझीनीची ह्या वेळीं ऐपत फार थोडी असे, व तिच्या मानानें सभेच्या वर्गणीचें ओझें फार मोठें होतें, तथापि तो ह्मणे त्यांत कांहीं वावगें नाहीं. माझीनीचे ह्यासंबंधाचे उद्गार मोठे लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. कारण अमुक सुधारणा झाली पाहिजे, तमुक सुधारणा झाली पाहिजे, असें तोंडानें ह्मणणारे लोक पुष्कळ असतात; पण ती करण्याचे कामीं ह्यांचे पदरास खार लागण्याची जरा पाळी आली कीं, ह्या मंडळींनें पिछेहाट केलीच समजा. माझीनी ह्मणतो वाईटकामासाठीं पैसे उकळणें मोठें पाप आहे, परंतु सत्कार्यास मदत होण्याचा संभव असतां

द्रव्यद्वारा साह्य देण्याचे कामीं हात आंखडणें हें त्याहून ही मोठें पाप आहे. अलीकडे लोकांत जी शहाणपणाची घमेंड चहूंकडे माजली आहे, तिचें फार दुःखदायक चिन्ह हें कीं, एक कवडी देतांना त्यांचे कंठीं प्राण येतात, व तिजसाठीं ते हवा तेवढा वितंडवाद घालतात. पण स्वतःच्या चैनीसाठीं आणि सुखांसाठीं ते लाखो रुपयांचा फन्ना करितात, व तीही सुखें खरीं नसून बहुतेक काल्पनिकच असतात. आपल्या देशास स्वातंत्र्याचा ठेवा मिळवून देऊन त्याचें नांव राखण्याचें काम जर आपल्या रक्ताचें आणि मांसाचें नाणें पाडल्यानें होईल, तर तींही देण्यास ज्या लोकांनीं एका पायावर तयार असलें पाहिजे, ते हे लोक वारंवार पैसे कोठून द्यावे असें ह्मणून तोंडें वेंगाडतात, आणि आपले व आपल्या देशबांधवाचे प्राण, अब्रू व मान हीं नायनाट झालीं तरी बेहत्तर, पण थैलीचा बंद ढिला व्हावयाचा नाहीं. असा ह्यांचा कृतनिश्चय आहे. "

कारबोनारी मंडळीच्या संबंधानें माझीनीच्या मनांत जो असंतोष उत्पन्न झाला त्याचे मुख्य कारण हें कीं, आपण आपलें स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न करण्यास हे इतालियन लोकांस जागृत करीत नसत, तर इतली स्वतंत्र करण्याचा सर्वस्वीं हावाला फ्रान्स देशावर टाकून हे बसले होते. ह्या वेळीं दहावा चार्लस् राजा आणि त्याची पार्लमेंट ह्यांजमधील विरोध फारच निकरावर येऊन ठेपला होता, आणि त्यामुळें इ० स० १८३० चा दंगा झाला. कारबोनारी मंडळांस वाटे कीं, गिझाट, बरदे, लाफायटी, वगैरे लोकांकडून आपलें सर्व काम होईल. त्या तसल्या वेळींही माझीनी ह्याच्या मनाचा पक्का निश्चय झाला होता कीं, ज्या देशास स्वतःची स्वतंत्रता स्वतःस मिळवितां येत नाहीं, त्यास ती मिळूनही उपयोग नाहीं.

फ्रेंच लोकांच्या १८३० सालच्या राज्यक्रांतीनंतर लवकरच कारबोनारी सभेच्या प्रमुखांनीं माझीनी ह्यास एक लहानसें काम सांगितलें होतें. तें बजाविण्यासाठीं हा आपलें घर सोडणार, तोंच ह्यास दुःस्वप्न पडलें कीं, कोणीतरी आपलें नांव फोडून विश्वासघात करणार. ह्मणून त्यानें आपल्या कटांतील लोकांशीं अंतस्थ रीतीनें पत्रव्यवहार करण्याची अशी व्यवस्था केली कीं, वास्तविक राजकीय कामाचीं, परंतु बाह्यतः खाजगी

दिसणारीं पत्रें, ह्यानें आपल्या आईकडे पाठवावीं, व तिनें तीं ज्यांचीं त्यांस पोंचवावीं. ही नजर पोंचवून केलेली व्यवस्था फार उपयोगी पडली. कारण पीडमांट व सार्डिनिया येथील राजाच्या पोलिसानें ह्यास लवकरच पकडलें. स्वदेशभक्तिरूप महापातक करणाऱ्यास आस्ट्रियाच्या खालसा अमलांतील मुलखांत जितकें भय असे, तितकेंच पीडमांटच्या मांडलिक राजाच्या मुलकांतही असे! घर सोडतेवेळीं जरी तिघांजणांस शिक्षा होण्याइतक्या कागदपत्रांच्या पुराव्यानिशीं ह्यास पकडलें, तथापि ह्यानें मोठ्या धैर्यानें बाकीच्या लोकांसंबंधाचा पुरावा नाहींसा केला. ह्याच्या सर्व आयुष्यक्रमांत आपत्कालीं ह्याचें असेंच विलक्षण धैर्य दिसून येतें. पश्चिम रिव्हेरामधील साव्होना नांवाच्या किल्ल्यांत ह्यास प्रतिबंधांत ठेवण्यांत आलें होतें. माझीनीचा बाप तावडतोब आपल्या मुलावर कोणता आरोप आला आहे त्याची विचारपूस करण्यासाठीं जिनोआ येथील गव्हरनराकडे गेला. तेव्हां त्यास उत्तर मिळालें कीं, आपले चिरंजीव हे मोठे हुशार व तरुण गृहस्थ आहेत; त्यांस रात्रीं एकांतांत फेर फटका करण्याचा फार शोक आहे व ह्याच्या मनांत घोळत असलेले विचार कधीं कोणास कळत नाहींत. असले हुशार आणि गुप्त रीतीनें खलबतें करणारें लोक सरकारांस मुळींच आवडत नाहींत." ईश्वरनिर्मित मानवी प्राण्यांतील न्यूनाधिक भाव हा, राजसत्ता राज्याच्या किंवा वडे लोकांच्या हातीं असणें हा राज्यव्यवस्थेचा पाया आहे. व अशा प्रकारच्या सरकारांस जेव्हां तरुण व विद्वान लोकांच्या खलबतांची भीति वाटूं लागते तेव्हां त्यांचे ठिकाणीं शहाणपणा आणि दीर्घदृष्टि आहे असें ह्मणावयाचें.

साव्होना किल्ल्याच्या शेवटल्या मजल्यावर माझीनी ह्याची कोठडी होती. तो ह्मणतो, 'तेथून मला समुद्र दिसे आणि तेणेंकरून फार बरें वाटे. आकाश आणि समुद्र हीं विश्वचालकाच्या अगाध लीलेचीं प्रमाणें आहेत. आणि आल्पस पर्वत खेरीज करून जगामध्यें असल्या प्रचंड व भव्य वस्तूही नाहींत. जेव्हां मी आपल्या कोठडीच्या गज मारलेल्या लहानशा खिडकीच्या तोंडाशीं उभा राही तेव्हां हीं दोन्हीं माझ्या समोर असत. मला जमीन दिसत नसे पण वारा जेव्हां माझ्या दिशेनें वाही तेव्हां बीचवर लोकांचे आवाज माझ्या कानीं येत असत. एक जातीचा एक पक्षी ह्याचा तुरुंगांतील सोबती झाला होता; माझीनीचें त्याच्यावर

फार प्रेम असे. सर्व मुक्या जनावरांवर आणि त्यांतही पक्ष्यांवर ह्याची स्वभावतःच फार प्रीति असे. फिरतां फिरतां ह्याचा कोठेंही कांहीं महिने मुक्काम झाला कीं, लागलीच ह्याच्याभोंवती पक्षी जमूं लागत, व इतके धिटावत कीं, ते ह्याच्या खोलींत इकडे तिकडे उडून ह्याच्या पुस्तकांवर चोंचा मारीत आणि ह्याचे कागदपत्र देखील ओढीत; पण हा त्यांस कधींही हांकलीत नसे. अटकेंत पडल्यावर सुमारें एक महिनापावेतों ह्यास पुस्तकें मिळालीं नाहींत, परंतु पुढें ह्यानें एक बायबल व टासिटस आणि बायरन ह्यांचे ग्रंथ मिळविले. पूर्वीं लिहिलेल्या अंतस्थ पत्रव्यवस्थेच्या द्वारें ह्याच्या मित्रांकडून ह्यास असें कळलें कीं, आपण पकडले गेल्यामुळें कारबोनारी मंडळीची अगदीं पांचावर धारण बसली आहे. त्या लोकांस धीर देऊन पाणी चढविण्यासाठीं ह्यानें पुष्कळ श्रम केले, परंतु ते सर्व व्यर्थ गेले. शेवटीं त्याची खात्री झाली कीं, ह्या रडतराव मंडळीस घोड्यावर बसविण्यामध्यें आपला वेळ व श्रम दवडविण्यांत कांहीं अर्थ नाहीं; तर आपणच एक नवीन मंडळी निराळ्या धर्तीवर स्थापन करावी.

कैदेंत पडल्या दिवसापासून माझीनी हा धर्मसंबंधीं आणि लोकसत्ताक राज्यासंबंधीं उपदेश करूं लागला, असें म्हटलें तरी चालेल. कारण पुढें ‘ अभिनव इतली ’ नांवाची मंडळी ह्यानें स्थापन केली, तिची प्रथम कल्पना ह्याचे मनांत येथें आली. हल्लीं असलेल्या इतलीचे राज्याच्या इमारतीचा ही मंडळी पाया आहे; एवढेंच नव्हे तर लोकसत्ताक राज्य झाल्यास, हल्लींची ओबडधोबड रचना ढांसळून लोकांच्या खऱ्या स्वातंत्र्याची व एकीची जी इमारत बांधली जाणार, तीही ह्याच पायावर, असें पुढील कालांत सिद्ध होईल. उत्तरोत्तर उन्नतस्थितीस पोंचणाऱ्या, व ज्यानें आपल्या भल्यासाठीं जिवापाड परिश्रम केले त्याचे आपण कांहीं उतराई झालों नाहीं म्हणून पश्चात्ताप पावलेल्या, इतली देशांत लोकसत्ताक राज्य केव्हांना केव्हां तरी होईल. परंतु त्या देशाचें खरोखर दास्यविमोचन ज्यानें केलें, त्याच्या मात्र कपाळीं हा सुदिन बघण्याचें लिहिलें नव्हतें. हा सुदिन जेव्हां उगवेल, तेव्हां मात्र माझीनीच्या विलक्षण बुद्धीचें लोकांस आश्चर्य वाटूं लागेल, व आपणास हें सुखाचें निधान प्राप्त करून देणाऱ्यास ते देव्हाऱ्यांत मांडतील.

ह्या अटकेंत पडला होता, तरीही वर लिहिल्याप्रमाणें आकाश आणि पृथ्वी ह्यांजकडे पाहून त्यास सृष्टिकर्त्याच्या अगम्य लीलेची नेहमी आठवण होत असे. इतली देश स्वतंत्र करावयाचा आपला इष्ट हेतु कारबोनारी मंडळीच्या द्वारें साध्य होण्यासारखा नसल्यानें ती मंडळी मोडून टाकून, जी नवीन मंडळी स्थापन करावयाची, ती कोणत्या धार्मिक आणि नैतिक तत्वांवर असावी, ह्याविषयीं माझीनीनें कैदेंत असतां फार गहन विचार केला. ह्यावेळीं इतली देश निरनिराळ्या सहा मांडलिक राजांमध्यें वांटलेला असून, हे राजे कधीं कधीं आपसांतच कलह करीत. सर्वत्र रोमन क्याथोलिक धर्म चालू होता. त्याचें स्वरूप धर्मभोळेपणाच्या आणि थोतांडाच्या अगदीं शेंवटल्या पायरीस पोंचलें असून लोक भयंकर अज्ञानांधःकारांत बुडालेले होते, व मानसिक आणि नैतिक सुधारणा म्हणजे काय ह्याची त्यांस कल्पना देखील नव्हती. माझीनीचा विचार होता कीं, ' अभिनव इतली ' ह्या मंडळीचा उद्देश, इतली देश केवळ आस्त्रियाच्या घशांतून काढण्यापुरताच नसावा, तर वर लिहिलेलीं राज्यें मोडून टाकावीं व लोकांस अज्ञानदशेंतून जागें करावें, हाही असावा. ह्या साहस कृत्यांत येणाऱ्या अडचणी व संकटें त्यास पूर्णपणें दिसत होतीं; परंतु स्वतःचें शिर त्यानें तळहातावर घेतलेलें असल्यानें, त्यास संकटांची पर्वा वाटत नव्हती.

ह्या मंडळीची एकजूट राहण्याकरितां हीस कोणतीं बंधनें असावीं, ती स्थापण्याकडे कोणाची योजना करावी, राज्यक्रांति घडवून आणण्यास उद्युक्त असलेल्या युरोपांतील दुसऱ्या मंडळ्यांबरोबर हिचा संबंध ठेवितां येईल कीं नाहीं, ह्या गोष्टींचाही त्यानें फार विचार केला. ह्याच्या सरळ आणि एकमार्गी स्वभावास चोरकट आणि रहस्यें आवडत नसत. परंतु उघड उघड सरकारविरुद्ध खटपट करणाऱ्या मंडळीस आपलीं कृत्यें लपवून ठेवणें अत्यंत आवश्यक असतें. माझीनीनें निश्चय केला कीं, 'अभिनव इतली ' हिचे हेतू व कृतसंकल्प जगजाहीर असावे. प्रमुखांचीं नांवें न सांगतां, ' जे कोणी असतील त्यांच्या आज्ञा पाळूं, ' व काय बेत करावयाचे तेही न कळले, तरी ' जे बेत ठरतील ते सिद्धीस नेऊं ', म्हणून कारबोनारीचा सभासद होतेवेळीं शपथ वाहवून घेण्यांत येत असे. पण तसला गौप्याचा प्रकार 'अभिनव इतली'त असणें माझीनीस पसंत नव्हतें. ह्या नवीन सभेंत शिरतेवेळीं प्रत्येक मनुष्यास असें स्पष्ट दाखवून देण्यांत येई कीं, पाहिजे

तो प्रसंग येवो व हवीं तीं दुःखें भोगावीं लागोत, परंतु तीन गोष्टी करण्यास आपण आपल्यास बांधून घेत आहोंत. त्या ह्या कीं, (१) आपला देश स्वतंत्र करावयाचा, (२) त्यांत सर्वत्र लोकसत्ताक असें एक राज्य स्थापावयाचें, व (३) ह्या दोन गोष्टी तडीस नेतांना कोणत्याही राजाची किंवा दरबारी वकिलाची ( मग ते एतद्देशीय असोत किंवा परदेशीय असोत ) मदत अगदीं घ्यावयाची नाहीं. खरें म्हटलें म्हणजे इतलियन लोकांचें हें कर्तव्यकर्म होतें कीं, प्रसंगीं आपले प्राण व धन ह्यांचे वळी देऊन आपला देश स्वतंत्र करावयाचा, व त्यांत प्रजासत्ताक राज्य स्थापावयाचें. पण ते लोक गाढ झोंपेंत गुंग झाले होते, व त्यांस ह्या गोष्टीचें अगदीं भान नव्हतें. ‘ अभिनव इतली ’ ह्या समाजांतील प्रत्येक व्यक्तीचा हा कृतसंकल्प होणार होता कीं, इतलियन लोकांस त्या झोंपेंतून सावध करून आपलें कर्तव्य करण्याविषयीं त्यांजकडून निश्चय करवावा. माझीनी ह्याचा जहागीरदार, जमीनदार वगैरे बडे लोकांवर विश्वास नव्हता. त्यास वाटे कीं, जें काय होईल तें लोकांच्या हातून होईल. सारांश माझीनीस एक कोडें होऊन पडलें होतें; तें हें कीं, इतलियन लोकांच्या निद्रिस्त झालेल्या स्वाभाविक वृत्ती व त्यांचे मनोधर्म कसे जागृत करावे? इतलियन लोकांच्या अंगीं कर्तव्यज्ञान आहे, व तें करून दाखविण्याकडे त्यांची मनोवृत्ति असते, हें माझीनीस इतिहासाच्या अभ्यासावरून कळून चुकलें होतें, व त्याची मनोदेवताही तशीच लवे. पण त्यांचें मन जागें करण्यास काय उपाय योजावा, ही पंचाईत पडली होती. सर्व युरोपखंडांत ह्यावेळीं कोणासही ही गोष्ट समजली नव्हती कीं, यद्यपि इतलियन लोकांचें मन झोंपीं गेलेलें होतें, तथापि तें महानिद्रावश झालें नव्हतें. ही गोष्ट एकट्या माझीनीस जणू उपजतांच कळून आली होती, आणि एवढ्यावरून त्याची लोकोत्तरबुद्धि स्पष्ट होते. साधारण लोकांस ज्याचा कधींही भास होत नाहीं, असें महातत्वही ह्याच्या लक्ष्यांत येऊन चुकलें होतें; तें हें कीं, आजपर्यंत देशहिताचीं जेवढीं मोठमोठीं कार्यें घडून आलीं आहेत, तीं सर्व सामान्य लोकांतून पुढें सरसावलेल्या माणसांच्या हातून घडलीं आहेत. असल्या लोकांची साधनसामुग्री, म्हणजे स्वतःची अनिवार इच्छा व देवावर हवाला, हीं होत. ह्यांनीं एकदा एकादें काम हातीं घेतलें, म्हणजे ते कसल्याही संकटास जुमानीत नाहींत, व कालाची त्यांस खातर-

जमा नसते. अशा रीतीनें उभारलेलें काम थोडेसें रंगारूपास आलें, म्हणजे मग सधन व वजनदार लोक पुढें सरसावतात. क्वचित् प्रसंगीं अशा कामास ते हातभार लावून तें शेंवटास नेतात; पण बहुधा त्या कामाचा उद्दिष्ट हेतु असतो एक, व त्यास भलत्याच तीरास ते नेऊन लावितात. माझीनीचा निश्चय झाला होता कीं, सर्व देशाची एकी व लोकसत्ताक राज्य ह्या दोहोंशिवाय इतलीचा जीर्णोद्धार होणें नाहीं. म्हणून त्यानें ठरविलें कीं, आपणास जो समाज उभारावयाचा त्याच्या उद्दिष्ट हेतूंत ह्याच दोन गोष्टी असल्या पाहिजेत. तारुण्यांतील स्वाभाविक अविचारयुक्त उत्साहाच्या भरांत त्यानें हा निश्चय केला होता असें नाहीं; तर देशाच्या राजकीय इतिहासाचें व समाजाच्या घटनेचें लक्षपूर्वक मनन करून नंतर त्यानें तो ठरविला होता. सर्व देशांतील महान् तत्त्ववेत्यांचाही असाच सिद्धांत ठरला आहे. ह्या ठिकाणीं, ग्यारिसननें माझीनीच्या स्वदेशभक्तीविषयीं जें म्हटलें आहे त्याचा मी उतारा घेतों. तो म्हणतो, 'माझीनीची देशभक्ति फार कडकडीत व अनन्यभावाची असे; तथापि त्याचा कृतसंकल्प, आपल्या एकट्या देशाचें कल्याण नसून सर्व जगाचें कल्याण, हा असे.'

मुलाचें आपल्या आईवर जितकें प्रेम असेल, त्याहून अधिक असें माझीनीचें स्वदेशावर प्रेम असे. तरीही त्याच्या मनांत हा विचार कधींच आला नाहीं कीं, आपल्या देशांतील एकीचा आळा तुटून त्यावर जुलूम होत आहे व त्याची वाताहत झाली आहे, तर तेवढ्या इतलीचा जीर्णोद्धार करून आपण स्वस्थ बसावें. त्यानें इतली देशासंबंधानें मात्र उद्योग केला; ह्याचें मुख्य कारण हें होतें कीं, इतली देश पुन्हा सर्व जगास नीतिमार्गदर्शक होणार, असा ईशसंकेत असल्याविषयीं त्याची खात्री होती. त्यानें स्वतः म्हटलें आहे कीं, 'ईश्वरी नेमानेम असा दिसतो कीं, इतली देश आपल्या अंगावरील कात टाकून देऊन आपल्यामध्यें जिकडे तिकडे एकी स्थापन करून जगास कित्ता घालून देणार आहे.'

माझीनी ह्याची धर्मश्रद्धाही उत्कृष्ट तऱ्हेची असून ती सर्वभूतात्मक असे. धर्म म्हणजे सृष्ट प्राण्यांची आपल्या स्रष्ट्याकडे धांव होय. अशा धर्मावर माझीनीचा फार विश्वास असे. त्याच्या मतें धर्म अविनाशी असून कालवर्तमानानुसार त्यांत फेरफार होत असतात. एका धर्मांतील अनेक

पंथ ह्याच्या मतें विनाशी आणि पोरखेळ होत ( आणि असल्या पंथांस अलीकडे धर्मसंज्ञा प्राप्त झाली आहे ). पण ह्या सर्व पंथांमध्यें साधारण अंतर्भूत असलेल्या धर्मतत्त्वाविषयीं ( मग तें तत्व सांप्रतकाळीं प्रचलित असो वा नसो ) ह्याची फार पूज्यबुद्धि असे. कारण त्या तत्वानें जगावर अनंत उपकार केले आहेत, असें तो म्हणे. सांप्रत प्रचलित नसलेल्या धर्मास धर्मच नव्हे, असें म्हणणाराची तो फजीती उडवी, व म्हणे कीं, राख निवाल्यावर ती हातास ऊन लागत नाहीं, म्हणून तींत पूर्वी कधीं अग्नि नव्हता, अथवा एकादी काष्ठपाषाणमय मूर्ति नष्ट केली म्हणून ईश्वर नष्ट झाला, असें म्हणण्यासारखें आहे.

माझीनीची स्वदेशभक्ति त्याच्या धर्मश्रद्धेचा साहजिक परिणाम होय. तो म्हणे 'रोम शहराविषयीं पूज्यबुद्धि माझ्या अंगवळणीं पडून गेली आहे'. ह्याचें कारण,आपल्या देशाची ती राजधानी आहे,असला आपलपोटेपणा नव्हे; तर त्यास वाटे कीं, दुसरीं अनेक शहरें असतां, दोन वेळ रोम शहरांत प्रथम धर्मसंस्थापना होऊन त्या धर्माचा प्रसार सर्व युरोपखंडांत झाला, व ती व्यवस्था पुष्कळ शतकें चालून लोकांमध्यें नीतिदृष्ट्या ऐक्य स्थापन झालें, तें काय म्हणून? ह्यावरून रोम शहरचे हातून आणीकही मोठीं कार्यें घडावीं असा ईश्वराचा संकेत आहे, असें त्यास वाटे. त्याच्या मनाचा पक्का सिद्धांत ठरला होता कीं, आजपावेतों चालत असणाऱ्या सर्व धर्मांतील भ्रांतिमूलक व असत्य तत्वें गाळून टाकून, खरीं तेवढीं घेऊन मुशींत ओतून ज्यामध्यें एकवट केलीं आहेत व ज्यामध्यें नवीन धर्मशास्त्र अंतर्भूत झालें आहे, असा नवीन धर्म रोम शहरांत निघून तो सर्व जगभर पसरेल. पोप व आस्त्रियाचे बादशाह ह्यांच्या कचाट्यांतून रोम शहराची सुटका करण्यासाठीं लढणें, म्हणजे केवळ इतलीच्या स्वातंत्र्यासाठीं लढणें नव्हे, तर तें एक धर्मयुद्ध आहे, असें त्याचें मत होतें. माझीनीस वाटे कीं, 'रोम पुनः अशा वैभवास चढेल कीं, त्यापुढें त्याचें गतवैभव कांहींच नाहीं. नवीन धर्माचें आदिपीठ झाल्यामुळें पूर्वीपेक्षां हें क्षेत्र फारच पुण्य व पवित्र होईल; इतलीमध्यें लोकनियत राज्य होईल; इतर देशही त्याचें उदाहरण पाहून स्वतंत्र होतील, व एकमेकांशीं सलोख्यानें वागतील; इतलींतील स्वतंत्र लोक आपापल्या धर्मानें व नीतीनें वागतील, व ती सद्बुद्धि निरंतर रहाण्यास ईश्वरापाशीं प्रार्थना करतील;

व मी ज्यास ह्या युगींचा महामंत्र म्हणतों त्या द्व्यक्षरी **एकी** मंत्राचा उपदेश ते व्यक्तीस नव्हे तर राष्ट्रास करतील. लोक एकीनें वागूं लागले, म्हणजे जिकडे तिकडे समभाव व स्वातंत्र्य पसरून लोकांस ऐहिक सर्व सुखें प्राप्त होऊन अंतीं मोक्षाचीही प्राप्ति होईल.' 'मी अगदीं तरुण असतां जेव्हां माझ्या मनांत कल्पना आली कीं, युरोपखंडाच्या ह्या तृतीय पुनरुज्जीवनाचा आरंभही इतली देशाच्या श्रमामुळें, उत्साहामुळें आणि स्वार्थपराङ्मुखतेमुळें होणार, तेव्हां मला असें वाटलें कीं, जणू आतांच रोमशहरच्या लोकांचे ध्वनी माझ्या कानीं पडूं लागले आहेत; व ते मोठ्या गंभीरपणानें सर्व राष्ट्रांस एका धर्माचा, नीतीचा व एकीचा उपदेश करीत आहेत, व तीं राष्ट्रें मोठ्या नम्रतेनें हा उपदेश कर्णद्वारें घटाघट पीत आहेत. मला वाटलें कीं, रोम शहर प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांपुढें उभें आहे; आणि प्रजासत्ताक इतलीच्या वतीनें, ईशेच्छेस अनुसरून, ज्यास प्रजेचे हक्क म्हणतात तें शुष्क पातडें एकीकडे ठेवून, मानवी-जातीच्या प्रक्रमणास अनुकूल, अशा उदात्त राजनीतितत्वांचें तें प्रतिपादन करीत आहे; व सर्वसामान्य पुरुषार्थाचीं आणि नवीन धर्माचीं तत्वें प्रकाशित करीत आहे. सर्व यूरोपखंड हात जोडून उभें आहे, आणि त्यास अहंकार, नास्तिक्य व झोंटिंगपादशाही ह्यांचा वीट आला आहे, व तें वर लिहिलेलीं नवीं तत्वें मोठ्या आनंदानें स्वीकारून टाळ्यांचा गजर करीत आहे: असे विचार साव्होना येथील किल्ल्यांतील कोठडींत माझ्या मनांत येत असत.' याप्रमाणें माझीनी यानें आपल्या ग्रंथांत लिहून ठेविलें आहे. त्याच ग्रंथांतील पुढच्या पानावर तो खिन्न होऊन म्हणतो 'माझ्या मानससृष्टींत स्वदेशाविषयीं जें हें गोड स्वप्न दिसलें, त्यांतलें माझ्या हयातींत खरें व्हावयाचें नाहीं; आणि जरी तें कदाचित् खरें झालें (व मला वाटतें तसें होईल) तथापि त्यावेळीं माझी माती मातीशीं मिळालेली असेल'; तथापि पुढें तो लिहितो 'साव्होना येथील कोठडीएवढ्याच ह्या खोलींत ह्या ओळी लिहीत असतां देखील माझ्या मनांत तेच विचार येत आहेत. पण आतां मात्र ते पूर्वीप्रमाणें स्वप्नमय नसून साधार व सप्रमाण आहेत. ह्या असल्या विचारांमुळें मला माझ्या हयातींत वेडा पीर, मनोराज्यविहारी, अशीं टोपण नांवें मिळालीं आहेत. इतकेंच करून लोक राहिले नाहींत. त्यांनीं मला कधीं कधीं खरपूस मार देऊनही त्या

मनोराज्यांतून जागें केलें आहे. मला आतां असें वाटूं लागलें आहे कीं, माझ्या आयुष्याचा राहिलेला अर्ध घटका दिवस जर साव्होना येथील कोठडींत, कीं जेथें मनुष्यांचें वारें नाहीं अशा ठिकाणीं, आकाश आणि समुद्र ह्यांचेसन्निध घालवितां येईल तर किती मजा होईल? मी त्या प्रतिबंधांतून मोकळाच झालों नसतों तरी बरें होतें.'

चाळीस वर्षांनंतर गीटा येथील तुरुंगांतल्या खोलींतही त्याच्या मनांत हेच विचार घोळत होते. त्या तुरुंगांतून सुटका होण्यापूर्वी कांहीं घटका मला त्यानें सांगितलें 'येथून इंग्लंडास परत जातांना मी रोम शहरावरून जाणार नाहीं. राजसंस्थेनें विटाळलेल्या त्या रोम शहरांत माझ्यानें पाऊल तरी कसें टाकवेल?'

ह्या पिढींतल्या इतलियन लोकांस ह्या शब्दांची लाज वाटत आहे, असें ते करून दाखवोत व हा कालिमा ते धुवून टाकोत.

# भाग २ रा.

## काळें पाणी, अभिनव इतली.

### सन १८३१ पासून १८३६ पर्यंत.

सहा महिने अटकेंत ठेविल्यानंतर माझीनी ह्यास हद्दपार करण्यांत आलें; व तो फ्रान्स देशांत गेला. ह्यावेळेपासून तो म्हणतो 'माझ्या देशनिष्कासरूपी घोर दुर्गतीस प्रारंभ झाला. हिच्या ज्या भयंकर वेदना व यातना आहेत त्या, जो साक्षात् भोगीत असेल, त्यासच माहिती. किंबहुना हा एक शरिरास भिरड भुंगाच लागतो, आणि ह्यांतून सुटका मृत्यूनें मात्र होते.' ह्यावेळीं फ्रान्समध्यें दुसरेही पुष्कळ हद्दपार केलेले लोक होते. परंतु इतली देशांत एकी होईल किंवा निदान तसें होणें इष्ट आहे, असें समजणारा तितक्या लोकांत एकही नव्हता. इतकेंच नव्हे, तर ते आपल्या मनांत अशा कल्पना रचीत होते कीं, सर्व युरोपखंडाच्या पायांतली बेडी फ्रान्स देश तोडून टाकील. ह्या लोकांची आणि त्यांनीं मोडून टाकण्याचा प्रयत्न केलेल्या सरकारांची राजनीति पाहून माझीनीस फार दुःख होई.

ती कोणती म्हणाल, तर कोण चढत आहे कोण पडत आहे, आपलें तट्टू पुढें ढकलण्याची वेळ केव्हां येत आहे, दोघे भांडूं लागून तिसऱ्यास मध्यस्थी करून सगळेंच गट्ट करण्याची संधि कशी साधेल, हें पहात टपत बसावें, ही होय; हींत खऱ्या नीतीस व विश्वासास मुळींच थारा नसे. लायन्स शहरीं असलेल्या इतलियन लोकांत मात्र कांहीं पाणी आहे असें त्यास दिसून आलें. सेव्हाय हा प्रांत त्या वेळीं सार्डीनियाच्या राजाच्या मुलखांत मोडत असे, आणि ह्या प्रांतावर हल्ला करण्याचा त्यांचा बेत चालला होता; व ह्या कामीं लुई फिलिप हा त्यांस उत्तेजन देत होता. कारण लुई फिलिपचा फ्रांसचे राज्यावरील हक्क इतर राजे कबूल करीत नव्हते; म्हणून फिलिपच्या मनांत त्यांस अशा रीतीनें भिवडावून त्यांजपासून ती कबुलायत उपटावयाची होती. तेवढें साधल्याबरोबर फिलिप ह्यानें स्पेनच्या व इतलीच्या देशभक्तांस नशिबाच्या ओटींत ढकलून दिलें, आणि एकदम असा जाहीरनामा काढिला कीं, 'ह्या लोकांनीं आपल्या पलटणी तावडतोब मोडून टाकाव्या. तसें न करितां फ्रान्सचें आणि त्याच्या दोस्त राजांचें वांकडें पडावें, म्हणून जर कोणी त्या राज्याच्या सरहद्दीवर हल्ला करील, तर त्यास कायद्यानें फरमाविलेली कडक शिक्षा सांगण्यांत येईल'. माझीनी म्हणतो 'माझ्या डोळ्यादेखत इतलियन लोकांस फसवून राजे लोकांनीं त्यांचा हा तिसऱ्यानें गळा कापिला. प्रिन्स चार्लस आल्बर्ट हा कारबोनारी मंडळींतला असून व त्यांच्या कटांत ह्याचें अंग असून, जनलज्जा व मनलज्जा सोडून तो शत्रूकडे पळाला तो पहिला प्रसंग. दुसऱ्यानें मोदीना येथील ड्यूकनें फसविलें. ह्या ड्यूकनें बिचाऱ्या कापरो मेनॉती ह्यानें केलेल्या बंडास प्रथम आश्रय दिला व उत्तेजनही दिलें. नंतर ऐन वेळेस त्याजवर हल्ला करून त्यास पकडलें, आणि आपण स्वतः म्यांच्युआ येथें पळाला. तेथें मेनॉती ह्यासही पकडून घेऊन गेला, व आस्त्रियानें त्यास राज्यावर परत जाण्याची परवानगी दिल्याबरोबर मेनॉती ह्यास त्यानें सुळीं चढविलें'.

देशपार केलेले लोक दुसऱ्या देशांत आश्रय धरून होते, त्यांचा आतां छळ होण्यास आरंभ झाला, म्हणून माझीनी कार्सिका बेटांत गेला. त्या वेळीं बलोना प्रांतांत पोप ह्याचे मुलुखांत बंडावा झाला होता. या बंडास मदत करण्याकरितां कार्सिका बेटांत दोन तीन हजार लोक हत्यारांनिशीं

तयार झाले होते; त्यांस जाऊन मिळण्याचा माझीनीचा विचार होता. बलोना येथील त्या वेळचें तत्पुरतें नेमलेलें सरकार लढाई करण्यास भ्यालें. त्या सरकारच्या मनांत बेताबातानें पाचपेंच लढवून जें होईल तेवढें साधावयाचें होतें. सबब कार्सिका बेटांतील लोकांस समुद्र ओलांडून जाण्याकरितां गलबतें वगैरे साहित्य देण्याचें तें सरकार आजउद्यांवर ढकलूं लागलें. नंतर लवकरच आस्त्रियन लोकांनीं मध्यस्थी केली; तेव्हां लढाई होण्याचें चिन्ह दिसेना, म्हणून माझीनी तेथून निघून मार्सेल्स येथें आला, व 'अभिनव इतली' नांवाचा समाज स्थापन करण्याचे खटपटीस पुन्हा लागला.

ह्या वर्षीं (१८३१) चार्ल्स आल्बर्ट हा पीमांत आणि सार्डीनिया या राज्याचे गादीवर बसला. हा युवराज असतांना १८२१ सालीं ह्यानें इतली देशाची सुटका करण्याकरितां कट केला होता, निदान कटाचा आव तरी घातला होता. परंतु जेव्हां ह्याचे प्राणावर येऊन बेतली, तेव्हां आपल्या साथीगारांस पुढें करून आपण मोकळा झाला. तथापि हा तक्तनशीन झाल्यावर तरी पूर्वीचीं दिलेलीं वचनें हा खरीं करून दाखवील, अशी इतलींत पुष्कळांस आशा वाटत होती. स्वतः माझीनीस अशी आशा अगदीं नव्हती. १८६१ सालीं ह्या काळाविषयीं लिहीत असतां माझीनी म्हणतो 'इतलीची सुटका ह्या शब्दांचा जो अर्थ मी समजत आहें व थोड्या वर्षांपूर्वीं आपण सगळे समजत होतों—म्हणजे सर्व इतली देश एकछत्री व बलिष्ठ असणें, त्याजवर दुसऱ्या कोणत्याही राष्ट्राची दखल नसणें, व त्याचे हातून जें महत्वाचें कृत्य घडावयाचें आहे तें पार पाडण्यास त्याच्या अंगीं सामर्थ्य असणें—त्या अर्थीं इतलीची सुटका कोणत्याही राजाकडून होईल असें मला त्या वेळींही वाटलें नव्हतें, व आज मित्तीसही वाटत नाहीं.' तरीही त्यानें चार्ल्स आल्बर्ट ह्यास एक पत्र लिहिलें, व त्यांत 'इतलीचे उतराई होण्यास तुम्ही अमूकअमूक गोष्टी केल्या पाहिजेत, व त्या न केल्यास तुमचें मन तुम्हांस खाईल' असें म्हटलें होतें. हें पत्र पाहून सर्वांस आश्चर्य वाटलें. आपलें कर्तव्य करून दाखविण्यास जे गुण अवश्य आहेत, ते गुण चार्ल्स ह्याच्या अंगीं नाहींत, हें आपल्या देशबांधवांस सिद्ध करून दाखवावें, एवढाच हें पत्र लिहिण्याचा हेतु होता.

हें पत्र मार्सेल्स येथें प्रसिद्ध झालें. लोकांनीं चोरून मारून ह्याच्या प्रती करून घेतल्या, व अशा रीतीनें तें सर्व इतलीभर पसरलें. माझीनी म्हणतो 'ह्या पत्राची एक प्रत राजासही मिळाली, व त्यानें ती वाचली, आणि लागलीच आपल्या सरहद्दीवरील अधिकाऱ्यांस एक हुकूम फर्माविला. त्यांत माझ्या चेहेरेपट्टीचें वर्णन असून अशी आज्ञा केलेली होती कीं, मी जर इतलींत परत जाऊं लागलों, तर लागलीच मला पकडून कैद करावें'. माझीनीच्या देशबांधवांस हें पत्र फारच आवडलें, व ह्यावरून तो म्हणे कीं, 'इतली देश एकछत्री करण्याची चर्चा उघड रीतीनें केल्यानें इतलीचे लोक जागे झाले व त्यांसही ही गोष्ट इष्ट वाटली. ह्यामुळें येतील तीं संकटें सोसून दीर्घोद्योग करण्यास मला हें पहिलें उत्तेजन मिळालें.'

आपला गुप्त पत्रव्यवहार चालविण्यास मार्सेल्स हीच जागा बरी आहे असें वाटल्यावरून, कांहीं झालें तरी तेथेंच राहण्याचा माझीनीनें निश्चय केला. ह्या ठिकाणीं तो एकाद्या कैद्याप्रमाणें एका लहानशा खोलींत कोंडून घेऊन बसून राही, व म्हणे कीं, 'माझ्या आयुष्याच्या गेल्या तीस वर्षांपैकीं वीस वर्षें अशा बंदीखान्यांत गेलीं आहेत.'

ह्याच ठिकाणीं त्यानें 'अभिनव इतली' हा समाज स्थापन केला, व अशाच नांवाचें एक लहानसें वर्तमानपत्रही चालू केलें. 'आपला देश पुष्कळ संस्थानिकांमध्यें वांटला गेल्यानें त्याची वाताहत झाली आहे; तीं सर्व संस्थानें मोडून टाकून सर्व देश एकत्र स्वतंत्र व प्रजासत्ताक करण्यासाठीं, आणि प्रसंग पडल्यास स्वातंत्र्याचा बचाव करण्याकरितां दुसऱ्या देशाशीं सामना करण्याचें देशाच्या अंगीं सामर्थ्य आणण्यासाठीं, आम्ही आपलें सर्व आयुष्य खर्ची घालूं' अशी शपथ ह्या समाजांत शिरणाऱ्या प्रत्येक मनुष्यापासून वाहून घेण्यांत येत असे. देश एकत्र करूं म्हणून शपथ वाहून घेण्यांत येत असे, ह्याचें कारण माझीनी असें लिहितो कीं 'एकी झाल्याशिवाय सामर्थ्य कोठून येणार? व इतलीस तर सामर्थ्याची फारच जरूर आहे. कारण त्याच्या शेजारचीं सर्व राष्ट्रें फार बलिष्ठ व एकोप्यानें रहाणारीं व दुसऱ्याचें बरें न पहाणारीं अशीं आहेत. इतलींतील सर्व संस्थानिक एक जुटीनें राहूं म्हणतील, तर त्यांची स्विट्झर्लंडाप्रमाणें दशा होणार; म्हणजे त्यांस राजकीय वजन मुळींच

रहाणार नाहीं. शिवाय त्यांजवर शेजारच्या एकाद्या राष्ट्राची छाप पडलीच पाहिजे. असें झालें म्हणजे ह्या संस्थानिकांचे आपसांत बखेडे सुरू होणार. आजपर्यंत इतलीची दैन्यवस्था होण्यास हीच स्थिति कारण झाली. शिवाय, आटोपसर, जोरदार आणि एक तोलाचीं अशीं राष्ट्रें एक झाल्याशिवाय यूरोपांत चिरस्थायी शांतता रहाणार नाहीं. एक डोईजड, दुसरें हलकें, अशीं राष्ट्रें असलीं, म्हणजे स्वतःच्या रक्षणासाठीं काय मागतील तें देऊन गरीब राष्ट्रास चुंबीत बसावें लागतें. मग त्यांत कितीही अन्याय झाला, तरी दाद घेतो कोण? फार काय, पण सरहद्दीचे कामीं भानगड पडल्यास मदत मिळेल अशा आशेनें गरिबांस आपलें स्वातंत्र्य देखील थोरांचे पायीं अर्पण करून त्यांचे गुलाम होऊन बसण्याची पाळी येते'.

राजकीयदृष्ट्या लोकनियत राज्य सोइस्कर, म्हणून माझीनी तें पसंत करी, असें नाहीं. धार्मिक दृष्ट्या ह्याचें असें मत असे कीं, 'मानवी प्राणी तेवढे सारख्या योग्यतेचे आहेत. म्हणून त्यांचें राजकीय काम त्यांच्या हस्तगत असणें हें विशेष सयुक्तिक आहे'. इतिहासशास्त्रावरून आतां आपणास कळूं लागलें आहे कीं, ईश्वरी सूत्राप्रमाणें यूरोपखंडांत होणाऱ्या सर्व चळवळींचा परिणाम, लोकनियत राजतत्वाचा क्रमाक्रमानें प्रसार होणें, हा आहे. परंतु ही गोष्ट माझीनीस त्याच्या विशालबुद्धीमुळें त्याचवेळीं कळून आली होती. ह्याचे साथीदार लोकांमध्यें त्या मताचा प्रसार करण्याची शपथ घेत असत, त्याचीं कारणें खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत:—

'ईश्वराच्या सृष्टीचा नेमानेम असा आहे कीं, प्रत्येक देशांतील लोक बंधुवर्गाप्रमाणें एकोप्यानें व स्वतंत्रतेनें राहतील, आणि ही व्यवस्था अव्याहत चालण्यास राजकीय व्यवस्था ही लोकनियतच असली पाहिजे.'

'लोकतंत्रणाधिकार सर्वथैव लोकांपासून उद्भव पावतो, व नीतितत्वें ठरविण्याचें काम निरंतर लोकांचें आहे.'

'राष्ट्राच्या किंवा समाजाच्या शिरस्थानीं जी व्यक्ति असते, तीस कांहीं हक्क किंवा सुटी मिळाल्या, म्हणजे त्या आपल्यास प्राप्त करून घेण्याची हाव इतरांसही सुटते; आणि अशा रीतीनें व्यक्तिस्वातंत्र्यास धक्का पोंचतां पोंचतां अखेर देशाचें स्वातंत्र्य धोक्यांत पडतें.'

'राजसत्ता एकंदर राष्ट्राच्या अंगीं असली पाहिजे; तसें न होतां ती थोड्याशा लोकांत वांटली गेली, तर एक दुसऱ्याची सत्ता बळकावण्यास

पाहूं लागतो. हेंच आपसांतील लढायांचें बीज असून ज्या राष्ट्रांत समाधान आणि सलोखा असावयाचा तेथेंच पुंडावे व गुप्त कट माजतात.'

' राजा व प्रजा ह्या दोहोंमध्यें बडे लोकांची फरजी असलाच पाहिजे. नाहीं तर राजपद प्रजेपुढें टिकाव धरूं शकणार नाहीं. हे लहान, हे थोर, हे अकुलीन, हे कुलीन, असल्या वैषम्याचें आणि अनीतीचें बडे लोक हे माहेरघर होत.'

' इतिहासाच्या अवलोकनावरून व सृष्टिक्रमावरून आपणास असें कळून येतें कीं, प्रत्येक वेळीं सर्वानुमतें राजाची नेमणूक करावयाची, अशी संस्था ठरविली, तर झोटिंगबादशाही सुरू होते, व वंशपरंपरेनें एकाकडे गादी कायम केली, तर जुलूम बोकाळतो आणि कोणी विचारता पुसता नाहींसा होतो.'

' राजा ईश्वराचा अंशधारी आहे, हा समज एकदा लोकांतला नाहींसा झाला, म्हणजे ( यूरोपांत असा समज १३ वे व १४ वे शतकांत असे, पण तो हल्लीं अगदीं नाहींसा झाला आहे ) राजाचा दरारा राहत नाहीं, आणि त्याच्यानें प्रजेस आळा घालवत नाहीं.'

' राजसंस्था एकदा पत्करली म्हणजे दुसऱ्या दरबारांत वकील पाठविणें, ती करील तसें करूं देणें, तिचे पाचपेंच, व लोक अंमळ विचारपूस करूं लागले म्हणजे त्यांस दटावणें, ह्या गोष्टी त्या संस्थेच्या मागोमाग ( कार्यकारणसंबंधानें ) आल्याच पाहिजेत.'

ह्याप्रमाणें माझीनीचें आणि, अनिर्बंध राजसंस्थेचें नव्हे तर, खुद्द राजसंस्थेचेंच हाडवैर होतें. माझीनी म्हणे कीं, हल्लीं लोकनियुक्त संस्थांनीं राजास आळा घालण्याची तोडजोड निघाली आहे; परंतु राजास अशा बंधनाची जरूर आहे, एवढ्यावरूनच ती संस्था निरुपयोगी ठरते. हल्लीं इंग्लंडांत वर निर्दिष्ट केलेली तोडजोडीची संस्था चालू आहे; व तिचे कैवारी इंग्रज लोक म्हणतात कीं, प्रजासत्ताक राज्य चालविण्यापुरतें आमच्यांत अद्याप शहाणपण आलें नाहीं. त्यावर माझीनीचें असें उत्तर आहे कीं, 'ज्या राज्यपद्धतीमध्यें लोकांसंबंधानें न्यूनाधिक भाव ठेविला आहे, व जींत थोरांस कांहीं विशेष हक्क दिले आहेत, तींत आपण सर्व बरोबरीचे आहोंत अशी कल्पना लोकांच्या मनांत कधींही यावयाची नाहीं. प्रजासत्ताक राज्याचा साधेपणा, दरबारी थाटमाटांत आणि डामडौलांत कसा शिकतां

यावा? जेथें राजमंत्र्यास रोज अंतस्थ खटपटी व वकीली कावे करावे लागतात, त्या ठिकाणीं राजमंत्र्याचे अंगीं प्रजासत्ताक राज्यांतील सरळपणा व निष्कपटपणा कसा यावा? सारांश प्रजासत्ताक राज्यासंबंधीं निपुणता मिळावयास राजदरबार ही खरी शाळा नव्हे.'

ज्या मार्गानें 'अभिनव इतली' नें आपला देश स्वतंत्र आणि एकछत्री करावा, असा माझीनीचा उद्देश होता, तो मार्ग हा कीं—रणामध्यें शत्रूशीं तोंड देऊन कधीं सामना करावयाचा नाहीं, तर बंडवाल्यांच्या लहान लहान टोळ्या करून शत्रूवर हल्ले करीत सुटावयाचें. ज्याला आपला देश दुसऱ्याच्या घशांतून काढावयाचा असेल, त्याला हाच रस्ता उत्कृष्ट आहे. राष्ट्र प्रजासत्ताक करावयाचा प्रयत्न, लोकांस शिक्षण देऊन तद्वारा करावयाचा होता. माझीनीचें मत असें होतें कीं, ह्या समाजानें आपल्यास खरें वाटतें त्याचा लोकांमध्यें प्रसार केल्यानें आपलें कर्तव्य बजाविल्यासारखें होऊन, राजपद्धति ठरविण्याचा जो एकंदर राष्ट्राचा हक्क तो बळकाविल्यासारखें होणार नाहीं. बहुजनमत व्यक्तींस मान्य असणें, हें प्रजासत्ताक राज्याचें महातत्त्व आहे; व राष्ट्राचें मत काय आहे हें निश्चित न करितां, आपल्याच डोक्यांतून एकादी नवी राज्यपद्धति काढून ती लोकांच्या पाठीवर लादणें, म्हणजे ह्या तत्त्वाच्याविरुद्ध आचरण करण्यासारखें आहे, हें माझीनीच्या निरंतर लक्षांत वागत होतें. सबब तो स्पष्ट म्हणत असे कीं, 'आपले हेतू सिद्धीस नेण्यासाठीं इतलियन लोकांनीं उठण्यापूर्वीं, ते हेतू कोणत्या रीतीनें तडीस न्यावयाचे हें ठरविणें—प्रजासत्ताक राज्याचें निशाण उभारणें, व ज्यास प्रजासत्ताक राज्याच्या योगानें आपल्या देशाचें पुनरुज्जीवन होईल असें वाटत असेल त्यानें ह्या निशाणास येऊन मिळावें म्हणून पाचारण करणें—म्हणजे अभिनव इतलीनें इतलीच्या गळ्यांत प्रजासत्ताक राज्य बळें अडकाविण्यासारखें होत नाहीं. आपल्या राष्ट्राची राजकीय संस्था कोणत्या प्रकारची असावी, हें ठरविण्याची पूर्ण मुखत्यारी राष्ट्राकडे आहे; आणि एकदा तें स्वतंत्र झालें, म्हणजे हवी ती संस्था तें पसंत करून हवें तें निशाण उभारील व सर्व राष्ट्राचें मत व्यक्ती शिरसामान्य करतीलच.'

ह्या साहसासाठीं दृढनिश्चय अवश्य आहे, असें दाखविण्याकरितां निशाणावर 'यावच्चंद्र दिवाकरौ' असा लेख लिहिलेला असे. ज्यांनीं

इतलीचे स्वातंत्र्यार्थ आपले प्राण बळी दिले होते, त्यांच्या स्मरणार्थ या निशाणावर सायप्रस झाडाच्या फांदीचें निशाण् काढिलें होतें. ह्या समाजांतील लोक शपथ घेत असत ती खालीं लिहिल्याप्रमाणें आहे:—

'ईश्वरास व माझ्या देशास स्मरून,

'स्वराज्याच्या व परराज्याच्या जुलमामुळें ज्या इतलीच्या कैवाऱ्यांच्या प्राणाच्या आहुति पडल्या आहेत त्यांस स्मरून,

'माझ्या पूर्वजांची ही जन्मभूमि होय; माझे वंशजही ह्याच देशांत वास्तव्य करणार; म्हणून या देशाविषयीं माझ्या अंतःकरणांत प्रीति असणें हा मानवी धर्म आहे. त्या प्रीतीस स्मरून,

'जुलूम, अन्याय, अपहार आणि परांचा छळ ह्यांचा मनुष्यस्वभावास अनुसरून मला मनापासून तिटकारा आहे; म्हणून,

'दुसऱ्या राष्ट्रांतील लोकांकडे जेव्हां पहावें तेव्हां आपल्यास देश नाहीं, देशाचा झेंडा नाहीं व त्याच्याप्रमाणें आपल्यास हक्क नाहीं, ह्या गोष्टी मनांत येतात आणि मान खालीं घालावी लागते; म्हणून,

'स्वातंत्र्यसुखोपभोगासाठीं व कल्याणप्राप्तीसाठीं हा जीव निर्माण झाला आहे, आणि त्या गोष्टींकडे तो मोठ्या हुरुपानें धांव मारितो; पण हें शरीर परसत्ताशृंखलेनें अगदीं जखडलें गेलें असल्यानें त्यास उगीच रहावें लागतें. ही गोष्ट लक्षांत आणून,

'पूर्वीं आपलें वैभव काय होतें व हल्लीं आपलें दैन्य किती आहे, हें समजून,

'बंदीखान्यांत, सुळावर व परदेशांत दयादया भयाभया करीत जे इतालियन लोक प्राणांस मुकले, व पुत्रशोकांमुळें त्यांच्या मातांनीं जो अश्रुपात केला तो लक्षांत बाळगून,

'आणि आज लक्षावधि लोक दुःखार्णवांत बुडाले आहेत, हें नीट मनांत आणून,

'मी अ. ब. अभिनव इतली नांवाच्या समाजांत आपलें नांव दाखल करितों. त्या समाजाच्या मताप्रमाणेंच माझेंही मत आहे. सर्व जगताचें कल्याण इतली देशाच्या हातून करविण्याचा ईश्वरीसंकेत असल्याविषयीं माझी दृढ श्रद्धा आहे. तो संकेत सिद्धीस नेण्यासाठीं झटणें हें

प्रत्येक इतालियनाचें काम आहे. अशी माझी पक्की खात्री आहे कीं, एकाद्या राष्ट्राचा उदय व्हावा म्हणून ज्यानें नेमानेम केला आहे, त्यानें त्या राष्ट्राच्या अंगीं सामर्थ्यही ठेविलें असलें पाहिजे. हें सामर्थ्य एका व्यक्तीच्या ठिकाणीं नसतां सर्व राष्ट्राच्या ठिकाणीं असतें. राष्ट्रानें ह्या सामर्थ्याचा स्वहितासाठीं सन्मार्गानें व्यय केला, म्हणजे यश त्या राष्ट्राच्या अधीन असतें. तोंडानें नुसती वटवट न करितां घस सोसून हातानें कांहीं करून दाखविणें, ह्याचें नांव सदाचरण होय. कार्यनिष्ठा आणि एकी हेंच देशाचें सामर्थ्य होय. मी शपथ वहातों कीं—

‘इतली देश एकछत्री, स्वतंत्र आणि प्रजासत्ताक करण्यासाठीं, अभिनवइतलीचे इष्ट हेतु सर्व लोकांस समजून देण्यासाठीं, एकीशिवाय ते हेतु पार पडावयाचे नाहींत व ते सदाचरणी असल्याशिवाय त्यांचें स्वातंत्र्य चिरस्थायी व्हावयाचें नाहीं म्हणून त्यांस सदाचरणाच्या मार्गास लावण्यासाठीं, मी यावज्जीव एकनिष्ठेनें आणि कायावाचामनेंकरून झटेन. ह्यानंतर कधीं दुसऱ्या कोणत्याही समाजांत शिरणार नाहीं. अभिनव इतलीच्या इष्ट हेतूस अनुसरून त्या समाजाच्या लोकांनीं केलेल्या आज्ञांचे कधींही उल्लंघन करणार नाहीं. प्राणांतींही त्या आज्ञांचा स्फोट करणार नाहीं; व सल्लामसलत देऊन आणि अंगमेहनतीनें मी आपल्या समाजबंधूंस मदत करीन.

‘ही शपथ मीं सर्व किंवा अंशतः जरी मोडली तर मजवर ईश्वराचा रोष होवो, मनुष्यें माझी छीथू करोत, व खोटी शपथ घेतल्याबद्दलचें महत्पातक माझ्या शिरीं कोसळो.’

माझीनी म्हणतो ‘प्रथम मीं अशी शपथ घेतली व त्यावेळीं आणि त्या नंतर ज्यांनीं शपथा घेतल्या, त्यांपैकीं पुष्कळ लोक ह्या ओळी लिहिते वेळीं (सन १८६१ सालीं) दरबारांत कामगार होते, किंवा “मॉडरेट सोसायटी” ( राजसंस्था आपणास हवी असा ह्या समाजाचा हेतु असे ) नांवाच्या समाजाचे चालक होते, किंवा बोनापार्ट नाचवील त्याप्रमाणें नाचून पूर्वींच्या समाजबंधूस छळीत होते, आणि नाहींत ते त्यांच्यावर आळ आणीत होते’. तो म्हणतो ‘ ह्या लोकांनीं शपथ घेऊन तिजप्रमाणें आचरण केलें नाहीं, ह्या गोष्टीची मी त्यांस आठवण देतों, म्हणून ते माझा तिटकारा करोत. पण त्यांनीं एक तरी उदाहरण देऊन दाखवून द्यावें कीं,

मीं आपली शपथ मोडली आहे. तींत असणारीं तत्वें बैबलाप्रमाणें मी पवित्र मानितों. तीं कधीं तरी खरीं ठरतील असा माझा त्यावेळीं विश्वास असे व आजमितीसही आहे. आपणांस प्रजासत्ताक राज्य हवें आहे असा माझा पूर्वीं ठाम ग्रह असे, हल्लीं आहे, आणि तो आमरण तसाच राहील. आपल्यावरचा दोष उडविण्यासाठीं ते जर आम्हांस असें म्हणतील कीं, हल्लीं इतलींत राजसंस्था स्थापन झाली असतांही तिच्या आश्रयास राहून तुम्ही एकी करण्याचें काम चालवीत आहां, तर मी त्यास उत्तर देतों कीं, त्यांनीं अभिनव इतलीच्या नियमांकडे किंचित् नजर फेंकावी. त्या नियमांत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं, एकदा राष्ट्र स्वतंत्र झालें म्हणजे हवी ती संस्था तें पसंत करील व हवें तें निशाण तें उभारील, व ती पसंती सर्वांस मान्य होईल.' ह्यावेळीं राजसंस्था स्थापन करण्याविषयीं लोकांच्या मनांत जें पिसें भरलें होतें, त्याविषयीं माझीनीचा उल्लेख असा आहे:—' इतालियन लोकांस हल्लीं अगदीं खूळ लागलें आहे, व ते भलत्याच मार्गास लागले आहेत. पण माझें तसें झालेलें नाहीं. सर्व राष्ट्रास जी गोष्ट आवडली ती मलाही आवडली आहे. माझें एकट्याचें अंत:करण हळहळून उपयोग काय आहे? परंतु राजसंस्थेचा मी गुलाम किंवा अनुयायी व्हावयाचा नाहीं. माझें मत पायाशुद्ध आहे किंवा खोटें आहे, हें पुढें लोकांच्या अनुभवास येईल.'

कैदेंत असतां ह्यानें राजकीय आणि धार्मिक तत्वांविषयीं पुष्कळ विचार केला होता, व त्याचे विचार 'तरुण इतली' नांवाच्या वर्तमानपत्रद्वारां बाहेर पडत असत. ह्यांत तो स्वातंत्र्याचे व एकीचे प्राप्तीसाठीं परकीयांच्या अमलाविरुद्ध लोकांस बंडें करण्याविषयीं उपदेश करी, व म्हणे कीं, 'प्रजासत्ताक राज्य झाल्याशिवाय मनुष्यांस ईश्वरापाशीं आपल्या कृत्याचा झाडा देतां येणार नाहीं'. फ्रान्स देशास लागून असणाऱ्या इतलीच्या किनाऱ्यावरील दोन तीन शहरांस ह्या वर्तमानपत्राच्या प्रती फार बंदोबस्तानें त्याचे अनुयायी नेत असत, तेथून हातोहात चोंहीकडे त्यांचा फैलावा करीत असत, व आपणावर कांहीं अरिष्ट ओढवेल अशी किंचितूही शंका मनांत न धरतां बेधडक तें वाचून व गुप्त छापखान्यांत त्याच्या आणखी प्रती काढून सर्व देशभर वांटीत असत. ह्यां वर्तमानपत्राच्या प्रसाराचा परिणाम फार विलक्षण झाला. विद्यार्थ्यांपासून तो मोठ्यांपर्यंत भराभर सर्व लोक

'अभिनव इतली' ह्या समाजांत शिरूं लागले; व जे चोरूनमारून हें पत्र इतलींत प्रसिद्ध करीत, ते लोकांच्या सह्यांचे भारे माझीनीकडे पाठवीत. हें पाहून माझीनीस आणि त्याच्या साथीदारांस परम आश्चर्य वाटलें. आपल्या वर्तमानपत्राची लोकप्रियता पाहून त्याच्या मनाची खात्री झाली कीं, इतलियन लोक निसर्गतः स्वातंत्र्यप्रिय आहेत, अशी जी आपण अटकळ केली होती, ती खरी आहे.

मध्यइतलींत नुकतींच कांहीं बंडें झालीं होतीं, व त्यांचे परिणाम फार भयंकर झाले होते. तेव्हां माझीनी ह्याच्या म्हणण्याची लोकांस अशी प्रतीति आल्यानें लोक अधिकच खवळले असावे. ह्या वर्षी पोपाच्या जुलमास कंटाळून रोमन संस्थानानें बंड केलें. पारमा येथील लोकांनीं आस्त्रियाच्या ग्रांडडचेसविरुद्ध, व मॉदेना येथील लोकांनीं आपल्या ड्यूकविरुद्ध बंडें केलीं. हीं बंडें एकाच सुमारास झालीं होतीं; परंतु असा योग संकेतपूर्वक घडून आला नव्हता. सन १८३१ सालीं फेब्रुआरी महिन्यांत दुसऱ्या व तिसऱ्या तारखेस सुमारें पंचवीस लक्ष इतलियन लोकांनीं पोपचें व आस्त्रियाच्या प्रतिनिधींचें जूं आपल्या खांद्यावरून फेंकून दिलें. त्या वेळीं या लोकांस स्वतःच्या रक्षणासाठींच नव्हे, तर इतर सर्व इतलियन लोकांच्या मुक्ततेसाठीं देखील, लढाई करितां आली असती.

इतलियन लोकांस स्वभावतः एकी आवडत असे. ह्यास प्रमाण हें आहे कीं, आस्त्रियाच्या ग्रांडडचेसच्याविरुद्ध झालेल्या बंडास मदत करण्यासाठीं, बलोना येथील कित्येक जवानांनीं तस्कनींत शिरण्याचा प्रयत्न केला होता; मासा येथील लोकांची सुटका करण्यास आपणास जाऊं द्यावें, म्हणून मॉदेना व रेगियो येथील लोक ओरड करून राहिले होते; व न्याशनल गार्डस् पलटणींनीं तगादा लाविला होता कीं, आपणांस नेपल्सच्या राजावर हल्ला करण्यास न्यावें. हीं बंडें एकाददुसऱ्या प्रांतापुरतीं नसून, त्यांवरून सार्वत्रिक राज्यक्रांतीचीं लक्षणें दिसत होतीं. परंतु बंडवाल्यांनीं चालू कारभार पहाण्यासाठीं जें सरकार नेमिलें होतें त्याच्या लक्ष्यांत ही गोष्ट आली नाहीं; आणि तें आपल्या प्रांतापुरतेंच पाहून स्वस्थ बसलें. भोंवतालचे मुलूख जोंपावेतों प्रतिपक्षीय राजांच्या ताब्यांत राहिले असते, तोंपावेतों मध्यइतलीस आपलें स्वातंत्र्य कधींच कायम राखितां आलें नसतें. ज्यास राज्य हांकण्याचें किंचित्‌ही धोरण आहे,

त्यास तेव्हांच समजून आलें असतें कीं, होतां होईल तितक्या अधिक मुलुखांत राज्यक्रांती करणें हें हितावह होतें; इतकेंच नव्हे तर तसें घडवून आणणें सर्वांचें कर्तव्यकर्म होतें. कारण दुसऱ्या कोणत्याही मार्गानें आस्त्रियाच्याविरुद्ध चिरस्थायी यश मिळालें नसतें. आस्त्रिया म्हणजे सर्वांचा शत्रु व आज ना उद्यां त्याशीं लढाई करावीच लागली असती; म्हणूनच ती लढाई ताबडतोब आणि मोठ्या निकरानें चालविण्याच्या कामीं सर्वांनीं तनमनधन अर्पण करावयास पाहिजे होतें. पण प्रोव्हिजनल सरकारांत ही अक्कल नव्हती. त्यांनीं लोकांस असें आश्वासन द्यावें कीं, भोंवतालच्या राजांशीं सल्लासंपानें चाललांत, तरच तुमची सुटका होईल. बंडें झाल्यामुळें अनायासें लोकांचीं मनें खवळून आस्त्रियाविरुद्ध त्यांच्यांत बेदिली उत्पन्न झाली होती. तिचा चांगला उपयोग करून घेण्याची सोन्याहून पिवळी संधि दवडून बंडवाल्यांचीं सरकारें राजांच्या पायधरण्या करण्यांत गुंतलीं; व त्यांनीं इतलीच्या एकीचें व स्वातंत्र्याचें काम सार्वभौम आस्त्रियाशीं बंदे असे राजे आणि त्यांचे वकील यांच्या चरणीं अर्पण केलें.

स्वतः कंबर बांधून लोकांस कंबर बांधण्यास लावण्याची, व आपण त्यांजवर विश्वास ठेवून त्यांचा विश्वास आपल्याकडे ओढून घेण्याची ही वेळ दवडून, हीं नेभळीं सरकारें कसें करूं काय करूं असें रडगाणें गात बसलीं; इतकेंच नव्हे तर फ्रान्सानें दिलेल्या गुळचट थापांसही तीं भुललीं. नेपल्स येथील फ्रेंच वकिलानें त्या सरकारास अभिवचन दिलें होतें कीं, ' युरोपांतील हल्लीं चालू असलेली स्थिति जर तुम्हांस पसंत असेल, तर ती कायम ठेवण्याच्या कामीं फ्रान्स तुम्हांस मदत करील.' फ्रेंच पार्लमेंटच्या प्रमुखानेंही असें प्रसिद्ध रीतीनें म्हटलें होतें 'फ्रान्स देशानें नवीन स्वीकारिलेलें नीतितत्व असें आहे कीं, स्वातंत्र्याचें रोप जेथें आपोआप उगवल्याचें दृष्टोत्पत्तीस येईल तेथें त्यास वाढूं द्यावयाचें.' त्याच देशच्या परराष्ट्रासंबंधी मंत्र्याचें म्हणणेंही असेंच होतें कीं ' सर्वांनीं स्वतंत्र आणि स्वसत्ताक असावें, हें तत्व आम्हास मान्य आहे, व ह्याचें उल्लंघन दुसरे कोणी करणार नाहींत अशी आम्ही खबरदारी घेऊं.' पण ह्या प्रधानाच्या लक्षांत ही गोष्ट आली नव्हती कीं, ह्या वेळीं युरोपखंडाची स्थिति एकाद्या ज्वालामुखीप्रमाणें होती; कोठें

केव्हां भडाका होईल व लढाई जुंपेल, ह्याचा नेम नव्हता. आस्त्रिया देश राजसंस्थेचा, आणि फ्रान्स प्रजासत्तेचा कैवारी असल्यामुळें, ह्या दोन देशांचें युद्ध जुंपणें म्हणजे सर्व युरोपखंडांत त्या त्या संस्थांच्या अनुयायांमध्यें यादवी माजण्यासारखें होतें. व तशा प्रसंगीं फ्रान्सचा राजा लुई फिलिप ह्यास स्वतःचें चंबूगवाळें गुंडाळण्याची वेळ आली असती. कारण त्याचे पाय नुकतेच कोठें गादीला लागले होते; व तेही डळमळत होते. स्वतःची सत्ता स्थीरस्थावर करण्यास लुई फिलिप यास स्वस्थता हवी होती; असें असतां तो इतलीचें विकतश्राद्ध घेऊन आस्त्रियाशीं झुंजण्यास उभा राहता, व बंडवाल्यांनीं पदच्युत केलेल्या आस्त्रियाच्या मांडलिक राजांची स्थापना पुन्हा करतांना आस्त्रियास तो अडथळा करता, असें मानणें हें केवळ वेडेपणाचें होय. उत्तरेकडील प्रांत आस्त्रियानें स्वतःच स्वाहा केले होते; व ह्या प्रांतांस लागून प्रजासत्ताक राज्याची स्थापना आस्त्रिया होऊं देईल, ह्या कल्पनेंत कांहीं जीव नव्हता.

बंडखोर प्रांतांतल्या चालू सरकारांनीं अशी अटकळ बांधिली कीं, मध्यइतलींतील बंडें आस्त्रिया बळाऊं देईल, व त्यांवर हल्ला करणार नाहीं. त्या अन्वयें त्यांनीं राज्यक्रांतीचें असें धोरण ठरविलें कीं, आस्त्रियास तिळमात्र दुखवूं नये, आणि आपणावर हल्ला करण्यास त्यास कारण देऊं नये. म्हणून त्यांनीं लोकांच्या सत्ता किंवा हक्क ह्यासंबंधानें चकार शब्द काढिला नाहीं; लोकांस आपलीं शस्त्रें उचलण्यास सांगितलें नाहीं; निवडणुकीच्या भानगडींत अगदीं पडले नाहींत; व शेजारच्या मुलखांत बंडें उठविण्याचें किंवा त्यांस भर देण्याचें त्यांनीं नांव देखील काढिलें नाहीं.

भीतीनें ह्यांचें काळीज उडत आहे, असें ह्यांच्या प्रत्येक हुकमावरून स्पष्ट दिसे. पारमा आणि मॉदेना येथील सरकारांनीं जाहीरनामा काढिला कीं, 'येथील राजे मुलुखाची कांहीं एक व्यवस्था न लावितां पळाले, म्हणून लोकांनीं हीं तत्पुरतीं सरकारें स्थापन केलीं आहेत.' बलोना येथील सरकारानें जाहीरनामा काढिला कीं, 'पोपच्या प्रतिनिधीनें, मी राजसूत्रें सोडून जाणार आहें, असें सांगितलें असल्यानें, व तसें झाल्यानें मुलखांत बंडाळी होईल ती होऊं नये म्हणून, हल्लींचें सरकार स्थापन करण्यांत आलें आहे.' पारमा येथील सरकारानें न्याशनल गार्ड्स् पलटणींचा अधिकार

फेडेली नांवाच्या गृहस्थाकडे दिला; परंतु त्यानें, पदच्युत ग्रांडडचेसच्या मंजुरीशिवाय तो आपल्यास पत्करतां येत नाहीं म्हणून, सांगितल्यावर तशी मंजुरी मिळण्यासाठीं डचेस हीस विनंती करण्यास त्यास परवानगी दिली. ह्या कृत्याबद्दल सरकारच्या उपकाराची फेड लवकरच झाली. कारण फेडेलीनें डचेसला पुन्हा गादीवर बसविण्यासाठीं लागलीच एक कट सुरू केला.

मध्यइतली देशांत बंड झाल्यानें नेपल्स, पीमांत वगैरे इतलींतील सर्व संस्थानांत गडबड झाली होती. ह्यावेळीं बलोना येथील सरकारानें जाहीरनामा लाविला कीं ' नेपल्स व पीमांत ह्या संस्थानाधिपतींशीं ह्या सरकारची दोस्ती आहे, ती तशीच कायम राखण्यांत येईल. त्यांच्या सरहद्दीस या सरकाराकडून अगदीं धक्का लावण्यांत येणार नाहीं. हें सरकार उमेद बाळगतें कीं, ते संस्थानिकही ह्या सरकारच्या कारभारांत हात घालणार नाहींत. स्वसंरक्षणासाठीं लढाई करावी लागल्यास ह्या सरकारचा इलाज नाहीं. एरवीं हें सरकार आपण होऊन लढाईंत सामील होणार नाहीं.'

मध्यइतलीनें ह्याप्रमाणें आपल्या पायापुरतें पाहून बाकीच्या देशांस नशिबाच्या हवालीं केलें. ह्यासंबंधानें टीका करितांना माझीनी लिहितो ' वास्तविक पाहिलें असतां एकोपा, देशप्रीतीचें वारें, आणि लोकांच्या अंगीं चढलेलें स्फुरण, हीं राज्यक्रांतीचे पंचप्राण होत; परंतु इतलियन लोकांच्या राज्यक्रांतीच्या पद्धतींत ह्या गोष्टीस मुळींच जागा नव्हती. कावेबाजी आणि पोकळ खलबतें ह्यांनीं सर्व कार्य उरकावयाचें, हा समज इतली देशास अत्यंत विघातक झाला आणि अद्यापही होत आहे. आम्ही स्वस्थ बसून राहतों, काय चाललें आहे त्याजकडे पहातों, आणि यदृच्छा जिकडे दावें धरून नेईल तिच्यामागें जातों. पण उलाढाली कराव्या, कोड्या लढवाव्या, अचाट बुद्धि चालवून कल्याणास ओढून घरीं आणावें, ह्या गोष्टी आमच्या गांवींही येत नाहींत. ह्याला काय दीर्घदृष्टी म्हणावें ? नाहीं, तर ह्याला कोती समजूत हें नांव शोभतें. ' इतलियन लोकांच्या बेवकुबीमुळें आणि नामर्दपणामुळें आस्त्रियाचें अनायासें फावलें. पारमा मॉदेना आणि रेगियो ह्या संस्थानांवर त्यानें प्रथम हल्ला केला, व नंतर लवकरच फेरारा आणि अंकोना येथें आपलीं ठाणीं बसविलीं. बलोना येथील बंडवाल्या सरकारानें लुई फिलिपच्या विनवण्या केल्या. त्यांजकडे लुई

ह्यानें ढुंकून देखील पाहिलें नाहीं; फार तर काय, पण पोपशीं त्याचा दोस्तीचा पत्रव्यवहार सुरू होता. अशा रीतीनें इतलीच्या 'कायदेशीर (!!!) आणि ईश्वरांशधारी प्रभूंस अत्यंत शासनार्ह (!) अशा त्यांच्या प्रजेच्या रक्तस्रावानें प्रदिग्ध झालेली गादी आणि ईश्वरदत्त हक्क हीं मिळालीं.'

माझीनी म्हणतो 'इ. सन १८२०-२१ आणि सन १८३१ ह्या सालीं झालेल्या बंडांचा सूक्ष्म विचार केल्यानें, ज्या चुक्या पुन्हा होऊं देतां कामा नये, अशा कोणकोणत्या चुक्या त्या वेळीं झाल्या, तें मला कळून आलें. ह्या बंडांत थप्पड मिळाल्यानें इतलींतील बहुतेक लोक अगदीं हवालदील झाले. परंतु माझी अशी खात्री झाली कीं, राज्यसूत्र जर योग्य लोकांच्या हातीं दिलें, तर राज्यक्रांतीच्या कामीं यश येणें, ही गोष्ट आपल्या मुठींत आहे असें समजावें. पूर्वीं चुकी ही झाली होती कीं, बंडांत ज्यांचें मुळींच अंग नव्हतें, अशा लोकांच्या तंत्रानें आम्ही चाललों.

'जो कोणी पुढें सरसावला आणि ज्यानें अधिकाराचा थोडासा जोर दाखविला, त्याला इतलियन लोक आपलें पुढारीपण मुकाट्यानें देत आले आहेत. आजपर्यंत असें चालत आलें आहे कीं, कट व सारी जमवाजमव हीं एकानें करावीं, आणि राजक्रांती भलत्यानेंच हातीं घ्यावी. बंडास येणाऱ्या अडचणी नाहींशा झाल्या कीं, बंड करणारे जे लोक त्यांस गचांडी मिळालीच. मग वरातीमागून घोडें ह्या म्हणीप्रमाणें बडे लोकांचें मंडळ राजसूत्रें चालविण्यास पुढें सरसावयाचें. कट कसा केला आहे, तो तडीस कसा न्यावयाचा, त्यास अडचणी काय येतील, ह्या गोष्टींचा ह्या थोर मंडळींनीं कधींही विचार केलेला नसतो. लोकांच्या अंगांत असलेलें स्फुरण ह्यांच्या अंगीं मुळींच नसतें, व बंड करण्याच्या कामीं ह्यांच्या पदरास मुळींच खार लागलेला नसतो. ह्या उमराव लोकांचीं सुधारणेसंबंधाचीं मतें मॉडरेट पक्षाच्या मतासारखीं होतीं; म्हणजे हे अगदीं कमकुवत आणि भेकड होते, व बारीकसारीक बाबतींत कायद्याच्या आणवतील तितक्या हरकती आणून ते उगीच काथ्या कुटीत बसत असत, पण प्रचलित राज्यव्यवस्थेची मुख्य रचना बरोबर आहे कीं नाहीं, ह्या गोष्टीचा ते कधीं शोध करीत नसत. कारभार चालविण्याच्या कामीं सल्लामसलत देण्यासाठीं म्हणून थोर घराण्यांतील लोक, शास्त्री, पंडित, अशील लोकांनीं वेढलेले वकील, अशा लोकांचा ह्यांच्याभोंवतीं गराडा पडलेला असे.

परंतु राज्यक्रांतीच्या कामीं अत्यंत अवश्य जे गुण, स्फुरण, उमेद, बुद्धि-चातुर्य, ह्या गुणांचा ह्या बडे लोकांच्या सात पिढ्यांतही गंध मिळावयाचा नाहीं.

'आमची तरुण मंडळी भोळी असून त्यांस अनुभवही नसे, त्यामुळें ती माघार घेत असे. पण स्वातंत्र्यसुखाचा उपभोग घेणाऱ्या आणि गुलाम पदास पोंचलेल्या लोकांच्या गरजा निरनिराळ्या असतात; व परतंत्रदशेंत ज्यांच्याकडे स्थानिक व विशेष हक्कांचें प्रतिनिधित्व असतें, त्याच लोकांकडे स्वतंत्र दशेंत राजकीय व राष्ट्रीय हक्कांचें प्रतिनिधित्व असणें शक्य नाहीं, ही गोष्ट आमच्या तरुण लोकांच्या लक्षांत वागत नसे.'

माझीनी ह्यानें जी मंडळी स्थापिली ती अशाच विचारावरून स्थापिली. इतली देशाच्या भावी स्थितीवर ह्या संस्थेचा मोठा परिणाम झाला. इतलियन लोकांनीं माझीनीच्या छोटया वर्तमानपत्रास जो आश्रय दिला, त्या योगानें माझीनीस आणि त्याच्या साथीदारांस उत्तेजन मिळालें, धीर आला, आणि त्यांनीं अश्रांत परिश्रम केले. जोंपावेतों हे लोक माझीनीच्या नजरेखालीं होते, तोंपावेतों ह्यांच्याही अंगांत माझीनीचें वारें भरे. तो म्हणतो 'कोणाची मदत नाहीं, बसावयास जागा नाहीं, हाताखालीं नोकर नाहींत, अशा स्थितींत साऱ्या दिवसभर आणि रात्रीं बहुतेक वेळ आम्हीं कामांत गढलेलें असावें, निबंध आणि पत्रें लिहावीं, प्रवाशांस भेटावें, इतलियन खलाशांस आमच्या समाजांत ओढावें, छापलेल्या निबंधांचीं पुडकीं करावीं, तीं बांधावीं, व हे आणि असेच दुसरे शारिरीक आणि मानसिक श्रम आळीपाळीनें करीत असावें. आमच्यांत न्यूनाधिक भाव मुळींच नव्हता. आम्ही एका आईच्या लेंकराप्रमाणें वागत होतों, व एकाच ठिकाणीं राहत होतों. आम्हां सर्वांचें इतिकर्तव्य आणि आशा एक असत. परदेशस्थ प्रजासत्ताकमताच्या कैवाऱ्यांसही आमची उद्योगनिष्ठता आणि चिकाटी पाहून फार कौतुक वाटे, आणि ते आमच्यावर प्रेम करीत असत. ह्या सर्व उलाढालींचा खर्च आम्हांसच सोसावा लागत असे. अनेक वेळां असेंही घडे कीं, आमची तुटपुंजी शिल्लक सर्व वेंचून जाऊन आम्हांस आठराविश्वे दारिद्र्याच्या यातना सोसाव्या लागत. पण ईश्वर आपणास बरे दिवस दाखवील, म्हणून अशा कठीण प्रसंगींही आम्हीं समाधान मानून नेहमीं आनंदांत रहावें. सन १८३१पासून ३३ पावेतोंच्या दोन

वर्षांत आमच्या टोळीमधील तरुण गृहस्थांनीं आपलें कर्तव्य अशा आनंदानें आणि मनोभावानें केलें कीं, त्याविषयींची माहिती पुढील पिढीस होईल तर फार बरें होईल. आमच्या शत्रूंनीं आम्हांवर पुष्कळ कहर केला, व आम्हांवर पुष्कळ संकटेंही आलीं; परंतु दुःखांत सुख एवढें होतें कीं, हा द्वेष चोरून लपून नसतां उघड होता. पण पुढें ह्याहीपेक्षां कठीण प्रसंग आम्हांवर आला होता. आमच्या देशामधीलच नव्हे, तर आमच्या पक्षामधीलही कित्येक निमकहरामी, संशयी आणि निंदाखोर लोकांनीं आमच्यावर आडून गोळ्यांचा वर्षाव चालू केला; काडीइतकेंही कारण नसतां आमच्या मित्रमंडळींनीं आम्हांस रामराम ठोकला; इतकेंच नाहीं, तर आमच्या वेळच्या बहुतेक लोकांनीं, नेकीनें आणि इमानेंइतबारें देशसेवा करण्याची आणभाक घेतली असतां, ती गुंडाळून ठेविली; आणि तेंही, आपण करितों तें अयोग्य आहे अशी खात्री झाली म्हणून नव्हे, तर नेभळेपणामुळें, किंवा पोकळ ताठ्यानें, किंवा ह्याहीपेक्षां हलकट कारणांनीं त्यांनीं केलें. ह्या सर्व गोष्टींस अद्याप सुरवात झाली नव्हती. हा सर्व प्रकार घडून आल्यानंतर आमच्यापैकीं जे थोडे लोक सत्यपथापासून ढळले नव्हते, त्यांचा हिय्या खचला किंवा त्यांचीं अंतःकरणें करपलीं असें झालें नाहीं; तर आणीबाणीचा प्रसंग येऊन ठेपला असतां मनुष्याच्या अंगीं जें एका प्रकारचें स्थैर्य येत असतें तें त्यांच्यांत आलें. त्यांनीं ह्या प्रकारापासून एक सार काढिलें कीं, आपणास जें करावयाचें तें, आपली कोणी पाठ थोपटावी किंवा आपली वाहवा व्हावी, म्हणून नाहीं, तर फक्त आपल्या कर्तव्यास जागून करावयाचें; त्यांत आपल्या खाजगी सुखदुःखांच्या विचारांस अगदीं थारा द्यावयाचा नाहीं, मग त्या कृत्यांत देह जावो किंवा राहो. ईश्वरा, असा प्रसंग पुढें कोणावरही आणूं नको.'

अभिनव इतलीची स्थापना झाल्यास पुरें वर्ष झालें नाहीं तोंच सर्व देशभर त्याचें फार वजन वाढलें. माझीनी म्हणतो 'हा त्या समाजाच्या मतांचा परिणाम होय.' बोटांवर मोजितां येतील इतक्या गरीब, अप्रसिद्ध आणि साधारण अशा अल्पवयी लोकांकडे अल्पकाळांतच एवढ्या वजनदार समाजाचें आधिपत्य आलें कीं, ज्यास मोडण्याकरितां इतलींतील सात राजे कायावाचामनेंकरून आपल्या जुलमाची शर्थ करूं लागले. ह्या एका गोष्टीवरून सिद्ध होतें कीं, ह्या लोकांनीं उभारिलेला

झेंडा खऱ्या देशहिताचा होता. मार्सेल्स येथील जुटांतल्या लोकांनीं व इतलीं-तील त्यांच्या मित्रांनीं पुष्कळ तजविजी केल्या; तथापि त्यांचा कांहीं उपयोग न होतां ह्या कटाची बातमी सरकारास पुरतेपणीं कळली. त्याचे कागदपत्र पकडून देणारांस मोठमोठालीं बक्षिसें देऊं करण्यांत आलीं; व ते कागदपत्र इतली देशांत आणण्याचे कामीं कोणत्याही रीतीनें मदत करणारास कडक शिक्षा मिळतील, म्हणून प्रसिद्ध करण्यांत आलें. पीमांत येथील राजा चार्ल्स आल्बर्ट ह्यानें फरमाविलें कीं, 'कटाच्या कागदपत्रा-संबंधीं माहिती असतां सरकारास बातमी देण्याचें जो वर्जील, त्यास वाटेल तेवढा दंड आणि दोन वर्षांची कैद होईल; व ह्या गुन्ह्याची बातमी देणारास अर्धा दंड बक्षीस मिळून त्याचें नांव प्रसिद्ध केलें जाणार नाहीं.' माझीनी म्हणतो 'मी आणि इतलींतील राजे ह्यांजमध्यें जी लढाई जुंपली, तिचा हा प्रारंभ होय.' हिचा शेंवट माझीनीच्या मृत्यूनें झाला.

माझीनीच्या लेखांचा प्रसार आपल्याच्यानें बंद पाडवत नाहीं, असें जेव्हां इतलींतील राजांस कळून आलें, तेव्हां त्यांनीं तो प्रसार बंद करण्यास फ्रेंच सरकारास विनंती केली. युरोपांतील सर्व राजांनीं ह्या वेळीं लुई फिलि-पचा फ्रान्सच्या राज्यावरील हक्क कबूल केला होता; आणि आतां इतलीं-तील राजांस भिवडावण्याचें कांहीं कारण राहिलें नसल्यानें लुईनेंही ती विनंती मान्य करण्याचा आपल्याकडून प्रयत्न केला. यावेळीं फ्रेंच पोलिसानें माझी-नीचा पिछा पुरविला; पण त्यानें एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं ह्या प्रमाणें पळ काढिला, आणि दोन वर्षेंपावेतों आपला पत्ता लागूं दिला नाहीं. अखेरीस पोलिसास ह्याचा ठिकाण लागला. माझीनीच्या एका मित्राचा तोंडवळा कांहींसा माझीनीच्या चेहऱ्याशीं मिळता होता. तो ह्या प्रसंगीं आपण माझीनी म्हणून पुढें झाला. त्यास पोलिसांनीं कबज करून स्विट्झर्लंडास नेलें; व आपणास पकडावयास आलेल्या पोलीसच्या दुतर्फा रांगेमधून माझीनी खुशालपणें निघून चालता झाला. तो नंतर स्विट्झर्लं-डांत जाऊन राहिला; व इतली देशाचे विभाग करून ते अनेक राजांस वांटून द्यावे म्हणून म्हणणाऱ्या पक्षावर, इतली देश हें एक राष्ट्र असावें असें म्हणणाऱ्या पक्षानें जी हत्यारबंद स्वारी केली, त्या स्वारीची त्यानें तयारी चालविली. ह्या स्वारीचा सेनापती रॅमोरिनो हा प्रतिपक्षास मिळालेला असल्यानें हीस यश आलें नाहीं. बंडवाले येऊन ठेपले म्हणजे आपणही

उठून त्यांस मदत करण्याचा ज्या लोकांनीं कट केला होता, त्यांचा चार्ल्स आल्बर्ट ह्यानें फार भयंकर रीतीनें सूड घेतला. ह्या प्रसंगीं बंदींत पडलेल्या लोकांत माझीनीचा जिवलग मित्र जाकोपो रुफीनी हा होता. चार्ल्सचे कारकीर्दीत फारच अनन्वित कृत्यें घडलीं. जाकोपेचे जे हाल करण्यांत आले, ते ह्या कृत्यांचा एक मासला आहेत. जाकोपोची माझीनीवर मोठी भक्ति व प्रेम असे, ही गोष्ट सुप्रसिद्ध होती. कटाची गोष्ट त्यास कबूल करावयास लाविण्यासाठीं, जाकोपोच्या साथीदारांच्या नांवांची एक यादी करून व तिजवर माझीनीची बनावट सही करुन, ती यादी जाकोपोच्या हातांत देण्यांत आली. रुफीनीनें ह्या आमिषास दाद दिली नाहीं, परंतु त्याच रात्रीं बंदीखान्यांत त्यानें आत्महत्या केली. या मित्राच्या मृत्यूनंतरही माझीनीचें त्याजवरील प्रेम तिळमात्र कमी झालें नाहीं. ह्याच कामीं बळी पडलेल्या दुसऱ्या दोघां गृहस्थांचें चरित्र ह्यानें आपल्या लहानपणच्या मित्रास (जाकोपोस) त्याचे मृत्यूचे पश्चात् अकरा वर्षांनीं अर्पण केलें. ह्या अर्पणलेखाच्या ओळी थोड्याच आहेत, पण त्यांत विलक्षण मार्दव आहे; आणि त्या वाचल्या म्हणजे मनास गहिंवर आल्याशिवाय रहात नाहीं.

ह्या पराभवानंतर त्या गोष्टीचा नाद सोडून देण्याविषयीं माझीनीस पुष्कळांनीं सांगितलें. कारण माझीनीचा पक्ष अगदीं दुर्बळ असून शत्रु भारी प्रबळ होते; व कुमुहूर्तावर हातीं घेतलेल्या सेव्हायवरील स्वारीनंतर ज्या गोष्टी घडून आल्या, त्यांच्या योगानें ह्या म्हणण्यास अधिक पुष्टि मिळाली. चालत्या नावेंत बसणाऱ्या लोकांनीं ह्या आपत्काळीं माझीनीची अगदीं छीथू उडविली, व अपेशाचें सर्व खापर त्याच्या माथीं फोडलें. धराधरी, पळापळी, पक्षत्याग आणि अव्यवस्था ह्यांशिवाय इतलीं तून दुसरी वातमीच येत नव्हती. आसपासच्या जुलमी राजांनीं स्विट्झर्लंड येथील सरकारास खूप जरब दाखविली; तिजमुळें त्या सरकारानें स्विटझर्लंडांत असणाऱ्या ह्या कटांतल्या लोकांचा छळ करण्यास प्रारंभ केला. ह्या लोकांच्या जवळचें लढाईचें सामान संपलें होतें; त्यांची पैशाची थैली रिती झाली होती; त्यांच्यापैकीं बहुतेकांस अन्नाचीही भ्रांति झाली होती; पराजय झाल्यानें त्यांचा हिय्या खचला होता; व त्यामुळें त्यांचे आपसांत कलह सुरू होऊन जो तो अपेशाचें ओझें दुसऱ्यावर ढकलूं ला-

गला होता. असा जरी कहर गुजरला होता, तरी माझीनी त्यास जुमानणारा नव्हता. तो म्हणतो 'लोकांनीं माझें मन फिरविण्यासाठीं आपली पराकाष्ठा केली, व अपरंपार संकटेंही ओढवलीं, परंतु मी डगलों नाहीं; पण माझी जन्मदात्री माउली दुःखानें आणि काळजीनें अगदीं होरपळून गेली आहे, हें मात्र पाहून क्षणभर माझा निश्चय ढळतोसा मला वाटे. मला जर ही गोष्ट सोडून देतां आली असती, तर फक्त माझ्या आईच्या दुःखाकडे पाहून मीं तसें केलें असतें.' स्वातंत्र्यांत मोक्ष आहे म्हणून तें माझीनीस हवें होतें असें नाहीं; तर स्वातंत्र्यापेक्षां अत्यंत महत्वाचा हेतु साधण्याचें तें साधन होय, म्हणून त्यासाठीं तो एवढे उरीं डोंगर पुरी कांटे करीत होता. तो म्हणतो 'आम्हीं उभारलेल्या झेंड्यावर **एकी आणि लोकसत्ता** हीं अक्षरें लिहिलीं होतीं. एका स्वतंत्र देशाचा व राष्ट्राचा पाया घालण्याचा आमचा हेतु होता. असले ज्यांचे विचार त्यांस पराभव म्हणजे पदार्थ काय? विपत्काळीं धैर्य धरून आला दिवस कसा लोटावा, हें आमच्या पक्षांतील लोकांस शिकविण्याच आमचें कर्तव्य नव्हतें काय?'

# भाग ३ रा.

## तरुण युरोप; शंका; इंग्लंड. १८३६ ते १८४८.

माझीनी ह्यास कळून चुकलें होतें कीं, इतलियन लोकांतला जो मोठा दुर्गुण आणि ज्याच्या योगानें त्यांचें अगदी मातेरें झालें होतें, तो स्वातंत्र्य मिळविण्याच्या इच्छेचा अभाव हा नव्हे, तर उद्दिष्ट हेतु साधण्यास अवश्य दृढनिश्चय त्यांच्या अंगीं नव्हता, हा होय. एक निश्चय नाहीं, तर दुसरे शंभर सद्गुण असूनही नसल्यासारखे आहेत. त्यांच्या विचारांत आणि आचरणांत मेळ नसे. इतली देश परदेशियांनीं ग्रस्त असल्यानें वर्तमानपत्रद्वारां तद्देशीय लोकांच्या विचारास वळण लावितां येणें अशक्य होतें. म्हणून माझीनीस वाटे कीं, चोहींकडे फिरून उपदेश करणारांची एक

टोळी असावी. 'कितीही छळ होवो पण तो निमूटपणें सहन करणारे, हातीं धरलेल्या कार्याच्या महत्वाविषयीं दृढ विश्वास असल्यानें तें करून दाखविण्याचा ज्यांच्या अंगीं हुरूप भरलेला आहे, पराजयानें खिन्न न होतां जे सदा हंसतमुख असतात, उद्यां ताज्या दमानें उठतां यावें म्हणून मात्र आज हार घेणारे, शत्रूंशीं टक्कर द्यावयास नेहमीं सज्ज, कालाचा व त्याच्या प्रतिकूलतेचा ज्यांस हिशोब नाहीं, व शेवटीं **सत्यमेव जयते** ह्या सिद्धांतावर ज्यांचा दृढ विश्वास, अशा लोकांचा, मग ते थोडे कां असतना, ह्या कामाकरितां एक समाज पाहिजे होता.' देशाभिमानरूपी धर्म सार्वत्रिक करण्यास आपण निघालों आहों हें लक्षांत ठेवून, कांहीं विघ्नें येवोत व कितीही काळ लागो, परंतु त्या कृत्याचा पिच्छा पुरविण्याविषयीं माझीनीनें आपल्या मनाचा दृढ निश्चय केला. आरंभींच आलेल्या पराजयानें आणि द्रोहानें दुःखार्णवांत बुडाला असतां आपल्या बाल्यावस्थेंतच धरिलेल्या व्रतापासून हा कांहीं ढळला नाहीं; व आमरण ह्यास यशाचा वाराही लागला नसतां, जणू पराजय यास स्वप्नांतही ठाऊक नाहीं, असल्या उल्हासवृत्तीनें देशकार्यासाठीं ह्यानें आपलें यच्चावत आयुष्य खर्चीं घातलें.

कांहीं काळ लोटेपावेतों इतलींत बंड करण्याचें कोणी मनांत देखील आणीना. उपदेशद्वारां मनें वळविण्याच्या कामासही अनिवार्य अडथळा आला. देशपार झालेले माझीनीचे सर्व देशबंधु त्यावेळीं स्विट्झर्लंडांत एकत्र जमले होते; तेथें त्यांची गांजणूक होऊन ते सैरावरां पांगण्यापूर्वी त्यांच्या मनांत एकीचें बीं रोपण्याचा माझीनीनें बेत केला. कारण लोकांच्या अशा एकीशिवाय पुढें पाऊल टाकण्याची सोय नव्हती, हें तो समजून चुकला होता. इतली देशाचें पुनरुज्जीवन करण्याचें सामर्थ्य फक्त एका गोष्टींत आहे, असें त्यास पक्केंपणीं माहीत होतें. ती ही कीं, प्रथम एकी झाल्याशिवाय आपण सर्व मिळून एक राष्ट्र आहोंत, असा लोकांचा समज, होणें दुरापास्त होतें. मागाहून युरोपांत इन्टरन्याशनालिस्ट म्हणून एक मंडळी झाली होती (ह्या मंडळींत वाटेल त्या राष्ट्राचा मनुष्य घेण्यांत येत असे). या इंटरन्याशनालिष्टांप्रमाणें कारबोनारी ह्यांनीं आपला उद्योग सर्व स्थळीं चालविला होता, व सर्व देशच्या लोकांस ते आपल्या समाजांत घेत असत. परंतु या दोन्ही समाजांची

एकसारखी चूक होत होती. हे दोन्ही समाज विश्वकुटुंबी ह्या शब्दाच्या तात्विक अर्थाप्रमाणें व्यापक असत. कारबोनारी समाज मनुष्यजातीचे भेद ओळखीत नसे. व्यक्ति आणि मनुष्यजाती ह्या दोनच गोष्टी तो हिशेबांत घेत असे. एकदा ह्या समाजांत शिरलें म्हणजे मी फ्रेंच तूं जर्मन हा लोकांचा जातीभाव नाहींसा होई; व ते सर्व कारबोनारी ह्या नांवानें मोडत असत.

माझीनी लिहितो कीं 'आपपरभाव टाकून देऊन सर्व मनुष्यांच्या ठिकाणीं बंधुप्रेम ठेवणें, व लोकांमध्यें परस्पर हितविरोधी अशा ज्या अडचणी व भेद आहेत त्यांचा नाश करणें, असा जर विश्वकुटुंबित्व ह्या शब्दाचा अर्थ असेल, तर आम्ही सर्व विश्वकुटुंबी आहोंत.' पण त्यानें हें दाखवून दिलें कीं 'लोकमतास एक बाजूस झुगारून देऊन राज्य करण्याचा हक्क सांगणाऱ्या राजांचा कट लोकांनीं मोडून काढिला पाहिजे, हा मुख्य मुद्दा आहे. ह्या कामासाठीं एकाद्या समाजाची स्थापना झाली पाहिजे. व असा कोणताही समाज स्थापन करावयाच्या पूर्वी त्याचे इष्ट हेतु काय असावयाचे आणि त्यांस आरंभ कोठून करावयाचा, ह्या गोष्टींचा निर्णय झाला पाहिजे. एकादी वस्तु यंत्रानें उचलावयाचा विचार करण्यापूर्वी तें यंत्र आणि ती वस्तू हीं दोन्हीं आपल्यापाशीं असलीं पाहिजेत.' ह्या कारणामुळें माझीनीचें मत असें होतें कीं, 'मनुष्यजातीच्या कल्याणाप्रीत्यर्थ जनसमाजरूपी यंत्रास गति देण्यापूर्वी त्यास कोठें तरी ठाम केलें पाहिजे. **आपलें** काय आहे ह्याची आधीं ओळख करून घेतली पाहिजे. विश्वकुटुंबी समाजांतील लोक आपल्यास देशच नाहीं, असें धरून चालत, म्हणून त्यांस उभें राहण्यास जागा नाहींशी झाली. मग ते लोकांच्या कल्याणार्थ झटणार कसे? यंत्र टेंकण्यासच जागा नाहीं, तेव्हां अर्थात्च तें निरुपयोगी झालें.'

पूर्वकाळीं राजे आणि उमराव लोक ह्यांनीं तहांतून व करारांतून राष्ट्र ह्या शब्दाचा फारच खोडसाळपणानें दुरुपयोग केला. बाह्यतः राष्ट्रहितासाठीं म्हणून पण वास्तविक स्वतःच्या मतलबासाठीं, त्यांनीं लोकांवर हवे तसे जुलूम व कहर केले. एकराष्ट्रत्वाच्या कल्पनेशीं ज्या कित्येक सुधारकांचें वांकडें आहे, त्यांच्या मनांवर ह्या गोष्टीचा परिणाम न कळत झाला आहे; ही गोष्ट माझीनीनें स्पष्ट करून दाखविली. तो म्हणतो 'त्या राजांस

स्वार्थापलीकडे कांहीं दिसत नव्हतें; व ज्यांस खऱ्या जनहिताची मुळींच आस्था नव्हती अशा लोकांनीं दरबारांत एकांतामध्यें तह केलेले असून लोकांचें त्यांत अगदीं अंग नव्हतें, त्यामुळें लोकांच्या कल्याणासाठीं म्हणून ते मुळींच करण्यांत आले नव्हते. असे तह लोकांस कसे मान्य होतील ? तह करणारांस आपलें कुटुंब, आप्तमित्र, आणि वंशज हाच काय तो स्वदेशाचा पाश होता. लोकांच्या सुखदुःखांकडे न पाहतां सर्व सत्ता आपण बळकावून बसणें, एवढाच त्यांचा पुरुषार्थ; तात्पर्य आपलें हित साधून घ्यावें व त्यास धक्का न लागावा, म्हणून प्रजेची पायमल्ली करावी, एवढ्या वाक्यांत त्या लोकांच्या मताचें सार येऊन जातें. ह्यांनीं केलेले तह खरे तह नव्हत; तर आली वेळ मारून नेण्यासाठीं केलेल्या त्या तडजोडी होत. ह्यांनीं जो समेट करावयाचा तो आपणास उसंत मिळावी म्हणून. ह्यांचा एकमेकांवर तिळाएवढाही विश्वास नव्हता. हे एकमेकांस पाण्यांत बघत असत. सरहद्दी न वाढविण्याविषयीं ह्यांचे जे करार आहेत, ते केवळ आपल्यावर घाले न पडावे म्हणून केलेले आहेत.

'हा एकमेकांवरील गैरविश्वास त्यांच्या वकिलांच्या कारस्थानांत दिसून येतो. ह्यांचा एकमेकांशीं सलोखा करण्यांतही हाच मतलब होता. वेस्टफालिया येथील तहांत तो फारच व्यक्त रीतीनें दिसून येतो. युरोपांतील राष्ट्रांचा परस्पर दळणवळणासंबंधीं चालू असलेल्या कायद्याचा सदर तह हा एक भाग झाला आहे. ह्या तहाचें बीज हें आहे कीं, राजघराण्यांचा कायदेशीरपणा सांगणें, आणि त्या घराण्यांना किंचित्‌ही धक्का न लागेल अशी व्यवस्था करणें. तेव्हां राजसंस्था ज्यांच्या हाडीं खिळली आहे अशा युरोपस्थ लोकांच्या मनांत राष्ट्रांची एकी व सलोखा असावा हें यावें कसें, आणि तें त्यांच्या हातून घडावें कसें ?

'म्हणून, आपल्या राष्ट्राच्या पायांतील शृंखळा तोडून टाकणें, हें प्रत्येक देशांतील सुधारकांचें पहिलें कर्तव्य होय. कारण राष्ट्रें स्वतंत्र झाल्याशिवाय, लोकांचा एकोपा होणें, एका गांवांत जशीं अनेक कुटुंबें असतात तशीं यूरोपखंडांतील सर्व राष्ट्रें त्या खंडांतील कुटुंबें होणें, स्वसिद्ध अथवा लोकांच्या पसंतीच्या राजसंस्थेचें निर्मूळ होणें, इत्यादि गोष्टी घडावयाच्या नाहींत.' पुष्कळ श्रम सोसून व अनेक हानी सोसून राष्ट्ररूप

कुटुंब एकदा स्वतंत्र झालें व सर्वजनांस संमत अशा कायदेकानूंस अनुसरून लोकनियुक्त संस्थांच्या द्वारें आपला राज्यकारभार करूं लागलें, म्हणजे वर लिहिलेल्या प्रकारचा एकोपा झालाच पाहिजे, असें माझीनीचें मत होतें. 'अशा रीतीनें बनलेलीं राष्ट्रें व्यक्तिशः स्वतंत्र असून सर्वांच्या सामान्य हितास अनुकूल अशीं आपलीं कर्तव्यें ओळखूं लागतील, व युरोपस्थ राष्ट्रांच्या मंत्रिमंडळांत आपापल्या तर्फेचे प्रतिनिधी पाठवून, राष्ट्रांच्या अंतस्थ दळणवळणांचें नियमन करण्यासाठीं सर्वानुमतें कायदे घडण्यास ह्या प्रतिनिधींस अधिकार देतील. राजसत्तेखालीं असलेल्या राष्ट्रांचा आजपर्यंत असा स्वभावच ठरून गेला आहे कीं, त्यांनीं लोकांचे हक्क बळकावावे व लोकांची पायमल्ली करून टाकावी. न जाणों पुढेंमागें आपणांवर कांहीं संकट ओढवेल अशी निरंतर असलेली भीति, हें त्या स्वभावाचें कारण आहे, दुसरें कांहीं नाहीं. भावीकाळीं होणाऱ्या युरोपाच्या राष्ट्रकुटुंबांत ह्या अप्पलपोट्या स्वभावाचा लेशही दिसावयाचा नाहीं, व ह्या कोत्या विचाराच्याऐवजीं सर्वांस हितावह असें प्रत्येकाचें कर्तव्य काय आहे, ह्या विचारांचा पगडा बसेल. आजपर्यंत राष्ट्रांच्या परस्पर व्यवहारांत, दुसऱ्यास पायमल करून टाकून यावच्चंद्र दिवाकरौ त्यास आपलें डोकें वर करितां येणार नाहीं अशी तजवीज करणें, म्हणजे मुत्सद्दीपणाची व कर्तबगारीची सीमा झाली असें मानलें जात आहे; पण पुढें, आपापलें कर्तव्य करून सर्वांचें हित साधावें व आपण पुढें पाऊल टाकून सर्वांस आपल्याबरोबर पुढें न्यावें, ह्यांत खरें शहाणपण आणि कर्तबगारी मानली जाईल.'

त्या वेळीं जर्मनी, फ्रान्स, इतली आणि पोलंड ह्या देशांतील हद्दपार झालेल्या लोकांचा माझीनीभोंवतीं गराडा पडला होता. ह्या लोकांच्या मनांत वर लिहिलेल्या विचारांचे बीजारोपण करण्यासाठीं (त्या अंकुरास पुढें फळें आलींच पाहिजेत), अभिनव इतलीच्या धर्तीवर नूतन युरोप नांवाच्या समाजाची माझीनीनें स्थापना केली. ह्या समाजाचीं मतें काय आहेत, त्या विषयावर त्यानें एक लेखही लिहिला. स्वतंत्र आणि समान हक्काच्या लोकांचे समाज झाले, व सर्वमान्य नीतिनियमांच्या अनुरोधानें त्या समाजाकडून आचरण झालें, म्हणजे मनुष्यजा-

तींच्या सुधारणेचें पाऊल पुढें पडलेंच पाहिजे, असा नूतन युरोप समाजाच्या मतांचा मूळ सिद्धांत होता.

हीं मतें केवळ तात्विक म्हणजे व्यवहारानपेक्ष आहेत. ह्यांस अनुसरून जर कधीं सृष्टीचा क्रम चाललाच, तर तसें होण्यापूर्वी युगांचीं युगें लोटलीं पाहिजेत. तथापि ह्या मतांचा प्रसार करण्यासाठीं माझीनी इतक्या निश्चयानें झटत असे कीं, त्यास बहुतेक लोकांनीं 'मनोराज्यांतील राजा' असें नांव दिलें होतें. माझीनीविषयीं असा ज्यांचा ग्रह झाला होता, त्यांस माझीनीच्या स्वभावाची ओळख पटली नव्हती. जगांत मूर्खांचीच संख्या मोठी आहे. वर लिहिलेल्या प्रकारचें सत्ययुग येण्यास किती काळ लोटला पाहिजे, हें माझीनीस समजत नव्हतें असें नाहीं. उलट, त्यास 'मनचे मांडेखाऊ' म्हणून जे म्हणत, त्यांस त्याच्या निम्मे हिश्शानें सुद्धां ही गोष्ट कळली नव्हती. आपल्या स्वतःच्या ह्यातींत ही गोष्ट घडून येणें नाहीं, हें त्यास कधींच कळून चुकलें होतें; तथापि त्यामुळें त्याच्या आचरणांत काडीइतकाही फरक पडला नव्हता. स्वतःच्या आशा व सुखें हीं कर्तव्यमार्गावर पडलेलीं फुलें असून, तीं टाळण्यासाठीं त्या मार्गापासून ढळतां कामा नये, तर तीं फुलें तुडवून पुढें चालतें झालें पाहिजे, असें तो मानीत असे. तो ह्मणतो 'इतलियन लोकांस आपला देश परकियांच्या कचाट्यांतून सोडवितां येईल, ही कल्पना प्रथम अस्पष्ट रीतीनें माझ्या मनांत आली; परंतु पुढें तिनें आपला ठाव कधीं सोडिला नाहीं.' काव्यव्युत्पत्ति, चित्रलेखन वगैरे विषयांची माझीनीस जात्या फार आवड असे. तथापि पोरपणींच त्यानें ही आपली आवड एके बाजूस गुंडाळून ठेविली; आणि आपला देश स्वतंत्र करितां येईल कीं नाहीं ह्या प्रश्नाचा उलगडा करण्याकरितां आपलें सर्व आयुष्य खर्चण्याचा त्यानें निश्चय केला; व त्याकामीं आपणास यश आलें तर आपल्या मरणोत्तर इतलियन लोक अंगीं असेल नसेल तेवढें कौशल्य खर्चून आपल्या अस्थींवर सुबक व नकशीदार थडगें बांधतील, म्हणून आपलें समाधान करून घेऊन यावज्जीव त्यानें आपला निश्चय सोडिला नाहीं. प्रयत्न केला तर अखेरीस सत्याचा जय झालाच पाहिजे; एवढें महत्कार्य उद्योगाअंतीं सफल होण्यासारखें असल्यास आपल्या देशबंधूंनीं तें कर-

ण्यासाठीं झटलेंच पाहिजे, ही गोष्ट त्याला एकदा कळल्यावर तिनें ब्रह्महत्ये-प्रमाणें त्याचा पिच्छा सोडिला नाहीं. हें थोर कार्य सिद्धीस नेण्यासाठीं ज्या ज्या साधनांचा उपयोग किंवा मदत होण्यासारखी होती, तीं सर्व साधनें, मग तीं लहान असोत कीं मोठीं असोत, प्राप्त करून घेण्यासाठीं त्यानें अश्रांत परिश्रम केले.

एकाद्या सत्पुरुषानें आपला अमृतहस्त माझीनीच्या डोळ्यावरून फिरवून जर त्यास दिव्यचक्षु केलें असतें, व त्याचा इतिकर्तव्यरूप क्षितिज तो समजत होता त्याहून अतिशय दूर आहे, ही गोष्ट त्याच्या प्रत्ययास आणून दिली असती, तरी किंचितही खिन्न न होतां आपल्या नेहमीच्या हास्ययुक्त पण जरा उदासीन आणि निश्चयी अशा मुद्रेनें, एक क्षणभर देखील न थांबतां, तो पुढें चालता झाला असता. शॅवरच्या बंदीवासांतून सुटल्यानंतर एके दिवशीं, राजाच्या आणि त्यांच्या अनुयायांच्या अनीतीच्या बाजारानें इतलियन लोकांचा जो नैतिक ऱ्हास होत चालला होता, त्याविषयीं फार कष्टी होऊन तो बोलत असतां, त्याच्या एका मित्रानें ती संधि साधून त्याचेच बोल त्याच्या पदरीं घालून म्हटलें ‘ तर आतां पुन्हा श्रम करूं लागण्यापूर्वी विश्रांती घेतली पाहिजे असें तुमच्याच बोलण्यावरून ठरतें. ’ त्यावर त्यानें उत्तर दिलें ‘ जों जों मुक्काम दूर तों तों तट्टू तसेंच पुढें दामटलें पाहिजे. त्याला थबकवून टाकतां येत नाहीं, तसें आराम करीत बसणेंही उपयोगी नाहीं. ’

नूतन युरोप या समाजाचा तत्काळ उपयोग होईल अशा भरंवशावर माझीनीनें त्याची मुळींच स्थापना केली नव्हती. आपल्या बलाढ्य शेजाऱ्याच्या धमकावणीनें स्विट्झर्लंड सरकारची अगदीं गाळण उडाली होती, व देशनिकालाची शिक्षा पावून स्विट्झर्लंडांत येऊन राहिलेल्या परकी लोकांस तें बाहेर घालवून देत होतें, हें माझीनीस माहीत होतें. माझीनीचा असा बेत होता कीं, हे लोक फांकून इतर लोकांत मिसळून जाण्यापूर्वी, युरोपखंडांतील भावी प्रजासत्ताक राष्ट्रांच्या एकीविषयीं, या लोकांच्या मनांत कल्पना भरवावी, म्हणजे पुढें प्रवासांत ज्या ज्या लोकांशीं यांचा संबंध होईल त्यांचीं मनें हे लोक त्या कल्पनेकडे विशेष वळवूं शकतील. तसें झाल्यानें कधीं काळीं, आपल्या सरकारच्या

किंवा परकियांच्या जुलुमास त्रासून कोणी लोक उठले, तर त्यांस मदत करण्यास युरोपखंडांतील दुसऱ्या लोकांनीं तयार असावें. ही मदत हातांत हत्यार घेऊन केली तर बरेंच; नाहींपेक्षां निदान उठलेल्या लोकांविषयीं आपली आस्था आणि कळकळ अशा स्पष्ट रीतीनें दाखवावी कीं, त्यामुळें त्या लोकांच्या देशचें सरकार भिऊन जाऊन तें आपलें बळ त्या लोकांविरुद्ध खर्च करणार नाहीं. माझीनी म्हणतो '"राष्ट्रांचा असा एकोपा करणें हें एकट्यादुकट्याचें काम नाहीं; तें सगळ्या युरोपखंडांतील लोकांच्या हातून झालें पाहिजे, हें मी समजून होतों; आणि म्हणूनच माझ्या यत्नास तत्काळ यश येईल असें मला मुळींच वाटलें नव्हतें. मी हेंही समजून होतों कीं, ही गोष्ट घडून येण्यास पुष्कळ अवधि लागेल, व याप्रमाणें राष्ट्रांचा एकोपा अवश्य आहे हें लोकांस समजूं लागण्यापूर्वीं त्यांस पुष्कळ कसोट्यांस उतरावें लागेल. परंतु मी ह्या मताचा प्रसार करण्यासाठीं झटलों तें एवढ्यासाठीं कीं, एकदा बीं चांगलें जमिनींत पडलें म्हणजे कालपरत्वें त्यास फळें लागलींच पाहिजेत.'

ह्या बीजास जर लवकर फळें आलीं असतीं, सन १८४८–४९ सालापूर्वीं जर युरोपस्थ लोकांच्या मनांत एकमेकांविषयीं भ्रातृभाव उत्पन्न झाला असता, तर फ्रान्स येथील लोकसत्ताक राज्यानें रोम येथील नवीन जन्म पावलेल्या प्रजासत्ताक राज्याच्या गळ्यास नख दिलें, तें पहाण्याचें आपल्या नशिबीं आलें नसतें; फार तर काय, पण त्या क्षणापासून हंगेरीची गुलामगिरींतून सुटका झाली असती. हंगेरीनें आपला धनी जो आस्त्रिया ह्याचा मोड केला होता. त्यावेळीं जर लोकांस परस्पर संबंधाचें आपलें कर्तव्य समजत असतें, तर हंगेरीनें तोडून टाकिलेली बेडी त्याच्या पायांत रशियानें पुनः घातली, ती त्यांनीं जडूं दिली नसती. एकट्या राजाच्या किंवा राजाच्या आणि उमराव लोकांच्या हातीं सारी राजसत्ता असते, अशा सरकारांस आत्मसंरक्षणाचें ज्ञान फार लवकर आणि चांगलें येतें. ह्यावेळींही असेंच झालें. देशोदेशींचीं सरकारें लोकांपेक्षां अधिक सावध होतीं. आपण हद्दपार केलेल्या प्रजेपुढें ह्या मनोराज्याधिपतीस त्याचें स्वप्नपुराण त्यांनीं फारसें सांगूं दिलें नाहीं. युरोपांतील सर्व राजांकडून आणि विशेषेंकरून फ्रान्स आणि इतली येथील सरकारांकडून स्विट्झर्लंड सरकारावर खलित्यांचा वर्षाव झाला. सर्वांचें मागणें हें कीं, माझीनी आपल्या मुलखांतून हांकून

लाया. परंतु माझीनी ज्या तालुक्यांत राहत होता, तेथील लोक त्यास अनुकूळ होते. असा जुलुम करण्यास कांहीं निमित्त पाहिजे, म्हणून फ्रान्स व इतली येथील वकिलांनीं, राजांस ठार मारण्याकरितां एक कट झाला आहे, याप्रमाणें काल्पनिक कटाची उभारणी केली, व त्यांत माझीनी सामील होता, म्हणून प्रसिद्ध केलें. परंतु इतलींतून देशपार झालेल्या लोकांनीं त्यांचें सारें भांडवल फोडिलें, व हलकटपणाचा आणि लबाडीचा हा सारा प्रकार उघडकीस आणिला. फ्रान्स व इतली यांच्या तर्फेच्या मुकत्यारांस त्यांच्या सरकारांकडून जी माहिती मिळाली होती व त्यांजपाशीं त्यासंबंधाचे जे कागदपत्र होते, ते सर्व या हद्दपार झालेल्या लोकांनीं त्यांना देण्यास लाविलें. लुई ब्लँकच्या 'दहावर्षांचा इतिहास' नांवाच्या इतिहासांत ह्या कृष्णकुटाचें यथासांग वर्णन आहे. माझीनीनें आपल्या 'स्वचरित्र व ग्रंथ' नांवाच्या पुस्तकांत ह्या विषयासंबंधानें फार खरमरीत पण अक्षरशः खरी टीका केली आहे. तींतून येथें अवतरण देण्यासाठीं मीं तिचा उल्लेख केला आहे.

तो म्हणतो 'दरबार वकील, कारभारी, दरबारी, मुकत्यार, ह्या व अशाच दुसऱ्या नांवांनीं मोडणारे दिखाऊ सभ्य गृहस्थ झाडून सगळे महाशठ असतात. लबाडी ह्यांच्या हाडोहाड खिळलेली असते; व पावलोंपावलीं ह्यांस खोटें बोलल्याशिवाय चैन पडत नाहीं. तरी देखील सांप्रतच्या राजकार्यधुरीण मंडळीचा ह्यांच्या द्वारांत जर नुसता प्रवेश झाला, तर ती मोठी धन्यता मानून घेते; व ह्यांनीं एक प्रसन्न नेत्रकटाक्ष आपल्यावर फेंकावा, किंवा नुसता ह्यांच्या हातास हात लागावा, म्हणून ती पालथीउलथी होत असते. मला जर ह्यांच्या वाऱ्याचा स्पर्श झाला, तर मी सचैल स्नान करीन. ह्यांच्यापैकीं सभ्यांतला सभ्य असा एक माणूस जरी घेतला, तरी त्याची किंमत एकाद्या मजुरी करून निर्वाह करणाऱ्या कोळ्यानाळ्यापेक्षांही कमी असते. हें खरें कीं, त्या मजुरास कल्हई केलेल्या अव्वाच्यासव्वा मिठ्या बाता झोंकतां येत नाहींत. तो बिचारा आपल्या अडाणी भाषेनें कां होईना, पण असेल तसें खरें बोलतो; व त्याच्या लबाडीचें माप जर त्याच्या पदरीं घातलें, तर निदान ओशाळा तरी होतो.'

स्विस डाएटनें (पार्लमेंटनें) माझीनीस जन्मपर्यंत देशनिकालाची शिक्षा फर्माविली. तें ऐकून माझीनीनें नुसती मान हालविली, पण आपली जागा

सोडिली नाहीं. स्विस सरकारनें त्याचा शोध करकरून दमलें, पण त्याचा पत्ता लागला नाहीं. तो म्हणतो 'माझ्याप्रमाणेंच हद्दपार झालेल्या दोघां मित्रांच्या प्रकृति बिघडल्यामुळें तो देश सोडावा लागला; नाहीं तर मला तेथें हवे तितके दिवस राहतां आलें असतें.' सन १८३९त त्यानें इंग्लंडांत जाण्याचा निश्चय केला. ह्या वर्षी त्याच्या मानसिक दुःखाची पराकाष्ठा झाली. हें वर्ष तो जन्मभर विसरला नाहीं. माझीनीनें केलेल्या कृत्यांचा इतिहास सांगत बसण्याचा नव्हे, पण तो कशा प्रकारचा मनुष्य होता, हें दाखवून देण्याचा माझा मुख्य उद्देश असल्यानें, हीं दुःखें मी त्याच्याच प्रौढ आणि हृदयमर्म भेदणाऱ्या भाषेंत सांगतों.

'मी जरी शतायुषी असलों, तरी ह्या वर्षाच्या शेंवटीं ज्या मानसिक व्यथा माझ्यावर काहुरून आल्या आणि त्यांच्या तुफानांत सांपडून जो मी अगदीं जर्जर होऊन गेलों, त्या गोष्टी मी कधीं क्षणभरही विसरावयाचा नाहीं. या क्षणींही मी त्यांच्याविषयीं आवडीनें लिहितों आहें असें नाहीं. मी हा व्याप एवढ्याचसाठीं करितों कीं, माझ्याप्रमाणें ज्यांच्या नशिबीं असले प्रसंग भोगावयाचे लिहिलेलें असेल, त्यांस माझ्या ह्या आरोळ्यांनीं असल्या तुफानांतून सुटका होण्याचा रस्ता दिसावा. ह्या तुफानानें माझीं हाडें खिळखिळीं होऊन मी अगदीं क्षीण झालों आहें; परंतु माझें मन पहिल्यापेक्षां घट्ट झालें आहे. आपल्या हेतूंविषयीं लोकांनीं नाहीं तेच कुतर्क करणें व भलत्याच कल्पना बांधणें, हें दुर्दैव लोकांचा पुढाकार घेणाऱ्या बहुतेक सर्वांच्या वांटयास असतें. ज्यांनीं एका महत्कार्याच्या सिद्धीसाठीं आपलें तनमनधन व सर्व आयुष्य हीं अर्पण केलेलीं असतात, ज्यांचीं अंतःकरणें वाळून कोळ होऊन जाऊन ज्यांत कर्तव्यबुद्धीच्या शुष्क अंकुरापलीकडे कांहीं उरलें नसतें, व ज्यांच्या मनांतील प्रीतीचा झरा कोरडा ठणठणीत पडून त्यांत द्रवाचा लेशही उरला नसतो, अशा पुरुषांविषयीं मात्र गैरसमज होत नाहीं; कारण तसा गैरसमज होण्यास अवकाशच राहिला नसतो. माझा स्वभाव फार मायाळु असून माझें अंतःकरण प्रीतीनें उचंबळत असे. लहानपणीं माझ्या जननीच्या प्रेमयुक्त हास्यमुखाकडे पाहून जो मला आनंद होई व उल्हास वाटे, तशाच हर्षाचा उमाळा मोठेपणींही या घटकेपावेतों येत असे. माझ्या स्वतःच्या कल्याणाची नाहीं, पण लोकांच्या कल्याणाची उत्कट इच्छा माझ्या अंतःकरणांत

सदैव जागृत असे. परंतु ह्या वर्षाच्या अखेरच्या घातमासांत माझ्यावर दु:खें, निराशा आणि फसगती, ह्या ढगांचें असें काहूर आलें व मी असा गाढ अंध:कारांत बुडालों कीं, जरेचें उग्र रूप साक्षात् माझ्या डोळ्यांसमोर दिसूं लागलें; मला सर्व जग जीर्णारण्याप्रमाणें भासूं लागून, मी त्यांत एकटा आयुष्याचे दिवस कंठीत आहें, मला कांहीं आधार नाहीं, व समाधानास जागा नाहीं, अशी माझ्या मनाची वृत्ति झाली.

'माझीं दु:खें कोठवर सांगूं? इतलीच्या उन्नतीचा शेवटचा आशातंतु तुटला. आमच्या पक्षापैकीं अत्यंत विश्वासुक लोकांची दाणादाण झाली. स्विट्झर्लंडांत एकावर एक जुलूम सुरू झाले. आम्हीं जो थोडाबहुत पाया घातला होता, त्याचा मागमूस नाहींसा झाला. स्विट्झर्लंडांत असतां आम्ही इतलीच्या अगदीं शेजारी होतों, तोही आमचा आश्रय तुटला. आमच्याजवळ कांहीं त्राण उरलें नव्हतें. हातीं धरलेल्या कार्यांत हजारों आणि अपरिहार्य अशीं विघ्नें उभीं राहिलीं. माझ्या दु:खांची मालिका येथेंच संपत नाहीं. आजपर्यंत माझ्यावर लोकांचें निस्सीम प्रेम होतें, व मी म्हणेन तें वेदवाक्याप्रमाणें ते मानीत असत, त्यामुळें ही टक्कर घेतांना मला धीर येत असे; पण तें सर्व पार नाहींसें झालें. माझ्याविषयीं जिकडे तिकडे अविश्वास उत्पन्न झाला. आम्हीं अंगीकारिलेल्या कार्यांत शेंकडों अडचणी येतील, ही गोष्ट तें कार्य हातीं घेतेवेळेसच माहीत असूनही, आपल्या कर्तव्याच्या रस्त्यापासून तिळमात्र न ढळण्याविषयीं ज्यांनीं आणभाक वाहिली होती, तेच क्रियानष्ट झाले. मी ज्या कार्यास्तव आणि जे हेतु मनांत धरून एवढ्या प्रबळ शत्रूशीं एकटा लढत होतों, तें कार्य व तें हेतु झूट असून त्यांत माझा कांहीं तरी खाजगी मतलब आहे, असा लोकांचा समज झाला; व तोही गैरमाहितगार तिऱ्हाइतांचा नव्हे, तर प्राणाहूनही जे मला अधिक प्रिय होते, अशा एका दोघा मित्रांचा. मी उगा कां बसलों आणि माझ्या सर्व ऐहिक सुखांवर समजून उमजून लाथ मारण्यांत मला किती दु:खें भोगावीं लागलीं, ह्या गोष्टी, ज्यांवर मी बंधुप्रेम करीत असे, ते लोक समजत आहेत व ते माझ्यावर सुखदु:खाचे वांटेकरी होतील, असा मला भरंवसा होता. पण ज्यावेळीं माझ्यावर चोहोंकडून संकटें येऊं लागलीं, व ज्यावेळीं माझ्या मित्रांपैकीं कोणीं तरी येऊन माझी पाठ थोपटून व समाधान करून मला धीर द्यावयास पाहिजे होता, त्याचवेळीं वर लिहिलेले

सर्व प्रकार मला समजून आले. अस्तु. मी चऱ्हाट लावीत बसत नाहीं. पण एवढेंच सांगतों कीं, **कठिण समय येतां कोण कामास येतो हें** वाक्य अक्षरशः खरें झालें.

'मी ह्या जगांत अगदीं एकटा आहे. मला कोणी पाठीराखा नाहीं. बिचाऱ्या आईचा मात्र जीव मजसाठीं तिळतिळ तुटत आहे; पण तीही माझ्या दुःखानें होरपळून जाऊन दूर देशीं पडली आहे. ह्या गोष्टी माझ्या मनांत आल्या मात्र, आणि जिकडे तिकडे मला भयाण दिसूं लागलें. मी अगदीं गांगरून गेलों. ह्या काल्पनिक अरण्यजालांत मी पडलों असतां, माझ्या मनांत एक शंका उभी राहिली कीं, कदाचित् आपलीच चुकी होत असेल. लोक म्हणतात तें खरें नाहीं कशावरून ? कदाचित् माझें जें मत आहे तें नुसतें स्वप्न असेल. माझें म्हणणें लोकांस रुचत नसून, मी मात्र त्यांची पाठ सोडीत नाहीं, असें होत असेल. कदाचित् मी गर्वानें फुगलों असेन, आणि आपलाच हेका धरून बसलों असेन. नुसता जय मिळविण्यासाठीं मी शत्रूंच्यामागें लागलों असेन, मग त्यांत कांहीं फळ निघो कीं न निघो. माझी संकल्पात्मक बुद्धि मला हळूच उपदेश करीत असेल कीं " बाबारे, अर्धी सोडून सगळीच्या पाठीस लागूं नको. ज्यावांचून अगदीं अडलें आहे आणि जो सुसाध्य आहे, तेवढाच कार्यभाग आधीं उरकून घे." पण मला अहंकार झाला असेल, आणि मी तो उपदेश झुगारून देत असेन. असें नसेल कशावरून ?

'ज्या दिवशीं माझ्या अंतःकरणास ह्या कल्पनांची सुयांसारखी टोंचणी लागली, त्या दिवशीं मी माझा मलाच इतका तुच्छ वाटूं लागलों कीं, सांगतां येत नाहीं. मला वाटे कीं, मी अपराधी आहें; व माझ्या अपराधाचा परिहार कोणत्याही प्रायःश्चित्तानें होण्यासारखा नाहीं. खुनी मनुष्याच्या पाठीस जशी त्याची हत्या लागते, त्याप्रमाणें चेम्बरी आणि अलेक्सांड्रिया येथें गोळ्या लागून ठार झालेले लोक माझ्या डोळ्यांपुढें उभे राहिले. त्यांस पाहून पश्चात्तापाचें शल्य माझ्या काळजास झोंबलें. मला वाटूं लागलें कीं, त्या लोकांस जिवंत करण्याची शक्ति माझ्या अंगांत आहे काय ? मीं किती आयांस दुःखाश्रू ढाळण्यास लाविलें आहे ? अजूनही जर मीं आपला हट्ट सोडिला नाहीं, आणि आपल्या देशास नांवारूपास आणण्याची इच्छा इतालियन लोकांच्या मनांत मी जागृत करीत राहिलों, तर

ते आपल्या प्राणांच्या आहुती देत सुटणार नाहींत काय ? व असें झाल्यास आणखी किती आर्यांस रडावें लागेल ? पण आतां जर इतली देश म्हणून या पृथ्वीच्या पाठीवर देशच उरला नसेल; दोनवेळ कालचक्रांमध्यें पुढें सरसाऊन सुधारणेची संस्थापना केल्यानें जर तो देश आतां निस्सत्व आणि मृतप्राय झाला असेल; व जगन्नियंत्याची जर आतां अशीच मर्जी असेल कीं, इतलीस इतःपर नांव, गांव, कर्तव्य कांहींएक नसावें, पण त्यानें आतां नवीन उदय पावलेल्या एकाद्या जोमदार राष्ट्राचें अंकित होऊन स्वस्थ राहवें; तर भावीकाळीं अमुक होईल आणि तमुक होईल म्हणून भाकितें करीत बसण्यास मला काय अधिकार आहे ? हजारों लोकांस आपल्या प्राणांचे आणि त्यांहीपेक्षां प्रिय वस्तूंचे बळी देण्यास मीं काय म्हणून लावावें ?

' ह्या शंकांचा माझ्या मनावर जो परिणाम झाला तो मी साद्यंत सांगत बसत नाहीं. एवढेंच सांगतों कीं, माझ्या मनास अशा असह्य वेदना झाल्यामुळें मी बहुतेक वेडाच झालों. केव्हां केव्हां मीं रात्रींतून झोंपेंतून एकदम उठावें, व जाकोपी रुफीनी आपल्यास हांका मारीत असून त्याचा आवाज ऐकल्याचा भास होऊन मीं बेशुद्धींत तडक खिडकीकडे पळत सुटावें. केव्हां केव्हां मीं उठून कांपत कांपत शेजारच्या खोलींत जावें; कारण मला वाटे, तेथें आपला एकादा मित्र आपल्यास भेटेल. वास्तविक तो गृहस्थ मजपासून शेंकडों कोसांवर आहे किंवा बंदिखान्यांत आहे, हें मला माहीत असे; पण तसें केल्याशिवाय माझ्यानें राहवत नसे. एकादा शब्द किंवा आवाज ऐकून किंवा अशाच क्षुल्लक गोष्टीमुळें मीं रडूं लागावें. ग्रेंचनच्या आसपासचा सर्व प्रदेश ह्यावेळीं बर्फानें आच्छादला गेला असल्यामुळें अगदीं वैराण झाला होता. तो मला स्मशानासारखा दिसे, व तें स्मशान मला आपल्याकडे बोलावीत आहे, असें वाटे. ज्यांच्या ज्यांच्याकडे दृष्टि फेंकावी ते सर्व माझी निर्भर्त्सना करीत आहेत, व कांहींस माझी दयाही येत आहे, असें भासे. हीच मनाची स्थिति जर आणखी कांहीं वेळ राहती, तर एकतर मी वेडा मी वेडा झालों असतों, किंवा आपल्यामागें बिचाऱ्या आईची व आपल्या मित्रमंडळीची दशा काय होईल, ह्या गोष्टींचा विचार न करितां आपलपोटेपणानें मी आत्महत्या करून घेतली असती. ह्याप्रमाणें माझ्या जिवास यातना लागल्या होत्या, व माझा धीर सुटत चालला होता;

इतक्यांत माझी ही दुःखद स्थिति एका तरुण मुलीच्या थोडीशी लक्षांत येऊन, तिनें माझ्यापासून थोड्या अंतरावर राहणाऱ्या एका मित्रास आग्रह केला कीं, मला एकटें न ठेवितां कोणीं तरी माझ्याजवळ राहावें. त्यावर त्या गृहस्थानें उत्तर दिलें कीं "त्याला काय दगड झाला आहे? तो स्वस्थ आहे आणि त्याचे बेत सुरू आहेत. त्याच्याजवळ कोणी रहावयास नको." अरेरे!! आपल्या मनाची स्थिति परक्यास तिळभर तरी कळते का? ती जिव्हाळ्याचें असेल त्यासच कळेल. मायेवांचून रड नाहीं म्हणतात, तें उगीच नव्हे.

'एके दिवशीं सकाळीं मी उठून पाहतों तों, एकाद्या मोठ्या अरिष्टांतून पार पडलेल्या मनुष्याप्रमाणें माझें चित्त शांत आणि स्वस्थ झालें होतें. ह्यावेळेपर्यंत झोंपेंतून उठल्याबरोबर माझी फारच दुर्दशा होत असे. जणू कांहीं दुःख भोगण्याकरितांच मी पुन्हा जागा झालों असें होई. वर सांगितलेल्या महिन्यांत साऱ्या दिवसांत ज्या मला अनिर्वाच्य वेदना भोगाव्या लागत असत, त्यांची गोळाबेरीज झोंपेंतून जागा झाल्याबरोबर मी एक घटकापावेतों भोगीत असे. परंतु ह्या दिवशीं सकाळीं माझ्या मनास समाधान वाटलें. सृष्टि उल्हासमय भासूं लागली. भगवान् लोकबंधूच्या आनंदमय अशा मंदकिरणस्पर्शानें माझ्या शिथिल झालेल्या देहपंजराचा थकवा जाऊन त्यांत ताजा दम आल्यासारखें वाटलें. ह्यावेळीं माझ्या मनांत पहिला विचार हा आला कीं "माझीनी तूं अहंकाराच्या आमिषास भुलला आहेस. तुला जन्माचें साफल्य काय आहे, हें समजत नाहीं; म्हणून हीं दुःखें तूं भोगीत आहेस."

'आतां माझी चित्तवृत्ति स्थीर झाली असल्यानें, मी स्वतःविषयीं आणि भोंवतालच्या वस्तुस्थितीविषयीं शांतपणें विचार करूं लागलों. माझ्या भोंवतालची जुनी इमारत मीं ढासळून पाडून ती पुन्हा सर्व नवी बांधली. लोक कबूल करोत किंवा न करोत, पण माझ्या मतें, जन्माचें साफल्य कशांत आहे ह्या वादग्रस्त विषयाचा उलगडा बरोबर झाला आहे कीं त्यांत कांहीं चूक आहे, हा प्रश्न सर्व तत्वज्ञानाचा पाया आहे. हिंदुस्तानच्या प्राचीन धर्मांत मनन हें मनुष्याचें इतिकर्तव्य सांगितलें आहे. म्हणूनच कर्मपरित्याग, इंद्रियनिग्रह व जिवात्म्याचा परमात्म्यामध्यें लय, हे आर्य लोकांच्या तत्वज्ञानाचे सिद्धांत आहेत. खिस्ती धर्मांत मर्त्यलोक-

वास प्रायश्चित्तात्मक सांगितला आहे. म्हणूनच यदृच्छेनें प्राप्त होणारीं आधिभौतिक दुःखें हीं एक कसोटी मानली गेली असून, तीं ईश्वरावर भार घालून मुकाट्यानें आणि वनल्यास आनंदानें सहन केलीं पाहिजेत; त्यांचा परिहार करणें हें मनुष्याचें कर्तव्य नव्हे; असा तदनुयायांचा समज आहे. इहलोक तापत्रयांचें वसतिस्थान मानलें असून, ऐहिक सुखदुःखांविषयीं धिक्कारबुद्धि बाळगून तद्वारा मोक्षप्राप्ति करून घ्यावयाची, असा खिस्ती धर्माचा सिद्धांत आहे.

'दोन हजार वर्षांपूर्वी मूर्तिपूजक लोक, जीवित सुखान्वेषणात्मक आहे, अशी त्याची व्याख्या करीत असत. अठराव्या शतकांतील परमाणुवादी-ही जीविताची अशीच व्याख्या करूं लागले. आज लोकांच्या स्वभावांत जी अनेक रीतींनें अहंकृति दृश्यमान आहे, ती ह्या व्याख्येचें फळ होय. सर्व मनुष्यांच्या हिताकरितां म्हणून एका वर्गांतल्या लोकांनीं उठावयाचें, पण त्यांत आपला लाग साधला कीं, बाकीच्या आपल्या साह्यकर्त्यांस त्यांच्या नशिबांवर लोटावयाचें, हें निंद्य कर्मही त्याच सिद्धांताचा महिमा आहे. बुद्धीचें अस्थैर्य, चांगल्या कर्माकडे प्रवृत्ति झाली तथापि तिची शाश्वती नसणें, संकटें आणि यशाची आशा ह्या दोहोंमध्यें संकटांचें पारडें जड झालें कीं, आरब्ध कृत्यांचा त्याग करणें, प्रतिकूल वाऱ्याची अंमळ झुळूक लागली कीं नाउमेद होणें, ह्या सर्वांचें बीज तोच सिद्धांत होय. सुखसाधनांस नीतितत्वांच्या डोक्यावर बसविण्यांत आलें आहे, तें तरी ह्याच सिद्धांतामुळें. ह्या पाखंडी सिद्धांताचे असेच दुसरे पुष्कळ परिणाम झाले, व ते अद्यापही पाहण्यांत येतात.

'जन्माच्या इतिकर्तव्याच्या ह्या घाणेरड्या व्याख्येची जरी मला किळस आली होती, तथापि मला असें कळून आलें कीं, ह्या व्याख्येचा पूर्वीच्या त्या मनूमध्यें फारच पगडा बसला होता. आणि त्याचा कांहींसा असर माझ्या मनावरही राहिला होता. माझ्या लहानपणच्या फ्रेंच भाषेच्या अभ्यासानें, ह्या मताचें प्रतिपादन करणाऱ्या ग्रंथांची मला त्यावेळीं फार आवड असल्यानें, व गरीबगुरीब आणि साधारण लोकांनीं नेहमी पादाक्रांत राहून कधीं वर डोकें करूं नये ह्या मतलबासाठीं " अशांस कसचें सुख आलें आहे! स्वसुखार्थ कांहीं मागण्याचा ह्यांस हक्क नाहीं" असें प्रतिपादन करणाऱ्या राजांचा व वर्गाचा

मला उपजत तिरस्कार असल्यानें, माझ्या मनावरच्या त्या ग्रहांत भर पडली होती. ह्या मताचा लोकांच्या मनांवरचा परिणाम मीं अगदीं काढून टाकिला होता. पण माझ्या स्वतःच्या मनावरून तो पुरतेपणीं दूर झाला नव्हता. विषयोपभोगाविषयीं अनावर तृष्णा हें जें त्या मताचें घाणेरडें स्वरूप त्या स्वरूपानें तें माझ्या मनाच्या ठिकाणीं वसत नव्हतें. परंतु जणू कांहीं मला फसविण्यासाठीं म्हणून प्रीतीविषयीं आसक्ति ह्या शुद्ध स्वरूपानें तो सिद्धांत माझ्या ठिकाणीं आविर्भूत झाला होता. त्यामुळें माझ्या डोळयांत अगदीं धूळ पडली होती. इहलोकयात्रेमध्यें हा प्रीतिरूप वाट-सरू सोबतीसाठीं व करमणुकीसाठीं मिळाला तर बरेंच. त्याचा स्वीकार करून ईश्वराचे आभार मानिले पाहिजेत. पण तो मिळाला नाहीं म्हणून कुरकुरणें, तो मला मिळालाच पाहिजे, किंवा तो मला मिळावा अशी माझी योग्यता आहे, असें म्हणणें हें बरें नव्हे. लोक माझ्यावर प्रेम करतील, तरच माझें कर्तव्य माझ्या हातून घडेल, अशी माझ्या मनानें न कळतां अट घेतली, ही माझी चूक झाली. ऐहिकसुखानपेक्ष जी प्रीति तिचेंच नांव खरी प्रीति, हें तत्व माझ्या ध्यानांत आलें नव्हतें. प्रेम नव्हे, तर त्यापासून प्राप्त होणारा आनंद मीं आपल्या हृदयाचें अधिदैवत करून ठेविलें होतें. तो आनंद नाहींसा झाल्याबरोबर मी निराशा डोहांत बुडालों. जणू काय मजवर सुखें किंवा दुःखें आलीं, म्हणून माझ्या कर्तव्यांत अंतर झालें असतें. आकाश निरभ्र असो किंवा गर्द भरून आलें असो, प्रवासाच्या उद्दि-ष्टकार्यांत किंवा निकडींत कांहीं फेरफार होतो कीं काय? ×

'नरदेहास येऊन कांहीं तरी सार्थक करावयाचें असतें, अथवा इहलोकवास कर्तव्यात्मक आहे, ही जीविताची खरी व्याख्या आहे. हिजशिवाय जिविताच्या सर्व व्याख्या चुकीच्या व भलत्याच रस्त्यास लावणाऱ्या आहेत. धर्म, आधिभौतिक शास्त्रें आणि तत्वज्ञान ह्यांचीं पुष्कळ विषयासंबंधानें परस्पर भिन्न मतें आहेत; परंतु ह्या लोकीं जन्म सहेतुक असतो, ह्या सिद्धांताविषयीं त्या सर्वांची एकवाक्यता आहे. असें नसतें तर प्राणिमात्रांमध्यें जें प्रगमन सर्वत्र अविच्छिन्न रीतीनें

× मूळ ग्रंथांत यापुढील सुमारें दहा ओळींचा मजकूर ख्रिस्ती धर्माच्या तात्विक सिद्धांतासंबंधी असल्यानें तो मराठी वाचकांस कंटाळवाणा होईल, समजून तो येथें गाळण्यांत आला आहे.

दृष्टीस पडतें, व जें हल्लीं सर्व कबूल करीत आहेत त्याचा उपयोग काय? मनुष्यप्राण्याच्या बुद्धीचे अनुद्भिन्न घटक अंकुर आहेत, त्यांचा विकास करून व त्यांस चलन देऊन त्यांच्या द्वारें ह्या प्रगमनाच्या नियमाचें मूळ काय आणि त्याचा कसा उपयोग करून घ्यावयाचा, ह्याचा शोध लावणें, हाच नरजन्माचा हेतु होय. कालानुसार व स्थलविशेषानुसार व्यक्तींचे दुसरे अनेक आणि अप्रधान हेतुही असतात. परंतु हे सर्व वर दर्शविलेल्या प्रधान हेतूस अनुसरणारे व त्यांचे साधक असतात. ह्या सर्वांचें कार्य एकच असतें; तें असें कीं, मनुष्यप्राण्याच्या ठिकाणीं असलेल्या शारिरिक व मानसिक शक्तिसंघांचे प्रौढीकरण व एकीकरण करणें. आपल्या निकटवर्ती लोकांची शारिरिक व मानसिक स्थिति सुधारणें हेंच कोणी आपळें कर्तव्य समजतो. दुसरा जास्त बुद्धिमान किंवा विशेष संपन्न असल्यानें एकाद्या राष्ट्रास नांवारूपास आणण्यास किंवा एकाद्या देशाची सामाजिक स्थिति सुधारण्यास किंवा धर्मविषयक गूढ प्रश्नांचा उलगडा करण्यास झटतो. याप्रमाणें हा अप्रधान हेतुच त्याचें मुख्य कर्तव्य होऊन बसतें.

'महाकवि डँटी ह्यास पांच शतकांपूर्वी ही गोष्ट चांगल्या रीतीनें कळली होती. त्यानें लिहून ठेविलें आहे कीं, ह्या चैतन्यसमुद्रावर सर्व प्राणी हे नौका आहेत, व त्या ईशशक्तीनें निरानिराळ्या स्थळांस नेल्या जात आहेत* मनुष्याचें ज्ञान आणि शक्ति हीं दोन्ही अद्याप बाल्यावस्थेंत आहेत. नरजन्मास येऊन कोणतीं कार्यें आपण अवश्य केलीं पाहिजेत, हीं गोष्ट अद्याप वादग्रस्त आहे. तथापि अशीं कर्तव्यें विद्यमान आहेत, हें सप्रमाण सिद्ध करितां येतें एवढें पुरें आहे; वनस्पती व श्वानसूकरें ह्यांच्या आणि मानवी प्राण्यांच्या जीवितांत जर कांहीं भेद असला पाहिजे, तर ह्या जगतीतलावर आपल्यास जीं यदृच्छेनें थोडीबहुत वर्षें काढावयाचीं असतील तेवढ्यांत आपल्या शक्त्यनुसार आपली विद्यमान स्थिति सुधारून वर निर्दिष्ट केलेल्या इहलोकवासाच्या मुख्य हेतूस हातभार लावण्यास सर्वांनीं झटलें पाहिजे, एवढें समजलें म्हणजे पुरें आहे.

आत्मा अविनाशी आहे व काल अनंत आहे. परंतु मानवी शक्ति पूर्णत्वास येण्यास किती काल लागावयाचा व ही पूर्णता कशा रीतीनें प्राप्त

---

* महाभारतांतही अशाच प्रकारें नरदेहाला नौकेशीं तुलना केली आहे:—

नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारम् ।

करून घ्यावयाची, ह्या गोष्टी कांहीं अंशीं आपल्या हातीं आहेत. प्रथमतः आपल्यापैकीं प्रत्येकानें अहंकृतीचा विटाळ धुऊन टाकून आपलें चित्त शुद्ध केलें पाहिजे. नंतर आपलें कर्तव्य काय आहे, ह्या प्रश्नाचा निर्णय करण्यास, त्याचें महत्व मनांत आणून, फार श्रद्धाळुपणानें लागलें पाहिजे. आपल्यासभोंवती जे लोक आहेत त्यांस अपेक्षित काय आहे, त्यांच्या अत्यंत निकडीच्या गरजा काय आहेत, हें शोधून काढिलें पाहिजे. तदनंतर आपलें बुद्धिसामर्थ्य काय आहे, आपली धांव कोठपावेतों पोंचते, हें पाहिलें पाहिजे. नंतर त्या गरजा भागविण्याकडे आपल्या सामर्थ्याचा दृढनिश्चयानें आणि अस्खलितपणें उपयोग केला पाहिजे. हें आत्मपरीक्षण उगीच तात्विक विचारांचा काथ्या कुटीत बसून करावयाचें नाहीं, तर आपल्यास जी बुद्धि ईश्वरानें दिली आहे ती सगळी खर्चून आपलें मन आपल्यास काय सांगत आहे, तें पाहून करावयाचें आहे. तात्पर्य हा प्रश्न किती गूढ आहे हें मनांत पूर्णपणें बिंबवून, आपल्या अंतःकरणाची प्रवृत्ति कोणीकडे आहे, हें सात्विक दृष्टीनें अवलोकन केलें पाहिजे. माझ्या तरुण बंधूंनो! आपल्या मनाशीं विचार करून आपलें कर्तव्य काय आहे, ह्या प्रश्नाचा एकदा का निकाल केलांत, म्हणजे मग त्याचा पिच्छा सोडूं नका. मग त्यांत कांहीं होवो. लोक वंदोत किंवा निंदोत. तुम्हांस कोणाचें साह्य असो किंवा नसो. (आचाराची विचाराशीं एकवाक्यता ठेवणारास बहुधा एकट्यासच आपला मार्ग क्रमावा लागतो). तुमचा रस्ता सरधोपट आहे. कांहींही संकटें येवोत किंवा फसगती होवोत, पण तें सर्व मुकाट्यानें सहन करून जर तुम्हीं आपलें कार्य शेंवटास पोंचविलें नाहीं, तर तुमच्या पदरीं भागुबाईपणा येईल. मग तुम्ही ईश्वरापुढें काय जबाब द्याल ?

'किती मानसिक आयास भोगिल्यानंतर माझ्या मूळच्या सिद्धांताचें दृढीकरण झालें; व कितीही संकटें येवोत आणि हवी तशी निर्भर्त्सना होवो, परंतु साव्होना येथील बंदिवासांत ज्या कर्तव्याची माझ्या मनांत प्रेरणा झाली होती—म्हणजे देश एकवट करून प्रजासत्ताक करणें—तें पार पाडण्यासाठीं कुडींत प्राण आहे तोंपावेतों श्रम करण्याचा मीं कसा निश्चय केला, तें येथें सविस्तर सांगतां येत नाहीं, आणि सांगण्यांत कांहीं अर्थही नाहीं. मला ज्या यातना सोसाव्या लागल्या, माझे जे हाल झाले, व जे विचार अखेरीस माझे

तरणोपाय झाले, ते सर्व मीं त्यावेळीं टिपून ठेविले होते. त्यांवरून एक पुस्तक तयार करून, कर्त्याचें नांव प्रसिद्ध न करितां, "एका अज्ञात गृहस्थाचा वृत्तांत" या नांवानें तें छापण्याचा माझा विचार होता. अतिशय पातळ कागदांवर अगदीं बारीक अक्षरांनीं लिहिलेली त्याची एक हस्तलिखित प्रत मी रोम शहरास घेऊन गेलों होतों. तेथून परतलों तेव्हां फ्रान्स देशामधून जात असतां ती मजपासून हरवली. त्यावेळचे माझे विचार आणि ग्रह आतां लिहीन म्हटलें तर साधावयाचें नाहीं.

'एक धार्मिक विचार माझ्या मनांत आला, आणि मी ताळ्यावर आलों. मला दुसऱ्या कोणाचीही मदत नव्हती. हा विचार मीं इतिहासाशीं ताडून पाहिला. ईश्वरापासून मी पायरीपायरीनें खालीं उतरत चाललों. ईश्वराच्या कल्पनेनंतर माझ्या मनांत प्रगमनाची कल्पना आली, व तिजनंतर नरदेहाच्या खऱ्या कर्तव्याची कल्पना माझ्या मनांत उद्भवली. मनुष्यप्राण्यास उत्पन्न करण्यांत विश्वचालकाचा कांहीं हेतु आहे असा माझा ग्रह झाला, व ह्यावरून स्वकर्तव्यपरायणता हा मनुष्याचा पहिला आचार होय, हें अर्थापत्तीनें सिद्ध ठरतें. येथपर्यंत माझी मजल येऊन ठेपल्यानंतर मीं शपथ घेतली कीं, आतां आकाशपाताळ जरी एक झालें तरी पुनरपि ह्या सिद्धांतांत चलविचल होऊं द्यावयाची नाहीं, किंवा त्याच्या खरेपणाविषयीं शंका घ्यावयाची नाहीं. **चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे** ह्या उक्तीप्रमाणें आतां माझ्या मनास आलेली शांति मला मिळाली होती. निराशा झाल्यानें ती म्यां बळेंच ओढूनताणून आणिली होती, हें मी कबूल करितों; कारण आतां मीं दुःखाशीं गट्टी केली, आणि आम्ही एकमेकांच्या हातांत हात घालून फिरूं लागलों. पण कशी झाली तरी ती शांति होती. यापुढें प्राप्त झालेलीं दुःखें मी निमूटपणें सहन करीत असे, आणि स्वस्थ चित्तानें व समाधानवृत्तीनें राहत असे. ऐहिक सुखाच्या आशेस मीं फांटा दिला. मीं आपल्या हातानें खाडा खणून त्यांत प्रीति नाहीं (ईश्वर साक्षी आहे कीं, आज माझ्या वयास जरी साठी लोटली आहे व माझे पांढऱ्याचे काळे झाले आहेत, तथापि लहानपणीं जो माझ्या अंतःकरणांत प्रीतीचा झरा वाहत असे, तो ह्या घटकेपावेतों थेंबभर देखील अटला नाहीं), तर माझ्या सर्व आशा, खाजगी अडचणी, व आतस्वकियांच्या ममतेनें होणारें निरु-

पम आणि अविस्मार्य सुख हीं सर्व त्या खाड्यांत घालून, त्यावर आपल्या हातानें माती लोटली; कीं पुन्हा माझ्या स्वतःविषयींची हकीकत कधीं कोणासही कळण्यास जागाच राहूं नये. कांहीं प्रसिद्ध व कांहीं अंतस्थ कारणांनीं आजपावेतों मला कधींही सुखाचा वारा लागला नाहीं; आजही सुख म्हणजे काय पदार्थ असतो हें मला माहीत नाहीं; आणि आतां तर काय, माझ्या आयुष्याचा घटकाभर दिवस राहिला आहे. पण तें पुष्कळ जरी असतें, तथापि अंतकाळपावेतों मी असाच राहिलों असतों. पण माझें स्वतःचें दुःख माझ्या कर्तव्याआड येईल, ही गोष्ट त्या घटकेपासून पुन्हा कधीं माझ्या मनांत आली नाहीं. दुसऱ्यांनीं आपणावर प्रेम करणें ह्यांत जें समाधान मिळतें, तें ईश्वरानें मला ह्या वृद्धापकाळीं दिलें आहे ( ह्या-शिवाय दुसऱ्या प्रकारचें समाधान मला माहीत नाहीं ), व त्याबद्दल त्या विश्वपालकाचे मी मनोभावेंकरून अनंत उपकार मानितों; आणि ह्या देहाचा जेव्हां कधीं कधीं मला कंटाळा येतो, तेव्हां वर लिहिलेल्या परप्रेमाकडे लक्ष देऊन मी आपल्या जीवास धीर देतों. समाधानाचें हेंही ठिकाण मला न मिळतें, तरीही मला वाटतें, माझ्या हल्लींच्या स्थितींत कांहीं फेरफार झाला नसता. इतलींतील प्रभातकालीन दिनमणीच्या दैदीप्यमान किरणांची आपली नेहमीची पैठणी वनश्री नेसलेली असो, किंवा उत्तराशेकडील धूमधूसर वस्त्रानें परिवृत असल्यानें तिची वपु नयनांस खेद-दायिनी आणि पंचत्व पावल्याप्रमाणें दिसो, आपल्या कर्तव्यांत त्यायोगें फेर कसा होईल? ह्या विश्वाचा चालक डोळ्यांत तेल घालून बसला आहे. जगताचें प्रगमन व कालाचें आनंत्य हे दोन तारे आपल्या अंतःकरणांत प्रकाशत आहेत. त्यांचा प्रकाश एकाद्या स्मशानांतल्या दिव्याप्रमाणें मंद असला म्हणून काय झालें? तो प्रकाश आहे हा सिद्धांत आहे.'

माझीनी इंग्लंडास गेला, त्या वर्षीं त्याला मानसिक वेदना इतक्या सोसाव्या लागल्या कीं, जणू त्यांतून त्याच्या अंतःकरणाचा पुनर्जन्म झाला. ह्या वेदनांविषयीं लिहितांना माझीनीस फार हृदयद्रावक पण उदात्त आणि समर्याद असा उमाळा येतो. पण चमत्कार हा कीं, इंग्लंडांत पहिल्या वेळीं आल्यावर आरंभीं त्याला जे शारिरिककष्ट सोसावे लागले, त्याविषयीं लिहि-तांना त्याच्या डोळ्यांस टिपूसही येत नाहीं; इतकेंच नाहीं तर दुसऱ्या कोणा-सही असेच कष्ट सोसावे लागले तर आपल्याप्रमाणें त्यानेंही त्यांची पर्वा

करूं नये, म्हणून मात्र त्याविषयीं त्यानें लिहून ठेविलें आहे. ह्यावरून शारिरिक सुखाविषयीं निस्पृहता हा जो त्यांच्या स्वभावांतील विशेष गुण तो चांगला दिसून येतो. पुढें आपणावर येऊन थडकलेल्या अठरा विश्वे दारिद्याविषयींही लिहितांना, त्या दारिद्याच्या कारणाविषयीं त्यानें चकारशब्द काढिलेला नाहीं. ह्यावरूनही तोच गुण व्यक्त होतो. दारिद्याच्या कारणाविषयीं माझीनीनें मोठ्या औदार्यानें आपली लेखणी आटोपून धरिली आहे. पण ती उणीव आतां आपल्यास भरून काढितां येईल. हा इंग्लंडांत आला त्यावेळीं ह्याजबरोबर हद्दपार झालेले तीन इतलियन गृहस्थ होते. ह्यांचा माझीनीशी दाट स्नेह होता; व ह्यावेळीं त्यांस माझीनीशिवाय दुसरा कोणाचा आश्रय नव्हता. देशहितासाठीं जन्म घालविण्याचा त्यानें आपल्या मनाशीं निश्चय केला, त्या दिवसापासून त्यानें डामडौलाचें अगदीं नांव टाकिलें, व आपली राहणी फार साधी आणि बेताबाताची ठेविली. नाहीं तर त्याच्या आईकडून जें त्यास थोडेंबहुत खर्चास येत असे तें त्यास एकटयास देखील पुरलें नसतें; मग परक्या देशांतील रीतरिवाजच काय परंतु भाषाही ज्यांस माहीत नाहीं, अशा चार तरुण गृहस्थांचा खर्च तेवढ्यांत भागविण्याचें नांवच नको होतें. तशांतून त्यांपैकीं दोघांचे स्वभाव व संवयी माझीनीहून अगदीं उलट असत. त्यांच्यांत मनाचें मोठेंपण मुळींच नसे. दुसऱ्याचें कांहीं होवो पण ह्यांच्या पुरवठ्यांत किंवा बातावेतांत अंमळ अंतर पडलें कीं, ह्यांनीं कुरकुरावें व आपली गरिबी उस्मरून दाखवावी. त्यामुळें माझीनीच्या हालांत आणि तिरपिटींत अधीक भर पडली. ह्यावेळीं माझीनीस लागणारा कपडालत्ता देखील त्याची आई जिनोआहून पाठवीत असे. एक तीळ सातांनीं वांटून घ्यावा, ह्या तत्वाची माझीनीनें इतक्या लांबवर मजल पोंचविली होती कीं, त्याच्या आईला हे कपडे अगदीं जाड्याभरड्या कापडाचे करावे लागत असत. ह्याचा पक्का निश्चय होता कीं, मला जें मिळेल त्यांत मी आपल्या मित्रांस वांटेकरी करणार; त्याच्या ह्या निश्चयामुळें त्या माउलीस एकाच्या ठिकाणीं चौघांची बेगमी करून द्यावी लागत असे. तिला माहीत होतें कीं, एक जर भारी पोषाख करून पाठविला, तर आपले चिरंजीव लागलीच त्यास बाजार दाखवून त्यांतून सगळ्यासाठीं सारखे व स्वस्त कपडे खरेदी करितील.

सर्वसंगपरित्याग करून आपल्या मुलानें जी तापसवृत्ति धारण केली, तिचा वांटा ह्या माउलीनें किती थोर मनानें उचलिला, हें आतां सांगणें गैरवाजवी होणार नाहीं; कारण तें ऐकून ज्यांचीं मनें दुखावलीं असतीं, त्यांपैकीं आज कोणीही हयात नाहीं. माझीनी प्रथम हद्दपार झाला तेव्हां त्याच्या निर्वाहाकरितां कांहीं एक न पाठविण्याचा त्याच्या बापानें निश्चय केला. त्यास वाटलें कीं, अशानें माझीनी इतलीच्या राजांच्या म्हणण्यास रुकार देईल, व ते त्यास माफी देतील. माझीनीच्या वर्तनाच्या हेतूंची थोरवी, त्याच्या बापास तर नाहीं पण, त्याच्या आईस कळली होती. परंतु त्याचा बाप तिचें कांहीं केल्यानें ऐकेना. माझीनी परदेशांत राहिला, तोंपावेतों आपल्या नवऱ्याला नकळत माझीनीची आई दर तीन महिन्यांनीं त्यास खर्चावयास पाठवीत असे. त्याच्या साध्या राहणीमुळें एकटयास पुरण्याजोगी ही रक्कम असे. परंतु तितके पैसे जमविण्याकरितां ह्या बिचारीनें आपल्या पोटास टांचा द्यावा, लेऊं ओढूं नये, व नवऱ्याशीं अनेक लबाड्यालाताड्या कराव्या ( अशा लबाडयांचें पाप कसें लागेल ? ). असें करून तेवढी रक्कम जमली, म्हणजे नवऱ्याच्या नांवानें ती माझीनीकडे तिनें पाठवून द्यावी; पण त्याच्या बापास त्या गोष्टीची वार्ता देखील नसावी. इतके पैसे जमा करण्याकरितां तिला ज्या हिकमती व युक्त्या लढवाव्या लागत, व जे हाल सोसावे लागत, त्या सर्वांमध्यें माझीनीची बहीण फ्रान्सेस्का हिनें आपल्या आईस मदत करावी. पण हिला देवानें अल्पायुषी केलें. ही फार दिवस जगली नाहीं. परदेशांत असणाऱ्या आपल्या प्रिय भावासाठीं कितीही अपेष्टा सोसाव्या लागल्या, तरी फ्रान्सेस्कास त्या जड वाटत नसत. ती त्या आनंदानें सोशी. त्याच्या बापास ही लबाडी न कळावी, म्हणून माझीनीच्या आईनें आणि बहिणीनें जे हाल सोसावे, ते जर सविस्तर सांगूं लागलों तर एक ग्रंथ होईल. पुष्कळ वर्षें लोटल्यानंतर आणि या गोष्टी गुप्त ठेवण्याचें कारण नाहींसें झाल्यावर, ह्यांपैकीं कांहीं गोष्टी ह्या थोर मनाच्या बाईनें स्वतःच ग्रंथकर्त्यास सांगितल्या. त्या सांगतांना तीस हंसूं येई आणि रडेंही कोसळे. माझीनीच्या बापाच्या निर्दयपणामुळें तीस ह्या लबाडया कराव्या लागत असत; आणि त्या मला' सांगण्याच्या आधीं तिनें वचन घेतलें होतें कीं, ज्याच्या जिवासाठीं त्या कराव्या लागल्या त्याच्या कानावर त्यांपैकीं कांहीं एक जावयाचें नाहीं. हे दारिद्र्याचे दिवस आपण कसे

कंठिले, त्याविषयीं माझीनीनें थोडेसें लिहून ठेविलें आहे, तें खालीं उतरून घेतों.

' स्विट्झर्लंडांत माझ्या मनोवेदनांचा कळस झाला होता. त्यांतून मी अंमळ सांवरतों तोंच आकाबाईचा फेरा मजवर आला; आणि सन १८३७चें सगळें व सन १८३८चें अर्धें वर्ष त्या मजवर सुप्रसन्न होत्या. ह्या दारिद्र्याचीं कारणें दोन होतीं. एक लोकांचा खर्च मला सोसावा लागत होता; व दुसरें, माझ्या आईबापांनीं माझ्या निर्वाहाकरितां म्हणून पैसे पाठवावे ते सर्व मीं इतलीच्या पायीं खर्चून टाकून कर्जही करावें. माझी स्थिति आईबापांच्या कानावर घालून मला आपली सुटका करून घेतां आली असती; कारण माझ्यासाठीं ते आपल्या सर्व संसारावर तुळशीपत्र ठेवण्यास तयार झाले असते. पण मला वाटलें कीं, ही गोष्ट त्यांच्या कानीं जाऊं देऊं नये; कारण त्यांस तरी कोठवर त्रास द्यावयाचा?

'मी निमुटपणें दिवस ढकलीत होतों. दुसऱ्या कित्येकांनीं व माझ्या आईनें आपली आठवण म्हणून मला दिलेल्या जिनसा मीं त्यांच्या पुऱ्या किंमतीपर्यंत पैसे घेऊन गहाण टाकल्या. मग त्यांपेक्षां हलक्या वस्तूंसही तोच मार्ग दाखविला. अखेरीस एका शनिवारीं तर माझा एक जुना कोट आणि बुटांची जोड हींही एका सराफाच्या येथें मला फुंकून टाकावीं लागलीं. रविवारीं आपल्या पोटास मिळावें, म्हणून शनिवारीं संध्याकाळीं निकृष्टावस्थेस पोंचलेल्या गरीब लोकांची, ह्या सराफांच्या दुकानीं गर्दी उडालेली असते. ह्यानंतर एका पेढींतून दुसरींत व तींतून तिसरींत ह्याप्रमाणें मी कर्ज काढीत सुटलों. माझे कांहीं देशबंधु मला जामीन होत असत. हे सराफ लोक थोडेसे रुपये कर्जाऊ देऊन चाळीस किंवा पन्नास टक्क्यांपर्यंत व्याज घेतात, व तुंबडी लावून गरीब लोकांचीं अगदीं आंतडीं ओढितात; कधीं कधीं तर ते त्या गरिबांस आपलें अंग झांकून जगास तोंड दाखविण्याकरितां एक वस्त्र देखील ठेवीत नाहींत. हे कर्ज काढिलेले पैसे आठा दिवसांच्या हप्त्यांनीं नियमित वेळीं नेऊन त्यांच्या पेढीवर भरावे लागतात. ह्या पेढ्या सार्वजनिक खाणावळींतून किंवा दारूच्या गुत्त्यांतून असतात. मदिराबाईचें यथेच्छ सेवन करून मस्त झालेल्या हलकट लोकांची तेथें जी धुमाकूळ चालते ती सांगतां पुरवत नाहीं.

'मला हें सर्व भोगून त्या कसोट्यांतून पार पडावें लागलें. आधींच त्या कसोट्या फार दुःखद होत. त्यांत, मजवर हा प्रसंग गुदरला तेव्हां मी अगदीं एकटा होतों. माझ्या ओळखीचें कोणी नव्हतें; किंवा मला सल्लामसलत घेण्यास ठिकाण नव्हतें. त्यांतही मी ह्यावेळीं इंग्लंडसारख्या देशांत होतों; त्या देशांत तर गरिबी( व त्यांतून तो मनुष्य परकीय देशांतला असला तर विशेषच) व पाजीपणा यांचा हमेषचा संबंध आहे,असें लोक मानितात. इंग्लंडच्या लोकांचा हा समज पुष्कळ वेळां अन्यायाचा असतो, व कधीं कधीं तर त्यानें दुःखावर डाव बसतात. ह्या स्थितींत त्या कसोट्या मला दुप्पट दुःखदायक वाटल्या, ह्यांत काय नवल आहे? पण त्यामुळें थोड्याशा शारिरिक विपत्तींपलीकडे मला कांहीं झालें नाहीं; आपण अगदीं नीच स्थितींत जाऊन पोंचलों आहोंत, असेंही कधीं मनांत आलें नाहीं; किंवा त्याविषयीं कधीं खेद वाटला नाहीं. ह्या दारिद्र्यदुःखाविषयीं मी एक शब्दही लिहिला नसता; पण मला वाटतें कीं, अशा विपत्ती ज्यांच्या दैवीं लिहिल्या असतील व ज्यांस त्या भोगाव्या लागल्या म्हणून हीनपणा वाटत असेल, त्यांस माझें उदाहरण पाहून किंचित् धीर येईल.

'आम्ही स्वतःच्या किंवा स्वकियांच्या सुखदुःखाचे धनी असूं, अशी युरोपखंडाच्या आजच्या स्थितींत कोणाचीही खातरी नाहीं; हें आमच्या आया जर लक्षांत वागवितील तर बरें होईल. लहानपणीं आपल्या मुलांस श्रम आणि तहानभूक सोसण्याची संवय करून द्यावयाची; तसें न करितां आया त्यांस ऐषआरामांत तळहाताच्या फोडाप्रमाणें वाढवून अगदीं पोस्तीं करून ठेवितात; तें अगदीं उपयोगी नाहीं. आजच्या काळांत मुलांस कडक शिक्षण देऊन हव्या त्या स्थितींत राहण्याची योग्यता त्यांच्या अंगीं आणून देणें, म्हणजे त्यांच्या भावी कल्याणाचें आणि ऐहिक व पारमार्थिक सुखांचें मोठें साधन त्यांस करून देण्यासारिखें आहे; अशी आयांची खातरी होईल तर फार चांगलें. मी कित्येक असे तरुण इतालियन गृहस्थ पाहिले आहेत कीं, त्यांच्या गुणांवरून ते थोर निपजतील असें वाटत असे; परंतु त्यांच्या हातून नाहीं ते गुन्हे घडले, किंवा आलेल्या दुःखांतून आपली सुटका करून घेण्यासाठीं त्यांनीं आत्महत्याही करून घेतल्या. ह्या स्थितीबद्दलची जबाबदारी माझ्या मनाशीं मी त्यांच्या आयांवर टाकतों. पण तींच दुःखें मीं आनंदानें सहन केलीं. हवें तें दुर्दैव ओढवलें,

तथापि सत्वास न ढळण्याचें शिक्षण माझ्या आईनें मला लाविलें होतें. खऱ्या प्रीतीचें हेंच लक्षण होय कीं, ती तत्पुरतें न पाहतां दूरवर दृष्टि पोंचविते.'

माझीनी दारिद्र्याच्या तावडींत सांपडल्यावरोबर तो गुंग होऊन गेला होता. तो किंचित् सांवरल्यावर इंग्रजी मासिकपुस्तकांत लेख लिहून आपला चरितार्थ चोलवूं लागला, व दुसऱ्या हद्दपार झालेल्या लोकांसही मदत करूं लागला. ह्या लेखांचा विषय इतली देश असे, किंवा दुसरा कांहीं असला, तर त्यांत नेहमी इतलीसंबंधानें उद्गार काढिलेले असत. ह्या लेखांच्या द्वारें त्यानें इंग्रज लोकांचें लक्ष इतलीकडे आकर्षिलें. सन १८४५ सालानंतर इंग्रज लोकांस इतली देशासंबंधीं माहिती व्हावी, म्हणून त्यानें 'इतलीयन वार्ताहर' नांवचा समाज स्थापिला; त्या समाजाचा पायाही त्यानें ह्याच लेखांच्याद्वारें घातला होता. इतली देश एकवट होण्याच्या कामीं इंग्रज लोक हळूहळू जी कळकळ दाखवूं लागले, तें ह्या समाजाचें फळ होय, असें माझीनी म्हणतो; व हें त्याचें म्हणणें सर्वथैव खरें आहे. इंग्रज लोकांची मैत्री किती अकृत्रिम आणि चिरस्थायी असते, त्यासंबंधानें त्यानें आपल्या अंतकाळच्या सुमारास काढिलेल्या उद्गारांचें येथें अवतरण घेण्याचा मला आनंद आणि अभिमान वाटतो. तो म्हणतो 'इंग्रज लोकांशीं एकदा मैत्री जडली कीं, ती ठाम असते, व नुसती तोंडीं साखर पेरण्यापेक्षां ते हातानें ती खरी करून दाखवितात; मग कांहीं मुद्यांच्या किंवा मतांच्या संबंधानें तुमच्यांत आणि त्यांच्यांत भेद असला तरी चिंता नाहीं. माझ्या मतें सुसाध्य अशा पुष्कळ गोष्टी त्यांस त्यावेळीं दुःसाध्य वाटत असत, व अजूनही कित्येक त्यांस तशा भासत आहेत; इतकेंच नाहीं, तर माझीं कित्येक मतें त्यांस भयंकरही वाटत असत. परंतु माझ्या आयुष्यक्रमावरून असें सिद्ध होत होतें कीं, तीं मतें मी मनापासून खरीं मानीत आहें; आणि तेवढ्यानेंच इंग्लंडांतल्या कित्येक अतिशय विद्वान् आणि थोर पुरुष यांची व माझी मैत्री झाली. हल्लीं ज्या भूमीवर बसून मी ह्या दोन ओळी लिहीत आहें, तिचें विस्मरण ह्या देहांत प्राण आहे तोंपावेतों मला व्हावयाचें नाहीं; व तिच्या मंगल नामाचा उच्चार करितांना मला सदैव कृतज्ञतेचा उमाळा येईल. इतलीनें मला जन्मच दिला आहे, पण इंग्लंड माझी धर्ममाता आहे. ह्या देहाला चोहींकडे ठोंकरी लागल्या आहेत, उपजल्यापासून सु-

खाचा वारा माहीत नाहीं, व पुष्कळ शाळू सोबती मिळाले; पण खऱ्या व शाश्वत प्रेमाचा अनुभव मला कायतो इंग्लंडांत मिळाला.'

माझीनी पहिल्यानें इंग्लंडांत राहत असतां, सन १८४४ सालीं कित्येक तरुण व देशभक्त इतलियनांनीं हत्यारबंद होऊन नेपल्सवर स्वारी करण्याचा विचार करून तो माझीनीस कळविला होता. पण माझीनीनें त्याचा धिक्कार करून त्यास मोडा घातला. कारण त्याच्या मतें अशी स्वारी करण्याची वेळ अद्याप आली नव्हती; व तिजपासून कांहीं निष्पन्न न होतां व्यर्थ रक्तपात मात्र झाला असता. ही गोष्ट येथें सांगण्याचें कारण हें कीं, ह्याप्रसंगीं इंग्रजी पोष्ट ऑफिसांतून माझीनीचीं पत्रें फोडण्यांत येत होतीं, व हा नीच क्रम कित्येक वर्षांपासून सतत चालला होता, ही गोष्ट त्यावेळीं उघडकीस आली. राज्यकारभार करणाऱ्या आमच्या वड्या लोकांस हें फार मोठें लांछन लागलें. ह्या घाटत असलेल्या बंडाचे प्रमुख ( बँडियरा बंधु ) आस्त्रियाची प्रजा होते. आस्त्रिया आणि नेपल्स येथील सरकारांच्या विनंतीवरून इंग्लंडांतल्या प्रधानमंडळानें माझीनीचीं पत्रें गुप्त रीतीनें फोडून त्यांतील मजकूर त्या सरकारांस कळविला होता. आमच्या कारभाऱ्यांनीं हा कित्ता टॅलिरँड व फुशे ह्यांजपासून उचलिला होता. हा पत्रव्यवहार फुटल्यामुळें वर लिहिलेल्या देशभक्तांची मृत्युमुखांत आहुती पडली. माझीनी खरें म्हणतो कीं, ती देतांना **स्वाहा** म्हटल्याचें श्रेय इंग्लंडांतल्या प्रधानमंडळाकडे आहे. हें दुष्कृत्य कसें पकडलें गेलें, आणि थॉमस डनकोम्ब ह्या गृहस्थाच्या दीर्घोद्योगानें व धीटपणामुळें हॉऊस ऑफ कॉमन्स सभेमध्यें तें कसें उघडकीस आलें, ह्याबद्दलची सविस्तर माहिती माझीनीनें आपलें 'स्वचरित्र व ग्रंथ' ह्यांत दिली आहे. पार्लमेंटांच्या दोन्ही गृहांनीं ह्या कृत्याची चौकशी करण्याकरितां कमिश्या नेमिल्या. 'त्यांच्या रिपोर्टांत हें कृत्य अगदीं नागवें उघडें करून न दाखवितां जरी त्याजवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करण्यांत आला आहे;' तथापि त्यावरून एवढें शाबीत होतें कीं, सन १८०६ पासून तों सन १८४४ पावेतों एका मागून एक चट साऱ्या प्रधानांनीं बातम्या मिळविण्यासाठीं ह्या मार्गाचें अवलंबन करून आपल्या नांवांस काळिमा लावून घेतला आहे. तो म्हणतो 'माझी आणि दुसऱ्या हद्दपार झालेल्या लोकांचीचशी काय, पण खुद्द इंग्रज लोकांचीं व पार्लमेंटाच्या सभासदांचींही पत्रें ह्याप्रमाणें फोडण्यांत येत

होतीं. हा गुन्हा नेहमी बनावटी शिक्के व मोहोरा करून छपवीत असत. ह्या गोष्टी जर न्यायासनासमोर आल्या असत्या, तर त्या करणाऱ्यांस कडीतोडे मिळाले असते ह्यांत संशय नाहीं. माझीं पत्रें एकसारखीं चार महिन्यांपेक्षांही अधिक दिवस फुटलीं जात होतीं.' लॉर्ड आबरडीन ह्यांनीं हाऊस ऑफ कॉमन्समध्यें माझीनीच्या नांवास नामोषी येण्यासारखे खोडसाळ उद्गार काढिले होते; व सर जेम्स ग्राहाम यांनीं माझीनीची उघड निंदा न करितां कांहीं आडून गोळ्या मारिल्या होत्या. पण तें सर्व प्रसिद्ध रीतीनें त्यांस चुंबीत परत घ्यावें लागलें. पत्रें फोडण्याच्या विश्वासघातासंबंधानें ह्या व अशाच पुष्कळ दुसऱ्या गोष्टी घडून आल्या होत्या; परंतु मी त्या सगळ्या सांगत बसत नाहीं. ह्या विषयासंबंधानें माझीनीनें त्यावेळीं इंग्रजी वर्तमानपत्रांस लिहिलें होतें कीं, 'खोटें बोलणें व बनावट लेख करणें येथपर्यंत ज्या राजकार्यधुरीणांची मजल येऊन ठेपली, त्यांनीं एकाद्याच्या निंदा कराव्या, ह्यांत कांहींच नवल नाहीं.' याप्रमाणें त्यावेळीं आमच्या उमराव मंत्रिमंडळानें इंग्लंडच्या नांवास जो काळिमा लाविला, त्याचें मीं किंचित् दिग्दर्शन केलें आहे. कारण वकिली कावे आणि गुप्त खलबतें हीं अनियंत्रित राजसत्तेचा जबरदस्त किल्ला होत; आणि त्यांपासून होणाऱ्या अनर्थाचें वरील गोष्ट हें फार शेलकें व भयंकर उदाहरण आहे. समाजव्यवस्थेंत एकास राजा ठरवून कर्तुमकर्तुं शक्ति त्याच्या स्वाधीन केली, म्हणजे त्यास दुसऱ्या राजांची मर्जी व पाठबळ हीं संपादन करावीं लागतात; तेव्हां त्यांच्या मागण्या कबूल करणेंही ओघानेंच प्राप्त होतें, व त्यांच्या दरबारच्या वकिलांस मान देऊन त्यांजवर भरंवसा ठेवावा लागतो. घरीं, बाहेर, स्वदेशांत किंवा परदेशांत, वकिली कारस्थानांचा मुख्य हेतु हा असतो कीं, लोकांस वर मान करूं न देतां होईल तितकें लोकमत चेंपून टाकावें. त्यामुळें हीं कारस्थानें लोकांच्या नजरेस येऊं देतां येत नाहींत. इंग्लंडांतली राजसत्ता नियंत्रित आहे, अशी फुशारकी मारण्यांत येत असते. पण तेथें देखील प्रधानमंडळाचें पराराष्ट्रांसंबंधीं कारभाराचें धोरण कधींही (आणि देशांतील अंतर्व्यवस्थेचें धोरण पुष्कळ वेळां) लोकांच्या मुखत्यारांपुढें येत नाहीं. माझीनी ह्मणतो 'प्रजासत्ताक राज्य हा शब्द आज ज्याच्या त्याच्या तोंडीं झाला आहे. पण त्याचें इंगित जेव्हां आमच्या मनावर बिंबेल; जेव्हां आम्हांस असें वाटूं लागेल कीं, बापापासून तों थेट पंचविसाव्या पिढीपर्यंत ज्याचे सर्व

पूर्वज राजभूषणें धारण करीत आले आहेत, अशा एकाद्या राजबिंड्यापेक्षां एकादा प्रामाणिक मजूर अणुरेणुइतकाही कमी कुलीन नाहीं, त्या राजबिंड्याच्या व या मजुराच्या हाताशीं हात मिळविणें सारखेंच आहे, त्यांत कांहीं मोक्ष नाहीं व ह्यांत कांहीं कमी नाहीं; जेव्हां आपल्यास असें समजूं लागेल कीं, आपण आपल्या खाजगी कारभाराची जी व्यवस्था लावितों तीच त्या राज्याचीही लाविली पाहिजे, म्हणजे राज्याचा कारभार हुशार आणि प्रामाणिक मनुष्यांच्या हातीं सोंपावयाचा, मग असलीं मनुष्यें समाजाच्या कोणत्याही वर्गांत आढळोत; जेव्हां ह्या बड्या बापांच्या बड्या लेंकांस कोणी भीक घालीनासें होईल; तेव्हां ह्यांच्या मतलबी पिढीजाद थोरपणाचें निर्मूल होईल. असें झालें म्हणजे नियंत्रित राजसत्ता जमीनदोस्त झालीच असें समजा.'

माझीनीचीं पत्रें फोडण्याच्या संबंधांत झालेल्या नीचपणाच्या प्रकारावर टीका करीत असतां तो आणखी म्हणतोः—

'बापापासून मुलाला या परंपरेनें प्राप्त झालेल्या सत्तारूपी भ्रांतिमूलक पायावर रचलेल्या, "राजा राज्य करितो पण नियंत्रण करीत नाहीं", * "निरनिराळ्या राष्ट्रांनीं आपला एकमेकांशीं समतोल आहे कीं नाहीं हें पाहणें व तो संभाळून ठेवणें, हाच प्रगमनाचा खरा मार्ग आहे", १ ह्या व असल्याच दुसऱ्या, नियंत्रित राजसत्तेच्या कैवाऱ्यांनीं बगलश्रुतींतून काढिलेल्या पोकळ सिद्धांतांनीं दृढ झालेल्या राजसंस्थेंत आजना उद्यां केव्हां तरी अनीति सुरू व्हावयाचीच. आपण अमुक कृत्य केलें किंवा न केलें तर सगळें जग आपणांस काय म्हणेल, हा विचार मनांत आणून, राजे लोक व त्यांचे हस्तक ह्यांची आपल्या कर्तव्या-

---

* म्हणजे राज्यकारभार स्वतः करीत नसून प्रजेनें आपल्यातर्फे निवडून दिलेले मुखत्यार करीत असतात, ह्यामुळें त्या कारभाराच्या बरेवाईटपणाची जोखीम त्याजवर नसते. १ युरोपांतील राष्ट्रांच्या मुलखांच्या मर्यादा ठरलेल्या असून त्यांचें उल्लंघन करून एकाचा मुलूख दुसरें बळकावणार नाहीं, असा राष्ट्रांचा एकमेकांशीं करार झालेला असतो; ह्या करारास 'बॅलन्स ऑफ पॉवर' म्हणतात. ह्या करारांचें कोणी राष्ट्र शिरजोरीनें उल्लंघन करूं लागल्यास, बाकीचीं राष्ट्रें दुसऱ्या बाजूकडे होऊन त्या राष्ट्रास तसें करूं देत नाहींत. असल्या करारामुळें मुलखाच्या अनावर तृष्णेस आळा पडून सर्वांचें संरक्षण होतें, व लढाईचें फारसें भय राहत नाहीं. चोहोंकडे शांतता असणें हें व्यापार कला वगैरेंस हितावह असल्यानें मानव कोटीच्या सुधारणेस वर दर्शविलेल्या प्रकारचे करार अवश्य आहेत असें मानिलें गेलें आहे.

कडे प्रवृत्ति नसते; तर सत्ताधारी आणि श्रीमान अशा समाजाच्या एका अंशानें आपल्या खिशांतून काढिलेल्या कायद्यास व निराधार आणि कृत्रिम अशा मतांस अनुसरून ह्यांचें आचरण असतें. त्यामुळें सत्ताहीन अशा बहुसमाजाशीं नेहमी ह्यांचा थोडा फार तरी उघड विरोध असतो. कृत्रिम, अस्वाभाविक आणि अनीतियुक्त अशी कोणतीही संस्था घ्या; तिचा आणि खऱ्याचा मेळ कधीं पडावयाचा नाहीं. कारण तिच्यावर लोकमताचा दाब नसल्यानें तींत लबाड्यालाताड्या झाल्याशिवाय रहावयाच्या नाहींत. हे मुत्सद्दी लोक स्वभावतः चांगले व प्रामाणिक असतात. परंतु कृत्रिम आणि सृष्टिक्रमाशीं व मानवी स्वभावाशीं विसंगत अशा राजसत्तेच्या पुष्टयर्थ रचलेल्या सिद्धांतांविषयीं (ज्यांपैकीं दोन वर दिले आहेत) पूज्यबुद्धीचें ह्यांना बाळकडू मिळालेलें असल्यानें, ह्यांच्या सदसद्विवेकबुद्धीस जाड्य आलेलें असतें. अधिकारी ह्या नात्यानें केलेल्या आचरणांत आणि खाजगी आचरणांत मेळ असला पाहिजे, ह्या गोष्टीची त्यांची कल्पना नाहींशी होते. म्हणून घरच्या व्यवहारांत जीं कृत्यें करण्याचा प्रसंग आला असतां, त्यांच्या अंगावर कांटा येऊन त्यांचें पाऊल पुढें पडणार नाहीं, तींच कृत्यें प्रधान किंवा मंत्री ह्या नात्यानें ते बेधडक करितात.

'आजकाल लोकांचा स्वातंत्र्याचा विचार अगदीं नष्ट झाला आहे. राजेलोकांच्या दरबारी रीतिरिवाजामुळें बाहेरच्या डामडौलास भुलून जाऊन माणसांच्या अंगच्या गुणांकडे कोणी लक्ष पुरविनासें झालें आहे. कपडे बगळ्याच्या पंखासारखे पाहिजेत; अब्रूवर कितीही डाग असले तरी चिंता नाहीं (मुत्सद्दी झाला म्हणून काय झालें? त्याचें मुत्सद्दीपण दरबारांत; एरवीं तो इतर चार लोकांपैकींच होय. त्यानें आपली नीति सोडितां कामा नये. एवढेंच नव्हे, तर लोकांचें पुढारीपण करण्याचें व त्यांस वळण लाविण्याचें काम त्यानें आपल्या शिरावर घेतलें असल्यानें, त्यानें आपलें आचरण अत्यंत शुद्ध ठेविलें पाहिजे). असें नसतें तर लॉर्ड आबरडीनच्या सहाधिकाऱ्यांनीं त्याची छी थू उडविली असती. ज्या दिवशीं लॉर्डसाहेबांनीं भर पार्लमेंटांत असत्य भाषण करून आपली जीभ विटाळली, त्या दिवसापासून त्यांच्या मित्रमंडळीनें त्यांस आपल्या उंबऱ्याच्या आंत पाऊल ठेवूं देण्याचें नव्हतें; म्हणजे लॉर्डसाहेबांनीं नाहीं तर निदान त्यांच्या मागून अधिकारावर येणाऱ्यांनीं तरी आपल्या कानास खडा लावून

घेतला असता. पण साहेब बहादुरांच्या अमीरी इभ्रतीपुढें व मोठ्या अधिकारापुढें बिचारी इंग्रज लोकांची नीति लटपटली. ह्या खोटसाळपणाविरुद्ध सगळ्या देशांत गवगवा झाला, पण त्याचे कर्ते खुशाल आपली प्रधानकी भोगीत होते.

'ह्याच कारणानें सन १८४४ सालीं जो पत्रें फोडण्याचा क्रम होता तोच आजमित्तीसही चालू आहे. तो कांहीं कमी मात्र झाला असेल.'

माझीनी इंग्लंडांत आल्यावर पहिल्या वर्षीं त्यानें दारिद्र्यानें पीडलेल्या आपल्या देशबांधवांचे हाल कमी करण्याचा, व त्यांची मानसिक स्थिति सुधारण्याचा विलक्षण प्रयत्न केला; व त्यांत त्याला यश आलें. गरिबांविषयीं आस्था आणि प्रेम, हीं तो लहान असतां त्याच्या स्वभावांत ढळढळीत दिसून येत होतीं. तो म्हणतो ' लोकांच्या कल्याणासाठीं यत्न करावा व तो लोकांच्याच साह्यानें करावा, हा माझ्या मतांचा स्वाभाविक परिणाम होय. लंडनमध्यें आल्यावर ज्या थोड्याशा इतलियन मोलकऱ्यांचा व माझा संबंध झाला, ते मला इतके निस्पृह आणि सुशील आढळून आले कीं, त्यांच्या कल्याणाचें कार्य हातीं धरण्यास मला फार उत्साह वाटला. मोलमजुरी करून निर्वाह करणारा लोकसमाज, हा जो आमच्या राष्ट्राचा फार मौल्यवान भाग, त्याचें लक्षपूर्वक अवलोकन करण्याचा आजपावेतों मला प्रसंग आला नव्हता. ती सोन्याची वेळ आतां सहज आली, व ती मीं वायां दवडिली नाहीं.

' ह्या प्रचंड शहरामध्यें ( लंडनांत ) पेटी वाजवीत रस्त्यांतून जीं कित्येक मुलें फिरत असतात, त्यांच्यापाशीं मीं केव्हां केव्हां विचारपूस करी; तीवरून कित्येक द्रव्यलोलुप गृहस्थांनीं मांडलेल्या ह्या व्यापाराचा इतिहास व पद्धती हीं मला कळून आलीं, व त्यांचें मला फारच आश्चर्य आणि दुःख वाटलें. ह्याला एक प्रकारचा गोऱ्या गुलामांचा व्यापार असें नांव दिलें, तर फारसा बाध येणार नाहीं. इतलीदेश, तेथील सरकार आणि धर्मोपदेशक ह्या सर्वांना हा व्यापार एक मोठा कलंक आहे; कारण त्यांच्या मनास आलें असतें, तर त्यांस तो बंद पाडितां आला असता.

' ह्या अनाथ मुलांच्या दुःखाचा भार अंमळ हलका करण्याचा हेतु मनांत धरून, त्यांचें संरक्षण होण्यासाठीं मीं एका समाजाची स्थापना केली; व

त्यांस दोन अक्षरें येऊन आपलें कर्तव्य काय आहे, आणि आपले हक्क काय आहेत, हें समजूं लागावें, म्हणून मीं एक शाळा घातली. स्वदेशीं परत गेल्यावर आपल्या देशबांधवांस चांगली सल्ला त्यांस देतां यावी, म्हणून ह्या शाळेंत कांहीं फी न घेतां त्या मुलांस फुकट शिक्षण देण्यांत येत होतें. ह्या मुलांच्या निर्दय धन्यांस मीं अनेक वेळां न्यायाचीं कोडतें दाखवून त्यांच्या क्रूरपणाचें प्रायश्चित्त त्यांस देवविल्यानें, व आपण काय करतों तें पाहण्यासाठीं कित्येक टपलेले असतात असें जेव्हां त्यांस आढळून आलें, तेव्हां आपला क्रूरपणा हलके हलके सोडून देऊन ते कायद्यास भिऊन वागूं लागले.'

ही शाळा सन १८४१ पासून ४८ पर्यंत म्हणजे माझीनी इंग्लंड देश सोडीपर्यंत चालू होती. हिच्या खर्चास लागणाऱ्या रकमेचा मोठा भाग माझीनी पुरवीत असे, व मुलांस शिकविण्याच्या कामींही तो मदत करीत असे. हिच्याविषयीं माझीनी म्हणतो 'ह्या सात वर्षांत आम्हीं शेंकडों मुलांस नीतिविषयक व ज्ञानवर्धक असें शिक्षण दिलें. हीं मुलें निमेशिमे रानटी स्थितींत होतीं. प्रथमतः तीं आमच्याकडे येण्यास भीत असत. पण हळू हळू येथें काय मौज आहे ती पहावी, म्हणून हाटन बागेंत घातलेल्या शाळेंत तीं येऊं लागलीं. तेथें शिक्षकांनीं त्यांस फारच ममतेनें व दयाळूपणानें वागवावें; त्यामुळें तीं माणसाळलीं, व त्यांची स्थिति सुधरूं लागली. अखेरीस तर विद्याचारसंपन्न अशा आपल्या देशास आपल्यास परत जावयाचें आहे, ह्या गोष्टीचा त्यांस मोठा आनंद व अभिमानही वाटूं लागला.

'हीं मुलें रात्रीं नवाच्या पुढें आणि दहाच्या आंत येत असत; व येतांना आपलीं वाद्येंही बरोबर आणीत असत. आम्हीं त्यांस लिहिणें, वाचणें, गणित, थोडासा भूगोल व चित्रलेखनाचें थोडेंसे ज्ञान इतकें शिकवावें. रविवारीं संध्याकाळीं आम्हीं आमच्या सर्व विद्यार्थ्यांस एकत्र जमवून त्यांस इतली देशाच्या इतिहासावर किंवा आमच्या देशांत होऊन गेलेल्या थोर लोकांच्या चरित्रांवर किंवा सृष्टिविषयक तत्वज्ञानावर किंवा अशाच एकाद्या विषयावर व्याख्यान द्यावें. तात्पर्य, दारिद्र्यानें आणि दुसऱ्याच्या गुलामगिरींत राहिल्यानें गाढ अंधःकारांत बुडालेल्या त्यांच्या अंतःकरणांत जेणेंकरून कांहीं प्रकाश पडेल व त्याचा विकास होईल, असे विषय

आम्हीं पसंत करीत होतों. दोन वर्षेपर्यंत बहुतकरून प्रत्येक रविवारीं मी त्यांस इतली देशाच्या इतिहासावर किंवा ज्योतिष शास्त्रांतल्या ठोकळ सिद्धांतांवर व्याख्यान देत असे. खगोल हा फारच धार्मिक विषय आहे. त्याच्या अभ्यासानें मनास फार निर्मळपणा येतो. ह्या विषयावर साध्या व सोप्या भाषेंत ग्रंथ लिहून त्यांस शाळांतील अभ्यासक्रमांत पहिली जागा दिली पाहिजे .... माझ्या देशबांधवांसाठीं आपला देह प्रीतिपूर्वक झिज-विण्याची ही दुसरी पाळी होती. हिच्या योगानें माझ्या स्वतःच्या व देशभ्रष्ट झालेल्या दुसऱ्या लोकांच्या मनाचा थकवा जाऊन त्यास उल्हास आला. आपलें देशकार्य त्यांनीं पुन्हा मनावर घेतलें, व तें पार पाडण्याचा निश्चय केला. हें कार्य फारच परोपकाराचें होतें, ह्यांत संदेह नाहीं; आणि तें आम्हीं फार भक्तिपूर्वक केलें. सर्वांनीं केवळ धर्मार्थ ह्या कामीं मदत केली. शिक्षकलोक एक पैसाही घेत नसत. बरें, त्यांस पैशाची जरूर नव्हती असें म्हणावें, तर तसें नव्हतें. प्रत्येकाच्या मागें मुलाबाळांचा व कुटुंबपोषणाचा जोजवार असून त्यांची ओढगस्त होती ........ ही शाळा नवेंबर महिन्याच्या दहाव्या तारिखेस स्थापण्यांत आली होती. हिच्या प्रत्येक वाढदिवशीं आम्हीं सर्व विद्यार्थ्यांस (त्यांची संख्या सुमारें दोनशें होती) एकत्र करून बक्षीससमारंभ करावा, व त्यांत लहानशीं बक्षिसें वाटावीं. तो आटोपल्यावर एक साधा खाना द्यावा. त्याच्या स्वयं-पाकाची तजवीज आम्हीं स्वतःच करावी. भोजन करीत असतां देशाभि-मानप्रेरक किंवा संस्थापकांप्रत कृतज्ञतादर्शक अशीं गाणीं म्हणावीं. त्या योगानें सर्वांस फार स्फुरण चढे. सर्व वर्षभर शिकून जो विद्यार्थ्यांच्या मनांवर परिणाम व्हावयाचा, तो ह्या दिवशीं संध्याकाळीं एका चार घटकेंत होत असे. ज्या हतभागी मुलांस त्यांचे धनी गुलामाप्रमाणें वागवीत असत, त्यांस आतां कळूं लागलें कीं, आपणही माणसें आहोंत, व दुसऱ्या माण-सांची आणि आपली योग्यता सारखीच आहे; आपलाही जीव आहे व आपण गुलाम नव्होंत. ह्या विदुरावरच्या कण्या खाण्यास आमचे पुष्कळ इंग्रज मित्र—पुरुष स्त्रिया हीं दोन्ही—येत असत; व हें सर्व पाहून त्यांच्या मनावर देखील परिणाम होऊन त्यांस गहिंवर दाटत असे. वर मीं सांगि-तलेंच आहे कीं, ह्या शाळेच्याद्वारें इतालियन मोलमजुरी करणाऱ्या लोकांशीं माझा समागम झाला होता. इतालियन राष्ट्राशीं साक्षात् संबंध

आहे, अशा कामीं मदत करण्यासाठीं ह्यांपैकीं जे उत्तम प्रतीचे होते त्यांस मीं निवडून काढिले. कामकरी लोकांची आम्हीं एक मंडळी स्थापिली, व एक नवीन वर्तमानपत्र काढूं लागलों. ह्याचें नांव "लोकप्रिय हितोपदेशक" असें ठेविलें होतें. ह्याच्या शिरोलेखावर "काम व त्याचा योग्य मोबदला" हे शब्द लिहिलेले असत. त्या वर्तमानपत्रांतील माझे लेख कोणत्या हेतूस धरून असत, हें "मनुष्याचीं कर्तव्यें" ह्या निबंधांवरून कळून येईल.'

ह्या समाजानंतर असल्या प्रकारचे शेंकडों समाज इतली देशांत स्थापिले गेले. ह्यांपैकीं कांहीं माझीनीनें स्वत: स्थापिले होते, व बाकीचे माझीनीच्या वजनामुळें लोकांनीं स्थापिले होते. आजमित्तीस इतली देशांत नांव घेण्यासारखें एकही शहर नाहीं कीं, ज्यांत असा एकादा समाज नाहीं. ह्या समाजांविषयीं त्या लोकांस फार अभिमान वाटत असतो. ह्याचें सर्व श्रेय माझीनीकडे आहे.

# भाग ४ था.

## इतली देशांतील बंडें व राज्यक्रांत्या.

### सन १८४८.

परोपकाराचीं कामें करून विश्रांती घेत असतां व आपली उमेद ताजी करीत असतां, आपल्या देशबांधवांत नैतिक आणि राजकीय शिक्षणाचा प्रसार करण्यासाठीं माझीनीनें अश्रांत परिश्रम केले. गुप्त मुद्रणयंत्रें व देशभर पसरलेला पत्रव्यवहार यांच्याद्वारें, त्यानें इतलियन लोकांच्या मनांत राष्ट्रीय स्वातंत्र्याची पक्की अभिरुचि उत्पन्न करून दिली, व कटाचें जाळें सर्व देशभर पसरिलें. दक्षिण अमेरिकेंत बंडखोरांचें पुढारीपण घेऊन गॅरिबाल्डीनें जे अचाट पराक्रम केले, ते माझीनीनें सर्व देशभर प्रसिद्धीस आणिले. त्यामुळें गॅरिबाल्डीची चोहोंकडे इतकी कीर्ति पसरली कीं, तो सन १८४८ सालीं युरोपखंडांत आल्याबरोबर इतलियन लोकांनीं त्याला आपला प्रमुख व पुढारी केलें.

सन १८४६ सालीं नवvा पायस पोपचे गादीवर बसल्यावर, त्यानें राजकीय गुन्हेगारांस माफ़ीचा जाहीरनामा काढिला. या पोपाची राज्य करण्याची ही नवीन तऱ्हा पाहून इतालियन लोक फसले. या पोपालाही राष्ट्रीय स्वातंत्र्याची आवड आहे, अशी त्यांनीं नसतीच कल्पना केली; व इतली देशाचें स्वातंत्र्य स्थापण्याच्या कामीं पोप महाराज अग्रणी होतील, असें त्यांस वाटलें. पोपाच्या कित्येक निस्सीम भक्तांनीं तर त्यास 'इतलीस्वातंत्र्यारुण' अशी पदवीही देऊन टाकिली. ह्यावेळीं माझीनी इंग्लंडांत होता. त्यानें आपल्या मेळ्यांत येऊन आपणांस उत्तेजन द्यावें, म्हणून वर सांगितलेल्या भक्तमंडळीनें त्यास वारंवार आग्रह केला. परंतु माझीनी पडला पक्का वस्ताद. तो पोपाच्या अशा पोकळ थापांस भुलणारा नव्हता, राजेलोकांवर त्याचा मुळींच विश्वास नसे. त्यानें चोख उत्तर दिलें कीं. 'इतलीच्या स्वातंत्र्याच्या संस्थापनेस पोपानें आरंभ केला कीं, त्यानें उभारलेल्या झेंड्यामागें मी सर्वांच्या पुढें होईन.' तो म्हणतो 'पण ज्या निशाणामागें जावयाचें तें निशाण कोठें आहे ? **राष्ट्राची एकी** या निशाणास मात्र मी ओळखतों. तें जर कोणी उभारील, तर मी आपली पताका घटकाभर बाजूस ठेवीन; ती अजीबात टाकून तर देणार नाहीं. तसें केल्यास मी ईश्वराचा, देशाचा व माझ्या मनाचा गुन्हेगार होईन........देश स्वतंत्र करण्याचा कोणताही रस्ता घ्या; त्याचा आरंभ आणि पर्यवसान हीं एकींत नसल्यास तो निरुपयोगी आहे, एवढेंच नाहीं तर त्यापासून पुष्कळ तोटे आहेत. पोप स्वतः फार सुशील पुरुष आहे. त्याच्या मनाच्या प्रवृत्ति आणि आस्त्रियाचा शह यांजमध्यें त्याला एकीकडे आड आणि दुसरीकडे विहीर असें झालें आहे. परंतु धर्मासनारूढ झाल्याबरोबर त्याच्या पहिल्या कृत्यांवरून इतली देशाच्या हिताविषयींचे त्याचे हेतु स्पष्टपणें दिसून यावयास पाहिजे होते, ते मुळींच कोठें दिसत नाहींत. माझी जर चुकी होत असेल, तर त्यानें हातांनीं कांहीं तरी करून दाखवावें, म्हणजे मी आपला कान धरण्यास तयार आहें. माझा वृथा आग्रह मुळीं नाहीं.' तथापि त्यानें पोपास एक पत्र लिहिलें. त्या पत्रांत त्यावेळीं पोपास जें महत्वाचें धार्मिक व राष्ट्रीय कार्य संपादितां आलें असतें तें त्यानें दाखवून दिलें. पोपचें कर्तव्य आणि आचरण ह्यांजमधील विसंगती आपल्या देशबांधवांस कळावी, म्हणून त्यानें तें पत्र प्रसिद्ध करण्याची मोकळीक दिली होती.

सहा महिन्यानंतर भ्रमाचा भोंपळा फुटला. पोपानें घेतलेली धर्माची छाटी झुगारून देऊन त्यानें राजयतीचें आपलें खरें स्वरूप प्रगट केलें. ह्या घटकेपर्यंत नेमस्त ( मॉडरेट ) पक्षाचे लोक म्हणत असत कीं, पोपाचा अधिकारदंड व राष्ट्राची तरवार ह्यांची एकी झाल्याशिवाय इतलीची बेडी तुटावयाची नाहीं. पण आतां ते म्हणूं लागले कीं, या कामास इतलीची एकटी तरवार पुरे आहे. ह्या लटुपटीच्या तरवारीच्या हातून कांहीं झालें नाहीं. परंतु जिच्यांत इतलीचें रक्षण करण्याचें खरें सामर्थ्य होतें, ती आपली तरवार लोकांनीं सिसिली बेटांत सन १८४७ सालीं व लॉंबर्डीत १८४८ सालीं म्यानांतून उपसली. ह्या काळची माहिती मिळण्यास दुसरें कांहीं साधन नसतें, तरी इंग्लंड देशाच्या १८४८–४९ सालच्या ब्ल्यू-बुकांमध्यें आलेल्या कागदपत्रांवरून एवढें साफ निघतें कीं, 'ह्या वर्षी इतली देश एकछत्री करण्याकरितां जे जे उपाय योजण्यांत आले, ते सर्व माझीनीनें त्या वेळेपावेतों केलेल्या उपदेशांचे व त्यानें लाविलेल्या वळणाचे परिणाम होते; व पीमॉंतच्या राजाच्या मोठमोठ्या थापांस भुलून जाऊन तद्देशीय लोक आडरस्त्यास लागले नसते, तर लढाईचा दुर्धर परिणाम होऊन आस्त्रियास परत यावयास सांपडलें, हें व दुसरीं अरिष्टें टळलीं असतीं. इतकेंच नाहीं तर इतलीची एकी होणें, ही गोष्ट जर मानवी शक्तीच्या बाहेर नव्हती, तर ती देखील त्यावेळीं घडून आली असती.' इतली देशांत शांतता राहण्याकरितां काय उपाय योजावे, ह्याविषयीं खल करून व्हायना येथील मंत्रिमंडळानें एक खलिता तयार केला होता; तो लॉर्ड पामरस्टन याजकडे पाठविण्यांत आला होता. ह्या खलित्यांत सन १८४८ च्या बेडासंबंधानें असें म्हटलें आहे कीं, 'ज्वालामुखींतील वितळलेल्या गंधकाच्या रसाप्रमाणें हा पुंडावा चोहींकडे पसरत चालला आहे; तो माझीनीच्या सतरा वर्षें केलेल्या उपदेशाचा परिणाम होय.' ह्याच लेखांत असेंही लिहिलें आहे कीं, 'इतलियन राष्ट्रत्वाचा अंकुर आजपर्यंत भुईमध्यें गडून गेला होता; परंतु **अभिनव इतली** ह्या समाजाच्या प्रयत्नानें तो आतां फुटून वर आला आहे, व त्यामुळेंच आमच्या डोळ्यांदेखत ह्या गोष्टी घडून आल्या आहेत.' कारण **आस्त्रियनांची कत्तल** ही आरोळी आस्त्रियाच्या साक्षात् अमलाखालीं असलेल्या लॉंबर्डी किंवा व्हेनीशिया ह्या प्रांतांत उठली नसून, जेथें आस्त्रियाचा जुलमी शह मुळींच लागला

नव्हता, तेथून म्हणजे सिसिली बेटाच्या मध्य भागांत ती उत्पन्न झाली; व तिनें सर्व द्वीपकल्प दणाणून देऊन ती इतलियन टायरलप्रांतांत जाऊन धडकली. हा प्रांत तर आस्ट्रियाच्या अमलास खुषी आहे असें मानण्यांत येत होतें.' * राजे लोकांच्या आणि त्यांच्या हस्तकांच्या चालीप्रमाणें, राजपुत्र ( प्रिंस ) मेटरनिच ह्यासही, आपले हक्क सांगणारे लोक तक्रारी व फिसादखोर वाटत असत; फार तर काय पण ' राष्ट्र ' हा शब्द ऐकून त्याच्या अंगावर कांटा उभा रहात असे. तो ह्या बंडाच्या सुरवातीला म्हणजे ता. ११ आगष्ट सन १८४७ रोजीं लिहितो कीं, 'हे दंगेखोर लोक धार्मिक बाबतींत किंवा इतलियन द्वीपकल्पांतील एकाद्या संस्थानांत ढवळाढवळ करून गप्प बसावयाचे नाहींत. त्यांचा असा विचार आहे कीं, चट सारीं संस्थानें मोडून टाकून इतली देशाचें एक राष्ट्र बनवावें.'

माझीनीनें आपल्या देशबांधवांच्या मनांत राष्ट्रत्वाची आकांक्षा जागृत केली होती ती सार्वत्रिक होती, असें जें या राजपुत्राचें म्हणणें होतें तें खरें होतें. बूर्बान राज-घराण्याविरुद्ध लोकांस उठविण्याकरितां सन १८४४ सालीं बॉंडियरा बंधूंनीं प्रयत्न केला होता. त्या प्रयत्नांत इतली एकछत्री करण्याकरितां त्यांनीं उघड्या डोळ्यांनीं आगींत उडी घातली होती, असें माझीनीस लिहिलेल्या त्यांच्या पत्रांवरून उघड होतें. अभिनव इतलीचें म्हणणें होतें कीं, देशी व परदेशी राजांच्या अमलाचें जूं झुगारून देणें, हें इतलियन लोकांचें पहिलें कर्तव्य होय; व तसें झाल्याशिवाय इतली देशाचें एक राष्ट्र बनावयाचें नाहीं. ह्या म्हणण्याच्या सत्यतेविषयीं बॉंडियरा बंधूंची बालंबाल खात्री झाली असल्यानें, त्यांच्यानें मांडीवर मांडी घालून स्वस्थ बसवेना. ते म्हणत कीं, 'देशाकरितां आपण बळी कसें पडावें, हें इतलियन लोकांस समजूं लागल्याशिवाय त्यांस बरा दिवस यावयाचा नाहीं; व हें समजावून देण्यास कोणीं स्वतः बळी पडून दाखविण्यासारखा दुसरा मार्ग नाहीं.' माझीनी म्हणतो 'एकट्या दुकट्यानें नाहीं, तर सर्वांनीं मिळून कांहीं तरी निकराचें कृत्य करून दाखविण्याची वेळ येऊन ठेपली होती. त्या कार्यासाठीं या अमूल्य बंधुद्वयास जतन करून ठेवावें, म्हणून मीं आपली पराकाष्ठा केली होती. व त्या कामीं मला यश आलेंही असतें. पण इंग्लंडच्या प्रधानांनीं आस्ट्रिया

---

* ज्यास आस्ट्रियानें इतलियन टायरल हें नांव दिलें होतें, तो प्रांत इतली देश स्वतंत्र असतांना व्हेनीस येथील लोकसत्ताक राज्याखालीं मोडत होता.

आणि नेपल्स येथील सरकारांस बातम्या दिल्या; त्यामुळें तीं दोन्ही सरकारें घाबरलीं, व त्यांनीं आपल्या अधमपणांत कांहीं बाकी ठेविली नाहीं. त्यामुळें माझा बेत फसला.' नेपल्स येथील दुष्ट राजाच्या हेरांनीं त्या दोघां बंधूंविरुद्ध पुरावे आणिले, व त्यांस बळेंच गुन्हेगार ठरवून त्या दुष्ट राजानें त्यांस गोळ्या घालून ठार मारविलें.

ह्या बंधुद्वयांच्या वधामुळें झालेला हाहाकार आणि दुःख ह्यांचा अंमळ विसर पडल्यावर असें स्पष्ट दिसूं लागलें कीं, त्यांनीं घालून दिलेला धडा व्यर्थ गेला नसून तो त्यांच्या देशबांधवांच्या मनांवर चांगल्या रीतीनें ठसला होता. १८४६ त पोपच्या संस्थानांत व १८४७ त जिनोआमध्यें आस्त्रियाविरुद्ध लोकांची बेदिली दिसूं लागली होती; व ह्याचवर्षीं सिसिली बेटामध्यें राज्यक्रांती होऊन नेपल्सच्या राजास चुरमुरे खात बसावें लागलें होतें. ह्या राज्यक्रांतींतल्या प्रमुखांचा माझीनीशीं, व तस्कनी, पीमाँत, रोम वगैरे ठिकाणच्या कटांतल्या लोकांशीं (इतलीचें एक राष्ट्र करावें असें ज्यांचें म्हणणें होतें त्यांच्याशीं) फार दिवसांपासून गुप्त पत्रव्यवहार होता. १८४८ सालीं लाँबर्डीच्या लोकांनीं आस्त्रियाच्या सत्तेविरुद्ध बंड केलें. तें ऐकून चोहींकडे आनंदाचें भरतें आलें; व सर्व इतलीभर, बंडवाल्या लोकांस यश येवो, अशी इच्छा प्रदर्शित करण्यांत आली. लोकांनीं स्वयंसिद्ध ( व्हालंटीयर्स ) सैनिकांच्या पलटणी तयार केल्या. प्रजा चवताळून गेल्यामुळें संस्थानिकांस नाकें मुठींत धरून बसावें लागलें. तस्कनीचा ग्र्यांड ड्यूक स्वतः आस्त्रियाच्या राजघराण्यांतला असूनही आपली गादी कायम राखण्याकरितां त्यास नाइलाजानें आस्त्रियाशीं लढाई सुरू करावी लागली. जिनोआ येथील स्वयंसिद्ध पलटणी प्रथम तयार झाल्या; पण मार्च महिना संपण्याच्या पूर्वींच दहा हजार रोमन आणि सात हजार तस्कन लोकांनीं हत्यारबंद होऊन लाँबर्डींतील आपल्या देशबांधवांस मदत करण्याकरितां आपलीं नांवें पटांत दाखल केलीं. आश्चर्य हें कीं, इतलींतील पेढीवाल्यांच्या आणि सराफांच्या अंगांत देखील देशभक्तीचें वारें भरलें होतें. मिलन येथील तत्पुरत्या सरकारानें काढिलेल्या कर्जांत ह्या पेढीवाल्यांनीं एक कवडीही व्याज न मागतां भराभर मोठाल्या रकमा भरल्या. आस्त्रियन लोकांनीं आल्प्स पर्वतामध्यें पळ काढिला, त्यांचा स्वयंसिद्ध पलटणींच्या मोठमोठ्या तुकड्यांनीं पाठलाग केला. इंग्रज सरकारच्या

वकिलांच्या हकीकतपत्रांवरून असें दिसून येतें कीं, मिलन येथें बंड उठल्यापासून एक महिन्याच्या आंत आस्त्रियाचे अवघे पन्नास हजार लोक इतलींत उरले होते, व त्यांचाही मोड होऊन ते अगदीं मट्टयास आले होते, आणि त्यांच्यांत जिकडे तिकडे अगदीं अव्यवस्था झाली होती.

ह्या वर्षांत घडून आलेल्या गोष्टींवरून राज्यक्रांतीसंबंधानें माझीनीची मतें किती सप्रमाण होतीं हें सिद्ध होतें. सन १८२१ व ३२ सालच्या उठावण्या निष्फळ झाल्या होत्या, कारण त्यांच्या पुढाऱ्यांनीं बहुजनसमाजास हिशोबांत धरलें नव्हतें. पण सन १८४७–४८–४९ सालच्या उठावण्यांस यश आलें; कारण अभिनव इतलीच्या प्रयत्नानें लोकमत जागृत झालें होतें, आणि ह्या राज्यक्रांत्या लोकांनींच होऊन केल्या होत्या.

वर निर्दिष्ट केलेला आस्त्रियन मुत्सद्दी मेटर्निच म्हणतो 'लोकसत्ता स्थापण्याच्या कामास ह्यांनीं बेधडक सुरवात केली आहे.' सन १८४८–४९ सालीं देशस्वातंत्र्याकरितां मिलन, बेसिया, बलोना, व्हिन्सेन्झा, रोम वगैरे ठिकाणीं जे लोक देशकामीं आले, त्यांच्या यादी पाहिल्या म्हणजे दिसून येतें कीं, त्यांपैकीं निदान नऊदशांश बहुजनसमाजापैकीं होते. परंतु लोकांच्या हक्काचे शत्रू पीमाँतच्या राजाभोंवती गोळा होण्यास सुरवात झाली होती, व त्यांनीं 'नेमस्त' (मॉडरेट्स) नांवाचा पक्ष स्थापिला. ह्या वेळेपावेतों प्रजासत्ता स्थापण्याच्या सरळ मार्गावर इतलियन लोक होते; परंतु ह्या पक्षामुळें त्यांचें चित्त व्यग्र झालें. नेमस्त पक्षाचा हा वाईट व राष्ट्रकल्पनेस अपायकारक परिणाम इतलियन लोकांच्या मनावर होऊं नये, म्हणून माझीनीनेंही आपली कमर बांधिली. ही झटापट त्याला जन्मवर पुरली. ह्या लढाईत माझीनी तत्वांस धरून चालणारा असून, त्याचे प्रतिपक्षी वारा वाहील तिकडे पाठ देणारे होते; माझीनी पक्का प्रामाणिक व ते अट्टल कावेबाज, माझीनी आपल्या कर्तव्यास जागणारा व शत्रू आपल्या पोळीवर तूप ओढणारे, असे होते. माझीनी म्हणतो 'ह्या पक्षानें धारण केलेलें नांवच (ते आपणांस नेमस्त म्हणवीत) मोठें डोळ्यांत धूळ टाकणारें आहे. इतलीच्या बोटा एवढाल्या चिंध्या झाल्या होत्या; कोणाचा जोडा कोणाच्या पायांत नव्हता; कांहीं हालचाल केली तरच जिवांत जीव राहणार, नाहीं तर मृत्यू आ वासून बसलाच आहे; हातपाय हालविले तरच इतली देशाचें एक राष्ट्र होणार, नाहीं तर पायलीचीं पंधरा क्षुद्र संस्थानें झालींच

आहेत, व तींही आस्त्रियाच्या सावलीस राहून इतलीचेंच अहित चिंतणार व त्याच्याच सुधारणेस मोडा घालणार; अशा आणीबाणीच्या वेळींही जणू कांहीं नेमस्तपणाचा मार्ग उरलाच होता........हे नेमस्तपक्षाचे लोक राजभक्त होते; व राजसत्तेचा भार लोकांस सह्य होण्यापुरती मोकळीक (तेवढ्यापुरतीच पण एक तिळभरही जास्त नाहीं) देण्यास हे राजी होते. आपलीं मतें प्रसिद्ध करण्याचा, व कायदेकानु करणाऱ्या मंडळांत आसन ठोकून बसण्याचा आपला हक्क सांगण्यासही ह्यांची एका पायावर तयारी होती. परंतु हेच हक्क, हेंच स्वातंत्र्य लोकांस देण्याची गोष्ट मात्र त्यांस नको होती. कारण त्यांच्या पोटांत भीति ही कीं, लोकांना आपले हक्क कळूं लागतील, व स्वकर्तव्यबुद्धि त्यांच्या मनांत जागृत होईल. राजभक्तांना लोकांच्या हक्कांचा मनापासून तिटकारा होता, आणि स्वकर्तव्याविषयीं आस्था नव्हती. ........ एकमेकांशीं अगदीं विरुद्ध अशा गोष्टींचा समेट कसा करावा, ह्या प्रश्नाच्या उलगड्यास ते लागले. त्यांस राजसत्ता व स्वातंत्र्य ह्यांची सांगड घालावयाची होती; इतली देशाचें राष्ट्र बनवावयाचें होतें, परंतु त्याचे जे तुकडे झाले होते ते सांधावयाचे नव्हते. आपला हेतु सिद्धीस नेण्यास त्यांस सामर्थ्य हवें होतें, परंतु एकी व निश्चय हीं नको होतीं. ह्या पक्षाच्या प्रमुखांपैकीं पुष्कळांस एकी नकोशी होती, व ती होऊं शकेल, असें तर एकासही वाटलें नव्हतें. इतलींतील क्षुद्र संस्थानिकांमध्यें जूट असणें हें कायतें आपलें कर्तव्यसर्वस्व आहे, असें बाल्बोपासून तों कॉहूरपर्यंत ह्यांच्यापैकीं सर्व विचारशील पुरुषांस वाटस असे. वंडें होऊन लहानसान संस्थानांचा जेव्हां फडशा पडला, तेव्हां 'नेमस्तांची' उच्चत्तम आकांक्षा ही होऊन बसली कीं, इतलीचीं तीन राज्यें करावयाचीं. एक उत्तरेकडील; म्हणजे पीमाँतच्या राज्यास भर घालून तें मोठें करावयाचें. एक दक्षिणेकडील; ह्या गादीवर बूर्बॉन घराण्यांतील एकाद्या लांडग्यास बसवून तेवढ्या घटकेपुरतें त्याच्या गळ्यास पार्लमेंटसारख्या संस्थेचें दोरखंड अडकवावयाचें. तिसरें मध्य इतलींतील; म्हणजे पोपच्या ताब्यांत जास्ती मुलूख देऊन तें वाढवावयाचें. सन १८४७ सालीं मालावरील जकातीच्या संबंधानें पीमाँत व आस्त्रिया यांच्यामध्यें कांहीं चकमक झाली; तेवढ्यावरून नेमस्त पक्षाच्या वर्तमानपत्रकारांनीं आपल्या पत्रांमधून 'राष्ट्राचा हितशत्रू' जो आस्त्रिया त्याजवर खूप ताशेरा झाडला. पीमाँतचा राजा

लोकांच्या हक्काचा कैवारी आहे, व प्रसंग पडल्यास तत्संरक्षणार्थ तो आ-स्त्रियाशीं दोन हात करण्यासही मागें पुढें पहाणार नाहीं. . . . . ' अशा अर्थाच्या लेखांची त्यांनीं रेलचेल उडविली, व त्यांच्या पुष्ट्यर्थ कांहीं लोणकढ्या गप्पाही मारिल्या. माझीनीनें आपल्या एका मित्रास लिहिलें कीं, 'पोपनें ह्यांच्या हातांवर तुरी दिल्या. तेव्हां आतां त्यांना ह्या इतलींतील अग्रगण्य योध्याचें (चार्ल्स आल्बर्ट राजास तत्पक्षियांनीं हें उपपद दिलें होतें) वेड लागलें आहे. तो ह्यांना तोंडघशीं पाडील, तेव्हां हे ग्रँडड्यूकच्या नादीं लागतील. अशी ह्यांची धांव कोठपर्यंत पोंचावयाची आहे, तें ईश्वर जाणे.' पोपच्या बदला आतां राजांचे देव्हारे माजले, ह्या गोष्टीविषयीं आपली पसंती प्रदर्शित करण्यास कोणीं माझीनीस सांगितलें. त्यानें उत्तर दिलें. 'चार्ल्स आल्बर्टनें माझ्या अत्यंत प्रिय मित्रांचा वध केला आहे; व त्याचा स्वभाव अगदीं परतंत्र आणि भेकड आहे; ह्यामुळें माझी त्याज-विषयीं नुसती धिक्कारबुद्धि आहे असें नाहीं, तर त्याच्या नांवाची देखील मला किळस येते. शिवाय लोकसत्ता स्थापण्याविषयीं माझें मन फार उत्कंठित आहे. असें असून देखील जर माझ्या मनाची खात्री होईल कीं, आपण इतलीचा सार्वभौम राजा व्हावें ह्या मतलबासाठीं तरी निदान इतली देश एकवट करण्याची या चार्ल्सच्या अंगीं महत्वाकांक्षा आहे, तर मी तच्चरणारविंदीं मिलिंदायमान होणाऱ्यास तथास्तु म्हणेन.'

परंतु निरनिराळ्या संस्थानांतून वांटले गेलेल्या आपल्या लोकांस एकवट करून त्यांचें एक बलाढ्य राष्ट्र करण्याची 'नेमस्तांस' आशा नव्हती व इच्छाही नव्हती. स्वतंत्र राष्ट्रत्वाचा हेतु मनांत धरून मिलन येथें जेव्हां सन १८४८ सालीं बंड झालें, तेव्हां 'नेमस्तां'स अत्यंत आश्चर्य वाटलें. हें बंड लोकांनीं होऊन केलें होतें; आणि (लोकांची शक्ति काय आहे तें त्यांस समजलें नसल्यानें) 'जें न करी राव तें करी गांव' हें तत्त्व त्यांस कधींच समजलें नव्हतें, किंवा ह्या तत्त्वास ते कधीं जमेंत धरीत नसत. लोकांनीं तीन दिवस पावेतों टक्कर झेलल्यानंतर तेथील महाजनांनीं आणि स्थानिक अधिकाऱ्यांनीं एक जाहीरनामा लाविला; त्यांत, लोकांनीं कायद्याचे रस्ते सोडून देऊन बेकायदे वर्तन केलें (परदेशीय लाख्या गंगारामाशीं कायद्यानें झुंजावयाचें!!!), ह्याबद्दल त्यांनीं आपली दिलगिरी प्रदर्शित केली, व पक्का तह होईपावेतों लढाई बंद

ठेविण्याविषयीं लोकांस सूचना केली. लोकांनीं त्या जाहीरनाम्यास केराची टोपली दाखवून लढाई चालू ठेविली. पांचवे दिवशीं आस्त्रियनांकडील चार हजार शिपाई ठार झाल्याबरोबर त्यांची त्रेधा उडून त्यांनीं मिलन येथून पळ काढिला. ह्यानंतर व्हेनिसमध्यें बंड उठलें. त्याचा प्रसार फारच विलक्षण त्वरेनें झाला. ह्या बंडाच्या योगानें इतलीमधून आस्त्रियांत जाण्याचे घाट व रस्ते स्वयंसिद्ध पलटणींच्या हातीं आले; त्यामुळें मोड पावून सरहद्दीकडे पळत सुटलेल्या आस्त्रियनांस स्वदेशांत उतरतां येईना, व कुमकही मिळेना. आस्त्रियाच्या पदरीं असलेल्या इतलियन लोकांच्या साऱ्या पलटणींनीं चाकरीवर लाथ मारिली. इतलियन खलाशांच्या ताब्यांत असलेलीं आस्त्रियाचीं तीन गलबतें व्हेनिसच्या स्वाधीन झालीं. व्हेनिस येथें लोकसत्ता स्थापन झाली होती. 'मिलन येथील बंडानें सर्व इतलीस उठण्याविषयीं आरोळी दिल्यासारखें झालें.'

ह्या लढायांत एकाद्या राजास गोंवून दिलें नाहीं, तर इतली देशांत राजसत्तेस तिळांजळी मिळेल ही गोष्ट नेमस्तांच्या लक्षांत आली. अभिनव इतलीनें लोकांस प्रथम हा धडा शिकविला होता कीं, इतलीची राजसत्ता बळकावून बसलेल्या राजांच्या घशांतून ती प्रथम सोडविली पाहिजे; तो धडा त्यांस पूर्ण अवगत झाला होता. आस्त्रियाशीं एकट्या लोकांसच लढूं दिल्यास, आपलें सामर्थ्य काय आहे हें लोकांच्या लक्षांत येऊन, ते आपले हक्क सांगून प्रजासत्ताक राज्याची स्थापना करतील; अशी दुसऱ्या धड्याप्रमाणें करणी करून दाखवितील, म्हणून नेमस्त पक्षास भीति पडली. म्हणून त्यांनीं आल्बर्ट राजाकडे दूत पाठवून त्यास विनंती केली कीं, आपण ह्या चळवळीचें आधिपत्य स्वीकारावें; व त्यास असेंही सूचविलें कीं, जर असें करण्यास तुम्ही विलंब लावाल, तर लोकसत्ताक राज्याचा जयघोष तुमच्या कानांवर येऊन धडकलाच असें समजा. ह्या झटापटींत हारजीत कोणाची होते ही गोष्ट संशयग्रस्त होती, तोंपर्यंत नेमस्तांकडून आलेल्या वकिलांची भेट घेण्याचें राजानें नाकारिलें; तत्राप मिलनमध्यें राज्यक्रांति होणार असें जेव्हां स्पष्ट दिसूं लागलें, तेव्हां त्या प्रांतांत लढाई चालू ठेविण्याकरितां आपल्या सैन्याची मदत देण्यास आपण तयार आहों, म्हणून त्यानें सांगून पाठविलें. परंतु त्यांत अशी अट घातली कीं, एक तत्पुरतें सरकार नेमून, लॉंबर्डी प्रांत पीमॉंतच्या

राजास देण्याची सूचना त्या सरकारानें लोकांपुढें ठेवावी. काउंट मार्टी-नी ( यास माझीनीनें ‘ नेमस्त पक्षाचा फिरता दलाल ’ असें उपपद दिलें आहे ) यानें ही सूचना प्रजापक्षाच्या एका पुढाऱ्यास ( केटेनिओस) केली व म्हटलें कीं ‘ राजाची नौकरी बजावून त्याची मर्जी संपादन करून घेण्याची वेळ वारंवार येते असें नाहीं, हें तुम्ही जाणतच आहां ’. ह्यावर टीका करितांना माझीनी म्हणतो ‘ केवढी राजाची थोरवी ! आपले प्राण बळी देऊन मिळविलेल्या जयाचा उपभोग कोण घेणार, हें पुसण्यास देखील क्षणभर न थांबतां, तटावर चढून इतलीच्या स्वातंत्र्यासाठीं आनंदानें देह अर्पण करणाऱ्या अत्यंत गरीब मजुराच्या खेंटराचीही सर, ईश्वराच्या समदृष्टीनें पाहिल्यास, पन्नास राजांस येत नाहीं; आणि पुढें मागें इतलियन लोकांसही असेंच वाटूं लागेल. ज्या दिवशीं आस्त्रियन सेनापतीनें ( रॅडेट्स्की ) आपल्या अवशिष्ट सैन्यासह मिलनमधून यःपलायन केलें, आणि आपल्या अमलांतील पीमाँत आणि सार्डीनिया प्रांतांतील स्वयंसिद्ध शिपाई नेटानें लॅाबर्डीत शिरत असून आतां आपण स्वस्थ राहिलों तर लॅाबर्डी आपल्या राज्यास जोडण्याचें तर एकीकडेच राहील, परंतु उलटें आपल्या राज्यासही आंचवावें लागेल, असें चार्ल्स आल्बर्टास वाटलें, तेव्हां त्यानें आस्त्रियाशीं लढाई करण्याचा जाहीरनामा लाविला. चार्ल्स ह्यानें इतर युरोपियन दरबारांस दिलेल्या अंतस्थ आश्वासनावरूनच नव्हे, तर इंग्लंडच्या वकिलांनीं लॉर्ड पामरस्टन ( मुख्य प्रधान ) ह्यास लिहिलेल्या हकीगतीवरूनही असें सप्रमाण सिद्ध करितां येतें कीं, अभिनव इतलीनें केलेलें काम ढांसळून पाडण्यासाठीं हा उपाय योजण्यांत आला होता. वकील लिहितात कीं ‘ आसपासच्या सर्व शहरांत व खेड्यापाड्यांतही अस्वस्थता झाल्यामुळें सार्डीनियाच्या राजाच्या मुलखाच्या सरहद्दीवर जिकडे तिकडे पुंडावा माजला आहे. चहूंकडे देशाभिमान फारच जागृत झाला आहे; व राजधानींत आणि मुलखांत अशी कांहीं गडबड उडाली आहे कीं, एकदम राज्यक्रांति होऊन गादीस धक्का पोंचतो की काय अशी क्षणोक्षणीं भीति वाटते. लॅाबर्डीमध्यें लोकसत्ताक राज्यस्थापना होण्याची भयप्रद वेळ अगदीं नजीक येऊन ठेपली आहे. पीमाँतचीही स्थिति बरी नाहीं. लॅाबर्डीत प्रजासत्ताक राज्य झालें, असें जाहीर होण्याबरोबर सार्डीनियाच्या राजाचे मुलखांतही तशीच धामधूम उडेल’.

आस्त्रियाशीं लढाई जुंपल्यानंतर पीमाँत येथील मंत्रिमंडळानें दिलेलें आश्वासन लिहून पाठवितांना इंग्लंडचे वकील म्हणतात 'येथें अगदीं बेबंदी झाली आहे. कोणी कोणाचा धनी उरला नाहीं. ही गडबड मोडण्यासाठीं राजेसाहेबांस लढाई सुरू करावी लागली आहे. लोकांचें प्राबल्य फारच वाढलें आहे. सरकारास ते मुळींच जुमानीत नाहींत, व बंड करून आस्त्रियावर हल्ला करण्याची धमकी देतात; सेव्हॉयचें राजघराणें फारच संकटांत पडलें आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें येथील मंत्रिमंडळांस तरवार उपसणें भाग पडलें आहे. आम्हांस मोठी भीति ही वाटते कीं, लॉंबर्डींत पुष्कळ राजकीय संस्था आहेत, व स्विट्झर्लंड त्या प्रांताला अगदीं लागून आहे; त्यामुळें लॉंबर्डींत प्रजासत्तेची स्थापना केव्हां होईल याचा नेम नाहीं, व तसें झालें म्हणजे सेव्हॉयच्या थोर राजघराण्याचीं वर्षे भरलींच म्हणून समजा. सरकारास लढाई सुरू करण्याविषयीं कांकू करितां येत नाहीं. असें केल्यानें त्यांनीं आपणास धोक्यांत घालून घेतलें आहे; तथापि त्यांची अशी बालंबाल खात्री आहे कीं, ही गोष्ट युरोपांतील सर्व राजांस हितावह होईल.'

नेमस्तपक्ष व इतलींतील विजयी योद्धा (चार्लस्) ह्यांस लढाई सुरू करावी लागली, तिचीं खरीं कारणें हीं होत. लोकांस त्यांनीं निराळीच भूलथाप दिली होती. राजानें असा जाहीरनामा काढिला कीं, 'एका बंधूनें दुसऱ्यास जी मदत दिली पाहिजे, तशी मदत लॉंबर्डीच्या लोकांस देण्यासाठीं आपण आलों आहोंत.' प्रजापक्षाच्या लोकांचीं मनें स्वस्थ राखण्याकरितां तत्पुरत्या सरकारानें प्रसिद्ध केलें 'आम्ही सत्यास स्मरून वारंवार असें आश्वासन दिलें आहे कीं, लढाई संपल्यानंतर इतलीमध्यें नियामक संस्था कशा प्रकारची असावी, हें ठरविण्याचा अधिकार लोकांकडे राहील; व इतलीचा दरएक भाग स्वतंत्र होईपावेतों आम्ही त्या बाबतींत कांहीं एक करणार नाहीं; एकंदर देश स्वतंत्र झाला म्हणजे सर्वानुमतें काय तें ठरवितां येईल.' सर्व देश स्वतंत्र होईपावेतों तटस्थ राहण्याचा हा ठराव माझीनीनें कबूल केला, व तो त्याप्रमाणें अक्षरशः चालला. हें खरें कीं, राजानें हा सर्व कपटव्यूह रचिला आहे, ही गोष्ट त्यावेळीं माझीनीस माहीत नव्हती. तथापि आपण हातीं धरिलेलें काम तडीस लावण्याचें सामर्थ्य आपल्या अंगीं नाहीं, असें त्यास वाटत होतें.

म्हणून तो म्हणे कीं, राष्ट्राच्या मतास मान कसा द्यावा हें दाखवून देण्याचें काम प्रजापक्षियांचें विशेषेंकरून आहे. आपल्या देशांतील नि-यामक सत्तेची घटना कोणत्या प्रकारची असावी हें ठरवितांना, सर्व राष्ट्रास मत देतां यावें, ह्यासाठीं परकियांच्या तावडींतून आपला देश सोडवून तो स्वतंत्र करण्याकरितां, व तत्पुरत्या सरकारास पाठबळ देण्या-करितां, प्रजासत्तापक्षियांनीं कायावाचामनें झटावें, म्हणून माझीनीनें आपल्याकडून होईल तेवढा प्रयत्न केला. लढाई चालू असतां कोणत्याही प्रकारच्या राजकीय मताचा प्रसार करण्याची खटपट त्यानें अगदीं बंद ठेविली, व मोठ्या थोर बुद्धीनें तो आपलें मन मुठींत धरून स्वस्थ बसला. त्यावेळच्या इतलींतील राजपक्षीय पोटबाबू वर्तमानपत्रकारांनीं त्याच्या ह्या काळच्या वर्तनासंबंधानें ज्या खोट्यानाट्या कंडया पिकविल्या होत्या, व जितका गैरसमज इंग्लंडांत झाला होता, तसें दुसऱ्या कोणत्याही काळासंबंधानें झालें नसेल. ह्यावेळींच नेमस्तपक्षियांनीं प्रथम माझीनीस फस-वून नंतर त्याच्या नांवाचा दांडोरा लोकांत पिटविला. लॉंबर्डी प्रांत चार्ल्स आल्बर्टच्या राज्यास जोडून देण्याचें वचन नेमस्त पूर्वीच देऊन चुकले होते. ही गोष्ट साध्य करण्याचा सर्वोत्तम उपाय त्यांच्या जड बुद्धीस हा वाटला कीं, एकटया चार्ल्स राजासच ही लढाई जिंकू द्यावी; म्हणजे अखेर एकीकडे वीट आलेलें आस्ट्रियाचें वर्चस्व व दुसरीकडे चार्ल्सची सत्ता, अशी आडविहीर झाली कीं, लोकांस चुंबींत चार्ल्सची सत्ता कबूल करावी लागेल. शत्रू व राजाची फौज ह्यांमध्यें जरा कोठें चकमक झाली कीं, मिलन येथील तत्पुरत्या सरकारानें जाहीरनामे लावावे, व आप-ल्यास शत्रूवर मोठा जय मिळाल्याची बातमी गोटांतून आली आहे, असें त्यांत लिहावें. हा क्रम चालत असतां कांहीं दिवसांनीं, राजाच्या सेनानींच्या मूर्खपणामुळें म्हणा किंवा लबाडीमुळें म्हणा, लढाईचा रंग फिरून शत्रू खरोखर बळावत चालला होता, त्यावेळीं देखील मिलन येथील लोक मनांत मांडे खात होते, व शत्रू नामशेष होण्याची वेळ समीप येऊन ठेपली आहे असें समजत होते. स्वयंसिद्ध पलटणींतील लोक प्रजापक्षीय असल्यानें राज त्यांस भीत होता. इतलींतून आस्ट्रियांत उतरण्याचे आल्पस् पर्वतांमधील घाट रोकून धरण्याचें काम ह्या पलटणींकडे होतें. तेथून त्यांस परत बो-लावून घेऊन राजानें त्यांस रजा दिली. आस्ट्रियनांचा मुख्य तळ व राडे-

ट्स्कीचा गोट ह्यांमधील रस्ता अशा रीतीनें अनायासें मोकळा झाल्यानें राडेट्स्की ह्यास आपल्या फौजेंत लोक व अन्नसामग्री भरण्यास मुबलक अवकाश मिळाला.

आस्त्रियन लोकांनीं युद्धास सर केलें, तेंव्हां मात्र ठिकठिकाणच्या तत्पुरत्या सरकारच्या काळजांत धडकी भरली. त्यांनीं एक सभा भरवून ऐन मध्यरात्रीं तींत माझीनीस बोलावूं पाठविलें, व त्यास सल्ला विचारिली ' आजपर्यंत आम्हीं लोकांच्या डोळ्यांत धूळ घातली; पण आतां निकराची वेळ येऊन ठेपली आहे. आतां मुकाट्यानें आस्त्रियाचें जूं घेण्यासाठीं पुनः खांदा पुढें दिला पाहिजे, किंवा सर्व लोकांनीं एक जबरदस्त प्रयत्न करून सुटका करून घेतली पाहिजे. तर ही गोष्ट लोकांच्या कानीं घालण्यास काय मसलत करावी?' माझीनीनें त्यांस कळविलें कीं, ' झालेली सर्व खरी हकीकत एकदम प्रसिद्ध करून आबालवृद्धांची एक सभा भरवावी, व स्वयंसिद्ध लोकांचीं पलटणें लागलीच तयार करवावीं.' त्यानें असें कबूल केलें ' यादींत पहिलें नांव जर मला घालूं द्याल, तर मिलनमध्यें मी एक सैन्य उभें करितों.' माझीनीची ही सुचना प्रथम मान्य करण्यांत आली; परंतु ती लागलीच राजानें नाकारिली. राजाचा सेक्रेटरी, कॅस्तॅग्नेतो, ह्यानें स्पष्ट सांगितलें कीं, ' शत्रूचें (प्रजापक्षियांचें) सैन्य आपल्या पाठीवर असावें अशी राजेसाहेबांची इच्छा नाहीं.'

लढाईंत आलेल्या अपयशासंबंधानें माझीनीनें एकसारखी ओरड चालविली होती; परंतु त्याच्या बोलण्यावर कोणाचा भरंवसा पटला नाहीं. 'राजेसाहेबांचो मर्जी तुमच्यावर सुप्रसन्न होऊन, तुम्ही अगदीं त्यांच्या नाकांतले बाल होऊन रहाल', अशा गुळचट थापा देऊनही त्याचें तोंड दाबण्याचा यत्न करण्यांत आला होता. राजाचे गोटांतून एक कामगार माझीनीकडे पाठविण्यांत आला. त्यानें बोलणें लाविलें ' लॅांबर्डी प्रांत आपल्या मुलखास जोडण्याचा राजेसाहेबांचा विचार आहे. म्हणून त्या कामाचा तुम्हीं पुरस्कार घेऊन तें सिद्धीस न्याल, तर ह्या उत्तरेकडील मुलखाची राज्यव्यवस्था तुमच्या म्हणण्याप्रमाणें लावण्यांत येईल, तुमची आणि राजेसाहेबांची मुलाखत करविण्यांत येईल, व तुम्हांस मुख्य प्रधानाची जागा देण्यांत येईल.' इतली देश एकछत्री करणें, हें आपलें कर्तव्यसर्वस्व आहे, असें माझीनी जन्मा-

दारभ्य मानीत आला होता; तेव्हां त्यानें राजाकडून आलेल्या कामदारास जबाब दिला ' माझा मुख्य हेतु पार पडत असेल, तर किरकोळ बाबतींत मी आग्रह धरणार नाहीं. आजमितीस अतिशय महत्वाचा प्रश्न, आस्ट्रियाशीं लढाई करणें हा होय. अशा प्रसंगीं उत्तर इतलीचें एक संस्थान करणें फारच अनर्थावह होईल. प्रथमतः इतलीचें एक राष्ट्र करण्यासाठीं हा एवढा खटाटोप करण्यांत आला होता. तो विचार आतां जर उघडपणें एक बाजूस ठेवण्यांत आला, व पीमाँत संस्थानानें असला दडपादडपीचा प्रकार सुरू केला, तर आजूबाजूच्या संस्थानांतील लोकांच्या मनांतील आधींच थंडावत चाललेली आस्था आणि उत्साह हीं समूळ नाहींशीं होतील, व संस्थानिकांसही तो प्रकार देखूं शकणार नाहीं. त्यांना आपसांत द्वेषभाव सुरू करण्यास कारण अनायासेंच मिळेल. सर्व राष्ट्र स्वतंत्र करण्यासाठीं म्हणून जर हल्लीं चालू असलेली लढाई चालविण्यांत येईल, तर लोकांस पुन्हा स्फुरण चढेल. नेमस्तपक्षियांनीं राजेसाहेबांस इतलींतील क्षात्रियसिंह असें उपपद दिलें आहे, तें यथार्थ करून दाखविण्यास जर राजेसाहेब तयार असतील, व इतलीचें सार्वभौमत्व मिळविण्यासाठीं प्रसंग पडल्यास पीमाँतच्या राज्यावर पाणी सोडण्यास जर त्यांची तयारी असेल, इतलींतील सर्व राजांशीं काडी मोडून ( कारण ते राजेसाहेबांस अर्थात्च प्रतिकूळ असणार ) आल्पस् पर्वतापासून तो तहत समुद्रापर्यंत इतलींत जे कोणी देशभक्त असतील त्या सर्वांस जर राजेसाहेब आपल्यापाशीं गोळा करतील;—जेणेंकरून राजेसाहेबांनीं हें काम मनोभावें हातीं धरलें आहे अशी लोकांची खात्री होईल— इतक्या गोष्टी जर घडतील, तर इतली देशांत राज्यक्रांतीविषयीं उत्सुक असणारे लोक राजेसाहेबांस अनुकूळ करून देण्याविषयीं मजकडून होईल तेवढी खटपट मी करीन'. कामदारानें विचारिलें ' राजेसाहेबांस ही गोष्ट कबूल आहे, अशाविषयीं तुम्हास कोणत्या प्रकारची खात्री पाहिजे ?' माझीनीनें लागलीच वर लिहिलेल्या आशयाच्या चार ओळी लिहून, त्यावर राजाची सही होण्याकरितां त्या कामदाराच्या स्वाधीन केल्या. राजानें त्या लेखावर सही करण्याचें नाकारिलें, हें सांगावयास नकोच. कॅस्त्यॅग्नेतो ह्यानें माझीनीविषयीं राजास लिहून कळविलें कीं, 'याजपाशीं कार्यभाग सिद्धीस जाईल अशी आशा दिसत नाहीं.'

अखेर जेव्हां आस्त्रियास एकावर एक जय मिळूं लागले, तेव्हां नेमस्तपक्षियांस लोकांपाशीं कबूल करावें लागलें कीं, हत्यारांच्या पुरवठयाची व लोकांच्या कुमकेची जरूर आहे. त्यांनीं असें ही जाहीर केलें 'लॅांबर्डीचे लोक जर असें कबूल करतील कीं, राजेसाहेबांवर आमचा भरंवसा आहे, व तो प्रांत राजेसाहेबांच्या ताब्यांत देण्यास सर्व लोक जर मत देतील, तर राजेसाहेब आपल्या खास मुलखांतील लोकांकडून लाखों रुपये व हजारों शिपाई ह्यांची मदत त्यांस देववितील.' अशा रीतीनें विचाऱ्या लॅांबर्डीच्या लोकांस थापा देऊन आणि त्यांच्या डोळ्यांत माती टाकून त्यांजकडून तसलें मत काढण्यांत आलें; ही लढाई सुरू करण्याचा जो राजाचा मुख्य हेतु तो पार पडला; व नेमस्तपक्षियांमध्यें जिकडे तिकडे आनंदाचें भरतें आलें. कारण आतां मध्यंतरीं प्रजासत्ता स्थापन होण्याची भीति उरली नाहीं; व (वकीली कारस्थानी भाषेंत) लॅांबर्डी प्रांतावर हक्क सांगण्यास सेव्हॉयच्या राजवराण्यास ह्या एका दाखल्याचा लाभ झाला. लढाई करण्यांत लॅांबर्डी प्रांताचा स्वाहा करण्यापलीकडे राजाचा दुसरा कोणताही हेतु नव्हता, असें दुसऱ्याही एका गोष्टीवरून सिद्ध होतें. व्हेनिस येथील लोकांसही मिलन येथील लोकांप्रमाणेंच आपला प्रांत राजाच्या स्वाधीन करण्याविषयीं भुरळ घालण्यांत आलें. त्या लोकांनीं ती गोष्ट कबूल केल्याबरोबर तें हतभाग्य शहर चार्ल्स आल्बर्टच्या तर्फे कबजांत घेण्यासाठीं म्हणून दोन प्रतिनिधी पाठविण्यांत आले. ही गोष्ट घडण्याच्या पूर्वीं दोनच दिवस राजानें आस्त्रियाशीं गुप्त रीतीनें तह करून, तें शहर आस्त्रियाच्या स्वाधीन करण्याचें कबूल केलें होतें. राजाचें हें कृष्ण कारस्थान सिद्धीस जाऊन कांहीं दिवस लोटले नाहींत तोंच, बातमी येऊन धडकली कीं, पीमॉंत येथील सैन्याचा मोड होऊन त्यानें मिलनकडे पळ काढिला आहे, व सेनापती राडेट्स्की आपल्या ताज्यातवान्या आणि यशस्वी सैन्यानिशीं त्याचा पाठलाग करीत आहे. तेव्हां लोकांचे डोळे उघडून आपणांस कसें फसविलें, हें त्यांस कळून आलें; व द्रोह, विश्वासघात, असा चोहींकडे एकच हाहाकार उडाला. माझीनी म्हणतो 'लोकांनीं मजकडे पुष्कळ वेळां बोलणें लाविलें होतें कीं, तत्पुरत्या सरकाराचा पाडाव करून त्या स्थानीं दुसऱ्या लोकांची योजना करून देशाचा बचाव करावा. ही गोष्ट सहज करितां आली असती; पण तसें

करून उपयोग काय? मिलनमधील राज्यव्यवस्थेंत एकदम फेरफार केला असता, तर लोकांची आपसांत यादवी माजली असती; व आस्त्रियापासून देशाचा बचाव करणें एकीकडेच राहून प्रजासत्तापक्षाच्या नांवास मात्र कलंक लागला असता. कारण इतलींतील बाकीच्या लोकांस अद्याप खरी स्थिति माहिती नसून ते अंधारांत धडपडत होते. प्रजामतानें लॉंबर्डी प्रांत राजास मिळाला असल्यानें, प्रांतांत शांतता राहावी व आपली सत्ता कायम व्हावी म्हणून त्या देशांत सैन्य पाठविण्याचा अधिकार त्यास होता; त्यामुळें आमचेच देशबंधु तरवार उपसून आमच्याशीं भिडावयास आले असते, आणि ह्या त्यांच्या भांडणांत आस्त्रियाचें मात्र पिकलें असतें. ह्या कारणांमुळें मी लोकांच्या म्हणण्यास रुकार देण्याचें साफ नाकारिलें; आणि एवढेंच करून थांबलों नाहीं, तर तसला प्रयत्न लोकांसही करूं दिला नाहीं. लढाईचा शेंवट काय व्हावयाचा आहे, तो दिसतच होता. आम्हांस पूर्वींच दुःस्वप्न पडलें होतें कीं, राजाच्या सैन्याचा मोड होऊन देशास कोणीही त्राता राहणार नाहीं. पुढें ज्या गोष्टी घडून आल्या व ज्या टाळणें मानवी शक्तीच्या बाहेरचें काम होतें, त्यांचें भाकीत करून ठेवण्यास त्रिकाळज्ञान किंवा दिव्य चक्षूंची गरज नव्हती.'

ह्यानंतर राजानें मिलन शहराशीं विश्वासघात केला, तो सांगत बसण्यास मला अवकाश नाहीं. आस्त्रियानें राजाच्या सैन्याची जिकडे तिकडे दुर्दशा उडविली; व त्या सैन्यापैकीं कांहीं लोकांनीं मिलनकडे माघार घेतली, असें म्हणण्यापेक्षां त्यांनीं मिलनकडे पळ काढिला, हें म्हणणेंच अधिक सत्यास धरून होईल. नेमस्तांस देखील नंतर आपली चुकी उमजून आली; पण त्यावेळीं कांहीं उपाय राहिला नव्हता. माझीनी प्रथम खरी गोष्ट उघडकीस आणीत होता, तेव्हां तो आस्त्रियाशीं मिलाफी आहे, अशी त्याची टर नेमस्त करीत असत; परंतु जेव्हां निकराची वेळ येऊन ठेपली, तेव्हां तेच त्याजकडे सल्लामसलत विचारण्यास व मदत मागण्यास गेले. माझीनीनें लागलीच शहराचें रक्षण कसें करावें ह्याचा विचार करण्यासाठीं म्हणून एक कमिटी नेमिली. तो म्हणतो 'मला आशा होती कीं, आस्त्रियानें मिलनवर हल्ला केल्याबरोबर तटावरील लोकांच्या अंगांत भीमाचें बळ येईल, व लॉंबर्ड लोक आणि आस्त्रिया यांच्यामध्यें खरेंखुरें रण जुंपेल.' लोकांस आपल्या शहराचें रक्षण करतां यावें, म्हणून माझीनीनें आपल्या-

कडून होतील तितके प्रयत्न केले. आणीबाणीची वेळ येऊन ठेपली, तसें माझीनीचें पूर्ववत् लोकांवर वजन बसलें. तो म्हणतो 'ह्यावेळीं लोकांनीं जी कर्तबगारी दाखविली, तिजवरून लढाईचें काम राजानें आपल्या अंगावर घेतलें ही गोष्ट आणि नेमस्तांनीं योजिलेलें धोरण, हीं निव्वळ चुकीचीं होतीं असें म्हणावें लागतें.' लोकांच्या डोळ्यावरची आतां झोंप उडाली होती, आणि त्यांस आपली खरी स्थिति पुरतेपणीं कळून आली होती. त्यांनीं स्वसंरक्षणासाठीं हत्यारें तयार केलीं; व लढाईची वेळ अगदीं समीप येऊन ठेपली आहे, असें त्यांस कळून येतांच, ते आनंदानें तिची मार्गप्रतीक्षा करीत होते. इतक्यांत खबर आली कीं, शहराचें रक्षण करण्यासाठीं राजा चाळीस हजार फौज घेऊन येत आहे. तिजमुळें लोकांच्या उत्साहास अर्थात्च विरजण पडलें. राजा येण्याच्या पूर्वीं त्याचे प्रतिनिधी येऊन पोंचले. त्यांनीं लागलीच राज्यकारभार आपल्या हातीं घेतला; कारण लॉंबर्डी प्रांत पीमॉंतचे राज्यास जोडण्याचें मत लॉंबर्ड लोक देऊन चुकले होतेच. माझीनी म्हणतो 'मीं ह्या प्रतिनिधींस पाहिलें. त्यांच्या वाड्याच्या खिडक्याखालीं जमलेल्या लोकांस त्यांनीं जें कांहीं सांगितलें तें ऐकिलें. मिलन शहरच्या रस्त्यांतून फिरलों. लोकांचे चेहरे नीट न्याहाळून पाहिले. ते आपसांत जें बोलत असत, त्याचाही नीट विचार केला; आणि मी अगदीं निराश झालों. लोकांस वाटलें कीं, आतां आपणावरचें अरिष्ट टळलें. पण वास्तविक त्यांचा सर्वस्वीं घात झाला होता. तें शहर सोडून मला दुसरीकडे जावें लागलें; परंतु तेथून निघतेवेळीं जें मला दुःख झालें तें एक ईश्वरास माहीत आहे. गॅरिबाल्डीच्या सैन्याचा तळ बरगॅमो येथें होता, त्यास मी जाऊन मिळालों.'

ह्या काळच्या इतिहासावरून असें दिसून येतें कीं, चार्ल्स आल्बर्टनें, इतलीच्या शत्रूवर नव्हे, तर माझीनीमुळें इतलियन लोकांच्या मनांत जागृत झालेल्या राष्ट्रविषयक व प्रजासत्ताविषयक मतांवर हत्यार उचललें होतें.

राजानें राडेट्स्कीशीं तह केला होता. त्याचें एक कलम असें होतें कीं, मिलन शहर राडेट्स्कीच्या स्वाधीन करून द्यावें. असें असतांही दुसरे दिवशीं मिलनमध्यें प्रवेश करतेवेळीं राजानें लोकांस त्या शहराचें रक्षण करण्याचें वचन दिलें. वाड्यासमोर लोकांची गर्दी झाली, त्यावेळीं

त्यानें खिडकींत उभें राहून शपथ घेऊन पुन्हा लोकांस आश्वासन दिलें कीं, 'आमच्या व आमच्या पुत्राच्या कुडींत प्राण आहेत, तोंपर्यंत आम्ही लढूं.' तथापि त्याच दिवशीं रात्रीं त्यानें चोरवाटेनें मिलनमधून पळ काढिला, व तटावरील आपलें सैन्य उठवून घेऊन तें शहर आस्त्रियन लोकांस मोकळें करून दिलें. त्यांनीं लागलीच तें शहर आपल्या ताब्यांत घेतलें.

ह्यावेळीं लोकसत्तापक्षियांच्या स्वयंसिद्ध पलटणीच्या एका लहानशा तुकडीनिशीं गॅरिबाल्डी बरगॅमो येथें तळ देऊन होता. राजापाशीं अद्याप चाळीस हजार फौज होती, म्हणून तो आपलें दिलेलें वचन पाळून मिलन शहराचें रक्षण करील, असें गॅरिबाल्डीस वाटलें होतें. आस्त्रिया व राजाचें सैन्य ह्या उभयतांमध्यें मिलन येथें युद्ध झाल्यावर जी हालचाल करावी लागेल, त्या कामीं राजास मदत करण्यासाठीं म्हणून पुढें चाल करून जाण्याचा गॅरिबाल्डीनें मोठ्या हिय्यानें विचार केला. माझीनीनें आपल्या खांद्यावर एक बंदूक टाकिली, व कर्नल मेडिची नांवाच्या गृहस्थाच्या ताब्यांत जें स्वयंसिद्ध लोकांचें सैन्य होतें त्यास जाऊन तो मिळाला. त्यानें मेडिची यास विनंती केली कीं, आपल्या हाताखालच्या लोकांत मला नुसत्या शिपायाची जागा द्यावी. ह्याविषयीं मेडिची म्हणतो ' हा थोर व मातृवत्सल इतलीपुत्र आला, तेव्हां सर्वांनीं आनंदाचा एकच गजर करून त्याचें स्वागत केलें, व एकमतानें आपलें निशाण त्याच्या स्वाधीन केलें. ह्या निशाणावर **ईश्वर आणि लोक** अशीं अक्षरें लिहिलेलीं होतीं........ आमचा कूच फारच कंटाळवाणा होता. सर्वांस थकवा आला होता. पावसाची मुसळधार लागली होती, व आम्ही सर्व भिजून चिंब झालों होतों. माझीनीचें सर्व आयुष्य विद्याभ्यासंगांत गेलें होतें. लांब पल्ल्याच्या मजलीची दगदग सोसण्याचें त्याच्या अंगीं मुळींच सामर्थ्य नव्हतें. तथापि त्याच्या दृढनिश्चयानें आणि मनाच्या शांततेनें त्यास क्षणभरही सोडिलें नाहीं. ह्यास कदाचित दुखणेंबहाणें येईल अशी भीति वाटून, मागें राहण्याविषयीं त्याजपाशीं आम्हीं आपली पराकाष्ठा केली. परंतु मागें रहाण्याचें किंवा सैन्य सोडून जाण्याचें त्यानें साफ नाकारिलें. स्वतःची अशी स्थिति असतां, आमच्यापैकीं एका बाल वयाच्या देशभक्ताच्या अंगावर फक्त सुती कपडे होते. हींव आणि पाऊस ह्यांपासून त्याचा बचाव होत नाहीं

असें पाहून, माझीनीनें आपला झगा देऊन तो नको म्हणत असतां त्यास तो पांघरावयास लाविला. मोंझा येथें दाखल झाल्यावर मिलनच्या तहाची वातुक बातमी आमच्या कानावर आली; व आस्त्रियनांचा घोडेस्वारांचा एक मोठा रिसाला आमच्यावर पाठविण्यांत आला आहे, असेंही आम्हांस तेथें कळलें. ह्या फौजेशीं आपल्या थोड्या लोकांनिशीं तोंड देण्यांत कांहीं हंशील नाहीं, व्यर्थ आपला नाश मात्र होणार, असें जाणून गॅरिबाल्डीनें मोर्चा फिरविण्यास हुकूम दिला; व आपली तुकडी सुरक्षितपणें निघून जाईपर्यंत शत्रूस थोंपून धरून पिछाडी राखण्याचें काम त्यानें माझ्या तुकडीस सांगितलें. शत्रू आमच्यापेक्षां फारच प्रबळ होते; त्यांनीं आमचा एकसारखा पाठलाग केला. आम्ही काळाच्या दाढेंत पडतों कीं काय असें आम्हांस क्षणोक्षणीं वाटत होतें; तथापि माझ्या लोकांत यत्किंचितही चलविचल झाली नाहीं. ते फारच एकोप्यानें व जुटानें वागले; आणि त्यांनीं अखेरपर्यंत शत्रूस आडवून धरिलें. दृढनिश्चय, धैर्य आणि जिवाचा धडा, हे गुण फारच मोठ्या प्रमाणानें माझीनीच्या अंगीं वसत होते. ह्या कठीण आणि जिवावरच्या मजलींत ह्या गुणांनीं माझीनीस कधींही सोडिलें नाहीं, हें पाहून आमच्यामध्यें शूरांत शूर म्हणविणाऱ्यांसही कौतुक वाटलें. तो आमच्यांत असल्यानें त्याचे शब्द ऐकून आणि त्याचें शौर्य प्रत्यक्ष पाहून, आमच्या तरुण शिपायांस पाणी चढलें. ह्या संकटांत आपण माझीनीचे वांटेकरी आहोंत त्या गोष्टीचा त्यांस मोठा अभिमान वाटे. माझीनी हा एक अत्युत्तम मुत्सद्दी पुरुष होता; एवढेंच नव्हे, तर शौर्य आणि साहस हे शिपाईपेशाचे गुणही त्याच्या अंगीं वसत होते, ह्याची वरील गोष्ट चांगली साक्ष देते.' ( वरील अवतरण लिहिणारे गृहस्थ मेडिची हे हल्लीं राजाच्या नौकरींत सेनापती आहेत, व पालरमोचे गव्हर्नर असतांना सन १८७० सालीं त्यांनींच आपल्या पूर्वीच्या नायकास पकडून कैदेंत टाकिलें होतें ).

मिलनचा पाडाव झाल्यानंतर सर्व लॉबर्डी प्रांत शत्रूच्या स्वाधीन झाला; आणि शत्रूच्या पराक्रमास नव्हे तर त्याच्या मोठ्या संख्येस, गॅरिबॉल्डीच्या हाताखालील देशसेवकांचें सैन्य समरभूमीवर मानवी कर्तबगारीची सीमा करून अखेर हार गेलें. ह्यापैकीं माझीनी व त्यासारखेच दुसरे कितीएक निस्सीम देशभक्त ह्यांनीं डोंगरी मुलखांत बंडें उठविण्याचा प्रयत्न

केला; पण नेमस्तपक्षीय लोकांच्या कारस्थानांमुळें त्यांस यश आलें नाहीं. माझीनी म्हणतो ' नेमस्त स्वतः अगदीं मेषपात्र असून, दुसऱ्या कोणीं कांहीं हालचाल केली तर, ती मोडून काढीत असत. आम्हीं केलेल्या एकोप्यांत फाटाफूट करण्याकरितां त्यांचे अश्रांत परिश्रम चालले असून ते अजूनही (सन १८६१) जारी आहेत.' ह्यानंतर थोड्याच काळानें माझीनीनें स्विट्झर्लंडांत कांहीं लेख प्रसिद्ध केले. त्यांतील एक लेख इतलींतील तरुणांस उद्देशून लिहिला होता. लॅंबर्डीच्या पराजयाच्या नैतिक कारणांचें यथार्थ ज्ञान ह्या तरुणांस व्हावें, म्हणून लॅंबर्डीच्या लोकांनीं सरळ तत्त्वांस अनुसरून धोपट मार्गानें जावयाचे सोडून देऊन सद्यः इष्टकर काय आहे एवढेंच पाहिल्यानें, व दैव अनुकूळ होण्याची वाट पहात बसण्याच्या मार्गाचें अवलंबन केल्यानें, जे परिणाम घडून आले त्यांचा उहापोह ह्या लेखांत त्यानें केला होता. ह्या ग्रंथाच्या मुखपृष्ठावर युक्लिडमधील अर्थगौरवयुक्त असें पुढील वाक्य लिहिलें होतें 'दिलेल्या दोन बिंदूंस जोडणाऱ्या रेषांपैकीं सरळरेषा ही सर्वांहून कमी लांबीची असते—(अथवा ईप्सितकार्यसिद्धीस सरळ मार्गासारखा दुसरा जवळचा मार्ग नाहीं).' माझीनीनें क्रोधवश होऊन परंतु खिन्नतेनें इतलियन लोकांस बजाविलें कीं, 'राष्ट्रांची उन्नति खोटें बोलून होत नसते.'

माझीनी म्हणतो ' राजानें सुरू केलेल्या लढाईचा घातुक परिणाम जरी मला पूर्वीच कळून चुकला होता, तरी निराश झालेल्या माझ्या जिवास क्षणभर धीर देण्यास एक मात्र आशातंतु उरला होता. तो तंतु व्हेनिस होय. प्रजासत्तेचा झेंडा अद्याप व्हेनिसवर फडकत होता; म्हणून मला वाटलें कीं, भेकडपणा आणि स्वपक्षद्रोह ह्या जोडीनें लॅंबर्डीत आपल्या कर्तृत्वाची कमाल केल्यावर, सर्व लोकांची दृष्टि (तिजवर घातलेलें कपटपटल दूर झालें म्हणजे) ह्या निशाणाकडे लागेल; व व्हेनिस हें लढाईचें नवेंच मथक होऊन लोकांच्या लढाईचें अग्रेसरत्व व्हेनिसच्या लोकांकडे येईल. परंतु परकीय शत्रूपासून व्हेनिसचा बचाव करण्याचे कामीं सर्व आधार मॅनिन नांवाच्या गृहस्थावर होता. पीमाँतच्या राजानें आपण दिलेलीं वचनें गुंडाळून ठेवून शत्रूशीं तह केल्यानंतरही, आस्त्रियाशीं लढाई सुरू करण्यास व राज्यक्रांतीसारखें महत्वाचें काम हातीं घेण्यास

अवश्य असा जोम व उत्साह ह्या गृहस्थाच्या अंगीं मुळींच नव्हता. वर निर्दिष्ट केलेल्या तहाअन्वयें आस्त्रियनांनीं, विश्वासावर राहून फसलेल्या ह्या हतभागी शहरांत पुनः प्रवेश केला.

स्वकीयद्रोह आणि मूर्खपणा ह्या द्वयानें आपलें कर्तव्य फार चांगल्या रीतीनें बजाविलें व आतां लॉंबर्डीत कांहीं आशा उरली नाहीं, असें पाहून माझीनी फ्रान्सच्या रस्त्यानें तस्कनींत गेला.

तो म्हणतो 'आम्ही प्रजासत्तावादी पीमॉंतच्या राजाचे विश्वासूक दोस्त म्हणवीत होतों. परंतु त्या राजास जें इष्ट तेंच आम्हांसही इष्ट, व त्याची फौज तीच आमचीही फौज, असें आम्हीं कधींही म्हटलें नव्हतें. परकीय शत्रूंशीं लढाई करीत असतांना आपसांत दुफळी होऊन कामास हरकत येऊं नये, म्हणून आम्हीं आपल्या मताचा प्रसार करणें बंद ठेविलें. परंतु आमचें मत अगदीं सोडून देऊन विरुद्ध पक्षाचें मत आम्हांस मान्य आहे, असा कधींही उद्गार काढिला नव्हता. आम्ही लोकसत्ताकपक्षाचे आहोंत असें ज्यांनीं थोड्या काळापूर्वी शपथपूर्वक सांगितलें होतें, त्याचलो-कांपैकीं आज किती लोक राजनिष्ठ म्हणवीत आहेत, हें माझ्या लक्षांत आहे. ह्या लोकांच्या मतांत खरोखर बदल झाल्यानें ही राजनिष्ठा आली आहे असें नव्हे, तर हा प्रकार डावपेंचाचा आहे असे ते म्हणतात; पण सर्व मतांचा अभाव हें त्याचें खरें कारण आहे असें मला वाटतें, कारण ह्या डावपेंचास शेंडा किंवा बुडूख कांहींच दिसत नाहीं. थोड्या वर्षांपूर्वी ज्यांनीं राजसंस्थेविरुद्ध ओरड चालविली होती, त्यांनींच आतां ती संस्था कांहींएक अट न लावितां पत्करून, देश आणि त्याचें भावी कल्याण, ह्या दोहोंसही त्या बयेच्या ओटींत घातलें. त्यांचे डावपेंच आणि नीतीचा मासला पाहून सामान्य लोक अनीतिमान होतात, किंवा त्याहूनही किंबहुना भयंकर असा अविश्वास त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न होतो.

'सन १८४८ सालीं थोडेसे लोक लोकसत्तापक्षास धरून राहिले होते. त्यांनीं आपल्या आचरणानें लोकमत (मग तें चुकीचें कां असेना) शि-रसा मान्य आहे असें दाखवून दिलें होतें, व आज घटकेसही त्यांचें आचरण तसेंच शुद्ध आणि निष्कलंक आहे. मी या गोष्टीवर जोर देत

आहे तो अशासाठीं कीं, त्यावेळीं आमच्या पक्षावर झालेल्या निंदेच्या वर्षावामुळें लोकांची दृष्टि अद्यापिही कलुषित झालेली आहे; व इतलीमध्यें झोटिंग बादशाही सुरू होऊन शत्रूंशीं लढतांना आलेल्या अपयशाचें खापर ते आमच्या माथीं फोडीत आहेत; आणि हा सर्व प्रकार 'आमच्या अविचारी प्रजासत्तामताच्या बोकाळण्यानें घडून आला, असें ते म्हणत आहेत.'

इतलीमध्यें बेबंद बादशाहीचें बीजारोपण कोणीं केलें, हें वर दिलेल्या थोडक्याशा इतिहासावरून देखील व्यक्त होईल. नेमस्तपक्षरूपी विषवल्लीचा प्रसार सर्व देशभर मोठ्या झपाट्यानें सुरू झाला; त्यामुळें इतली देशाच्या एकीचे आणि स्वातंत्र्याचे जे अंतस्थ शत्रू त्यांच्याशीं झुंजण्यासाठीं माझीनीस ह्यावेळीं जी कमर बांधावी लागली, ती यावज्जीव सुटली नाहीं. पूर्वीं त्यानें परदेशस्थ शत्रूंशीं लढाई केली, ती ह्या झुंजीपुढें कांहींच नव्हे असें म्हणावें लागतें. सन १८४८–४९ सालीं इतलियन लोकांच्या अंगीं नीति व उत्साह हीं वसत होतीं, त्यांचा दिवसेंदिवस ऱ्हास होत चालला आहे. माझीनीनें त्यांस सरळ व चांगल्या मार्गास लावून स्वातंत्र्याची प्राप्ति करून दिली असती, व सामाजिक आणि राजकीय बंधनांपासून मुक्त करून मोठ्या योग्यतेस चढाविलें असतें; परंतु राजसंस्था आणि तिचें ऐश्वर्य ह्यांनीं इतलीच्या नीतिवर पाणी ओतलें आहे. तथापि सर्व सुखांचा आणि कल्याणांचा बीजभूत असा एक धडा इतलियन लोक माझीनीपासून शिकले; तो हा कीं—ईश्वरानें ज्या भूमींत आपणांस जन्मास घातलें तिचें स्वातंत्र्य कायम राखून तिजवर परकियांचा पगडा बसूं न देणें, हा सर्व लोकांचा हक्क आहे; एवढेंच नव्हे तर हेंच त्यांचें पहिलें कर्तव्य होय. इतली देशाविषयीं माझीनीनें लोकांच्या मनांत मातृवात्सल्य व पूज्यबुद्धि हीं जागृत केलीं, ह्यामुळें परकियांचा जुलूम व देशबांधवांचा रक्तपात ह्या दोन्ही अरिष्टांतून तें टळलें. ह्याच दोन गोष्टींनीं फ्रान्स देशास उद्ध्वस्त करून धुळीस मिळविलें आहे. माझीनीच्या लोकसत्तामतास आधारभूत अशीं जीं तत्त्वें, त्यांचा भावी पिढ्यांचे लोक मोठ्या आदरानें संग्रह करून ठेवतील, आणि तो संग्रह आपल्या देशाचा एक मोठा ठेवा आहे असें समजतील. लोकसत्ता होण्यास किती अवधि लागेल हें सांगवत

नाहीं; परंतु ती झालीच पाहिजे ही गोष्ट निर्विवाद आहे. ती घडवून आणण्यास माझीनीनें यावज्जीव आपली काया, वाचा आणि मन हीं अर्पण केलीं होतीं. पुढें त्याचें शरीर अगदीं थकलें होतें; परंतु त्याची कर्तव्यपरता तिळमात्र ढळली नव्हती. सन १८७२ सालीं मृत्यूनें त्यास इहलोकांतून सोडवीपर्यंत त्याचा तो क्रम तसाच अव्याहत सुरू होता.

---

# भाग ५.

## रोम येथील प्रजासत्ताक राज्य.

### पुन्हा बंडें उद्भवतात–फ्रान्स देशाशीं लढाई–सिसिलीमध्यें बंड.

### सन १८४९–१८५९

लॉंबर्डी वगैरे ठिकाणीं घडून आलेल्या गोष्टींमुळें पोपच्या प्रजेमध्यें राष्ट्रीय विचारांची चळवळ सुरू झाली, तीस भिऊन जासुदाच्या वेषानें पोप महाराजांनीं रोम शहरामधून पलायन केलें. रोम आपलें स्वतःचें राज्य चालविण्यास मोकळें झालें. व्हेनिस पुष्कळ दिवस शत्रूस दाद देणार नाहीं, असा सुमार दिसत होता. तस्कनी संस्थानचे अधिपति ग्रांड-ड्यूक ह्यांनींही पोबारा केला, आणि त्यामुळें त्या प्रांतांत रक्तपात न होतां अनायासेंच राज्यक्रांति झाली. मिलन शहर शत्रूच्या स्वाधीन केल्यामुळें राजसंस्थेस मोठी काळिमा लागली. लोकांचीं मनें अस्वस्थ होऊन जिकडे तिकडे चळवळ होऊन राहिली होती. माझीनीस वाटलें कीं, ह्या संधीस (आणि नेपल्स पुन्हा राजाच्या वशांत जाण्याच्या आधीं) जर रोम येथील मंत्रिमंडळानें प्रजासत्ता ह्या शब्दाचा गजर केला, तर सर्व इतलियन लोकांचीं मनें एकवटून एकमेकांकडे ओढ घेतील. पण बंधांतून नुकताच मुक्त झालेल्या कैद्याप्रमाणें रोमनमंडळीची अवस्था झाली. त्यांच्यानें पुढें पाऊलच टाकवेना. ते मागेंपुढें करूं लागले, तोंडावरून हात फिरवून समाधानाच्या गोष्टी बोलूं लागले, व पोपची सल्ला मिळविण्याकरितां त्याजकडे लोक पाठवूं लागले. नवीनच स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर माझीनीनें लिहिल्याप्रमाणें त्यांची दशा झाली. तो म्हणतो 'ह्यांची दशा पाहून तिरस्कार येई व दुःखही होई. माझ्याशिवाय

तुमचा कोणी शास्ता नाहीं, आणि माझे नियम लोकांच्या इच्छेच्या द्वारें मात्र समजावयाचे आहेत.' असें ईश्वरानें आजच्यासारखें स्पष्टपणानें कधींच दाखवून दिलें नव्हतें. आमचे सर्व राजे प्रजाद्रोही असून अकलेचा त्यांस विटाळ नाहीं, ही ईश्वराची आह्मांवर मोठी दया आहे. तथापि आपल्या देशाचा उद्धार राजांच्याच द्वारें करावयाचा, असा आह्मी हट्ट धरून बसलों आहों.' माझिनीनें रोम येथील मंत्र्यांस हेंही सुचविलें कीं, पोप आपण होऊन पळाला आहे. रोमन लोकांस स्वातंत्र्य मिळाल्यावर ते राज्यकारभाराच्या बाबतींत प्रथम कोणतीं कृत्यें करितात, ह्यासंबंधानें आपणास जी काळजी लागली आहे, ती तेथें प्रजासत्ता स्थापावी ह्मणून, असें मुळींच नाहीं; परंतु इताली देशाची एकी व्हावी एवढ्यासाठीं आहे. सर्व इतालीचें मत कळल्यानंतर प्रजासत्तेची स्थापना व्हावयाची असेल तेव्हां होईल, व तो सुदिन येईपावेतों आपण अनन्य बुद्धीनें व दृढनिश्चयानें वाट पहात बसणार आहों. पोप पळाला याचा अर्थ त्यानें राज्यावरील हक्क सोडून दिला हा होय. पोप हा वंशपरंपरेचा राजा नसून पसंत केलेला राजा आहे. त्याच्यामागें त्याचे कोणी वारस राहत नाहींत. रोममध्यें हल्लीं दुसऱ्या कोणाचीही सत्ता नसून लोकांची मात्र आहे. सबब हल्लीं तें वास्तविक लोकसत्ताक राज्यच आहे. परंतु देशाची कायमची राज्यव्यवस्था कशी करावयाची, हें ठरविण्याकरितां देशाच्या स्थितीकडे पाहून, सवड सांपडेल तेव्हां सर्व प्रांतांतर्फे प्रतिनिधी बोलावून त्यांची सभा भरविण्यास तें बांधलें गेलें आहे.

अखेर रोम येथील पार्लमेन्ट सभेस आपली योग्यता आणि अधिकार काय आहेत हें कळून आलें. तारीख ९ फेब्रुवारी सन १८४९ रोजीं तिनें रोम येथें लोकसत्तेची स्थापना केली. माझिनीस रोम येथील पौरत्वाचा हक्क मिळाल्यानें आणि ह्या सभेचा सभासद निवडला गेल्यामुळें तोही रोम येथें जाण्यास त्वरा करून निघाला. जातांनां तो टस्कनी प्रांतावरून गेला. टस्कन लोकांच्यानें एकटें राहून आपलें स्वातंत्र्य संभाळवणार नाहीं, हें त्यास पक्कें माहीत होतें. सबब त्यानें तेथील तात्पुरत्या सरकारास, टस्कनी रोमशीं जोडून देऊन इताली देशाची एकी करण्याची

सुरुवात केल्याचें श्रेय घेण्यास अति आग्रहानें सांगितलें. लोकांच्या मनांत ती गोष्ट लागलीच भरली, व त्यांनीं लोकसत्तेची स्थापना करून टस्कनी प्रांत रोमशीं जोडण्याविषयीं आपलें मत दिलें. परंतु तेथल्या सरकारानें लोकांच्या अभिप्रायाप्रमाणें चालण्याचें नाकारिलें. असें झाल्यावर माझीनी तेथून रोम शहरास जाण्यास निघाला.

ह्या पवित्र शहरांत पाय ठेवते वेळीं त्याच्या मनाची जी स्थिति झाली तिजविषयीं तो ह्मणतो—मी अगदीं लहान असतां माझ्या मनांत रोम शहराविषयीं विलक्षण तरंग येत असत; तें माझ्या सर्व विचारांचें बीज होतें. संध्याकाळीं ह्या शहरांत प्रवेश करितांनां माझ्या मनांत विलक्षण नम्र बुद्धि उत्पन्न होऊन एखाद्या महातीर्थाच्या ठिकाणीं मी जातों आहें कीं काय अशी माझ्या मनाची स्थिति झाली.

रोम शहर मला मनुष्य जातीच्या उत्कर्षाचें आदिस्थान वाटत असे. आणि हल्लीं जरी तें नीच स्थितीस येऊन ठेपलें आहे, तथापि त्याचेविषयीं माझी तीच बुद्धि कायम आहे. धर्मक्रांति तिसऱ्यानें होऊन युरोपखंडाचें नैतिक व धार्मिक ऐक्य कधींकाळीं पुन्हां रोम शहरापासूनच होणार आहे.

लांबर्डीचा पराभव झाला होता, टस्कनीमध्यें मला नुकतीच ठेंच लागली होती, व सर्व इतालीभर आमचा लोकसत्ताक पक्ष विस्कळीत झाला होता. ह्यामुळें रोम शहरास जात असतां माझ्या अंगांत हिम्मत मुळींच नव्हती. अशी स्थिति असतांही पुरद्वारांत शिरतांनां माझ्या अंगावर थरारून रोमांच उभे राहिले, व मला नवा दम आल्यासारखें झालें. पुन्हां रोम शहराचें दर्शन होण्याची मला आशा नाहीं, परंतु मृत्यूच्या द्वारीं बसून ईश्वराचें आणि माझ्या प्रियकराचें स्मरण करीत असतां, रोम शहराविषयींचा विचार माझ्या मनांतून जाणार नाहीं. हीं हाडें कोठेंही मातीस मिळण्याचें नशीबीं लिहिलेलें असो, परंतु इतालीच्या एकीचा दर्शक असा प्रजासत्तेचा बावटा जेव्हां पोपचा मठ आणि क्यापिटॉल ह्यांवर उभारला जाईल, तेव्हां पुरद्वारांत शिरतांनां जो मला आनंद उचंबळून आला होता तोच ह्या देशास एकदां पुन्हां येईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय



इतालीमध्यें प्रजासत्तेचा जन्म होतो आहे, तोंच फ्रान्सानें निर्लज्जपणानें तीस रक्ताच्या पुरांत बुडवून टाकिलें. तत्रापि त्या वेळच्या वर्तमानपत्रांतून ह्या अल्पायुषी प्रजासत्ताक राज्याची जी थोडीशी हकीकत दिली होती, तेवढीवरून देखील त्याच्या योग्यतेची इंग्रज लोकांस चांगली माहिती झाली आहे. धर्माधिकाऱ्यांच्या नित्य जुलमी अंमलाखालीं रोमन लोक अगदीं पायमल्ल झाले होते, तथापि प्रजासत्ताक राज्य स्थापन झाल्यानंतर त्यांनीं देशभक्ति आणि शिपाईगिरी ह्या दोन गुणांची कमाल करून दाखविली होती, ही गोष्ट आबालवृद्धांस माहीत आहे. तशांतही, इतालीप्रीत्यर्थ ज्यानें आपल्या सर्वस्वाची आहुती दिली होती, एकनिष्ठतेचा जो केवळ अवतारच होता, रोमन लोकांच्या ठिकाणीं ज्याचें मोठें प्रेम, दृढ भक्ति, व पूर्ण विश्वास, अशा माझिनीच्या चरित्रांतील ह्या मनोवेधक भागाचें वर्णन करीत बसण्याचें माझें काम नाहीं. त्याच्या निंदकांसही तें कबूल करणें भाग पडत आहे.

ह्या पुरुषाच्या हातून घडलेल्या कृत्यांवरून, इतिहास लिहिण्याचा नव्हे, पण तो कशा प्रकारचा मनुष्य होता, हें दाखवून देण्याचा माझा हेतु आहे. उंच टेकडीवर जाळ केला ह्मणजे तो कोणासही दिसत नाहीं असें नाहीं. ह्मणून माझिनीचीं मतें अंमलांत आल्यावर त्यांच्या सत्यत्वाची खात्री पटून त्यांस जें मोठें यश प्राप्त झालें, त्यासंबंधानें कांहीं न लिहितां मी पुढें चालतों. कारण रोम शहराचा मोड होऊन त्या पवित्र शहरास राजसंस्थेचा विटाळ लागल्यानंतर देशोधडीस लागलेल्या त्याच्या ( प्रजासत्ता चालू असतांच्या ) तीन प्रधानांपैकीं एकानें ( माझिनीनें ) केलेल्या महान सायासांची कित्येकांस माहिती नाहीं ती थोडीशी करून दिली पाहिजे.

स्वतंत्र झालेल्या संस्थानाचें पहिलें कर्तव्य, दुसऱ्या संस्थानांस स्वतंत्र होण्यास मदत करणें हें होय, असें माझीनी समजत होता. ह्मणून प्रथमतः तो आस्ट्रियाशीं लढाई करण्याच्या तयारीस लागला. आस्ट्रियानें नुक्ताच लांबर्डीवर मोठा जय मिळवून तीस पादाक्रांत करून टाकिलें होतें, व माझिनीस वाटत होतें कीं, आस्ट्रिया रोम शहरावरही हल्ला

केल्याशिवाय राहणार नाहीं. तो ह्मणतो, 'अद्यापि आस्ट्रियानें रोमवर हल्ला केला नाहीं. तथापि आस्ट्रियावर हल्ला करण्याची तयारी करणें हें आमचें काम होतें. आपणांस प्रजासत्ताक राज्य हवें आहे, असें प्रसिद्धपणें सांगण्यास राजास हिंय्या नव्हता ह्मणा, किंवा इच्छा नव्हती; सबब आपणांस प्रजासत्ता हवी आहे, असें दाखविण्यासाठीं हातानें कांहीं तरी कृत्य करून इताली देश स्वतंत्र केल्याशिवाय प्रजासत्तेकडे लोकांचीं मनें वळावयाचीं नाहींत असा माझा समज होता.' ह्या हेतूनें माझिनीनें पार्लमेन्टपुढें अशी सूचना आणिली कीं लढाईखात्याची एक मंडळी नेमावी, व तिनें प्रसंगोपात्त हल्ला करण्याची किंवा स्वसंरक्षण करण्याची तयारी करावी. सभेनें असा ठराव केला कीं, सैन्याची संख्या वाढवून ती ४९००० करावी. माझिनीनें भविष्य केलें होतें कीं, स्वयंसेवक लष्कर आपणांस मदत करील, तें खरें ठरलें. कारण दुसऱ्या प्रांतांतून हजारों लोकांनीं रोम शहराकडे धांव घेतली. ह्या छोटेखानी प्रजासत्ताक राज्यानें लढाईची कडेकोट तयारी चालविलेली पाहून, चार्ल्स आल्बर्ट राजास आपली गेलेली लोकप्रियता मिळविण्यासाठीं खुद्द आस्ट्रियाशीं पुन्हां लढाई करावी लागली. परंतु नेव्हारा येथील सर्वथा लाजिरवाणा पराजय झाल्यानंतर त्या विरोधाचा लवकरच अंत झाला. हिजमध्यें राजाच्या सैन्यास इतक्या उघड रीतीनें लबाडी करून बळी देण्यांत आलें कीं, लोकांच्या अंगाचा अगदीं तिळपापड झाला, तो इतका कीं, तो शमविण्यासाठीं राजास एक युक्ति योजावी लागली. ह्या युक्तीचा राजे लोक नेहमीं उपयोग करीत असतात. लष्ठ पाहून सुळीं द्यावयाचा, ह्या न्यायानें ह्या लढाईंत जे सेनानाईक होते, त्यांतून एकास पुढें करण्यांत आलें, व त्यास राजद्रोही ठरवून गोळी घालवून राजानें ठार मारविलें. परंतु लोकांच्या मतें हा माणूस गुन्हेगार नसल्यानें त्यांनीं त्या पराजयाचें खापर राजाच्या डोक्यावर फोडिलें. ह्यानंतर लवकरच चार्ल्स आल्बर्ट यानें गादीवरचा हक्क सोडून दिला, व त्याचा पुत्र व्हिक्टर इम्यान्युअल हा

तख्तनशीन झाला. आस्ट्रियास हा नवा जय मिळाल्याची बातमी मिळाल्यावर रोम येथील सभेनें एक कायदा पसार केला आणि त्याअन्वयें सर्व चालकसत्ता तीन नगरवाशांच्या हातीं दिली. ह्या त्रिपुरुषात्मक राजसंस्थेचा माझीनी मुख्य होता. आपल्या सैन्याची व्यवस्था लावण्यास रोम येथील प्रजासत्ताक राज्यास पुरता एक महिनाही मिळाला नाहीं, तोंच लुई नेपोलियन ह्यानें त्या प्रजासत्ताक राज्याची राखरांगोळी करण्यासाठीं एक फ्रेंच सैन्य पाठविलें. रोमचें बंदर सिव्हि-टा–व्हिकाया येथें फ्रेंच सैन्य येऊन थडकल्याची बातमी लागल्याबरोबर रोम येथील सभेनें त्यास शरण न जाण्याचा निश्चय केला. ही गोष्ट तीस फारच भूषणावह होती. सभेस असा सल्ला देण्याचीं पुष्कळ कारणें होतीं. परंतु माझीनी ह्मणतो, 'मुख्य कारण व ज्यांत माझ्या जन्माचें सार्थक होतें तें, आमच्या राष्ट्राच्या ऐक्याचा पाया घालणें हें होय. ह्या ऐक्याचें मथक रोम होतें, आणि त्या शहराकडे माझ्या देशबांधवांची दृष्टी ओढणें व त्याजविषयीं त्यांच्या मनांत पूज्यबुद्धी उत्पन्न करणें हें फार महत्त्वाचें होतें.'

परंतु माझिनीशिवाय दुसऱ्या कोणासही असा भरंवसा नव्हता कीं, फ्रान्ससारख्या बलाढ्य राष्ट्रापुढें रोमशहराचा टिकाव लागेल. माझीनी ह्मणतो कीं, शत्रूस तोंड द्यावें किंवा कसें हा प्रश्न जेव्हां प्रथम उभा राहिला तेव्हां न्याशनल गार्डस् ( राष्ट्ररक्षक ) सैन्याच्या मुख्य अधिकाऱ्यांनीं दिलगीर होऊन मला सांगितलें कीं, सैन्याचा मोठा भाग शहराचें रक्षण करण्याचें नाकबूल करील. तो ह्मणातो–' मला वाटलें कीं रोमन लोकांचा स्वभाव त्यांच्यापेक्षां मला विशेष माहीत आहे; ह्मणून मीं हुकूम दिला कीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं सर्व पलटणींनीं सभागृहासमोर गोळा व्हावें, कीं ही गोष्ट त्यांस विचारण्यांत येईल. दुसरे दिवशीं त्याप्रमाणें हा प्रश्न विचा-रला मात्र, तोंच ' लढाई ' ' लढाई ' ह्मणून जी चहूंकडे आरोळी उठली तीबरोबर अधिकाऱ्यांच्या मनांतील भीति व शंका ह्यांनीं आपला रस्ता सुधारला.

लुई नेपोलियनच्या सैन्यानें रोमशहरास जो वेढा घातला होता, त्याचा इतिहास येथें देण्यास अवकाश नाहीं. लुई हा त्या वेळीं फ्रेंच प्रजासत्ताक राज्याचा अध्यक्ष होता; परंतु स्वतःच्या देशामध्यें बादशाही अम्मल स्थापण्याचा मूळचा त्याचा विचार असून त्यास दोन कार्यें साधून घ्यावयाचीं होतीं; एक लोकसत्ताक राज्याशीं लढण्याची आपल्या शिपायांस संवय लावणें, व दुसरें क्याथोलिक धर्मोपदेशक मंडळी, व तद्धर्मानुयायी आपली फ्रेंच प्रजा, ह्यांचीं मनें आपल्याकडे वळवून घेणें. रोमन लोकांनीं लोकसत्तेची स्थापना करून सर्व युरोपास जो सुरेख कित्ता घालून दिला होता, तो युरोपांतील राजांस बरा वाटत नसून त्यांच्या डोळ्यांत सलत होता. तेव्हां अर्थातच त्यांनीं आपल्यापैकीं अत्यंत नीच व जुलमी अशा राजास ( लुईस ) मदत देऊन रोमशहरावर गोळ्यांचा मारा करून तें काबीज करूं दिलें; व रोमन लोकांच्या रक्तप्रेतांचें नवें सिंहासन उभारून त्यावर ह्या स्वकल्पित लांकूडफोड्या आचार्यबोवांची ( पोपाची ) प्राणप्रतिष्ठा करूं दिली.

दोन महिने वेढा पडला होता. ह्या मुदतींत इतालियन लोकांनीं शौर्याची सीमा करून दाखविली. रोमच्या आजूबाजूच्या टेंकड्या फ्रेंच लोकांच्या हस्तगत झाल्या ; व त्यांवर तोफांचे मोर्चे बांधून रोमशहराचा नाश करण्याचें त्यांस साधन झालें. सभेनें ठराव केला कीं, शत्रूस ह्यापुढें अटकाव करणें अशक्य असल्यानें आतां शहराचें संरक्षण करणें एकीकडे ठेवावें व अधिकृत त्रयीनें फ्रेंच सेनापतीशीं तहाचें बोलणें लावावें. माझिनीनें ही गोष्ट नाकारिली, व—प्रजासत्ताक राज्याचें रक्षण करण्यासाठीं मला नेमण्यांत आलें होतें, रसातलास पोंचविण्यासाठीं नव्हे—असा जाब देऊन त्यानें आपल्या जागेचा राजीनामा पाठविला. त्याच्या दोघां सहाधिकाऱ्यांनींही तोच रस्ता धरिला.

यद्यपि सभेस रोमचें संरक्षण करणें अशक्य वाटलें होतें तथापि लोकांनीं अजून आशा सोडिली नव्हती, ह्या गोष्टीचा लेखी दाखला राहावा म्हणून माझिनीनें आपली तक्रार एका पत्रांत लिहून तें पत्र सभेकडे पाठविलें.

त्यांतील विचार फारच उदात्त आहेत. तो ह्मणतो—'ईश्वर आणि लोक ह्या दोघांच्याही आज्ञेनें तुमचें असें ठाम कर्तव्य होऊन बसलें आहे कीं, कसेंही होवो परंतु परकीयांच्या जुलमास आड येऊन त्याचा प्रतिकार करावयाचा, व आपल्या कर्तबगारीनें असें दाखवून द्यावयाचें कीं न्याय आणि अन्याय ह्या दोघांचा कधींही समेट व्हावयाचा नाहीं. अविनाशी असा जो लोकांचा स्वातंत्र्यहक्क त्यापुढें 'बळी तो कान पिळी' ह्या तत्वाची डाळ शिजत नाहीं, व अशा रीतीनें वागून रोमची सभा ह्मणजे जी साक्षात् स्वतंत्रतेचा अवतार तिचा बोज आणि मर्यादा ह्यांचें रक्षण करावयाचें, व असेंही दाखवून द्यावयाचें कीं, राजसंस्थेंत एकल्या राजाच्या बऱ्यावाइटाचा मात्र विचार असल्यानें राजे लोक शरण जावोत किंवा तह करोत, परंतु लोकसत्ता ही एक ईश्वरनिर्मित संस्था आहे, तिला धक्का न लागूं देणें हें व्यक्तिमात्राचें कर्तव्य असल्यानें प्रजासत्ताक राज्यांत तह करणें किंवा शरण जाणें हे शब्द माहीतच नसतात; परंतु त्यांच्यावर जुलूम झाला असतां ते 'अन्याय' असा कंठशोष करीत आपल्या प्राणांच्या आहुती देतात.

त्यानें दाखवून दिलें कीं, लोक अद्याप शहराचें रक्षण करण्यास उत्सुक आहेत; परंतु सभेनें रक्षण होणें 'अशक्य' आहे, असें ठरवून त्या कम्बरमोडया 'अशक्य' शब्दाच्या उच्चारण्यानें मात्र खरोखर तें अशक्य करून सोडिलें आहे. त्यानें सभेस अशी सूचना केली कीं, फ्रेंच लोकांस शहरांत शिरूं देणें ह्मणजे सभेनें आपल्या हातानें प्रजासत्ताक राज्याचा बीमोड करण्याचा ठराव करण्यासारखें होय. त्याचे शेवटचे शब्द असे होते:—

'ह्या अत्यंत महत्वाच्या आणि आणीबाणीच्या वेळीं नशीबास एकीकडे झुगारून देऊन आपल्या निश्चयाचें आणि कर्तबगारीचें बळ दाखवण्याचें सोडून देऊन तुह्मी हातीं धरलेल्या कार्याचा अज्ञानानें त्याग करीत आहां. सर्व इतालियन लोकांच्या मनांत रुजलेल्या व रोम शहरामध्यें रंगारूपास आलेल्या राष्ट्रत्वाच्या अंकुराचे बुडीं तुह्मी घाव घालीत आहां.

........ लोकांचा प्रतिनिधी ह्या नात्यानें तुह्मांस, लोकांस, आणि त्या सर्वसाक्षी परमेश्वरास साक्षी ठेवून मी सांगतों कीं, हें तुमचें करणें अत्यंत निंद्य आहे."

फ्रेंच लोक रोम शहरांत शिरल्यावर माझीनी एक आठवडाभर तेथें राहिला. ह्यावरून तो स्वतःच्या जिवाविषयीं कसा बेपर्वा असे हें चांगलें दिसून येतें. ह्या मुदतींत तो आपल्या मित्रासह रोम शहरांत भटकत असे. (हे मित्र हल्लीं परलोकवासी झाले आहेत.) आंतून त्याच्या मनाचा तिळ-पापड झाला होता, व एकदां शेवटचे हातपाय झाडण्याचा विचार त्याच्या मनांत एकसारखा घोळत होता. आपला कांहींएक अपराध नसतां एका प्रजासत्ताक राज्याच्या आज्ञेच्या मिषानें आपल्या प्रजासत्तेस धुळीस मिळविण्याकरितां आपणांवर चालून येऊन ज्यानें पशुवत् आचरण केलें त्यांची खेरी वंड करून कशी जिरवावी ह्या एका विचारामध्यें ह्या वेळीं तो रात्रंदिवस गढून राहिलेला असे.

हे सर्व बेत फसले; तथापि इतालींत राहण्यास माझिनीस दुसरेंही कारण होतें. रोम शहरास वेढा पडला असतां माझिनीनें लोकांवर फारच जुलूम करून त्यांस दे माय धरणी ठाय करण्यास लाविलें होतें, अशा प्रकारचा खोटाच गवगवा क्यायोलिकपंथी वर्तमानपत्रकारांनीं केला होता. त्यामुळें माझिनीस वाटत होतें कीं, आतां आपण रोम शहरामध्येंच राहावें व आपणावर कोणास सूड उगवावयाचा असेल त्यास, किंवा हल्लीं बळावलेल्या क्याथोलिक पक्षास आपल्या (माझिनीच्या) जिवाचा घात करून बक्षीस उपटावयाची इच्छा असेल तर त्यास स्वतःचे मनोगत पुरें करण्याची संधी आणून द्यावी. आणखी तो असें ह्मणतो कीं 'रोम शहर सोडून जाण्यास माझें मन घेईना. सभेचे सभासद काळ्या पाण्यावर गेले, शहराचा निःपात झाला, ह्या दुःखापुढें ज्यांस स्वतःचें शारीरिक दुःख गणतींत नाहीं अशा आमच्या जखमी झालेल्या व दवाखान्यांत पडलेल्या लोकांवर हल्ले झाले, धारातीर्थीं देह ठेविलेल्या आमच्या रणशूर लोकांचीं

नवीन उभारलेलीं थडगीं विदेशी शत्रूंनीं पायाखालीं तुडवून टाकून मोठा अधर्म केलो, ह्या सर्व गोष्टी पहात असतां, आपल्या प्राणप्रियेच्या मरणानें मनुष्याच्या मनाची जी स्थिति होते तशी माझ्या मनाची झाली होती. मला ठार मारण्याची किंवा कैद करण्याची जी संधी मीं आणून दिली होती, तिचा उपयोग क्याथोलिक भट्टांनीं किंवा फ्रेंच लोकांनीं कसा करून घेतला नाहीं हें मला अजून समजत नाहीं. ' देव आपल्यास पुढें बरे दिवस दाखवील; तेवढ्यासाठीं तुह्मी आपल्या जिवास जपा.' असें ह्मणून रोम शहर सोडून जाण्याविषयीं..........नीं मला कशी गळ घातली होती, तिचें मला पक्कें स्मरण आहे. पुढें विश्वासघात होणार आहे, माझे जुने मित्र मला सोडून जाणार आहेत, व मी तोंडघशीं पडणार आहें, ह्या गोष्टी जर मला अगोदर कळून आल्या असत्या, व मला जर आपमतलबी होतां आलें असतें, तर अशी गळ घालणारांस मीं उत्तर दिलें असतें कीं, " माझ्यावर जर तुमचें खरें प्रेम असेल तर रोम शहराबरोबरच माझें काळें होऊं द्या.' माझिनीची सगर्व पण अयोग्य नव्हे अशी आणखी एक उक्ति आहे कीं ' एखाद्या तत्वाचा अवलंब करून तें अंमलांत आणण्याचा ज्याचा दृढ निश्चय झाला आहे असा एखादा लहानसा लोकांचा समुदाय कां तयार होईना, त्याच्या हातून केवढालीं कार्यें घडतात, हें, दोन महिने शत्रूशीं लढून रोम शहरानें जें प्रशंसनीय उदाहरण घालून दिलें त्यावरून, व रोम शहराच्या भावी ऊर्जित दशेचा सूचक असा जो तत्संबंधी इतिहास त्यावरून निरंतर दिसून येईल.' संकटसमयीं लोकांनीं लोकोत्तर शौर्य, स्वसुखाविषयीं निरपेक्षपणा, व्यवस्था व सुयंत्रितपणा कसा दाखविला; लोक, सभा, व अधिकृतत्रयी, ह्यांचा एक जीव कसा होता; व परस्परांवर पूर्ण विश्वास असून काडीइतका दुजाभाव नसल्यानें ते एकमेकांस कसे पाठबळ देत होते; व त्यांच्या राज्यांत तुरुंग किंवा न्यायसभा ह्यांची कशी गरज राहिली नव्हती, ह्या गोष्टींविषयीं उल्लेख करून पुढें माझीनी ह्मणतो:—

' प्रजासत्ताक राज्य स्थापन करून लोकांच्या हातीं राजसत्ता आल्यामुळें त्यांच्या आंगचे नैसर्गिक उदात्त गुण विकास पावले. ' ईश आणि लोक ' ह्या महावाक्याचा आह्मीं स्वीकार केल्यानें प्रत्येक मनुष्याच्या अंतःकरणांत आपले हक्क कोणते ह्याविषयींची बुद्धि जागृत झाली. बहुजनसमाजावर आमचा आणि आमच्यावर त्यांचा पूर्ण आणि अकृत्रिम

विश्वास* बसला. ह्या सर्व गोष्टींमुळें वर लिहिलेली हकीकत घडून आली. आमच्या महाराजांजवळ पंचेचाळीस हजार शिपाई तयार होते, व प्रसंगोपात्त आणखी गरज लागल्यास सर्व पीडमाँट त्यांच्या ताब्यांत होता. तथापि आपली मुक्तता करून घेण्यास विश्वासघाताशिवाय त्यांस दुसरें साधन मिळालें नाहीं. हा लेख लिहीत असतां आंज मितीसही (१८६५) त महाराजांजवळ पांच लक्ष शिपाई जय्यत आहेत, (त्यांत स्वार, सर्व देशभर पसरलेलें राष्ट्ररक्षक नांवाचें सैन्य, व स्वयंसेवकांच्या पलटणी आहेत.) पैसा हवा तेवढा आहे, लढाईच्या सामानाची कडेकोट तयारी आहे, अडीच कोट इतालियन लोकांपैकीं एकूणएकाची अशी इच्छा आहे कीं, व्हेनिस आपल्याकडे स्वतंत्र असावें. असें असतांही इतालीच्या छातीवर तळ देऊन राहिलेल्या आस्ट्रियन लोकांच्या सैन्यावर चालून जाण्यास त्याचा हिय्या होत नाहीं.'

'१८४९ सालाची रोमन लोकांस आतां कशी काय आठवण आहे, हें मला माहीत नाहीं; परंतु रोमन आयांनीं जर आपलें कर्तव्य बजावलें असेल, व त्या वर्षीं लोकपक्षाच्या कार्यासाठीं रोम शहरचे जे बळी पडले त्यांजविषयीं त्यांनीं आपल्या मुलांच्या मनांत जर पूज्यबुद्धी उत्पन्न करून ठेविली असेल, तरुण व लोकप्रिय कवि गॉफ्रेडो मामेली कोठें ठार झाला, तीनशें लोकांनीं धरून ठेविलेल्या एका स्थळावर—आपणास जखम लागली असतांही—फक्त एकोणीस लो-

---

* लोकांच्या ठिकाणीं हें प्रेम आणि हा विश्वास उत्पन्न झाला त्याचें अंशतः हेंही कारण असेल कीं, लोकसत्तेचा केवळ प्राण असा जो माझीनी तो स्वतः तोंडानें ह्मणे त्याप्रमाणें लोकांशीं निस्सीम भ्रातृस्नेहानें वागत असे, व सदा प्रजेचें हित चिंतीत असे. तो क्विरिनलमध्यें एका लहानशा खोलींत राहत असे, आणि रोम शहरांतील रावापासून रंकापर्यंत तेथें कोणास केव्हांही मज्जाव नव्हता. दरबारांतील पहिल्या प्रतीच्या अधिकाऱ्यांस तेथें जाण्याची जी मुभा तीच एखाद्या मजुरास असे. सर्वांस सारखेंच 'या बसा' होई आणि सारखाच स्नेहयुक्त हस्तस्पर्श मिळे. अधिकृत त्रयीचा हा नायक एका दुसऱ्या प्रतीच्या पथिकाश्रमांत भोजन करीत असे, व त्याबद्दलचा त्याचा रोजचा खर्च दोन फ्रांक होता. त्याजपाशीं ऐषआरामाचा पदार्थ झटला ह्मणजे फक्त एक उत्तम पुष्पगुच्छ असे; परंतु तो रोज कोण आणून देत असे त्याचें नांव कळलेलें नाहीं.

कांनिशीं हल्ला करून मासीना कोठें पडला, शंभर फ्रेंच लोकांशीं फक्त वीस शिपाई बरोबर घेऊन लढत असतांही शत्रूस पाठ दाखविण्याचें साफ नाकारून डान्हेरियो आणि रायोरिनो ह्यांनीं आपले देह कोठें ठेविले, त्या जागा (ह्मणजे व्हिला कॉर्सिनाय, व्हिला व्हॅलेन्टिनाय, इल व्हॅसेलो, व्हिला पॅम्फीलाय वगैरे) जर त्यांनीं आपल्या मुलांस दाखविल्या असतील, फार काय सांगावें, पण शत्रूंशीं लढत असतां 'लोकसत्ता' ह्या महामंत्राचा घोष करीत मोठ्या आनंदानें आपले देह धारातीर्थी अर्पण करणाऱ्या देशभक्तांचें रक्त रोम शहराभोंवतीं असणाऱ्या सर्व दगडांवर पडलेलें आहे, ह्मणून तेथील प्रत्येक दगड एकेक महापूज्य स्मारक आहे, ही गोष्ट जर त्यांनीं आपल्या मुलांस समजावून दिली असेल, तर रोमच्या पुढल्या पिढीस राजसंस्थेचा विटाळ लागणार नाहीं; आणि लागलाच तर तो फार वेळ टिकणार नाहीं.'

अखेर जेव्हां माझिनीनें रोम शहर सोडिलें, त्या वेळीं त्याच्याजवळ परवाना किंवा दुसऱ्या कसल्याच कागदाचें पुरजें देखील नव्हतें. तो एका लहानशा आगबोटींतून मार्सेल्स शहरीं गेला. ह्या आगबोटीचा तांडेल एक कॉर्सिकन गृहस्थ होता. मार्सेल्स शहरीं माझिनीस पोंचविण्याचें जोखीम ह्या गृहस्थानें अंगावर घेतलें होतें. माझीनी ओळखला न जातां युक्तीनें मार्सेल्स शहरांत शिरून तेथून बाहेरही पडला; व शत्रूच्या देशामधून चालून जाऊन स्वित्झरलंड देशाचा त्यानें आश्रय केला. रोम शहर सोडण्यापूर्वी पुन्हां पादाक्रांत झालेल्या रोमन लोकांमध्यें व इतालींतील राष्ट्रीय पक्षांच्या लोकांमध्यें दळणवळण राहावें ह्मणून त्यानें एका प्रचंड गुप्त समाजाची स्थापना केली होती.*

ह्या समाजानें लोकांच्या मनांत प्रजासत्तेविषयींची आस्था फार वर्षे जागृत ठेविली. अखेरीस ह्या समाजाचे अग्रणी पकडले जाऊन कैदेंत पडले, व त्यांचा गुप्त छापखानाही जप्त झाला, तेव्हां रोमशीं दळणवळण

---

* ह्या समाजाचा मुख्य चालक बोलोना येथील गुसेप पेट्रोना नांवाचा गृहस्थ होता. रोम शहरांत वीस वर्षेपर्यंत बंदीवास भोगल्यावरही ह्या गृहस्थाची लोकसत्तेवरील निष्ठा व प्रेम हीं कमी झालीं नव्हतीं; व त्याची सुटका होतांच 'ला रोमा देल पोपोलो' नांवचें लोकसत्ताक मताचें प्रतिपादन करणारें वर्तमानपत्र प्रसिद्ध करण्याच्या उद्योगास माझिनीबरोबर हाही लागला.

ठेवण्याचें माझिनीचें शेवटलें साधन नाहींसें झालें. आतांपर्यंत माझिनीच्या मुसत्या नांवानें लोकांचीं मनें वळवितां येत असत तीं येईनातशीं झालीं, व लोकांस त्याची सल्लामसलतही मिळेनाशी झाली. पीडमॉन्टच्या राजाचे लोक शहरांत जाऊन त्यांनीं लोकांत खोट्याच गप्पा उठविल्या कीं आपले महाराज लोकपक्षास मदत करणार आहेत, व त्यांची शत्रूपासून सुटका करून त्यांस स्वातंत्र्य मिळवून देण्याकरितां ते घोर संग्राम करणार आहेत, तेव्हां आतां लोकांनीं स्वस्थ राहावें. आपण लढाई करणार अशीं हा छत्रपति ठग एकसारखीं वचनावर वचनें देत होता. आपला डाव साधण्याकरितां ह्मणून थोडींबहुत वर्षें गुलामगिरींत काढण्याचें ज्यांनीं पत्करिलें, त्या लोकांस त्या लज्जास्पद स्थितींत आणखी कांहीं दिवस स्वस्थ पडून राहण्यास सांगण्याची कांहीं जरूर नव्हती. निरुद्योगिता आणि स्वजनद्रोह हे जे दास्याचे स्वाभाविक परिणाम, त्यांत, भयानें ह्मणा किंवा आळसानें ह्मणा, रोमन लोक अगदीं चूर झाले होते. असें होतें तरी 'ज्यास स्वातंत्र्य मिळवावयाचें आहे त्यानें पहिला हात केला पाहिजे' हें तत्व आपल्या देशबंधूंस शिकविण्याचें माझिनीनें पत्करिलें असल्यामुळें त्या कामाचा त्यानें पिच्छा सोडिला नाहीं; पण त्यास आपल्या उद्योगाचें स्थळ मात्र बदलावें लागलें.

सन १८५२ साल संपतें आहे तोंच आपला उपदेश चांगला रुजून आतां जीव धरणार असें त्याला वाटूं लागलें. व्हेनिशियन लांबर्डीमध्यें आस्ट्रियन लोकांविरुद्ध केलेला एक कट उघडकीस आला. शत्रूंनीं कटवाल्यांचा सूडही खूप खरपूस घेतला. मँट्युआमध्यें कटाच्या तीन पुढाऱ्यांस फांशीं देण्यांत आलें. परंतु ह्या अपयशास बिलकुल न जुमानितां मिलनमधील मजूर लोकांनीं बराच मोठा जमाव करून त्याहीपेक्षां अधिक भयंकर कृत्य करण्याचें योजिलें होतें. कटांतल्या लोकांची संख्या कित्येक हजारांवर गेली, आणि त्यांनीं आपल्या शाखा लांबर्डीमधील सर्व शहरांत स्थापन केल्या. एवढें झाल्यानंतर त्यांनीं माझिनीपाशीं द्रव्याची आणि हत्यारांची मदत मागितली. तेव्हां कटवाल्यांचा बेत कसा काय आहे, व त्यांस यश मिळण्याचा कितपत संभव आहे, ह्याची पूर्ण माहिती मिळविण्यास त्यानें लष्करी खात्यापैकीं एक वाकबगार मनुष्य पाठविला. हा कट फारच कुशलतेनें रचिला होता, आणि त्याची बातमी कानाच्या

कोनासही कळली नव्हती. चौकशीकरितां गेलेल्या लष्करी गृहस्थानें त्या कटाविषयीं फारच अनुकूल अभिप्राय दिला. माझिनीनें त्यांस पैशाची कुमक केली; पण कट उघडकीस येण्याच्या भीतीनें हत्यारें देण्याचें नाकारून कटवाल्यांस त्यानें असें सुचविलें कीं, हिंमतबहादर लोकांच्या हातांत कट्यारी असल्या ह्मणजे पुरे. त्यांच्या जोरावर शत्रूपासूनच हत्यारें घेतां येतात, व १८४८ सालीं ह्याप्रमाणें तीं मिळविलीं होतीं. ही सूचना व्यर्थ गेली नाहीं. मिलन शहराच्या सर्व बाजूंवर एकावर एक कसे अवचित छापे घालावयाचे ते विलक्षण चातुर्यानें कल्पून बारीकसारीक बाबतींची देखील फार नामी व्यवस्था लावण्यांत आली होती. हल्ले करून ज्या जागा घ्यावयाच्या होत्या त्यांची अंतःस्थिति कशी काय आहे तिची चांगली बारकाईनें माहिती त्यांनीं मिळविली होती. प्रत्येक हल्ल्याचें काम निवडक आणि सुव्यवस्थित अशा कर्त्या शिपायांकडे सोंपविण्यांत आलें होतें, आणि त्या टोळ्यांचे नायक अगदीं निवडक सरदार होते. दम्एक हल्ला ठरलेल्या क्षणीं व्हावयाचा होता, व सर्व लांबर्डीतील राष्ट्रीय पक्षाच्या मथकांस अशी वर्दी देण्यांत आली होती कीं, मिलन येथील बंडाची बातमी पोंचल्याबरोबर त्यांनींही शस्त्रें घेऊन उठावें. ह्या सगळ्या व्यवस्थेंत एक चुकी झाली. एका मनुष्यानें विश्वासघात केला. पण तेवढ्यामुळें कटाचें ओम्फस होऊन सगळी गोष्ट उघडकीस आली. कॅस्टेलोवर प्रथम हल्ला करणाऱ्या सेनापतीनें खूण केल्यावर बाकीच्यांनीं हल्ले करावे असें ठरलें होतें; पण ह्या गृहस्थानें हातीं घेतलेलें कार्य एकीकडे ठेवून अगदीं आयत्या वेळीं मिलनमधून पळ काढिला; आणि शहराच्या निरनिराळ्या बाजूंवर हल्ला करण्यासाठीं जमलेल्या दुसऱ्या टोळ्यांनीं कांहीं वेळ खुणेची वाट पाहून अखेर अशी अटकळ केली कीं, नायकांनीं पहिला हुकूम रद्द केला असावा, अथवा हें गुह्य फुटून कटवाल्यांची पांगापांग झाली असावी. ह्यांपैकीं दोन टोळ्यांस उशीराचें कारण कळेना, त्यामुळें त्या अगदीं अधीर झाल्या, आणि दुसऱ्यांची वाट न पाहतां आपण आपलें काम बजावावें असा त्यांनीं निश्चय केला, व छापे घालून ग्रॅन्ड गार्डिया आणि पॅलेझो रियल ह्या दोन जागा शत्रूपासून हिसकावून घेतल्या. ह्या हल्ल्यांत आस्ट्रियाचे १९० शिपाई व दोन वरिष्ठ अंमलदार ठार झाले. ह्यानंतर लागलीच आस्ट्रियन कामदारांनीं तेरा मिलनकर मजूरांस कांहीं

एक चौकशी न करितां फांशीं दिलें. कटाची गोष्ट बाहेर फुटल्याबरोबर धराधरी सुरू होऊन चोहोंकडे एकच गर्दी उडाली. तेवढ्यांतल्या तेवढ्यांत माझिनीनें युक्ती करून झालेली चुकी कटांतील लोकांस कळविली, तेणेंकरून त्यांस मिलनमधून पळून जाण्यास जेमतेम थोडासा अवकाश मिळाला. कांवर्डीतील बारीकसारीक शहरांवरही हल्ले व्हावयाचे होते, तिकडेही आपला बेत फसल्याची सूचना माझिनीनें तावडतोब दिली.

बिचाऱ्या माझिनीस साऱ्या जन्मांत निश्चिंतपणा किंवा सुख ठाऊकच नव्हतें. त्यानें आपल्या आयुष्यक्रमांत पुष्कळ कट स्वतः रचिले होते, व पुष्कळांस मदत दिली होती. इतालीसाठीं आपले देशबंधु स्वप्राणाच्या आहुती देण्यास अमुक ठिकाणीं सिद्ध झाले आहेत, असें समजल्याबरोबर त्या कामीं माझीनी जातीनें हजर होऊन सर्व संकटांचा वांटेकरी झाला नाहीं, असें एकदांदेखील घडलें नाहीं; मग तो कट त्यानें स्वतः रचलेला असो, किंवा त्यांत स्वपरबलाबलाचा विचार नीट केला नसल्यामुळें तो अविचाराचा असून त्यास संमत नसो. युरोपांतील राजपक्षपाती वर्तमानपत्रकारांनीं माझिनीवर जो शिव्यांचा वर्षाव केला होता, त्यास उत्तरें देण्याचा आणि मागल्या गोष्टी उकरून काढीत बसण्याचा माझा हेतु नाहीं. परंतु ज्यांना बरोबर माहिती नसल्यानें त्या निंदेमध्यें खऱ्याचा कांहीं अंश आहे, असें वाटत असेल, त्यांच्याकरितां एवढें सांगतों कीं, वर लिहिलेली गोष्ट अक्षरशः खरी आहे, ती त्याच्या मित्रांस चांगली माहीत आहे, आणि त्याचें काय होईल काय नाहीं ह्या काळजीमुळें जरी त्यांचीं अंतःकरणें होरपळून जात असत, तरी तें सर्व गिळून जाऊन, कांहीं कमी जास्ती नाहीं असें त्यांस दाखवावें लागत असे. इतालीच्या खऱ्या स्थितीविषयीं ज्यांस काडीइतकी माहिती नव्हती, व साक्षात् किंवा ढोबळ दृष्टीस दिसणाऱ्या परिणामांवरून मात्र एखाद्या गोष्टीच्या बरेवाईटपणाबद्दल जे निकाल लावीत, अशांनीं, माझिनीनें ज्या बारीकसारीक चळवळी केल्या त्यांजकडे फार नाकें मुरडलीं आहेत. परंतु, आपल्या देशामध्यें जो जुलूम होतो तो हरप्रयत्न करून होऊं न देणें हें प्रत्येकाचें काम आहे, असा त्याच्या मनाचा पक्का समज झाला होता. पोरपणीं जिनोआ शहरच्या रस्त्यांत फिरत असतांनांच ह्या ' विचाराचा त्याच्या मनावर एकदम प्रकाश पडलेला होता, त्यामुळें आपलें स्वातंत्र्य मिळविण्याचें

इतालियन लोकांचें अंगीं सामर्थ्य आहे, आणि ह्मणून तें मिळविण्यासाठीं त्यांनीं प्रयत्न केला पाहिजे, अशी त्याच्या मनाची खात्री झाली होती. सर्व लोक जर आपापलें कर्तव्य करितील तर नव्याण्णव हिश्शानें कोणत्याही कामांत यश मिळतें. ह्मणून, जेव्हां जेव्हां आपणांस जय मिळण्याचा सुमार दिसेल तेव्हां तेव्हां आपण प्रयत्न केला पाहिजे, असा जो लहानपणींच त्याच्या मनांत अंकुर फुटला होता तो उत्तरोत्तर बळावला होता; आणि त्या निश्चयाचा परिणाम ह्या सर्व चळवळी होत. टांकीचे घांव सोसावे तेव्हां पाषाणास देवकळा येते, ही गोष्ट रात्रंदिवस त्याच्या लक्षांत वागत असे. इताली देश स्वतंत्र करण्याच्या प्रयत्नांत अपयश आलें तरी चिंता नाहीं; कारण तेवढी ठेंच लागून अनुभवानें शहाणपण येतें, व शत्रूच्या जुलूमरूपी तटास एक नवीन भगदाड पडतें, असें त्याचें मत असे.

परकीय राजकर्त्यांचा इतालियन लोकांस इतका तिटकारा आला होता कीं वर लिहिल्याप्रमाणें त्यांचा मोड झाल्यानंतर जरी धराधरीची गर्दी उडाली, पुष्कळ फांशीं गेले, व जुलमाचा कहर झाला, तथापि सन १८५४ साल संपण्यापूर्वींच पुन्हां तसा प्रयत्न करण्याची खटपट माझिनीनें चालविली असून ती बरीच रंगारूपास आली होती; पण मध्यंतरीं पीडमॉंट येथील राजाच्या कांहीं हस्तकांनीं ह्या कटांत शिरण्याचें ढोंग करून विश्वासघात केल्यानें मध्य इतालींत, व नेपल्स येथें फ्रेंच आणि इंग्रज लोकांचीं लढाऊ गलबतें येऊन धडकलीं त्यामुळें दक्षिण इतालींत, माझिनीच्या बेतांत विरजण पडलें.

माझिनी लोकांस सांगत फिरे कीं, इतालीच्या ज्या भागांवर परकीयांचा अंमल नाहीं त्यांजवर बाकीचा इताली देश स्वतंत्र करण्याची जबाबदारी आहे. आणि तसें करण्याचीं साधनें ज्यालाज्याला अधिक असतील त्याच्या त्याच्यावर या कर्तव्याचा बोजाही अधिक आहे. पीडमॉंटच्या लोकांस सर्व गोष्टींची अनुकूलता आहे, ह्मणून त्यांनीं आपल्या सामर्थ्याचा व्यय सर्व देशाच्या हितासाठीं केला पाहिजे. नाहींपेक्षां त्यांचें तें सामर्थ्य फुकट आहे. अशा प्रकारचा उपदेश माझीनी लोकांस करीत असल्यामुळें पीडमॉंटचा राजा तर हात धुवून त्याच्या पाठीस लागला होता. मातृभूमि राजेलोकांच्या खिजगणतींत नसते. स्वजनकल्याणापलीकडे त्यांचें लक्ष जातच नाहीं. लोकांचें पाहिजे तें कां होईना, आपल्या

व आपल्या गणगोताच्या चैनींत अंतर न पडलें ह्मणजे झालें, अशी त्यांची समजूत असते, यूरोपच्या इतर राजांचें जें हित किंवा अनहित तेंच व्हिक्टर इम्यान्युअल राजाचें होतें. त्यांस वाईट वाटेल तें करण्याची व्हिक्टरला कांहीं गरज नव्हती, व तशी गोष्ट तो आपल्या प्रजेसही करूं न देता. कारण तेणेंकरून लोकांस आपल्या आंगचें सामर्थ्य कळून आलें असतें; पण असें होणें तर राजांस अगदींच अनिष्ट होय.

अशी स्थिति असल्यामुळें 'ज्यानें त्यानें आपल्या नशीबावर हवाला देऊन स्वस्थ बसावें' असा उपदेश करणाऱ्यांस राजाकडून उत्तेजन मिळे, एवढेंच नाहीं तर त्यांची तुंबडीही भरे; तेव्हां माझिनीचा स्वकर्तव्याविषयींचा शुष्क उपदेश लोकांस गोड लागतो कसा? लेखनस्वातंत्र्य* पीडमॉंटमध्यें लोकांच्या गांवींही नव्हतें असें ह्मटलें तरी चालेल. त्यामुळें माझिनीचे लेख एकसारखे जप्त होत असत. ही एक दुसरी मोठी अडचण होती. ही अडचण दूर करण्यासाठीं 'संकल्प आणि कृति' या नांवाचें वर्तमान पत्र प्रथम लंडनमध्यें आणि नंतर स्वित्झर्लंडमध्यें छापण्याची त्यानें सुरवात केली.

माझिनीचा मित्र कार्लो पिसाकाने यानें नेपल्स शहर घेण्याचा प्रयत्न १८५७ त केला व त्याच सालीं जिनोआ आणि लेगहॉर्न ह्या दोन शहरांत एकदम बंड उठलें. ह्या गोष्टी माझिनीच्या अविश्रांत उपदेशाचीं व खटपटीचीं फळें होत. पिसाकाने ह्यानें काग्लिआरी नांवाची आगबोट पकडली, व तिजवर बसून पोन्झो येथें जाऊन बंदींत असलेल्या राजकीय कैद्यांस त्यानें मुक्त केलें, व त्यांस आपल्याबरोबर घेऊन नेपल्सच्या किनाऱ्यावर

---

* ह्याच वर्षाच्या फेब्रुवारी आणि सप्टेंबर महिन्यांच्या दरम्यान 'इतालिया ई पोपोलो' नांवचें प्रजापक्षीय वर्तमानपत्र पन्नास वेळां जप्त करण्यांत आलें होतें, व त्याच्या चार संपादकांस बिनभाड्याच्या घरांत पाठविण्यांत आलें होतें. सरकारतर्फे जे खटले चालविण्यांत येत ते न्याय होण्यासाठीं नव्हे, तर सूड उगविण्यासाठीं असत, हें एका गोष्टीवरून चांगलें दिसून येतें. एका प्रसंगीं एका संपादकाची चौकशी होण्यापूर्वींच त्याला दोन महिन्यांचा कारागृहवास घडला असल्यानें त्यास न्यायाधिशानें दोषमुक्त केलें. त्याबरोबर सरकारी वकील गरम होऊन न्यायाधीशास म्हणाला, 'तुम्ही पाहिजे तर त्याला दोषमुक्त करा, परंतु तो जी दोन महिन्यांची शिक्षा भोगून चुकला आहे ती ब्रह्मदेवाच्यानेंही रद्द होत नाहीं.'

तो उतरला. असें करण्यांत त्याचा इरादा असा होता कीं, प्रजापक्षाच्या लोकांनीं नेपल्स येथील बुर्बोन घराण्यांतील राजावर उठण्याचा बेत केला होता, त्यांस आपण मदत करावी. जिनोआ आणि लेगहॉर्न येथील बंडवाल्यांचा विचार असा होता कीं, तेथील शिलेखान्यांत हत्यारांचा आणि लढाईच्या दुसऱ्या सामानाचा चांगला सांठा होता तो लुटून घेऊन दक्षिण प्रांतीं चाललेल्या प्रयत्नांस मदत करावी. ह्या प्रयत्नांवर नेमस्त-पक्षाच्या वर्तमानपत्रकारांनीं पुष्कळ ताशेरा झाडला. त्यावर उत्तर व वरील प्रयत्नांच्या बचावाचा लेख माझिनीनें लवकरच प्रसिद्ध केला. त्यांत तो ह्मणतो ' हीं कृत्यें करितांनां आपणांस प्रजासत्ता हवी किंवा राजसंस्थाच चालू ठेवावी, असले विचार आमच्या मनांत मुळींच आले नव्हते. गाढ झोंप घेत बसावयाचें का हालचाल करावयाची, हा एक प्रश्न आमच्या-पुढें होता. मी स्वतः प्रजासत्तावादी आहें, व गेल्या पंचवीस वर्षांत जें एकसारखें रण माजून राहिलें आहे, त्यांत ज्यांनीं मला मदत दिली आहे तेही बहुतेक त्याच मताचे आहेत; पण आह्मां सर्वांचा हा एक सिद्धांत आहे कीं, सर्व राष्ट्राची जी इच्छा तिच्या अनुरोधानें प्रत्येकानें चाललें पाहिजे; ती एकीकडे गुंडाळून ठेवून आपलें किंवा आपल्या पक्षाचें घोडें पुढें ढकलण्यास कोणासही अधिकार नाहीं. '

माझिनी व तत्पक्षीय ह्मणत असत कीं, पीडमॉंट ह्मणजे पारतंत्र्यापासून पूर्णपणें अलिप्त असा इतालीचा एक भाग आहे; ह्मणूनच बाकीच्या इताली देशासंबंधानें त्याचें कर्तव्य फार मोठें आहे. युरोपखंडाच्या नकाशाकडे पाहिलें ह्मणजे पीडमॉंट,टस्कनी, नेपल्स इत्यादि निरनिराळे विभाग आह्मांला दिसत नाहींत, तर आह्मांला सगळा इताली एकच देश दिसतो. ज्या कोणास ही गोष्ट कबूल नसेल त्यानें आपणास पीडमॉंटवासी, टस्कनी-वासी, किंवा नेपल्सवासी असें नांव घ्यावें. तो इतालियन आहे असें आ-ह्मी ह्मणणार नाहीं. जिनोआवर परकीयांचा अंमल नाहीं. ईश्वरकृत आणि मनुष्यकृत कायद्याप्रमाणें प्रत्येकाच्या सामर्थ्यानुरूप त्याजवर कर्तव्याचा भार असतो. जिनोआच्या अंगीं सामर्थ्य आहे, त्या अर्थी इताली देशाच्या हितासाठीं त्या सामर्थ्याचा उपयोग त्यानें केला पाहिजे, नाहींपेक्षां त्याच्या ठायीं स्वतंत्र ह्मणवून घेण्याची योग्यता नाहीं असें ह्मटलें पाहिजे. इता-लियन ह्या शब्दाचा जो अर्थ माझीनी समजत असे त्या अर्थाप्रमाणें

नेमस्तपक्षाचे लोक 'इतालियन' नव्हते, 'सुसंपन्न पीडमॉंट आणि अठराविश्वे दरिद्री इताली देश हा दुजा भाव त्यांचे मनांत भरला आहे. जो पीडमॉंट इतालीचा एक कोंपरा होय त्यास धरून बसून खऱ्या व थोरल्या इतालीस ते विसरले आहेत' असें माझिनीचें वारंवार ह्मणणें असे. राजाचे हस्तक आणि तत्पक्षीय वर्तमानपत्रकार, लोकांस मोठ्या डौलानें सांगत फिरत असत कीं, आपण दुसऱ्या कोणत्याही भानगडींत न पडतां सुव्यवस्थित व कायदेकानूंचा ज्यास चांगला आळा आहे अशा एका नमुनेदार राज्याचें उदाहरण, परकीयांच्या अंमलाखालीं असलेल्या दुसऱ्या प्रांतांस घालून देऊन स्वस्थ बसावें. त्यावर माझिनीचें प्रत्युत्तर असें आहे:—

'तुह्मी उदाहरणाचें नांवसुद्धां काढूं नका. तें घालून देतां कोणाला! ज्यांच्या कानास चाप लागले आहेत, ज्यांस चोंहोकडून परकीयांच्या तरवारींनीं वेढून टाकिलें आहे, पांच जण एकत्र जमूं ह्मटलें तर तें ज्यांस शक्य नाहीं व वर्तमानपत्रांतून ज्यांस 'ब्र'ही उच्चारितां येत नाहीं अशांस का तुह्मी उदाहरण घालून देणार? दारापुढें खून होत असतां आंतून कडी लावून अगळा सारणाऱ्यांच्या आणि तुमच्या उदाहरणांत कांहीं फेर दिसत नाहीं. ईश्वरावर हवाला ठेवा आणि पुढें सरसावा, ह्मणजे आह्मी तुमच्या मागोमाग येतों. तसें होत नसेल तर आह्मांच आमचा कारभार पाहूं, व तुह्मांसही गचांडी देऊन मैदान दाखवूं; व ज्या प्रसंगाची आह्मी वाट पाहत आहों असें तुह्मी ह्मणतां तो तुमच्यापुढें आणून उभा करूं.'

माझीनी जें असें बोलत असे ती व्यर्थ बडबड नव्हती. पीडमॉंट स्वतंत्र होऊन दहा वर्षें झालीं होतीं. त्याच्या ताब्यांत जय्यत आरमार व फौज होती, व गंगाजळींत आणि शिलेखान्यांत पैशाची व लढाऊ सामानाची लयलूट होती; तथापि शत्रूपासून एक वोटभर देखील जमीन घेण्याची खटपट त्यानें केली नव्हती. नेमस्तपक्षीय नीच लोक प्रजेस सांगत फिरत कीं, तुह्मीं क़ांहीं गडबड केली, तर महाराज आपले प्रचंड बेत धिमेधिमे चालवीत आहेत त्यांस व्यत्यय येतो. ह्या त्यांच्या सांगण्यामुळें लोकांत जी आपल्या बऱ्याची नैसर्गिक इच्छा उत्पन्न होत असे, तीस विरजण पडे. अशिक्षित लोक फार भोळसर असतात; अंमल ह्मटला ह्मणजे तो कितीही दुर्बळ असेना, त्याचा शह लोकांवर पडावयाचाच;

आणि खाऊनपिऊन केवळ मजा मारणारे लोक बहुधा आप्पलपोटे असतात. मग ह्या त्रिवेणीचा संगम झाल्यावर काय विचारावयाचें आहे? हळूहळू लोक इतके भोळसर बनले कीं, लांबर्डीवर आस्ट्रियाचा अंमल असावा अशासंबंधानें झालेला तह, इतलीची एकी होणें कसें बंद पाडावें ह्या विषयीं राजास सल्ला देणाऱ्या प्रधानमंडळीपैकीं* आस्ट्रियाच्या मदतीनें क्रिमियामध्यें होणारी लढाई, इंग्रज व फ्रेंच ह्यांची मध्यस्ती, व फ्रान्स आणि रोममधील स्वातंत्र्य ज्या गृहस्थानें निर्मूल करून टाकिलें व ज्याच्या कपाळीं वज्रलेख लिहून ठेवलेला होता कीं तो जिवंत असेपर्यंत त्यानें लोकांवर जुलूमच करावा अशा गृहस्थाचीं गुप्त खलबतें, ह्या गोष्टींवर इतालीची सुटका करण्याचा हवाला सोंपवून देऊन आपण बिन-घोर बसले.

पिसाकाने ह्यानें मोठ्या शौर्यानें नेपल्स शहरावर हल्ला केला होता, पण त्याची दुर्दशा उडाली. शत्रूच्या फार मोठ्या सैन्याशीं हातघाईवर येऊन लढत असतां तो ठार झाला, व त्याच्या लहानशा टोळीपैकीं जे थोडे-बहुत लोक जिवंत हातीं आले, त्यांस नेपल्स येथील भयंकर कारागृहांत टाकण्यांत आलें. पिसाकाने ह्यास मदत करण्यासाठीं जिनोआमध्यें जी चळवळ करण्यांत आली होती तिचा पीडमॉन्टच्या राजानें, व लेगहॉर्न मधील चळवळीचा आस्ट्रियन् ग्रॅन्ड ड्यूक ह्यानें मोड केला. हे दोन्ही घाट माझिनीनें रचिले होते. ह्मणून नेमस्तमताचे लोक त्याच्या हेतू-विषयीं लोकांस असें सांगूं लागले कीं पीडमॉंटचें राज्य मोडून टाकून तेथें प्रजासत्ता स्थापण्याचा माझिनीचा बेत आहे. माझिनीस गालिप्रदान करण्याची व लोकांवर त्याचें वजन आहे तें फारच अनिष्ट आहे अशी ओरड करण्याची नेमस्तपक्षीय वर्तमानपत्रकारांत केवळ चढाओढ लागून राहिली होती. त्यांस उत्तर देतांना माझीनीं लिहिलें, 'गेलीं सव्वीस वर्षें इतालीच्या हितास मी विघ्नरूप होऊन बसलों आहें, व माझ्या हातून आजपावेतों सगळ्या चुकाच घडल्या असें तुमचें ह्मणणें आहे. तुह्मी पुष्कळ वेळां असें प्रसिद्ध केलें आहे कीं, माझिनीचे आतां बारा वाजले, त्याची गोष्टच आतां बोलायला नको, आणि त्याचें काडीइतकेंही वजन लोकांत

* ह्या वेळीं नेमस्तपक्षीय लोकांनीं कॅव्होर प्रधानाच्या नांवानें पदकें पाडून त्यांस देशोद्धारक असें नांव त्यास दिलेलें होतें.

राहिलेलें नाहीं; असें असतांही मी पुन्हां वर डोकें काढितों आणि चळवळ सुरू करितों हें कसें? वृद्धापकाळ आणि विवंचना ह्यांच्या भारानें मी लवून गेलों आहें, माझ्या केसांची अंबाडी झाली आहे, जवळ दांतावर मारण्यास छदाम नाहीं, सर्व राजे माझ्या वाइटावर आहेत, पोलीस माझ्यामागें हात धुवून लागलें आहे, हेर माझ्या पाळतीवर बसलेलेच आहेत, एक इंग्लंड देश खेरीज करून साऱ्या युरोपखंडांत एक टीचभरही अशी जागा नाहीं कीं, जेथें मी क्षणभर निर्धास्त आणि हक्कानें उभा राहीन. अशी स्थिति असतांही माझे अनुयायी तुरळक आहेत असें ह्मणण्याची आतां तुमचीदेखील छाती नाहीं.'

'ज्यांचा आंतील व बाहेरील बंदोबस्त अगदीं कडेकोट आहे, बोट हालविण्याचा उशीर, कीं 'काय हुकूम आहे?' असें विचारण्यास ज्यांच्या पदरीं प्रचंड लष्कर सिद्ध आहे, जे कुबेराप्रमाणें धनाढ्य आहेत, आणि—त्यांचीं वर्तमानपत्रें जर खरें लिहीत असतील तर—जे पूर्ण विचाराअंतीं प्रजासत्ताक राज्याचे शत्रू बनले आहेत, अशा कित्येक राजांच्या पोटांत माझें नांव ऐकण्याबरोबर धस्स होत असतें, तें काय ह्मणून? मी एक यःकश्चित् मनुष्य, बाबांनो कांहीं तरी उद्योग करा, ह्मणून लोकांपुढें आपला घसा कोरडा करीत आहें. इतालीच्या स्थितीकडे नजर फेंकाल तर तुह्मांस दिसून येईल कीं, हातपाय हालविल्यावांचून तरणोपाय नाहीं. इतालींतील थोर थोर पुरुषांचीही हीच ओरड सुरू आहे. इतालींतल्या शहरांतले लोक तीच ओरड करीत आहेत. नेपल्समध्यें आपल्या पाठीवर कोरडे फुटत आहेत व कानांस चाप लागत आहेत. ह्या सर्व गोष्टींवरून कांहीं तरी चळवळ केली पाहिजे हें जर निघत नसेल, तर निघतें तरी काय? 'स्वस्थ बसून रहा, हालचाल करण्याची गरज नाहीं, झोंप येत नसल्यास मेंदू शांत होण्याचें कांहीं औषध घ्या, सध्यां आपणावर आकाबाईचा फेरा आलेला आहे तो जाऊन आपली सद्दी येईपर्यंत तुह्मी दम धरा, तुमच्या दुःखाचा परिहार होण्यास ह्याशिवाय दुसरें रामबाण औषध नाहीं' असेंच जर तुह्मी लोकांस सांगत राहाल, तर सद्दी पालटेपर्यंत ज्यांच्यानें स्वस्थ राहवत नाहीं, कांहीं तरी करून दाखविण्याकरितां जे धडपडत असतात, ते लोक मजकडे—आमच्याकडे—वळतीलच. दक्षिण इतालीच्या लोकांनीं एक आगबोट पोन्झा येथें पाठविण्यास जेव्हां आह्मांस

सांगितलें, तेव्हां हव्या तशा उलाढाली करून आह्मीं ती पाठविली; परंतु शुष्क वचनें आणि तोंडदेखली कळकळ व्यक्त करण्यापलीकडे तुमच्यानें कांहीं झालें नाहीं. माझें लोकांवरील अनिष्ट वजन नाहींसें व्हावयास पाहिजेना? तर उठा आणि उद्योगास लागा. मी करितों त्यापेक्षां जास्ती आणि सफल प्रयत्न करून दाखवा. तुह्मी मला मदत करीत नसल्यामुळें मी एकटा बारीकसारीक गोष्टी करीत बसतों. तुह्मी एकजूट व्हा आणि मोठालीं कामें सिद्धीस न्या. इताली देश तुमची जननी नव्हे काय? पीडमॉन्टमधील लोकांचे डोळे उघडून त्यांस आपलें कर्तव्य समजूं लागेपर्यंत तेथें चळवळीची गर्दी उडवून द्या. मध्य दक्षिण व उत्तर इतालींतील लोकांस पैशाचा आणि बंदुकींचा पुरवठा करा.'

वरील उपदेशाची हकीकत ऐकून राजानें माझिनीस मृत्यूची शिक्षा फर्माविली; व मुख्य प्रधान कॅव्होर ह्यानें पार्लमेंट सभेंत बोलून दाखविलें कीं, 'इतर राज्यांशीं केलेले तह आणि करारमदार हे पीडमॉन्टच्या गादीचे आधारस्तंभ आहेत, व ते राजेसाहेब पूर्णपणें पाळतील,* जे तह व करारमदार राजाच्या स्वतःच्या हितासाठीं केलेले असतात, व ज्यांत प्रजेच्या बऱ्यावाइटाचा विचार केलेला नसतो, असले तह व करारमदार पूर्णपणें पाळण्याच्या शर्तीवर, युरोपांतील सर्व राजांचे गादीवरील हक्क अवलंबून आहेत, ही गोष्ट लोकांच्या नेहमीं लक्षांत वागेल तर बरें होईल.

मुख्य प्रधान कॅव्होर हमेश उघड बोलून दाखवीत असे कीं, इतालीची एकी व स्वातंत्र्य हीं 'स्वप्नांतील मांडे होत.' तथापि नेमस्तपक्षीयांनीं त्यास 'इतालीचा तारक, ही पदवी देऊन त्याच्या नांवानें पदकें पाडण्याचा सपाटा चालविला होता; अपयशामुळें हिरमोड होणें हें माझिनीस मुळींच ठाऊक नव्हतें. जागोजागीं विस्कळित झालेल्या राष्ट्रीयपक्षाला सांवरून धरण्याचें काम त्यानें धिमेपणानें चालविलें होतें. जिकडेतिकडे पत्रें पाठवून व चोहोंकडे वर्तमानपत्रांत लेख प्रसिद्ध करून पीडमॉंट प्रांतांतील लोकांची संकुचित दृष्टि दूरवर पोंचेल, व सर्व इताली एक राष्ट्र आहे असें त्यांस वाटूं लागेल असें करा, ह्मणजे आपला मार्ग सुकर होईल,

---

* ह्या तहाअन्वयें लांबर्डी आस्ट्रियाकडे, टस्कनी आस्ट्रियाच्या लिओपोल्डकडे, रोम पोपकडे, आणि नेपल्स बुर्बोन घराण्याकडे निर्वेध चालावी, असें ठरलें होतें.

असा उपदेश त्यानें सुरू ठेविला होता. लोकांवर असलेलें माझिनीचें वजन नाहींसें करण्याकरितां कॅव्होर ह्यानें 'राष्ट्रीय समाज' नांवाचा एक समाज स्थापन केला होता, व त्याचा आस्ट्रियाशीं लढाई करण्याची तयारी करणें हा बाह्यात्कारी हेतु होता. लढाईच्या या वार्तेमुळें प्रजापक्षीयांपैकीं देखील बरेच लोक पुन्हां एक वेळ राजाच्या पक्षाकडे वळले. फ्रान्सशीं तह झाल्याची बातमी बाहेर आल्याबरोबर नेमस्तपक्षानें 'इतालीचे ऐक्यसंपादक' अशा विशेषणांनीं कॅव्होर व व्हिक्टर राजा यांचा स्तोत्रपाठ सुरू केला. लोक अविचारीच. त्यांना ही गोष्ट अगदीं खरी वाटली, व राजाच्या लष्करांत नोकरी करण्यासाठीं सर्व प्रांतांतून हजारों लोक टोळधाडीप्रमाणें गोळा होऊं लागले. मध्यइतालींतील संस्थानिकांची पांचावर धारण बसली, व पूर्वीप्रमाणें ह्या वेळींही त्यांनीं आपलीं तख्तें सोडून 'यःपलाय' केलें.

आस्ट्रियाशीं लढाई सुरू करण्यांत कॅव्होरचा दुहेरी हेतु होता. तुमच्यासाठीं राजा लढाई करून शत्रूस जिंकणार आहे, करितां तुम्हीं उगीच भानगडींत पडून मनुष्यापायीं आणि द्रव्यापायीं खराबीस येऊं नका, असें लोकांस सांगून माझिनीचें प्रस्थ मोडणें, हा त्याचा एक हेतु होता. कारण त्याची पुन्हां पहिल्यासारखी छाप बसली तर, कदाचित एखादा प्रजासत्तावादी पुढारी करून, लोक आपण होऊन लढाईस प्रवृत्त होतील, व पीडमाँटच्या गादीस धोका येईल अशी त्यास भीति होती. शिवाय लांबर्डी प्रांतावर ह्या राजश्रीचा फार दिवसांपासून डोळा असून तो सुपीक प्रांत पीडमाँटच्या राजाकरितां काबीज करणें हा त्याचा दुसरा हेतु होता. फ्रान्समध्यें जिकडेतिकडे लोकांत आणि सैन्यांत बेदिली झाली होती, व त्यांस लढाईच्या नादीं लावणें फ्रेंच बादशहास भाग पडलें होतें. इतालीमध्यें राष्ट्रत्वाचा अभिमान जिकडेतिकडे जागृत होऊन कॅव्होर गडबडला आहे, ही संधी फुकट न जाऊं देण्याचा त्यानें विचार केला. 'असंतुष्टश्च महीपतिः' ह्या हावऱ्या वचनास अनुसरून त्यानें कॅव्होरपासून असा गुप्त तह करून घेतला कीं, लांबर्डीच्या बदल्यांत सरहद्दीवर असलेले नाइस आणि सॅव्हॉय हे प्रांत व्हिक्टर राजानें त्यास द्यावे. खळ्यावरून दाणे पळवणाऱ्या चोरास हाकून लावण्याकरितां घरफोड्या रामोशाची मदत घेऊन त्यास बक्षीस ह्मणून आपल्या पुढल्या आणि परसदारच्या

किल्ल्या त्याच्या स्वाधीन करणाऱ्या दीडशहाण्या गृहस्थाप्रमाणेंच, हा तह करणाराही अकलेचा खंदक होता, असें इतालीच्या नकाशाकडे पाहिलें ह्मणजे दिसून येईल. ह्या तहांत तीन गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. आपला वडिलोपार्जित सॅव्हॉय प्रांत लांबर्डीसाठीं सोडून देण्यामध्यें व्हिक्टर राजाचा दिसून येणारा अविचार, ही एक गोष्ट; एका राजाच्या ताब्यांतून मुलूख काढून दुसऱ्याच्या ताब्यांत देतांनां त्या मुलुखांतील लोकांची इच्छा काय आहे, ह्याविषयीं तिळभर देखील विचार करण्याची कोणास गरज वाटली नाहीं, ही दुसरी; व आमचा निरपेक्ष स्नेही व थोर मनाचा दोस्त ह्मणून लुई नेपोलियनचें लोकांनीं जें स्वागत केलें, त्यांत त्यांचें दिसून येणारें मौर्ख्य, ही तिसरी. माझिनीस आंतील इंगित काय आहे हें ठाऊक होतें. पीडमाँटच्या राज्यास लांबर्डी प्रांत जोडण्याची गोष्ट इतालियन लोकांच्या ध्यानींमनींही नव्हती. ती घडवून आणण्यासाठीं ह्या थोर मनाच्या दोस्तास जें बक्षीस द्यावयाचें होतें, त्या संबंधानें कॅव्होर आणि नेपोलियन ह्या उभयतांमध्यें झालेल्या तहाच्या शर्ती, तह अंमलांत येण्यापूर्वी सहा महिने माझिनीनें प्रसिद्ध केल्या, आणि इतालियन लोकांस शुद्धीवर आणण्याची पुष्कळ खटपट केली; परंतु तें सर्व अरण्यरुदन झालें. तो लिहितोः—‘ नायझा आणि सॅव्हॉय हे प्रांत स्वतःसाठीं, नेपल्सची गादी मुलासाठीं, व मध्य इतालीची गादी आपल्या चुलत भावासाठीं मिळविण्याची नेपोलियनची खटपट आहे. कॅव्होरनें ह्या गोष्टी कबूल केल्या आहेत.....जर आस्ट्रिया फारच निकरानें लढेल तर वर लिहिलेला सर्व बेत सिद्धीस नेण्यांत येईल. परंतु एक दोन लढाया हरल्यानंतर जर आस्ट्रियानें बोलणें लाविलें, कीं व्हेनीशिया प्रांत आपल्याकडे निर्वेध चालावा ह्या शर्तीवर लांबर्डी प्रांत देण्यास आपण कबूल आहों, तर तें मान्य करण्यांत येईल, व सॅव्हॉय घराण्याला मात्र जास्त मुलूख मिळून बंडांत सामील झालेल्या इतालीच्या इतर प्रांतांतील लोकांचा हवा तसा सूड आस्ट्रियाला घेतां यावा ह्मणून त्यांना फशीं पाडण्यांत येईल.’ त्यानें असेंही भाकित केलें होतें कीं, युद्ध अर्धेच बंद करून आस्ट्रियाविरुद्ध उठलेल्या इतालीस अत्यंत अनिष्ट असा तह एकाएकीं करण्यांत येईल. युद्ध फार वेळ लांबलें तर न जाणों लोक काय करितील, अशी भीति पडून, सार्डिनियन राजास, जरूर पडल्यास, थोडासा मुलूखही देऊन

लढाई सोडून जाण्यास नेपोलियन भाग पाडील, व व्हेनीशिया प्रांत आणि लांबर्डीचा कांहीं भाग यांना आस्ट्रियाच्या तोंडीं देईल!

आल्प्स पर्वतापासून तों तहत समुद्रापर्यंत इताली देश अगदीं स्वतंत्र झाला पाहिजे, असा नेपोलियननें जाहिरनामा लाविला होता, त्यानें लोकांस अगदीं भुरळ पाडली. फ्रान्समध्यें ह्याच गृहस्थानें स्वातंत्र्याचा अगदीं बीमोड केला, व पोपच्या सिंहासनास याच्याच शिपायांनीं संगिनींचा टेका देऊन तें उभें ठेविलें आहे, ह्या गोष्टींचा त्यांस विसर पडला. पूर्वीं व्हिक्टर राजानें मिलन शहर शत्रूच्या स्वाधीन केलें होतें, आणि नोव्हेरा येथील लढाईंतही विश्वासघात केला होता, या गोष्टीही त्यांच्या लक्षांत राहिल्या नाहींत. फार काय सांगावें? राष्ट्रीय पक्षाच्या एका अत्यंत थोर आणि हुशार गृहस्थानें एक खरी गोष्ट एकदां आवेशानें आणि निर्भीड-पणानें बोलून दाखविली होती कीं, 'सैतानाच्या हातांत हात घालून जाणाऱ्यांस स्वर्गास पोंचण्याची आशाच नको, ते नरकांतच जाणार'; त्या वाक्याचेंही त्यांस भान नाहींसें झालें. नेमस्तपक्षीय वर्तमानपत्रकारांनीं पुष्कळ विनवण्या केल्या कीं, राजाच्या चाकरीस सैन्य आहे तेवढें इता-लीस बंधमुक्त करण्यास पुरून उरेल; सबब लोकांनीं शिपाईगिरी करण्यास पुढें येऊन 'सरकारास फुकट घोळांत घालूं नये.' तथापि लोकांचे थवे-च्याथवे स्वयंसेवकांच्या पलटणींत दाखल होण्याकरितां राजाकडे येत होते. त्यांची कोणी बरदास्त ठेवीत नसे व होईल तेवढें करून त्यांस हिरमुष्टी करण्यांत येत असे; तरी देखील साठ हजार लोक आह्मांस ठेवाच असें ह्मणूं लागले. अखेर मोठ्या नाखुषीनें त्यांपैकीं चार हजार लोकांस ग्यारिबॉल्डीच्या आधिपत्याखालीं दिलें.* बाकीचे लोक इतालीच्या 'समशेर

* वरील संख्येपैकीं लढाईस अगदीं कुचकामाचे व अल्पवयस्क असे लोक त्याच्या हाताखालीं दिले असून ग्यारिबॉल्डीनें त्यांस 'शेंदाडशिपाई' असें नांव दिलें होतें. बाकीच्यांपैकीं कांहींस दूर पल्ल्यावर असलेल्या शिलेखान्यांच्या संरक्षणासाठीं पाठ-वून देण्यांत आलें होतें, व कांहींस, ज्यांस आपलें ठिकाण सोडून जावें लागणार नाहीं अशा पलटणींत ठेविलें होतें. ह्याचें कारण उघडच आहे. हे स्वयंसेवक आपापल्या प्रांतांतील चांगले लढवय्ये होते. एवढेंच नव्हे, तर ह्यांस राज्यक्रांती करण्याचीही उत्कट इच्छा होती. त्यांस कवाईत शिकवून चांगले तरबेज करण्यांत आलें असतें तर आस्ट्रियन सैन्याच्या पिछाडीवर हल्ले करून त्रास ह्यांनीं त्राहि त्राहि करून उत्तम काम-

बहादरांनीं ' नापसंत केले. इतालीच्या स्वातंत्र्यासाठीं व्हिक्टर राजानें तरवारीनें कोणास एक ओरखडाही ओढिला नव्हता; तरी देखील नेमस्तपक्षीय लोक ह्या विषयी व हलकट राजास वरील बहुमानयुक्त पदवीनें संबोधीत असत.

फ्रेंच व इतालियन सैन्यांनीं मिळून आस्ट्रियाचा एकामागून एका रणांगणावर मोड केला; व सोल्फेरिनो येथील घोर युद्धानंतर, आस्ट्रियास निदान त्या वेळेपुरतें तरी दे माय धरणी ठाय असें झालें. लांबर्डी प्रांत आस्ट्रियाच्या घशांतून निघाला; व सगळ्या इतालीची आस्ट्रियाच्या कचाटींतून खास सुटका होते असा रंग दिसूं लागला. लढाई तशीच पुढें नेटानें चालविली असती, तर तसें घडूनही आलें असतें यांत संशय नाहीं. परंतु माझिनीनें भविष्य केल्याप्रमाणें इतालीस फार प्रतिकूळ असा तह एकाएकीं करण्यांत आला, व लोकांच्या आशेचा भंग झाला. हा तह माझिनीनें भाकित केल्यापेक्षांही इतालीच्या अब्रूस आणि सुरक्षितपणास जास्त अपायकारक होता. कारण गुप्त तहाअन्वयें ज्या शर्तीवर आस्ट्रियाकडून तहाचें बोलणें लावण्यांत आलें असतां मान्य व्हावयाचें होतें, त्याच शर्ती आतां फ्रेंच बादशहानें आपण होऊन इतालीवर लादल्या. हे 'उदार दोस्त' ह्मणतातः—"आस्ट्रियाच्या बादशहाच्या आणि माझ्या दरम्यान तह होऊन शांतता झाली आहे" ह्यांत पीडमॉन्टच्या कळसूत्री बाहुल्याचें (राजाचें) नुसतें नांवदेखील नाहीं. नवीन तहाअन्वयें दक्षिण लांबर्डी व व्हेनीशियन लांबर्डी ह्यांच्यामधील सरहद्दीवर असलेले चार किल्ले आस्ट्रियाकडे ठेवण्यांत आले, व व्हेनिस शहर आस्ट्रियाकडे निर्वेध चालावें असें ठरलें; मोडीना आणि टस्कनी येथील ड्यूकांस त्यांचे पूर्वीचे सर्व हक्क देण्यांत आले, बोलोना प्रांत पोप ह्यास परत देण्यांत आला, आणि इताली एक संयुक्त राष्ट्र असून त्याच्या शिरोभागीं पोप आहे, असें जाहिर करण्यांत आलें. नेपोलियननें काढिलेल्या जाहिरनाम्यांत असें लिहिलें होतें कीं "इतालियन लोकांस जें कांहीं रास्त वाटेल तें कळविण्यास मुभा

गिरी बजाविली असती; आणि मॅजेन्टा येथील पराभवानंतर आस्ट्रियन सैन्य बिनधोक परतलें, व त्याचें नांवदेखील कोणीं घेतलें नाहीं, तसें घडलें नसतें. शिवाय त्या लढाईनंतर जो लाजिरवाणा तह करण्यांत आला, त्या प्रसंगीं त्यांचे हातीं हत्यारें असून जर त्यांची एकजूट झालेली असती तर त्यांनीं बंड केलें असतें.

असावी." बोलोना व टस्कनी येथील लोकांनीं आपल्या पूर्वीच्या धन्यांच्या ताब्यांत जाण्याचें नाकारिलें. लढाईचा असा लज्जास्पद शेवट लागलेला पाहून लोकांच्या मनांत प्रथम अशी ऊर्मि आली कीं, मध्य इतालीस बाकीच्या इतालीपासून तोडून निराळें करावें. प्रजासत्ताक पक्षाच्या लोकांपैकीं पुष्कळांस ही कल्पना आवडली. माझीनी आग्रहपूर्वक प्रतिपादन करीत होता कीं हे प्रांत पीडमाँटशीं सामील करणें हितावह होईल; पण लोकांस तें पसंत न पडून ते माझिनीवरच उलटले, व ह्मणूं लागले कीं माझीनी आतां राजापुढें गोंडा घोळूं लागला आहे. संयुक्त राष्ट्र स्थापन करावें असें ज्यांचें मत होतें त्यांनीं ( इतालीच्या सुदैवानें या पक्षाचे लोक जरी उलट्या काळजाचे होते तरी ते अगदींच क्षुल्लक होते.) असें प्रसिद्ध केलें कीं, माझीनी आजपर्यंत आपल्या लेखांच्या द्वारें जो उपदेश करीत आला, कीं हजार हिताच्या गोष्टी एकीकडे ठेवून आधीं इतालीचें एक राष्ट्र बनवा, त्यामुळें त्यानें राजसंस्थेचा रस्ता मोकळा करून देऊन लोकांस तिचे गुलाम होऊन राहण्यास मात्र शिकाविलें आहे.

राजसंस्थेखालीं ह्या वेळीं इतालीचा अगदीं चूर होत होता. लोकसत्ताक पक्षाच्या लोकांच्या बेदिलीस जें ह्या वेळीं भरतें आलें होतें, तें माझिनीचें काम आहे अशी राजभक्त वर्तमानपत्रकारांनीं ओरड चालविली होती, व राजसंस्था बुडवून टाकण्याचा त्याचा बेत चालला आहे, असा त्यांनीं माझिनीवर आळ आणिला होता. शिव्यांची आणि निंदेची अशी चोहोंकडून वृष्टि सुरू असतां माझीनी किंचितही डगमगला नाहीं, व राष्ट्राचें ऐक्य हें इतालियन लोकांचें पहिलें कर्तव्य होय, ह्या उपदेशाचा क्रम त्यानें अव्याहत सुरू ठेविला. कारण तो ह्मणे, आज परचक्रांतून मुक्त होण्यास तुह्मीं हत्यार उचललें, तरी तुमच्यांत एकी आणि सामर्थ्य असल्याशिवाय तुमच्यानें आपलें स्वातंत्र्य कायम राखवणार नाहीं, व सर्व राष्ट्रानें मिळून प्रजासत्ताक राज्य असावें असें ठरविल्यास तेंही कायम राखवणार नाहीं. माझिनीच्या प्रयत्नांमुळें इतालियन लोकांच्या मनांत जो एकीचा अंकुर उद्भवला होता, त्यामुळें लुई नेपोलियनचे आणि विभक्तराज्यसंस्थापकांचे (सेपरेटिस्ट पक्षाचे) बेत सफळ झाले नाहींत ही गोष्ट प्रसिद्ध आहे. बोलोना आणि टस्कनी येथील लोकांनीं आपले प्रांत पीडमाँटशीं जोडण्याविषयीं आग्रह धरिला. नेपोलियनास आपला

चुलत भाऊ टस्कनीच्या गादीवर बसवावयाचा होता. सबब त्यानें कॅव्होर ह्यास हुकूम केला कीं, त्या प्रांतांतील लोकांची विनंती तुह्मीं ध्यानीं आणूं नये. कॅव्होरनें तो हुकूम मुकाट्यानें मान्य केला. परंतु नेपोलियनचा चुलत भाऊ जेव्हां टस्कनीमध्यें गेला, तेव्हां तेथील लोकांनीं फ्रेंच लोकांविषयींचा आपला तिरस्कार इतक्या स्पष्ट रीतीनें दाखविला कीं, नेपोलियन बादशहास निरुपायास्तव आपला बेत रहित करणें भाग पडलें, आणि बोलोना आणि टस्कनी हे प्रांत फ्रेंच अंमलाखालीं गेले नाहींत. पीडमाँटच्या राजास त्या प्रांतांची मागणी कबूल करण्याची परवानगी मिळाली, (आतां नाहीं ह्मणण्याची सोयच नव्हती.) व त्या राजाच्या इतर वैभवाप्रमाणेंच हीं दोन रत्नें (प्रांत) त्याच्या गळ्यांत जुलमानें बांधण्यांत आलीं.

माझिनीनें आतां आपलें सर्व लक्ष लढाई चालू ठेवण्याच्या आणि ती आपल्या हितासाठीं आहे असें इतालींतील सर्व लोकांना वाटेल असें करण्याच्या कामीं लाविलें. ह्या महत्कार्यासाठीं स्थानिक बाबती एकीकडे ठेवून सर्वांनीं मनापासून झटावें, अशी त्यानें सर्व पक्षांस विनंती केली. तो ह्मणाला "इतालीचें नांव निष्कलंक राखण्यासाठीं आपण सर्व एक होऊं या." त्यानें या प्रसंगीं राजास एक फारच सुरेख पत्र लिहिलें. आपल्या पत्रांत तो ह्मणतो:—"खऱ्या लढाईचा हा केवळ आरंभ होय. इतालीची एकी करण्यास्तव जर आपण सर्व राष्ट्राचें आधिपत्य स्वीकाराल, तर प्रजासत्ताक पक्षाचे लोक आपणांस मनोभावें मदत करितील, व सर्व इतालीचें ऐक्य होऊन सगळे तट मोडतील, व आपण आणि लोक असे दोन पक्ष मात्र अवशिष्ट राहतील, असें मी आपणास आश्वासन देतों." ह्या पत्रानें अशी चळवळ उडाली कीं, राजाला तिचा विचार केल्याशिवाय राहवेना. कॅव्होरनें केलेल्या लाजिरवाण्या तहामुळें त्याच्या लोकप्रियतेस जबर धक्का बसला होता. त्याच्यामागून स्थानापन्न झालेल्या राटाझीच्या मंत्रिमंडळास, युद्ध करण्याविषयीं आग्रह धरणाऱ्या पक्षाची मनधरणी करावी लागली, ग्यारिबॉल्डीच्या दाढीस हात घालावा लागला, व बाह्यात्कारीं तरी लोकांच्या मतास आपली अनुकूलता दर्शवावी लागली. पीडमॉन्टचा प्रसिद्ध इतिहासकार ब्रोफेरिओ ह्यानें माझिनीचें पत्र राजास नेऊन दाखविलें, तेव्हां आपण तें पूर्वींच वाचलें होतें असें सांगून माझीनीस भेटण्याची आपली इच्छा राजानें त्याजजवळ दर्शविली, व कांहींही

होवो, "इतालचिं नांव कायम राहिलेंच पाहिजे." असा आपला निश्चय झाल्याचें त्याला कळविलें.

माझिनीनें उत्तर पाठविलें कीं "भेट होण्यापूर्वी एकमेकांनीं आपलें ह्मणणें काय आहे तें स्पष्ट सांगून टाकावें हें बरें. व्हिक्टर राजाच्या अंमलाखालीं आपण असावें असें बहुसमाजाचें मत असल्याविषयीं माझी खात्री झाली आहे, आणि राष्ट्राचें मत मला शिरसावंद्य आहे. हल्लीं परकीयांच्या अंमलाखालीं असलेले प्रांत जिंकून परत घेण्याचा यत्न मनोभावानें करून, लोकांचें मत आपणास मान्य आहे असें जर आपण दाखविलें, तर मजकडून होईल तेवढी मदत करण्यांत मी अंतर करणार नाहीं; परंतु महाराजांनीं असें शपथपूर्वक वचन दिलें पाहिजे कीं, आपलें काम पूर्णपणें फत्ते होईपर्यंत आपण आपली समशेर म्यानांत घालणार नाहीं." तो ह्मणतो, "हलके हलके राष्ट्र एकवट करण्याचें वचन मला नको. असली तड-जोड आपल्या कामाची नाहीं. आज डचीजसाठीं युद्ध करूं, उद्यां आणखी एखाद्या प्रांतासाठीं लढूं; पोप मेल्यावर आणखी एखादा घेऊं; व दोन तीन वर्षें दम खाऊन नंतर व्हेनिससाठीं तरवार उपसूं, असल्या चाळ-वण्या उपयोगी नाहींत. आज पहिलें काम हें कीं, मध्य इतालींत राज्यक्रांती करविली पाहिजे. राजानें उघडपणें मध्य इतालीशीं एकी करून तो प्रांत आपल्या राज्यास जोडला पाहिजे. तसें होत नसेल तर तुमचें आमचें पटावयाचें नाहीं. माझी खात्री आहे कीं, पीडमॉन्टमधील व इतालींतील हत्यारबंद लोकांच्या अंगीं ही क्रांती घडवून आणण्यास पुरेसें सामर्थ्य आहे, आणि ह्मणूनच मी असा आग्रह धरितों. दक्षिणेमध्यें राज्यक्रांती करण्यास अवकाश लागणार नाहीं. तसें झालें ह्मणजे, नेपल्समध्यें हल्लीं तयार असलेलें सैन्य, सिसिलींतील फौज, पीडमॉन्ट, लांबर्डी आणि मध्य इताली ह्यांत सशस्त्र होऊन उठलेले लोक, व इतकी सगळी तयारी झाल्यावर आपणास आणखी जे लोक येऊन मिळतील ते, इतकें सर्व सैन्य एकत्र झाल्यावर राजाजवळ पांच लक्ष शिपाई होतील. शिवाय आरमारही त्याला मिळेलच. ह्या सर्व गोष्टी समजणारा एकही मनुष्य महाराजांच्या पदरीं नसेल, तर तुह्मी आह्मी एकत्र होऊन कांहीं उपयोग नाहीं. ज्यानें त्यानें एकट्याच्यानें होईल तें करावें. दक्षिणेंत बंड उठविणें अतिशय सोपें आहे. तें सुरू करण्यास पीडमॉन्टची मदत नको. आह्मीच तें काम उरकून

टाकूं." माझिनीनें आणखी असें ह्मटलें होतें कीं, इतालीची एकी व्हावी अशी राजाची जर खरोखरीच इच्छा असेल, तर मध्य इतालींतील लहानसहान संस्थानिकांस त्यानें असा निरोप पाठवावा कीं, हद्दपार होऊन त्या संस्थानांत आश्रय करून राहिलेल्या इतालियन लोकांचा त्यांनीं छळ करूं नये; व त्यांस अटकेंत ठेवूं नये; व ग्यारिबॉल्डीस असें सुचवावें कीं रोमन संस्थानें व नेपल्स ह्यांमधील सरहद्द ओलांडून जाण्यास त्यास आपण हरकत करणार नाहीं; व आस्ट्रिया आड आल्यास आपण ग्यारिबॉल्डीस मदत करूं. हा बेत राजास पसंत झाला तर तो आपण अगदीं गुप्त ठेवूं, व त्यासंबंधानें एक अक्षरही बाहेर बोलणार नाहीं. त्यानें आणखी असेंही लिहिलें होतें कीं, नेपल्सकडे जातांनां ग्यारिबॉल्डीनें रोमन लोकांची सरहद्द ओलांडली ह्मणजे सिसिलींत एकदम बंड उठणार आहे. परंतु राजाची मर्जी तशी असल्यास तें बंड आधींच घडवून आणण्याचा आपण पतकर घेतों, कीं जेणेंकरून सरहद्द ओलांडून जाण्यास ग्यारिबॉल्डीस बाह्यत: कारण मिळेल. माझीनी लिहितो "ग्यारिबॉल्डी आब्रुझाय येथें पोहोंचल्याबरोबर नेपल्समध्यें दंगा उसळणार, व तो प्रांत पीडमॉन्टच्या राज्यास जोडण्याची लोकांकडून मागणी होणार, ही गोष्ट निश्चित आहे. ती मागणी राजानें विलंब न लावतां कबूल केली पाहिजे. येणेंप्रमाणें सर्व इताली देश पीडमॉन्टला काबीज करितां येईल, व ह्या शतकांतील एक महाकारस्थानी पुरुष ह्मणून राजाचें नांव अजरामर होईल." शेवटीं तो लिहितो कीं, "ह्या गोष्टी राजास कबूल असतील तर आह्मी एकत्र होऊन सर्व गोष्टींची एकदम व्यवस्था लावतों; नाहींपेक्षां समक्ष भेटण्यांत कांहीं हंशील नाहीं. माझ्यानें जें कांहीं होईल तें करण्याचा माझा निश्चय झाला आहे, आणि तो कधींही ढळावयाचा नाहीं."

हें पत्र लिहिणारा जो माझीनी त्याच्या मस्तकावर ज्याला त्यानें हें पत्र लिहिलें त्या राजानें दिलेली मरणाची शिक्षा अद्यापपर्यंत लोंबकळत होती, व त्याच्याच मुलुखांत तो लपूनछपून फिरत होता. ह्या गोष्टीवरून सिद्ध होतें कीं, माझिनीची लोकांवर जी विलक्षण छाप होती तीमुळें पीडमॉन्टच्या राजास इतालीचें ऐक्य करण्यासाठीं आपल्या मनांत नसतांही प्रयत्न करावे लागत होते. वास्तविक ह्मटलें तर ह्यांत राजाचाच स्वार्थ होता. तरी हें साहस करण्यास धैर्य न होऊन आतां काय करावें अशा विचारांत

तो पडला आहे, तोंच पुनः प्रधानमंडळ बदलून कॅव्होरच्या हातीं राज्यसूत्रें आलीं. त्यानें लागलींच नेपल्समधील ब्रॉम्बा आणि ‘थोर व उदार दोस्त’ नेपोलियन ह्यांच्याशीं इतालीचे तीन भाग पाडण्याविषयीं कारस्थान चालविलें. हे भाग कसे पाडावयाचे होते त्यांविषयीं पूर्वीं लिहिण्यांत आलेंच आहे. हें कारस्थान सुरू झालें, तसे माझिनीशीं झालेले सर्व करार मोडून टाकण्यांत आले.

लोकांच्या अंगांत वीरश्री चढून ते ‘युद्ध’ ‘युद्ध’ करीत होते; तेव्हां ग्यारिबॉल्डीच्या फौजेस फांटा देऊन राजास लोकमताचा उघडपणें अव्हेर करितां येईना; व तें सैन्य खडें असल्यामुळें, राजा कांहीं तरी करील अशी ज्यांची पूर्ण श्रद्धा होती ते आपली आशा सोडीनात. राजाचे विचार लोकांपेक्षां माझिनीस अधिक चांगले माहीत होते, ह्मणून पूर्वीं राजास सुचविलेले बेत आतां माझीनी आग्रहपूर्वक ग्यारिबॉल्डीच्या मनांत भरवूं लागला. ग्यारिबॉल्डीला आपल्या सल्ल्याप्रमाणें करावयास लाविलें, ह्मणजे व्हिक्टर राजास पुनः आपल्या पक्षाकडे यावयास लावूं, किंवा तो न आल्यास त्याची वाट न पाहतां लोक स्वतंत्रपणेंच आपला मार्ग आपण बघतील असें करूं, असें त्याला वाटत होतें. बंड करून दक्षिणेवर स्वारी करण्याची कल्पना नेमस्तपक्षाच्या लोकांपैकींदेखील कांहीं लोकांस पसंत पडली. पण त्यांनीं अशी अट घातली कीं, हा सर्व बेत माझिनीनें रचिला आहे तरी आपलें त्यांत अंग आहे असें त्यानें दाखवितां कामा नये; कारण माझीनी प्रजासत्ताक मताचा आहे असा डांगोरा पिटलेला असल्यामुळें, त्याचें नांव पुढें येतांच नेपोलियन आडवा आल्याशिवाय राहणार नाहीं. स्वतःचें नांव गाजविण्याची हाव माझिनीला मुळींच नव्हती. त्यानें ग्यारिबॉल्डीस उत्तर धाडिलें, त्यांत दक्षिणेमध्यें आपण कितपत तयारी केलेली होती ती लिहून, त्या कामाचा पुढाकार घेण्याविषयीं ग्यारिबॉल्डीस आग्रह केला, व असें वचन दिलें कीं जर तें कार्य सफळ झालें, तर तो सगळा बेत आपण रचिलेला असल्याविषयीं आपण अवाक्षरही बोलणार नाहीं, व सर्व यश ग्यारिबॉल्डीस देऊं; परंतु यदाकदाचित तें सफळ नच झालें, तर अपयशाचें खापर आणि लोकांचा उपहास आपण आपल्या शिरीं घेऊन त्या स्वारीची कल्पना मनोराज्य हाकण्यांत गर्क असलेल्या माझिनीच्या मेंदूंतून निघाली होती असें

लोकांस ह्मणूं देऊं. ग्यारिबॉल्डीनें ह्या सर्व गोष्टी लेखीं कबूल केल्या. हा बेत गुप्त ठेवण्याविषयीं वचन दिलेलें असतांही दुर्दैवाच्या प्रेरणेनें माझिनीनें तो गुप्तपणें राजास कळविला, व आपल्या नेहमींच्या कपटी स्वभावास अनुसरून तो आपणास पसंत आहे असें राजानें वरकरणीं दाखविलें. सेनापति ग्यारिबॉल्डीनें दुसरे दिवशीं कूच करण्याविषयीं सैन्यास हुकूम सोडिल्यानंतर त्यास राजाकडून एक खासगी तार आली; तेव्हां माझीनी आणि आपल्या हाताखालील फौज ह्या दोघांचीही पर्वा न करितां ग्यारिबॉल्डी रातोरात गोटांतून पसार झाला. त्याच्या हाताखालील दोघां कर्नलांस, ह्यानंतर लवकरच राजानें सेनापतीच्या हुद्यावर नेमिलें.

राजेलोकांनीं विघ्नें आणिलीं, व लोकांनीं वचनभंग आणि कृतघ्नपणा अनेक वेळां केला, तरीही त्यांना ज्यानें जुमानिलें नाहीं तो माझीनी ग्यारिबॉल्डीनें विश्वासघात केला ह्मणून थोडाच डगमगणार होता ? त्यानें आपल्या देशबांधवांस त्यांच्या कर्तव्याचा मार्ग दाखवून देण्याचा क्रम एकासारखा सुरू ठेविला होता. माझिनीशीं कोणीं अन्यायाचें किंवा विश्वासघाताचें वर्तन केलें ह्मणजे, ज्यांचा त्याशीं निकट संबंध होता त्यांस मात्र त्याच्या हास्यांत खिन्नतेची बरीच झांक दिसून येत असे, एवढाच काय तो त्याच्यांत फरक होत असे. माझिनीचे प्रतिनिधी दक्षिण देशांत पुष्कळ दिवस फिरलेले होते, त्यांच्या सांगण्यांत, स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं लढाई करण्याला सिसिलीची तयारी इतर प्रांतांपेक्षां अधिक आहे, असें आल्यावरून त्यानें सिसिलीमधील बंडाचा पुढाकार घेण्यास रोझॅलिनो पायलो नांवाच्या गृहस्थास तिकडे रवाना केलें. पायलो हा सिसिलीमधील एका थोर घराण्यांतील गृहस्थ असून त्यास माझिनीकडून लोकसत्ताक मताचा संस्कार झाला होता, व माझिनीचें त्याजवर अत्यंत प्रेम असे. कॉड्रिओ नांवाचा असाच एक दुसरा लोकसत्ताक पक्षाचा गृहस्थ होता. तो अत्यंत दीर्घोद्योगी स्वार्थत्यागी आणि देशैकनिष्ठ होता. पायलो व काड्रिओ ह्या दोघांनींही ह्यापूर्वी सिसिलींतील बंडाचें अग्रेसरत्व पत्करण्यास ग्यारिबॉल्डीचें मन वळविण्याविषयीं आपली पराकाष्ठा केली होती. परंतु त्यानें त्यांचा धिःक्कार करून उत्तर दिलें कीं दक्षिणेंतील बंड ह्मणजे माझिनीच्या स्वप्नसृष्टींतली गोष्ट आहे. अखेर रोझॅलिनोनें जेव्हां त्यास निक्षून कळविलें कीं तुह्मी या अगर नका येऊं, पण बंड करण्याचा माझा निश्चय

झाला आहे तो कधींही फिरावयाचा नाहीं, तेव्हां ग्यारिबॉल्डीनें वचन दिलें कीं जर तुह्मीं बंड करून आठ दिवसपर्यंत टिकाव धरिला, तर आपण त्या मसलतींत सामील होऊं. हें ऐकतांच तो तरुण लोकसत्ताभिमानी क्षणाचाही विलंब न करितां निघाला. त्याची युद्धसामुग्री काय ती कांहीं हजार फ्रान्क व माझिनीनें पैदा करून दिलेलीं थोडीशीं पिस्तुलें एवढीच होती. आपल्या सिसिलियन देशबांधवांची त्यास चांगली माहिती होती. त्यांनीं बंड करण्याचें वचन दिलें होतें, व तें प्राणांतींही ते पाळते.

पायलोनें पुढाकार घेऊन जें बंड उभारावयाचें होतें तें तारीख ३ एप्रिल रोजीं पालर्मो शहरीं व्हावें असें ठरलें होतें. प्रवासांत समुद्र तुफान झाल्यामुळें पायलो यास ११व्या तारखेपर्यंत तिकडे जातां आलें नाहीं. तरी लोकांनीं ठरलेल्या दिवशीं बंड उभारलें. पायलो तेथें जाऊन पाहतो तों शहरांत बंडवाल्यांचा मोड होऊन शांतता झालेली; परंतु गांवढ्यांतील लोकांचा बंडावा अद्याप चालूच होता. लागलींच लोकांचें आधिपत्य त्यानें आपल्याकडे घेतलें, निराश झालेल्या लोकांस प्रोत्साहन दिलें, व राजाच्या सैन्याचा प्रत्येक झटापटींत मोड केला. आपल्यापेक्षां शत्रु पुष्कळपटीनें भारी असतांही बंडवाल्यांची बाजू त्यानें ग्यारिबॉल्डीस वचन दिल्याप्रमाणें केवळ आठ दिवस नव्हे तर सहा आठवडेपर्यंत राखिली. अखेर विजयश्री त्यास माळ घालणार अशा ऐन वेळीं बंदुकीची गोळी लागून तो ठार झाला. बॉम्बा राजाच्या सैन्याचा त्यानें एका घनघोर संग्रामांत पूर्ण पराजय केला होता. अंतकाळ समीप येऊन ठेपला असतांही त्याची मुखचर्या किंचितही म्लान झाली नव्हती. उलट, त्याला ग्यारिबॉल्डी सिसिलींत आल्याची बातमी अगदीं अंतकाळीं कळली असल्यामुळें, ती प्रसन्न आणि हास्ययुक्त होती.

# भाग ६ वा.

नेपल्स येथील राज्यक्रांति—राजाचीं कारस्थानें—व्हेनिसच्या वतीनें काढिलेलें विनंतिपत्र—राजाचीं आणखी कांहीं कारस्थानें—आस्ट्रियाशीं युद्ध—मेंटाना—माझिनीचीं पत्रें—विश्वासघात—गाएटा—माझिनीचा मृत्यु.

कॅव्होर आणि नेमस्तपक्षाचे लोक यांनीं सिसिलींतील बंडवाल्यांना उघडपणें दोष दिला होता. रोझालिनो आणि पायलो यांच्या मदतीला ग्यारिबॉल्डीला न जाऊं देण्याविषयीं त्यांनीं आपली शिकस्त केली होती, इतकेंच नाहीं, तर आपल्या सैन्यानिशीं सिसिलींत जाऊन पोंचल्यावर आपण पुन: सैन्यासह परत येऊन नेपल्सवर चाल करणार नाहीं असें वचन देण्याविषयीं त्याचें मन वळविण्याचा हरप्रयत्न केला होता. राजानें त्याला याविषयीं स्वदस्तुरचें पत्र लिहिलें होतें असें ह्मणतात. पण त्यांची ही खटपट फुकट गेली. सिसिलींत एकामागून एक जय मिळवून ग्यारिबॉल्डीनें जलमार्गानें येऊन नेपल्सच्या किनाऱ्यावर पाय ठेविला, त्याबरोबर त्याचें नांव ऐकूनच बॉम्बा राजा पळाला. ग्यारिबॉल्डीनें दक्षिण राजधानी नेपल्समध्यें प्रवेश केला, तेव्हां लोकांनीं उत्साहपूर्वक त्याचें स्वागत केलें. नेपल्सला स्वतंत्र करण्याकरितां त्याला हात देखील हालवावा लागला नाहीं. इकडे अशी हकीकत घडलेली पाहून नेमस्तपक्षाच्या लोकांनीं आपलें सुकाणू फिरवून असें प्रसिद्ध केलें कीं, राजाच्या संमतीनें हा सगळा घाट कॅव्होरनेंच* रचलेला आहे. तसेंच नेपल्सचें राज्य पीडमॉंटच्या राज्याला जोडण्याची व्यवस्था करण्याकरितां त्यांनीं आपले विश्वासू मनुष्य तिकडे पाठविले.

---

* ग्यारिबॉल्डीचे जे लेख प्रसिद्ध झालेले आहेत त्यांत तो स्पष्ट लिहितो कीं राजपक्षाकडून आपणाला आपल्या स्वारीकरितां कांहीं मदत मिळाली नाहीं. एवढेंच नाहीं, तर उलट त्यानें आपल्या मार्गांत आणतां येतील तितक्या अडचणी आणून ठेविल्या. सार्डिनियन मतदारांस लिहिलेल्या पत्रांत राजाच्या प्रधानांविरुद्ध त्यानें भयंकर आरोप स्पष्टपणें नमूद केले आहेत. राजाचें नांव त्या पत्रांत नाहीं खरें; पण इतालियन भाषेंत ह्मण आहे आहे कीं, घोड्याला थोपटण्याची ज्याच्यांत हिंमत नाहीं तो खोगीरच बडवीत सुटतो.

इकडे माझीनी लपून छपून राहून राज्यक्रांती घडवून आणण्याकरितां मनुष्यांची आणि युद्धोपयोगी सामानाची सिद्धता करीत होता. सर्व इताली देशावर त्याची प्रीति सारखीच होती; आणि आपल्या जन्मभूमीबरोबरच नेपल्स, व्हेनीशिया, ट्रेंटिनो आणि पोपाच्या अंमलाखालील प्रांत यांनीं स्वातंत्र्यानुभव घ्यावा असें त्यास वाटत होतें. दक्षिणेंतील लोकांत स्वातंत्र्याची आवड उत्पन्न झाली होती; शिवाय तिकडे ग्यारिबॉल्डीसारखा पराक्रमी पुरुष आपले स्वयंसेवक घेऊन गेला होता; तेव्हां त्या प्रांतांना स्वातंत्र्यसंपादनार्थ आपण विशेष मदत करण्याची गरज नाहीं असें समजून, जिनोआ येथील कांहीं मंडळीच्या साह्यानें त्यानें ज्या तीन लढाऊ टोळया तयार केल्या होत्या, त्यांनीं पोपाच्या अंमलाखालील लोकांना मदत करण्यास जावें, असें त्यानें ठरविलें होतें; पण सरकारानें त्याच्या वाटेंत कांहीं अडचणी आणून उभ्या केल्यामुळें, आणि त्या शिपायांनाही, ग्यारिबाल्डी नामांकित सेनापति आहे तेव्हां त्याच्याच हाताखालीं काम करण्यास जाऊन आपण लढाया माराव्या, तो नसेल तेथें यशापयशाच्या संशयांत आपण कशाला जाऊन पडावें, असें वाटत असल्यामुळें, हें सर्व सैन्य माझिनीला दक्षिणेंतच ग्यारिबॉल्डीच्या साह्यार्थ पाठवावें लागलें. याप्रमाणें, सरकाराची मदत मिळाली नसतां, इतालियन स्त्रियांचा व पुरुषांचा देशाभिमान जागृत करून माझिनीनें ग्यारिबॉल्डीच्या साह्यार्थ शस्त्रें, आगबोटी, आणि वीस हजार सैन्य इतकी लढाईची सामग्री पाठवून दिली; आणि नंतर रोमन संस्थानांवर स्वारी करण्याकरितां चवथी तुकडी तयार करून तींत अंमलदार व शिपाई मिळून आठ हजार लोक सशस्त्र जमा केले. हें सैन्य त्या प्रांतांत शिरल्याबरोबर तेथील लोक सशस्त्र नव्हते तरी बंड करून उठण्यास तयार होते.

ग्यारिबॉल्डीला नेपल्स येथील लोकांनीं डिक्टेटर नेमिलें होतें. त्याला स्वारीचा हा बेत पसंत पडला. लोकसत्ताकपक्षाचा झेंडा उभारावयाचा नाहीं असें वचन या स्वारींतील प्रत्येक लष्करी अंमलदारापासून घेतलेलें असल्यामुळें नेमस्तपक्षांतील अत्यंत वजनदार मंडळी तसेंच टस्कनींतील व जिनोआ येथील अधिकारी, देशांतील अंतर्व्यवस्थाखात्याचे मुख्य प्रधान, आणि खुद्द नेपल्सचा राजादेखील या योजनेंत सामील झाले. राजा तर लष्करी अंमलदारांपैकीं एकाबरोबर बराच वेळ बोलतदेखील बसला

होता. लामॉरिसायेर हा पोपच्या सैन्यावरील सेनापति होता, व त्या सैन्यांत युरोपांतील प्रत्येक देशांतले थोडेसे धर्मवेडे लोक भरले असून त्यांच्यांत जूट मुळींच नव्हती. अशा सैन्यावर कटांतील मंडळीस जय मिळण्याची खात्रीच होती. माझिनीचा असा विचार होता कीं कटवाल्यांना जय मिळून पोप एकदां पूर्ववत् पळाला, ह्मणजे रोमन लोकांनीं आपल्या नूतनप्राप्त स्वातंत्र्याचें संरक्षण करावें, व जयशाली स्वयंसेवक सैन्याला बरोबर घेऊन व्हेनिस शहरास दास्यमुक्त करण्याकरितां ग्यारिबॉल्डीनें तिकडे चालतें व्हावें.

राजानें सर्व गोष्टी कबूल केल्या; पण पुनः दोन तासांनीं त्याचा बेत फिरून त्यानें सैन्यावरील अंमलदारांस तळ न हालवण्याबद्दल स्वदस्तुरचें पत्र लिहून हुकूम सोडले. पत्र घेऊन जाणाऱ्या जासुदाला तें सेनापतीला दाखवावें मात्र, पण तें त्याच्या हातींदेखील देऊ नये अशी ताकीद होती. टस्कनीच्या गव्हर्नरानें पूर्वी जाहिरपणें स्वयंसेवक जमविण्याचें व त्यांना कवाईत शिकविण्याचें काम फ्लॉरेन्सपासन थोड्याचे मैलांवर चालूं दिलें असतां आदले दिवशीं एकदम हरकत केली, व राजाच्या सैन्याच्या तोफा त्यांजकडे रोंखून त्यांस नेपल्सकडे कूच करण्यास लाविलें. नेपल्स-मध्यें ग्यारिबॉल्डीस पूर्ण जय मिळाला असल्यानें तेथील लोकांच्या इच्छे-आड येण्याची कोणाची छाती नव्हती. तेव्हां ग्यारिबॉल्डीच्या जयाचा स्वतःला फायदा करून घेण्याचें मनांत आणून, आपले सेनापती मेडिसाय, विक्सिओ, आणि कोसेन्झ ह्यांस नेपल्समध्यें पाठवून तिकडील लढाईची व्यवस्था आपल्या हातीं घेण्यास राजानें त्यांस हुकूम दिला. राजाचा कावा असा होता कीं (माझीनी ही गोष्ट त्या वेळीं उघड बोलून दाखवीत असे) लोकांनीं केलेल्या प्रत्येक चळवळीस मोडता घालण्याचा यत्न करावयाचा, परंतु जेव्हां लोकपक्षाला एखादा जय मिळेल तेव्हां मात्र स्वतःचें राज्य वाढविण्याची संधी फुकट जाऊं द्यावयाची नाहीं. आपण केलेल्या वि-श्वासघातकी वर्तणुकीसंबंधानें टस्कनीचा गव्हर्नर रिकॅसोली यानें मागाहून असा खुलासा दिला कीं, स्वयंसेवकांस कवाईत शिकवून हत्यारबंद करण्यांत माझिनीचा हेतु रोमन संस्थानांस स्वतंत्र करण्याचा नसून प्रजासत्ताक राज्य स्थापण्यासाठीं राज्यक्रांती सुरू करावयाची असा अस-ल्याविषयीं आपल्यास बातमी लागली होती.

माझिनीनें एक अनावृत पत्र लिहून राजनिष्ठांस कळविलें कीं, 'तुह्मी व आह्मी मिळून ह्या कामास हातभार लावूं या. तुम्हांस भीति कशाची वाटते? आह्मीं प्रजासत्ताक राज्य स्थापूं ह्मणून होय? तर मी सांगतों कीं त्याजबद्दल तुह्मी अगदीं काळजी करूं नका. आह्मी तुम्हांस नाहीं कां सांगितलें कीं, प्रजासत्ताक राज्य स्थापण्याविषयीं खटपट करण्याचें जर आमच्या मनांत आलें तर त्याबद्दल तुह्मांस आगाऊ सूचना मिळेल. तुम्हांस असें वाटतें का कीं, एखादी जागा पटकाविण्यासाठीं हे सर्व 'उरीं डोंगर आणि पुरीं कांटे' आह्मीं घेतले आहेत? छे, तुह्मांस तर पक्कें माहीत आहे कीं सर्व इताली देश एकछत्री झाल्याबरोबर आह्मी आपण होऊनच देश सोडून जाऊं. आह्मांस वाहवा मिळवावयाची आहे असें तुह्मांस वाटत असेल, तर तसेंही नाहीं. तुह्मांस ठाऊक नाहीं काय, कीं आह्मी सर्व खटपटी गुप्त रीतीनें केल्या, व कधीं आपलीं नांवेंदेखील बाहेर पडूं दिलीं नाहींत?' पुढें तो ह्मणतो, 'लुई नेपोलियनच्या ओंजळीनें पाणी पिण्याचा आपला आग्रह जर तुह्मी सोडणार नाहीं, तर मात्र आमचा निश्चय नीट कान उघडून ऐका—देह जावो किंवा राहो, आह्मी तुह्मांस कधींही हार जाणार नाहीं.'

'आमच्या अंगांत सामर्थ्य आहे, आणि त्याचा उपयोग करण्याचा आह्मीं निश्चय केला आहे. लोकांचा स्वाभाविक कलही आमच्यासारखाच आहे. एका ठिकाणीं तुह्मी आमचा मोड कराल, तर आह्मी दुसऱ्या ठिकाणीं उठूं; आह्मी सगळा इताली देश निश्चयानें एकवट आणि एकछत्री करणार. तुमचाही हा बेत असल्यास जेथें तुमचा पाय, तेथें आमचें डोकें. तसें तुह्मांला कबूल नसल्यास आमचा निश्चय पार पाडण्यास आणि देशसेवा बजावण्यास आह्मी कधींही माघार घेणार नाहीं. तुह्मी आमचे लेख जप्त कराल ना? करा. तुह्मी इतके भेकड आहां कीं हा लेखदेखील तुह्मी जप्त कराल. मग आह्मांस गुप्त छापखान्यांच्या द्वारें लोकांस स्वकर्तव्य दाखवून द्यावें लागेल. पाहिजे तर तुह्मी आह्मांस बंदीखान्यांत टाका. आमच्या जागीं तुमचे काका दुसरे उभे राहतील. ईश्वराच्या मनांत एखादी गोष्ट घडवून आणावयाची असली ह्मणजे तो एक पुढारी कारागृहांत गेला किंवा मृत्यु पावला तर, पहिल्यासही मागें सारील असा दुसरा पुढारी उभा करितो. आमचा देश आह्मी आपलासा करणार. ईश्वराच्या आणि लो-

कांच्या मनास जी गोष्ट आली, तीस विघ्नें आणण्याची तुमची काय बिशाद आहे?' असेंही आणखी त्यानें लिहिलें आहे.

रोमन संस्थानांमध्यें बंडास सुरुवात झाली, व तें मोडण्यासाठीं कार्मारिसायेरि ह्याच्या हाताखालील पोटबाबू शिपायांनीं पेरूजिया वगैरे ठिकाणीं आपल्या दुष्टपणाची कमाल करून सोडिली त्यायोगानें सर्व इताली देश खवळून गेला. ही गडबड पाहून राजाचेंदेखील धाबें दणाणलें. दगा होऊन फशीं पडलेल्या लोकांचा एकच हाहाकार उसळला. त्याबरोबर इतालींतील सर्व देशभक्तांनीं त्या अनाथांच्या तर्फे ग्यारिबॉल्डीची मदत मागितली. नुकत्याच पदच्युत झालेल्या नेपल्सच्या राजाची सर्व संपत्ति ग्यारिबॉल्डीच्या मुठींत होती. ती सर्व जुलुमाखालीं जेर झालेल्या आपल्या देशबांधवांस मुक्त करण्याच्या कामीं खर्च करण्याचा त्यानें निश्चय केला. ग्यारिबॉल्डीनें एक जाहिरनामा काढून रोम शहरावर एकदम हल्ला करण्याचा आपला विचार प्रगट केला. हा जाहिरनामा पाहून राजानेंही हातपाय हालविण्याचा निश्चय केला. बंडावलेले प्रांत आपल्या ताब्यांत घेतले नाहीं तर लोक त्यांस स्वतंत्र राज्यव्यवस्था लावून देतील, असें त्यास उघड दिसूं लागलें. नेमस्तपक्षाच्या वर्तमानपत्रकारांनीं ही संधी साधून राजाच्या इताली देशाविषयींच्या कळकळीचे गोडवे गाण्यास प्रारंभ केला. परंतु या राजाच्या तीर्थरूपांनीं सन १८४८ सालीं जसें केलें होतें, तसे आतां या राजानें युरोपांतील सर्व सरकारांस आपले अंतस्थ हेतु कळवून ठेविले होते. ह्या 'शौर्यशाली व युद्धपटु इतालीकर समशेर बहादुराचा' स्तव करण्यांत बाहेरदेशांतील वर्तमानपत्रें व इतालींतील नेमस्तपक्ष ह्यांजमध्यें चढाओढ लागली, परंतु हें त्याचें शौर्य स्वाभाविक नसून केवळ भीतिप्रयुक्त होतें. फ्रेंच प्रधान टालेरां ह्यास कॅव्होरनें लिहिलें होतें कीं, 'ग्यारिबॉल्डीच्या आधीं जर आह्मीं कॅटोलिकामध्यें जाऊन पोंचलों नाहीं तर आह्मी बुडालों असें समजा. बंडखोर लोक मध्य इतालीवर स्वारी करण्यास चुकावयाचे नाहींत, आणि हातपाय हालविल्याखेरीज आतां आह्मांस गत्यंतरच नाहीं.' फ्रेंच प्रधान थुव्हेनल ह्याच्या वटपत्रांत असें लिहिलें आहे कीं, 'बंडखोर लोक विजयी होऊन त्यांचा पुढाकार ग्यारिबॉल्डीनें घेतला असल्यामुळें सार्डिनियाच्या महाराजांवर जो भयंकर प्रसंग येऊन गुदरला आहे, त्यासंबंधाची हकीकत सीनिअर फेरिमाय ह्यानें बाद-

शहांस कळविली आहे. ग्यारिबॉल्डीस कोणाकडूनही अडथळा न होतां तो रोमन संस्थानांतील लोकांत बंड उत्पन्न करून सरहद्दीकडे जाण्याच्या अगदीं तयारींत आहे, व तो सरहद्द ओलांडून गेला ह्मणजे व्हेनिसवर स्वारी करण्याला त्याला कोणाकडूनही अडथळा होणार नाहीं. हें अरिष्ट टाळण्याचा आतां एकच मार्ग आहे. ग्यारिबॉल्डीच्या येण्यानें कांहीं गडबड होते न होते तोंच अंब्रिया प्रांतांत टयूरिन येथून लोक पाठवून पोपच्या अंमलास धक्का न पोंचवितां शांतता करणें, जरूर पडल्यास नेपल्सच्या हद्दींत राज्यक्रान्तिवाल्यांशीं सामना करणें, आणि इतालीची राज्यव्यवस्था लावण्यासाठीं राष्ट्रीयसभा भरविणें, हाच काय तो एक मार्ग राहिला आहे.

माझिनीला ह्या सर्व गोष्टी कळल्यावर त्यानें ग्यारिबॉल्डीस* एक पत्र लिहिलें कीं, तीन आठवडयांच्या आंत जर तुम्हीं रोम किंवा व्हेनिसकडे कूच केला नाहीं; तर तुम्हीं आरंभिलेल्या कार्याची इतिश्री झालीच ह्मणून समजा. हें पत्र लिहिल्यावर माझीनी स्वतः टस्कनी सोडून ताबडतोब नेपल्समध्यें गेला; परंतु त्याची सर्व खटपट निष्फळ झाली. ग्यारिबॉल्डीनें आरंभलेल्या कामाची समाप्ति झाल्यासारखीच होती. त्याच्याभोंवतीं जमलेली मंडळी सर्व राजपक्षीय होती; व ते अडाणी लोकांस भर देऊन त्यांस माझिनीविरुद्ध चिथवीत होते. पोपच्या कचाटींतून रोम सोडविण्याच्या बाता ह्मणजे नुसता एक आडपडदा आहे; व त्याच्या साह्यानें माझीनी तुमच्या डोळ्यांत धूळ टाकूं पाहत आहे; पण त्याचा अंतस्थ हेतु डिक्टेटरशिप मोडून टाकून तिच्या जागीं प्रजासत्ताक राज्य

---

* ह्या वेळीं कॉड्रिओ, केटेनिओ, साफी, बर्टानी, इत्यादि ठळक ठळक देशभक्तांनीं देशहिताचें कार्य राजपक्षावरच न टाकितां आपण स्वतः तडीस न्यावें ह्मणून ग्यारिबॉल्डीचें मन वळविण्याची शिकस्त केली होती; परंतु तिचा कांहीं उपयोग झाला नाहीं. कदाचित् त्यानें लोकांच्या ह्मणण्यास मान दिला असता, परंतु माझिनीच्या विचारानें एखादें काम करावें असें असें त्याला मुळींच वाटेना. माझिनीची इभ्रत आणि बुद्धीचें तेज ह्यांपुढें आपण फिके पडून जाऊं अशी त्याला नेहमीं भीति वाटे. ह्यानंतर पुष्कळ वर्षांनीं म्हणजे १८६९ सालीं जेव्हां पीडमॉन्टमधील एका तरुण देशभक्तानें ग्यारिबॉल्डीस माझिनीचा निरोप कळविला कीं तो आपणास भेटूं इच्छीत आहे, (हा माझिनीचा त्याला शंभरावा निरोप असेल) तेव्हां ग्यारिबॉल्डीनें उत्तर दिलें कीं मी पाहिजे काय तें करीन; माझिनीची भेट मला घ्यावयाची नाहीं.

स्थापण्याचा आहे. तसें झालें तर युरोपांतील सर्व राजे तुमच्याविरुद्ध उठतील, व ते नेपल्सचें राज्य तुमच्या हातून घेऊन बाँबा राजास परत देतील. राजपक्षीय लोकांपैकीं जार्जिओ पालाव्हिसिनाय नांवाच्या एका प्रसिद्ध गृहस्थानें पूर्वी पदच्युत झालेल्या जुलमी राजाविरुद्ध बंड केलें असल्यामुळें नेपल्स येथील लोक त्यास फार मान देत असत. ह्या गृहस्थानें माझिनीवर शस्त्र धरण्याची फार नामी शक्कल काढिली. त्यानें माझिनीस उद्देशून वर्तमानपत्रांतून एक असें पत्र लिहिलें कीं, तुम्ही सर्व कांहीं मनःपूर्वक करीत आहां, व तुमच्यावर लबाडीचा आरोप आणण्यास मुळींच जागा नाहीं; परंतु तुह्मी प्रजासत्तावादी आहां असा बोभाटा फार झालेला आहे. तुह्मी येथें पाय ठेवल्याबरोबर जिकडेतिकडे झोटिंगबादशाही सुरू होण्याचें भय आहे; तरी तुमची आपल्या देशावर जर खरी प्रीति असेल तर त्याच्या हितासाठीं तुह्मी आपण होऊन देश सोडून जाऊन ती खरी करून दाखवाल.

ह्या पत्रांत जो विशेष हलकटपणा होता तो हा कीं, बाह्यतः जरी तें माझिनीस उद्देशून लिहिलें आहे असें दिसतें, तथापि वास्तविक पाहतां माझिनीस इतालींतून घालवून लावण्याविषयीं अधिकाऱ्यांस ती एका अर्थी सूचनाच होती. इतालींतील प्रत्येक संस्थानांत माझीनी हातीं लागल्यास त्यास देहांतशिक्षा देण्याचे हुकूम सुटलेले होते; व ते अद्याप रद्द झाले नव्हते. नेपल्सचा राजा पदच्युत झाल्यामुळें मात्र त्यास इतालीच्या त्या भागांत उघड रीतीनें फिरतां येत असे. पालाव्हिसिनाय ह्याच्या उपदेशाप्रमाणें इताली सोडून जाण्याचें साफ नाकारून त्यानें लिहिलें कीं, प्रजासत्ताक मतांचा प्रसार करणें हें मी आपलें आद्य कर्तव्य समजतों. ती गोष्ट एका बाजूस ठेवणें ह्मणजे, जन्मास येऊन जें एक काम करावयाचा मीं निश्चय केला होता तें सोडून देण्यासारखें आहे. परंतु राजा आणि त्याचें मंत्रिमंडळ ह्यांजविषयीं मला पूज्यबुद्धि आहे ह्मणून नव्हे, पण इतालीच्या एकीसाठीं, शांततेसाठीं,व बहुजनसमाजाची आज्ञा मानण्यासाठीं, (त्यास भ्रम झाला असून आपलें हितानहित कळत नाहीं तरीही ), आपल्या मनोदेवतेला दडपून ठेवून, राजसंस्था आपणास कबूल आहे असें मीं प्रसिद्ध रीतीनें सांगितलें; इतकेंच नाहीं, तर जोंपावेतों इतालीची एकी करण्याच्या कामीं राजा हातभार लावील तोंपावेतों त्यास मदतही करण्यास मी तयार होतों.

आणखी मीं असेंही कळविलें होतें कीं, लोकसत्ताक मतांचा प्रसार करण्याचें काम पुन्हां हातीं घेणें हें माझें कर्तव्य आहे असें जेव्हां मला पुनः वाटेल, तेव्हां मी आपला मनोदय खुल्या दिलानें आणि स्पष्ट रीतीनें माझ्या शत्रूंस आणि मित्रांस कळवीन. ह्यापेक्षां जास्त कांहीं मला ह्मणतां येत नाहीं, व याहून अधिक स्वार्थत्याग मी करणारही नाहीं. जर तुमच्यासारख्या प्रामाणिक लोकांचा माझ्या शब्दावर विश्वास असेल, तर माझें मन वळविण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां माझ्या शत्रूंची खात्री तुह्मीं करून दिली पाहिजे, कीं हल्लीं चालू असलेला झोटिंगबादशाहीचा प्रकार माझ्या वर्तनानें नव्हे, तर त्यांच्याच हेकेखोरपणामुळें घडून आलेला आहे. तीस वर्षेंपर्यंत ज्यानें सतत देशहितासाठीं आपला देह झिजविला आहे, हल्लींच्या आपल्या आक्षेपकांस ज्यानें एकीचा पहिला ओनामा शिकविला, व ज्याच्या जिव्हेस आजपावेतों असत्याचा विटाळ झालेला नाहीं अशा गृहस्थावर जर त्यांचा भरंवसा नसेल तर त्यांच्यावर तरी कोणीं भरंवसा ठेवावा? *

माझिनीनें पालाव्हिसिनाय ह्यास ह्याप्रमाणें उत्तर देऊन शांततेनें आपला नेहमींचा क्रम सुरू ठेविला. त्याचा असा स्वभावच बनून गेला होता कीं, कर्तव्याशिवाय बाकीच्या गोष्टींचा भार ईश्वरावर टाकावयाचा. ‘माझीनी काळाच्या भक्ष्यस्थानीं पडो’ असे शब्द शहरांत भिंतीवरून

* ह्यानंतर कांहीं महिन्यांनीं माझिनीच्या जिनोआ येथील देशबांधवांनीं त्यास एक मानपत्र फार आदरपूर्वक पाठविलें. त्या वेळीं आजारी असतांही त्या मानपत्रास जबाब देतांनां माझिनीनें लिहिलें कीं ‘अमक्यानें अमुकच केलें’ असल्या व्यक्तिविषयक गोष्टी तुम्ही विसराल तर बरें. भविष्यकाळीं आपल्या देशाच्या हातून चांगली कामगिरी व्हावयाची आहे, असें माझें मन मला सांगत आहे. ती कामगिरी त्याच्याकडून चांगल्या तऱ्हेनें शेवटास जाईल अशाविषयीं आणि त्याच्या हिताविषयीं मात्र चिंता वाहत जा. हें अमक्याचें राज्य, तें तमक्याचें राज्य, हा भेद विसरा. युरोप खंडांतील निरनिराळ्या राष्ट्रांचा उदय करण्याचें महत्कार्य तुमच्या राष्ट्राकडून घडवून आणावें अशी ईश्वरी योजना आहे. देशजननीच्या अंकापासून भ्रष्ट होऊन विदेशांत भटक्या मारीत असतां मला मृत्यूनें गांठिलें तरी चिंता नाहीं; माझ्या नांवाचें तुह्मांला अजीबात विस्मरण झालें तरी हरकत नाहीं; पण हे देशबांधवहो, तो ईश्वरी नेमानेम पूर्ण करण्याच्या रस्त्यास लागलेले पाहून तुमचें अभिनंदन करण्याचा प्रसंग माझ्या अंतकाळीं तरी मला यावा एवढीच काय ती माझी इच्छा आहे.’

पाहून त्यानें हंसावें. लोकांविषयीं कुढेपणा त्याच्या मनांत कधींही येत नसे. त्याला ठाऊक होतें कीं लोकांकडून आपला अव्हेर अजाणपणानें होत आहे, आणि त्याचा दोष लोकांकडे नाहीं. ज्याच्या त्याच्या अनुकूलतेच्या मानानें त्याजवर कर्तव्याची जबाबदारी असते, ही गोष्ट राज्यकर्त्यांच्या मनावर ठसविण्याचा प्रयत्न तो प्रसिद्धपणें करीत होता. नेपल्स स्वतंत्र आहे व त्याच्या अंगीं सामर्थ्यही आहे, त्याअर्थी त्यानें आपल्या स्वतंत्रतेचा लोककल्याणाकडे उपयोग करून परतंत्र दशेंत असलेल्या इतालीच्या इतर प्रांतांस मदत केली पाहिजे; पीडमाँटच्या राजाचें सैन्य पोपच्या अंमलास धक्का न लावितां त्याच्या मुलखांत स्वस्थता मात्र करणार आहे तें बरोबर नाहीं; ग्यारिबॉल्डीकडे लोकांनीं आपलें आधिपत्य दिलें आहे, त्यानें हाताखालील फौजेसह रोम शहरावर चढून जाऊन धर्मसंबंधीं जुलमाचें माहेरघर होऊन बसलेल्या ठिकाणीं धर्मस्वातंत्र्याची स्थापना केली पाहिजे, अशा आशयाचा उपदेश त्यानें जाहिर रीतीनें चालविला होता. बुद्धि आणि वक्तृत्वशक्ति ह्यांचा प्रभाव पडल्यावांचून कसा राहतो ? इताली देशावर ज्यांचें खरें प्रेम होतें, त्यांचें मन ह्या निर्धास्तपणें प्रतिपादन केलेल्या खऱ्या गोष्टींकडे वेधलें. त्याच्या मतांचें मंडन करण्यासाठीं पुष्कळ वर्तमानपत्रें सुरू झालीं. तीं मतें अंमलांत आणण्यासाठीं पुष्कळ लोक आपण होऊन सिद्ध झाले, व माझिनीच्या राहत्या जागीं रात्रींच्या वेळीं गर्दी जमूं लागली. ग्यारिबॉल्डीवर लोकांचें प्रेम व विश्वास हीं होतीं. ती संधी साधून तो आपल्या हाताखालील फौज, आरमार, व स्वयंसेवक ह्यांसह जर रोमशहराची मुक्तता करण्याकरितां चालून गेला असता, तर त्यानें इतालीचें ऐक्य खचित केलें असतें. परंतु तें करण्याचें एकीकडे ठेवून त्यानें एकाएकीं नेपल्स प्रांत व्हिक्टर इम्यान्युअल राजास देऊं केला, त्यामुळें शहाण्या व समजूतदार लोकांच्या आशेचा अगदीं भंग झाला, व इतालीमध्यें धर्मस्वातंत्र्य स्थापित करण्याचें काम कालावधीवर पडलें. आपल्या खासगी शेतीवाडींतील ढोरांची जशी एखाद्यानें व्यवस्था करावी, त्याप्रमाणें नव्वद लाख लोकांच्या स्वातंत्र्याची मनसोक्त वाट लावून आपला डौल मिरविण्यासाठीं हा नाटकी प्रकार केल्यावर ग्यारिबॉल्डी केप्रेरा बेटामध्यें चालता झाला. या वेळीं युरोपखंडांतील क्षुद्रबुद्धि वर्तमानपत्रकारांनीं ग्यारिबॉल्डी हा ह्या युगामध्यें धर्ममूर्तीचा अवतार आहे अशीं मोठमोठीं विशेष-

णें देऊन त्याच्या स्तोत्रपाठाचा गजर चालविला होता. नेपल्स हा सुपीक प्रदेश इतालीचा एक मुख्य भाग असून त्यावर इतालियन राष्ट्राचा हक्क आहे ही गोष्ट ग्यारिबॉल्डी विसरला होता, किंवा तिजकडे त्यानें मुद्दाम दुर्लक्ष्य केलें हें समजत नाहीं. ग्यारिबॉल्डीच्या पक्षाचे लोक त्याच्यातर्फे अशी सबब पुढें आणितात कीं व्हिक्टर राजानें आपण स्वतः रोमवर फौज घेऊन जाण्याचें अंतःस्थ रीतीनें ग्यारिबॉल्डीस वचन दिलें होतें. व्हिक्टर राजाच्या वचनावर विश्वास ठेवणारा ग्यारिबॉल्डी मागील इतिहास पार विसरून गेला होता, असें जर मानतां येईल तर फार बरें होईल. तूर्त तरी आपल्या पक्षाला जय येईल अशी कांहीं अशा राहिली नाहीं, असें पाहून माझीनी तेथून चालता झाला, व ग्यारिबॉल्डीनें कांहीं अधिकार नसतांनां दिलेली देणगी (नेपल्स प्रांत) आपल्या ताब्यांत घेण्यासाठीं राजाची स्वारी थाटानें आली होती ती पाहण्यास तो तेथें राहिला नाहीं.

इतालियन लोकांच्या स्वाभाविक प्रवृत्ति फारच थोर आणि सत्यास धरून आहेत ही गोष्ट, माझीनी स्वतः रोम शहरामध्यें राहून तेथील लोकांस उत्तेजन देऊं लागला तेव्हां त्यांनीं दाखविलेल्या कर्तबगारीवरून सिद्ध होते. परंतु चिरकालिक परवशतेनें त्यांच्या अंगचे चांगले गुण लोपून गेले होते, ह्यामुळें त्यांस स्वातंत्र्याची झुळूक लागतांच, फार दिवस अंधारकोठडींत कोंडून ठेविलेला कैदी बंधमुक्त झाल्यावर जसा प्रथमतः प्रकाशानें दिपून जातो व त्याच्यानें पुढें पाऊल टाकवत नाहीं, त्याप्रमाणें रोमन लोकांची स्थिति झाली होती; व आपल्या कर्तव्याचा भार आपण स्वतः न उचलतां आपला पुढारीपणा पत्करण्याचें सामर्थ्य ज्या मनुष्याचे ठिकाणीं त्यांस आढळून आलें त्यावरच त्यांनीं सर्व विश्वास व भार टाकिला. 'तरुण इताली' नांवाच्या वर्तमानपत्रानें सतरा वर्षें जो उपदेश चालविला होता, त्यामुळें इतालियन लोकांच्या मनांत सन १८४८ सालीं स्वातंत्र्याची इच्छा प्रज्वलित झाली. आपली एकी असावी; रोम, व्हेनिस, ट्रेन्टिनों, ह्यांवर आपला हक्क आहे; त्या हक्कास आड येणारा आपला शत्रु होय; इत्यादि गोष्टी त्यांच्या मनांत जागृत करणें सोपें होतें; परंतु ते हक्क प्राप्त करून घेण्याचा दृढनिश्चय आणि स्थैर्य त्यांच्या अंगीं आणणें हें फार कठिण होतें. तथापि जसजसा काळ लोटत गेला, व इताली देशाचें एकराष्ट्र बनविण्याचें जोखमाचें काम आपल्या अंगावर घेण्याचा व्हिक्टर राजाचा

मुळींच हेतु नाहीं, हें जसजसें उघड होत गेलें, तसतसें राजेलोकांवर विश्वास टाकितांनां आपल्या मतीस भ्रम झाला होता असें त्यांस वाटूं लागलें; व ह्या वेळीं, जो गृहस्थ फक्त ईश्वर आणि लोक ह्यांजवर मात्र हवाला टाकण्यास आपणांस सांगत होता त्याची त्यांस आठवण झाली. सन १८६१ सालीं लोकपक्षाच्या चळवळीनें, इतालींतील सर्व मुख्य मुख्य शहरांत पुन्हां धामधूम सुरू झाली. ह्या वेळीं व्हिक्टर राजाची राजधानी ट्यूरिन येथें होती. तेथील लोक इतके बिथरले कीं, राज्यक्रांतीचें अरिष्ट टाळण्यासाठीं, तेथील भाडोत्री व स्वाभिमानशून्य पार्लमेन्टसभेस इतालीची मुख्य राजधानी रोम शहर होय असा ठराव एकमतानें पसार करणें भाग पडलें; परंतु तेथें गादी नेण्याची कांहींएक तजवीज न करितां, नेपोलियनच्या अनुमतानें तेथें गादी नेण्यांत येईल, एवढें वचन देऊन प्रधानमंडळ स्वस्थ बसलें.

लोकमत प्रथम अगदीं खवळून गेलें होतें तें ह्या वचनानें अंमळ शांत झालें. पण ही चळवळ एवढ्यानें अजीबात बंद पडली असें नाहीं. ग्यारिबॉल्डीच्या लष्करांतल्या मित्रांनीं त्याच्याभोंवतीं जमून त्याचें डोकें उठविलें, व सन १८६२ च्या सुरुवतीस तो रोम शहरावर पुन्हां मोहिम करण्यासाठीं केप्रेरा येथून निघाला, आणि नेपल्स प्रांतांत त्यानें थोडेसे स्वयंसेवक जमा केले. नेपल्सच्या माजी राजाचें लष्कर आरमार आणि पैसा त्याच्या हातांत असतां त्यानें जर हीच गोष्ट मनावर घेतली असती, तर ही मोहिम त्यास सहज उरकून घेतां आली असती.

आपल्या मुलखांत कोठेंही ग्यारिबॉल्डीस पोपावर स्वारी करण्याची सुरुवात करूं देऊन व्हिक्टर राजा नेपोलियन बादशहाची आपणावर इतराजी करून घेणार नाहीं, ही गोष्ट माझिनीस पक्की माहीत होती. परंतु त्यास वाटत होतें कीं ग्यारिबॉल्डी ह्या नांवास जें वजन आहे त्याच्या साहाय्यानें व्हेनिस प्रांत स्वतंत्र करण्यासाठीं जर एखादें बंड उभें करितां येईल तर इतालीचें सगळें राष्ट्र आस्ट्रियावर अशा रीतीनें उलटेल, कीं शेवटीं त्याचा जय झाल्याशिवाय राहणार नाहीं. ह्या कामास ग्यारिबॉल्डीचें अनुमोदन मिळविण्याच्या आशेनें त्यानें सन १८५९ सालीं जी एक सूचना त्यास केली होती तीच पुन्हां केली. माझिनीनें आपला एक मित्र ग्यारिबॉल्डीकडे पाठवून त्याजबरोबर असें सांगून धाडिलें कीं, नेपल्स प्रांत हल्लीं

व्हिक्टर राजाच्या राज्याचा भाग आहे, तेव्हां तेथें तुम्ही राज्यक्रांतीची खटपट करूं ह्मणाल तर तो आडवा आल्याशिवाय राहणार नाहीं. परंतु व्हेनीशिया प्रांत अद्यापि आस्ट्रियाच्या ताब्यांत आहे; व सन १८६० सालीं सिसिली आणि नेपल्समध्यें झालेल्या बंडास जसा व्हिक्टर राजास कांहीं व्यत्यय आणितां आला नाहीं, त्याचप्रमाणें व्हेनीशिया प्रांतांत बंड होऊं लागल्यास त्यास कांहीं करितां येणार नाहीं. तेव्हां आपण व्हेनीशिया प्रांतामध्यें बंडाची सुरवात करूं या. आह्मांस दुसरें कांहीं नको; फक्त ह्या गोष्टीस तुह्मी अनुकूल आहां व ती तुह्मांस मान्य आहे एवढा तुमचा शब्द मिळाला ह्मणजे पुरे. निदान रोमवर स्वारी करण्याविषयीं आतांच लोकांस सांगून आह्मांस लंगडे करूं नका. आम्हांस जर यश मिळालें तर सिसिलींतील बंडास तुह्मी येऊन मिळालां तसे ह्या वेळींही मिळा. तुमच्या नांवाच्या योगानें आमच्या कार्यास राष्ट्रीय स्वरूप येईल. दक्षिणेंत जशी सर्व सत्ता तुमच्या हातांत होती, त्याप्रमाणेंच व्हेनिसमध्येंही तुह्मीच प्रमुख व्हाल व आम्ही तुमच्या फौजेंत नुसते शिपाई होऊन राहूं. पण आमच्या यत्नास यदाकदाचित् यश न आलें, तरी तुमच्या नांवालौकिकास बट्टा लागण्याचा मुळींच संभव नाहीं. आजपर्यंत निष्फळ झालेल्या पुष्कळ प्रयत्नांचें अपेश माझ्या डोक्यावर आहेच; त्यांतलाच हा एक, असें मानून ह्यासंबंधीं सर्व जबाबदारी आणि फटफजीती मी आपला निमूटपणें सोशीन. परंतु ग्यारिबॉल्डी रोमशहरावर स्वारी करण्याचा दुराग्रह सोडीना. व्हिक्टर राजास ग्यारिबॉल्डीचें वर्म माहीत होतेंच; व त्यावर राजानें मात्राही दिली. राजानें ग्यारिबॉल्डीस निरोप पाठविला (स्वदस्तुरचें पत्र लिहिलें असेंही कोणी ह्मणतात) कीं पोपच्या राजकीय सत्तेचा उच्छेद करून युरोपांतील कॅथोलिकधर्मी राजांची गैरमर्जी आपणावर करून घेतां येत नाहीं; परंतु तें काम दुसरा कोणी करीत असेल तर आपण तिकडे खुशाल डोळेझांक करूं. मागें पुष्कळदां अनुभव आला असतांही, राजाच्या ह्या आश्वासनानें ग्यारिबॉल्डी इतका फसला कीं, त्याला आडविण्यासाठीं पाठविलेलें लष्कर जेव्हां त्यास समोर दिसूं लागलें, तेव्हां त्यानें आपल्या लोकांस गोळीबार चालू करूं नये ह्मणून हुकूम केला. त्यास वाटलें कीं राजाचे लोक स्नेहाच्या नात्यानें आपणाकडे येत आहेत. राजाच्या सैन्यावरील अंमलदारास राजाचे विचार काय आहेत हें पक्केपणीं ठाऊक होतें. त्यानें मागें पुढें न पाहतां, आप-

त्याशीं बोलण्याकरितां ग्यारिबॉल्डी एकटा पुढें येत होता त्यावर बंदूक झाडण्याविषयीं आपल्या लोकांस हुकूम केला; व तो घायाळ होऊन पडला असतां त्यास कैद करून व्हेरिग्नानो येथील किल्ल्यावर नेऊन ठेविलें! हा पराक्रम करणारास व्हिक्टर राजानें आपल्या सैन्यांत लागलींच सेनापतीची पदवी दिली यांत विशेष नाहीं; परंतु ज्यानें एक राज्य त्याच्या घशांत आणून घातलें त्या गृहस्थास त्याच्या उपकाराबद्दल बक्षीस देऊन त्याच्या ऋणांतून मुक्त होण्याची ही व्हिक्टर राजाची अजब तऱ्हा राजेलोकांतदेखील विलक्षण आहे.

ही हकीकत घडल्यानंतर इतालींतील बहुतेक शहरांत लोकांनीं थोडीबहुत गडबड करून आपला संताप शमविला; पण हें सारें तेवढ्यापुरतें होतें; त्यांच्यांत जूट किंवा व्यवस्था मुळींच नव्हती. दंगेखोरांचा घोडेस्वारांनीं पाठलाग केला व लोकांस धाक दाखविण्यासाठीं रस्तोरस्तीं तोफा आणि लष्कर इकडून तिकडे हिंडविण्यांत आलें. अखेर निष्कारण रक्तपात बराच होऊन ही धामधूम एकदांची थंड झाली. अशा रीतीनें बंडावा मोडल्यानंतर त्यांत सामील असलेल्या सर्व लोकांस माफी देण्याचा नेहमींचा फार्स राजेसाहेबांकडून करण्यांत आला. त्यांत माझिनीस मुद्दाम वगळण्यांत आलें होतें. गॅरिसन नामें एका गृहस्थानें ह्मटलें आहे कीं "माझिनी हा मनांत मांडे खाणारा व निरुपयोगी क्लृप्ती काढीत बसणारा होता असें ज्यांस वाटत असेल त्यांस वाटो; परंतु निदान युरोपांतील राजेलोकांस तो तसा खात्रीनें वाटत नव्हता. कारण तो व त्याचीं लोकसत्ताविषयक मतें त्यांस जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं, एखाद्या ब्रह्महत्येप्रमाणें दिसत असत. कोठेंही कट होवो त्यांत माझिनीचें अंग त्यांस दिसे. त्यास त्यांनीं मरणाच्या शिक्षा फर्माविल्या होत्या. पारधी हरिणाच्या मागें लागतात त्याप्रमाणें त्याची पाठ पुरवून त्यांनीं त्यास देशोदेशीं पळावयास लाविलें होतें. तो कोठेंही जावो त्याच्या पाठीवर त्यांचे भाडोत्री हेर ठेविलेले होतेच."

सन १८६३ सालीं पोलन्डमध्यें बंड झालें. तेव्हां आस्ट्रियाविरुद्ध उठण्याविषयीं आपल्या देशबांधवांस उपदेश करण्यास त्यास नवीन कारण मिळालें. आस्ट्रियानें कांहीं हक्क नसतां इतालीचा व्हेनिस प्रांत आपल्या घशांत घातला होता; तेव्हां व्हेनिसवर हल्ला केल्यानें पोलंडांतील लोकांस मोठी मदत होऊन इतालीनें आपलें कर्तव्य केल्यासारखें झालें असतें. मा-

झिनीचें असें मत होतें कीं "न्याय व नीति ह्यांच्या संरक्षणासाठीं सर्व मानवजातीनें एकदिलानें झटणें हें सर्व धर्मांचें आदितत्व होय. राजे लोकांनीं जेथेंजेथें आपलें घोडें मध्यें ढकलिलें आहे, तेथें तें प्रजेस नडूं लागलें आहे; व हा राजसंस्थेच्या अंगचा अपरिहार्य दोष आहे." ह्मणून आपल्या खऱ्या हितार्थ खटपट करण्यासाठीं इतालियन लोकांस जागृत करण्याचा माझिनीनें प्रयत्न केला. तो ह्मणतो कीं 'जुलमी राजे ब्रह्मराक्षसाप्रमाणें राष्ट्रांच्या बोकांडीं बसलेले असतात; व प्रजेवर बिनधोक जुलूम करतां यावा ह्मणून, ते आपसांत जूट करीत असतात. असल्या राजांच्या दास्यांतून मुक्त होण्यासाठीं एकजूट करणें हा आपला (लोकांचा) क्रम असूं द्या........रशियास मदत करण्यासाठीं प्रशियाचा राजा मध्यें पडला आहे. पण पोलंडांतील लोकांस मदत करण्यासाठीं कोणी राजा जाईल तर शपथ.' माझिनीनें असेंही भविष्य करून ठेविलें होतें कीं फ्रेंच बादशहा प्रशियाशीं लढाई करण्याच्या संधीसाठीं फार दिवस टपलेला आहे. प्राशियापासून ऱ्हाइन नदीच्या कांठचे प्रांत उपटण्यासाठीं तो कदाचित् या वेळीं पुढें सरसावेल. आपले नाइझा आणि सॅव्हाय हे प्रांत त्यानें असे लाटले आहेत. ऱ्हाइनवरचे प्रांत स्वतःला मिळाले ह्मणजे पोलन्डच्या राज्यव्यवस्थेंत कांहीं सुधारणा करविण्याचें वचन त्या लोकांस देऊन तो लढाईतून आपला पाय काढून घेईल. आजच्या यच्चयावत् राजांमध्यें नीतीच्या नांवानें शून्य झालें आहे. कोणाशीं मैत्री करावी, कोणाशीं नाहीं, हा विचारच त्यांजमध्यें राहिला नाहीं. कोणताही राजा घ्या, तो रशियाच्या वकिलाशीं हस्तस्पर्श करण्यास एका पायावर तयार नाहीं असें व्हावयाचें नाहीं. पोलन्डनें जर राजेलोकांवर विश्वास ठेविला तर त्यास आकाबाईनें घेरलेंच ह्मणून समजा. पोलंडचे लोक ज्याकरितां संग्राम करीत आहेत, तें तत्व इतालियन आबालवृद्धांस मान्य आहे. आम्ही राष्ट्रपदास पावलों ह्मणजे आमचें कर्तव्य संपलें, असा आमचा समज नसून तीच व्यवस्था सर्व युरोपांत असावी अशी आमची समजूत आहे. ह्या तत्वाची सर्व युरोपभर सरशी झाली तर मात्र आह्मांस स्वातंत्र्य मिळण्याची आशा. आह्मीं आजपर्यंत ज्या लढाया केल्या आहेत, त्या सर्वांत कमर बांधून आमच्या पायास पाय भिडवून पोलंडचे लोकही लढले आहेत. आपण दोन कोटी लोक आहों; आपल्यापाशीं फौजफांटा आहे; आपणांस द्रव्याची अनुकू-

ळता आहे व आपल्या देशाची मर्यादाही दुर्लंघ्य आहे; असें असतां कोरड्या शाबासकीपलीकडे आपल्याकडून पोलंडास दुसरें कांहींच मिळूं नये काय? आपला देश सोडून भयाभया करीत फिरणाऱ्या पोलंडांतील लोकांच्या निर्वाहासाठीं (त्यांतले बहुतेक आपल्या देशांत येऊन पोंचण्याच्या अगोदरच कदाचित कैद केले जातील.) थोडीशी वर्गणी जमा केली ह्मणजे आपण कृतकृत्य झालों काय? ह्या गोष्टीचा विचार करीत असतां माझें हृदय आशेनें उचंबळत आहे. चला! उठा! व्हेनिसचा रस्ता धरा. एक लक्ष आस्ट्रियन सैन्यानें तो प्रांत आस्ट्रियाकडे राखिला आहे. तो प्रांत आमचा आहे. आस्ट्रियाविषयीं लोकांच्या मनांत एखाद्या गुप्त ज्वालामुखीप्रमाणें क्रोधाग्नि पेटून राहिला आहे; व त्याच्या नरडीचा घोंट केव्हां घेऊं असें त्यांस झालें आहे. आस्ट्रियाच्या एक लक्ष सैन्यांत पुष्कळ हंगामी आणि पोलंड देशांतले लोक आहेत. 'तुमच्या आणि आमच्या उभयतांच्या स्वातंत्र्यासाठीं' अशी तुह्मी आरोळी मारा मात्र, (ती आरोळी मारण्याला पोलंडनेंच तुम्हांस शिकविलें आहे.) कीं ते दोघेही तुमच्या मागून आलेच असें समजा.

ह्या प्रार्थनेचा तात्कालिक परिणाम कांहीं घडला नाहीं; तथापि आपल्या देशाचे तुकडे न पाडण्याविषयीं, आणि लुई नेपोलियननें पोपच्या नांवानें त्याची राजधानी (रोम) आपल्या ताब्यांत घेऊन जो इतालियन लोकांचा अपमान केला होता त्याविरुद्ध इतालियन लोकांनीं एकसारखी चालवि-लेली ओरड अगदीं बंद पडणें अशक्य होतें. लोकांनीं नवी चळवळ सुरू केली ह्मणजे नवीन युक्ति लढवून त्यांस फसविणें राजास प्राप्त होई. त्या वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यामध्यें राजाजवळ असलेल्या एका गृहस्थाच्या द्वारें राजाकडून माझिनीस एक निरोप आला. त्याचा आशय माझिनीनें खालीं लिहिल्याप्रमाणें दिला आहे. "सरकार, व इतालीस स्वतंत्र करण्याविषयीं झट-णारा पक्ष, ह्या दोघांचे ज्या बाबतींत एक विचार आहेत, त्या गोष्टींसंब-धानेंदेखील मनांत भेद ठेवून त्या पक्षानें वारंवार गुप्त कट कां करावे, हें महाराजांस समजत नाहीं. माझिनीस जसें व्हेनिस हवें आहे तसें महाराजांसही हवें आहे. माझिनीच्या प्रामाणिकपणाविषयीं महाराजांस काडीइतकीदेखी-ल शंका नाहीं, असें असतां, महाराजांचा हेतु सिद्धीस नेण्यासाठीं दोघांनीं एकजूट कां करूं नये?" हा त्या निरोपाचा सारांश होता.

माझिनीस पक्कें ठाऊक होतें कीं व्हेनिस मिळविण्यासाठीं आस्ट्रियाशीं लढाई करण्याच्या कामीं इतालीच्या अंगीं जेवढें सामर्थ्य आहे तेवढें सगळें एकवट करावें लागेल. आस्ट्रियाच्या जाभाडांतून व्हेनिस सोडवावयाचें एवढा काय तो मुद्दा होता. ह्मणून माझिनीस वाटलें कीं व्हेनिस स्वतंत्र करून बाकीच्या इतालीस जोडून देणें हा जो राष्ट्रीय प्रश्न त्याचा आणि प्रजासत्तेच्या प्रश्नाचा लढा लावणें हें मूर्खपणाचें काम होय. त्यानें राजास कळविलें कीं 'इतालियन लोकांच्या स्वाभिमानास आणि योग्यतेस शोभेल अशा रीतीनें व्हेनिस प्रांत जिंकला पाहिजे; ह्मणजे इतालीच्या सैन्याची व्हेनीशियन लोकांकडून उठवणी झाली पाहिजे व स्वयंसेवकांचें आधिपत्य ग्यारिबॉल्डीकडे असलें पाहिजे,' तो आणखी ह्मणतो, आपण राजास साफ सांगितलें कीं तुमच्याशीं कोणत्याही प्रकारचे कारमदार करून मी आपणास बांधून घेणार नाहीं; एक वर्षापूर्वी (आस्मॉंटील येथील लढाईनंतर) मीं असें प्रसिद्ध रीतीनें ह्मटलें होतें कीं, स्वतंत्र रीतीनें आपली मनोदेवता सांगेल त्याप्रमाणें याउपर चालावयाचें; कोणाशींही संगनमत करावयाचें नाहीं असा मीं निश्चय केला आहे; व तो कायम ठेवणें हें स्वतःकडे व प्रजापक्षाकडे पाहून, मला भाग आहे. फ्रेंच बादशहा कान धरून नेईल तिकडे जाणारांवर आपला मुळींच विश्वास नाहीं. लुई नेपोलियन आणि ऑस्ट्रिया एक झाल्याची एखादी तार पारिसहून आल्याबरोबर आमच्या सरकारची युद्धाची तयारी जागच्याजागीं थिजून जाईल, हें माझें भाकित पाहिजे तर लिहून ठेवा. राष्ट्राच्या हितासाठीं ठरविलेल्या राजकीय धोरणांत असली चलबिचल कामाची नाहीं; सबब दुसऱ्याशीं कट किंवा संगनमत करून स्वतःस बांधून न घेणें हेंच मला अधिक शहाणपणाचें वाटतें.'

'शिवाय राजाशीं करार करून करावयाचें काय? सर्वांनीं मिळून त्या कामासाठीं झटलें पाहिजे, व व्हेनिसमध्यें प्रजासत्तेचा झेंडा उभारावयाचा नाहीं हीं माझीं मतें जगजाहिर आहेत. "व्हिक्टर राजाकी जय" अशी आरोळी आमच्या पक्षाच्या लोकांस मारितां येत नाहीं. तसें केल्यास आह्मी स्वाभिमानशून्य दिसूं, व आमचें मन आह्मांस खाऊं लागेल. ऑस्ट्रियाशीं झुंजा' 'देशबांधवांस मदत करा,' अशाच गर्जना आह्मी करूं, आणि मुख्य कार्यभाग कसा उरकावयाचा तें ठरविण्याचें काम

व्हेनिसकरांकडे सोंपूं. त्यांस फौजेची मदत हवी आहे, तेव्हां ते महाराजांच्या पक्षाकडे वळतील हें सांगणें नकोच.

" आह्मांस जसें व्हेनिस हवें आहे तसें तें राजास खरोखर हवें काय ? हवें असेल तर, आह्मांस आडकाठी न करितां जी संधी आणण्याच्या खटपटीस आह्मी लागलों आहों, ती साधून घेण्याची तयारी त्यांनीं ताबडतोब करावी ह्मणजे झालें. एकंदर परिस्थितीचा विचार करितां, व्हेनीशियन लोकांनीं प्रथम बंड उभारून लढाईची सुरुवात करावी, नंतर इतालीच्या इतर प्रांतांतील लोकांनीं सभा करून त्यांच्या मदतीसाठीं स्वयंसेवक पाठवून आपली संमती प्रदर्शित करावी, आणि शेवटीं सरकारानीं त्या कटांत येऊन आपल्या तेथील मुखत्यारांमार्फत व्हेनिसकरांस उत्तेजन द्यावें, हा मला योग्य मार्ग दिसतो. सरकाराकडून हल्लीं ज्या हरकती आह्मांस होत आहेत त्या होऊं नयेत; सरहद्दीवर आह्मांस प्रतिकूळ अशा ज्या लष्करी टोळ्या पाठविण्यांत येतात त्या पाठवूं नयेत; व आमचीं हत्यारें जप्त करूं नयेत; ( होईल तेवढें करून तीं बंदोबस्तानें नेण्याची सावधगिरी आह्मी ठेवीत जाऊं. ) आणि लष्कर व आरमार ( हें तर लष्करापेक्षांही जास्त महत्वाचें आहे ) हीं अगदीं जय्यत ठेवावीं.

"इतालीस फ्रान्सकडून मदत मिळेल असें स्वप्नांतदेखील समजूं नये, किंवा ऱ्हाइन नदीच्या कांठच्या मुलखावर हल्ला झाल्यास फ्रान्सास इतालीनें मदत दिली पाहिजे असें मनांतदेखील आणूं नये. स्वयंसेवकांची हरएक व्यवस्था ग्यारिबॉल्डीकडे द्यावी, आणि ही पक्की खात्री बाळगावी कीं लोकांमध्यें ज्यांस रतीभारही अब्रू नाहीं, व देशाचें खरें हित चिंतणाऱ्या आमच्या पक्षास जे बुद्धिपुरःसर प्रतिकूळ आहेत असल्या प्रधानांच्या हातून या राष्ट्राची खरी सेवा कधींही व्हावयाची नाहीं.

" आमच्यामध्यें जो पत्रव्यवहार झाला त्याची बारीकसारीक हकीकत मी सांगत बसत नाहीं. दुसऱ्यांचीं बोलणीं किंवा बेत प्रसिद्ध करण्याचा मला कंटाळा आहे. तथापि एवढें मी निक्षून सांगतों—व हें खोटें आहे असें ह्मणण्याची ज्यांची हिंमत असेल त्यांनीं पुढें यावें—कीं ह्या पंधरा नवेंबरच्या पत्रांतील एका अक्षराविरुद्ध मजकूर माझ्या दुसऱ्या कोणत्याही पत्रांत सांपडावयाचा नाहीं. आमच्या पक्षांत कोणकोण आहेत, आमचे हेतू

माझिनीस पक्कें ठाऊक होतें कीं व्हेनिस मिळविण्यासाठीं आस्ट्रियाशीं लढाई करण्याच्या कामीं इतालीच्या अंगीं जेवढें सामर्थ्य आहे तेवढें सगळें एकवट करावें लागेल. आस्ट्रियाच्या जाभाडांतून व्हेनिस सोडवावयाचें एवढा काय तो मुद्दा होता. ह्मणून माझिनीस वाटलें कीं व्हेनिस स्वतंत्र करून बाकीच्या इतालीस जोडून देणें हा जो राष्ट्रीय प्रश्न त्याचा आणि प्रजासत्तेच्या प्रश्नाचा लढा लावणें हें मूर्खपणाचें काम होय. त्यानें राजास कळविलें कीं 'इतालियन लोकांच्या स्वाभिमानास आणि योग्यतेस शोभेल अशा रीतीनें व्हेनिस प्रांत जिंकला पाहिजे; ह्मणजे इतालीच्या सैन्याची व्हेनीशियन लोकांकडून उठवणी झाली पाहिजे व स्वयंसेवकांचें आधिपत्य ग्यारिबॉल्डीकडे असलें पाहिजे,' तो आणखी ह्मणतो, आपण राजास साफ सांगितलें कीं तुमच्याशीं कोणत्याही प्रकारचे करारमदार करून मी आपणास बांधून घेणार नाहीं; एक वर्षापूर्वी (आस्मॉंटील येथील लढाईनंतर) मीं असें प्रसिद्ध रीतीनें ह्मटलें होतें कीं, स्वतंत्र रीतीनें आपली मनोदेवता सांगेल त्याप्रमाणें याउपर चालावयाचें; कोणाशींही संगनमत करावयाचें नाहीं असा मीं निश्चय केला आहे; व तो कायम ठेवणें हें स्वतःकडे व प्रजापक्षाकडे पाहून, मला भाग आहे. फ्रेंच बादशहा कान धरून नेईल तिकडे जाणारांवर आपला मुळींच विश्वास नाहीं. लुई नेपोलियन आणि ऑस्ट्रिया एक झाल्याची एखादी तार पारिसहून आल्याबरोबर आमच्या सरकारची युद्धाची तयारी जागच्याजागीं थिजून जाईल, हें माझें भाकित पाहिजे तर लिहून ठेवा. राष्ट्राच्या हितासाठीं ठरविलेल्या राजकीय धोरणांत असली चलबिचल कामाची नाहीं; सबब दुसऱ्याशीं कट किंवा संगनमत करून स्वतःस बांधून न घेणें हेंच मला अधिक शहाणपणाचें वाटतें.'

'शिवाय राजाशीं करार करून करावयाचें काय? सर्वांनीं मिळून त्या कामासाठीं झटलें पाहिजे, व व्हेनिसमध्यें प्रजासत्तेचा झेंडा उभारावयाचा नाहीं हीं माझीं मतें जगजाहिर आहेत. "व्हिक्टर राजाकी जय" अशी आरोळी आमच्या पक्षाच्या लोकांस मारितां येत नाहीं. तसें केल्यास आह्मी स्वाभिमानशून्य दिसूं, व आमचें मन आह्मांस खाऊं लागेल. ऑस्ट्रियाशीं झुंजा' 'देशबांधवांस मदत करा,' अशाच गर्जना आह्मी करूं, आणि मुख्य कार्यभाग कसा उरकावयाचा तें ठरविण्याचें काम

व्हेनिसकराकडे सोंपूं. त्यांस फौजेची मदत हवी आहे, तेव्हां ते महाराजांच्या पक्षाकडे वळतील हें सांगणें नकोच.

" आह्मांस जसें व्हेनिस हवें आहे तसें तें राजास खरोखर हवें काय? हवें असेल तर, आह्मांस आडकाठी न करितां जी संधी आणण्याच्या खटपटीस आह्मी लागलों आहों, ती साधून घेण्याची तयारी त्यांनीं ताबडतोब करावी ह्मणजे झालें. एकंदर परिस्थितीचा विचार करितां, व्हेनीशियन लोकांनीं प्रथम बंड उभारून लढाईची सुरुवात करावी, नंतर इतालीच्या इतर प्रांतांतील लोकांनीं सभा करून त्यांच्या मदतीसाठीं स्वयंसेवक पाठवून आपली संमती प्रदर्शित करावी, आणि शेवटीं सरकारांनीं त्या कटांत येऊन आपल्या तेथील मुखत्यारांमार्फत व्हेनिसकरांस उत्तेजन द्यावें, हा मला योग्य मार्ग दिसतो. सरकाराकडून हल्लीं ज्या हरकती आह्मांस होत आहेत त्या होऊं नयेत; सरहद्दीवर आह्मांस प्रतिकूळ अशा ज्या लष्करी टोळ्या पाठविण्यांत येतात त्या पाठवूं नयेत; व आमचीं हत्यारें जप्त करूं नयेत; ( होईल तेवढें करून तीं बंदोबस्तानें नेण्याची सावधगिरी आह्मी ठेवीत जाऊं. ) आणि लष्कर व आरमार ( हें तर लष्करापेक्षांही जास्त महत्वाचें आहे ) हीं अगदीं जय्यत ठेवावीं.

"इतालीस फ्रान्सकडून मदत मिळेल असें स्वप्नांतदेखील समजूं नये, किंवा ऱ्हाइन नदीच्या कांठच्या मुलखावर हल्ला झाल्यास फ्रान्सास इतालीनें मदत दिली पाहिजे असें मनांतदेखील आणूं नये. स्वयंसेवकांची हरएक व्यवस्था ग्यारिबॉल्डीकडे द्यावी, आणि ही पक्की खात्री बाळगावी कीं लोकांमध्यें ज्यांस रतीभारही अब्रू नाहीं, व देशाचें खरें हित चिंतणाऱ्या आमच्या पक्षास जे बुद्धिपुरःसर प्रतिकूल आहेत असल्या प्रधानांच्या हातून या राष्ट्राची खरी सेवा कधींही व्हावयाची नाहीं.

" आमच्यामध्यें जो पत्रव्यवहार झाला त्याची बारीकसारीक हकीकत मी सांगत बसत नाहीं. दुसऱ्यांचीं बोलणीं किंवा बेत प्रसिद्ध करण्याचा मला कंटाळा आहे. तथापि एवढें मी निक्षून सांगतों—व हें खोटें आहे असें ह्मणण्याची ज्यांची हिंमत असेल त्यांनीं पुढें यावें—कीं ह्या पंधरा नवेंबरच्या पत्रांतील एका अक्षराविरुद्ध मजकूर माझ्या दुसऱ्या कोणत्याही पत्रांत सांपडावयाचा नाहीं. आमच्या पक्षांत कोणकोण आहेत, आमचे हेतू

काय आहेत, किंवा काम कोठपर्यंत आलें आहे, ह्याविषयीं मी एक अक्षर-हीं कधीं कोणाजवळ बोललों नाहीं.

"मी इतका स्वतंत्रपणानें चालत असें कीं, कित्येक गृहस्थांनीं कांहीं शर्तींवर आमच्या कामासाठीं मला द्रव्याची मदत देऊं केली, पण ती स्वीकारण्याचें मीं नाकारलें. कारण असल्या देणग्या स्वीकारल्यानें देणारा व घेणारा ह्यांमध्यें एक प्रकारचें बंधन उत्पन्न होतें. मला तसलें बंधन पत्करत नव्हतें. मीं त्या गृहस्थांस अशी शिफारस केली कीं, मला देऊं केलेली मदत त्यांनीं पोलंडांतील व हंगेरींतील लोकांस द्यावी.

"सरकारच्या अशाश्वत बुद्धीचा कंटाळा येऊन, आपलें जें म्हणणें असेल तें मोकळेपणानें सांगून टाकावें असें मला वाटून, तारीख २५ जानेवारी सन १८६४ रोजीं लिहिलेल्या एका पत्रांत मीं म्हटलें कीं, सरकार व प्रधानमंडळ ह्यांजकडून जे वटहुकूम बाहेर पडतात त्यांची भाषा अगदीं भेकडपणाची व दुटप्पी असते, व ती आह्मांपेक्षां सरकारासच विशेष अनिष्ट आहे. एकामागून एक अशा उठावण्या करण्यांत आमच्याकडून ना नाहीं; परंतु आमचे हातपाय जर अगदींच जखडून टाकण्यांत आले, तर मग प्रजासत्ताक राज्य स्थापण्यासंबंधानें व देशाची अंतःस्थिती सुधारण्यासंबंधानें मजकडून होईल तो प्रयत्न केल्याशिवाय मला राहवणार नाहीं. पुढें लिहिलेल्या गोष्टी अवश्य झाल्या पाहिजेत हेंही मीं सरकारास सुचविलें होतें:—व्हेनीशिअन लोकांस बंड करण्याची सूचना देण्यांत यावी; ते उठले ह्मणजे स्वयंसेवकांच्या टोळ्या त्यांच्या मदतीस जाऊं द्याव्या; व्हेनिसला मदत करण्यासाठीं लोकांकडून वर्गणी गोळा करण्यासाठीं खटपट झाल्यास तिला व्यत्यय आणूं नये; व सन १८४४ सालीं चार्ल्स आल्बर्टनें कळविल्याप्रमाणें परराष्ट्रांस कळवावें कीं सरकारास या वेळीं लोकपक्षास मदत केल्याशिवाय इलाजच नव्हता.

"ब्रेशियामध्यें हत्यारें जप्त केल्याची गोष्ट जेव्हां माझ्या कानावर आली, तेव्हां मीं साफ सांगितलें कीं माझ्या डोळ्यांत माती टाकूं पाहणाराचें मी कांहीं चालूं देणार नाहीं, मग तो राजा असो किंवा दुसरा कोणी असो; आणि जप्त केलेलीं हत्यारें, अथवा त्यांच्या बदलीं तितकींच दुसरीं हत्यारें आह्मांस दिलीं पाहिजेत अशी मागणी मीं केली; तसेंच, पुन्हां असें होणार नाहीं याची खात्री पटण्यासाठीं आमचीं हत्यारें

जप्त करणाऱ्या स्पाव्हेंटा नामक कारभाऱ्यास सरकारी चाकरींतून हांकून लाविलें पाहिजे असा आग्रह धरून, तसें न केल्यास आमच्याविरुद्ध वागण्याचा सरकारचा हेतु आहे असें आह्मी समजूं, व ह्यापुढें सरकाराशीं कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवणार नाहीं, असें मीं कळविलें.

"शेवटीं २५ मे रोजीं मीं लिहिलें कीं, 'तुमची व आमची समजूत पडणें अशक्य आहे.....मला प्रथम असें सांगण्यांत आलें होतें कीं, बाहेरच्या बाहेर एखादी चळवळ सुरू करणें अशक्य आहे. तेव्हां मीं जबाब दिला कीं, बाहेरच्या चळवळीशीं तुम्हांस कांहीं कर्तव्य नाहीं. सध्यां प्रश्न हा आहे कीं देशांतल्या देशांत तुह्मी कांहीं करतां कीं नाहीं? त्यावर मला असें सांगण्यांत आलें होतें कीं, आधीं गॅलिशियामध्यें उठावणी झाली पाहिजे. यावर माझें उत्तर असें होतें कीं, वारंवार बेत बदलून आमच्या मदतगारांस आतां एक व मग एक सांगणें मला आवडत नाहीं; तथापि तसेंही घडवून आणण्याची मी तजवीज करितों. आतां हंगेरी प्रांतांतही कांहीं गडबड करविली पाहिजे, असें राजपक्षाकडून ह्मणण्यांत येत आहे; उद्यां बोहीमियांत कांहीं करण्यास सांगाल; व आस्ट्रियावर हल्ला करण्यापूर्वी तेथली बादशाही मोडकळीस आली पाहिजे असेंही ह्मणाल. तुमचे सगळे बेत होत आहेत, तों पुढल्या वर्षापावेतों पोलन्डचें स्वातंत्र्य पार नाहींसें होईल, गॅलिशियामध्यें तुह्मांस कांहीं करितां येईनासें होईल, डेन्मार्कसंबंधी प्रश्नाचा निकाल लागेल, व हंगेरी प्रांत तडजोडवाल्यांच्या हातांत जाईल.'* असला धरसोडपणा आमच्या राष्ट्राच्या उपयोगी नाहीं; हा निव्वळ भागूबाईपणा आहे. ज्या देशांत दोन कोटींवर लोक आहेत, व जेथें तीन लक्ष सैन्य तयार आहे असल्या देशास तो शोभत नाहीं. एखादी गोष्ट किती दिवसांत करावयाची यासंबंधानें कांहीं कालमर्यादा ठरविल्याशिवाय तुमच्याआमच्यामध्यें कोणत्याच प्रश्नासंबंधानें वाटाघाट करितां येणार नाहीं. अनुकूळ संधि आल्याशिवाय ह्या गोष्टी घडूं शकणार

* आपला सर्व पत्रव्यवहार प्रसिद्ध करितांनां माझिनीनें या पत्राला एक टीप देऊन असें लिहिलें आहे कीं हीं सर्व भविष्यें अक्षरशः खरीं झालीं आहेत, व इतालीनें अनेक वेळां आलेली योग्य संधी फुकट दवडून बिचाऱ्या पोलंड देशांतील लोकांना दिलेलीं वचनें मोडिलीं आहेत, या गोष्टीचा विचार मनांत आला ह्मणजे सखेद संतापानें माझें डोकें भणभणून जातें.

नाहींत, असें मला सांगण्यांत येतें; पण मी ह्मणतों, हल्लींसारखी संधि पुन्हां कधीं येणार नाहीं. हल्लींची वेळ चांगली कां नाहीं याचें कारण तुह्मीं मला सांगितलें पाहिजे होतें, किंवा अमुक वेळपर्यंत आह्मी कांहीं-एक करणार नाहीं असें तरी निश्चितपणें सांगावयास पाहिजे होतें. सर-हद्दीवरून हत्यारें नेऊं दिल्यास व्हेनीशियन लोक त्यांचा उपयोग करितील अशी भीति आहे ह्मणून तीं नेऊं देतां येत नाहींत, असें मला सांगणें ह्मणजे स्पष्ट जबाब न देतां मला घोटाळ्यांत घालण्यासारखें आहे. जरी व्हेनीशियन लोकांनीं बंड केलें तरी आह्मांस त्यांस मदत करितां येणार नाहीं असें ह्मणणें, ह्मणजे आस्ट्रियाची बाजू धरण्याचा सरकारचा निश्चय झाला आहे असें सांगण्यासारखेंच आहे."

हें पत्र इतालींतील सर्व वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालें होतें. त्यांतील शेवटचा मजकूर असा होता कीं "राजपक्षाशीं संबंध ठेवण्यापासून कांहीं उपयोग नाहीं सबब मी तो तोडून टाकितों. मी स्वतंत्र राहणार. मला माझ्या एका मनोदेवतेचें मात्र इतःपर बंधन राहील, दुसऱ्या को-णाचेंही बंधन मला नको. माझ्या दृष्टीनें राजा आणि प्रजा सर्व सारखे आहेत."

नेपल्सचा सुपीक मुलूख राजास फुकटच्याफाकट मिळाला असतांही आपल्या कर्तव्यास जागण्याइतकें धैर्य त्यास झालें नाहीं. अशा रीतीनें त्याच्या सामर्थ्यांत भर पडली असतांही तो फ्रान्सचा अंकित होऊन रा-हिला होता. सन १८६४ सालीं त्यानें फ्रान्सशीं एक तह केला, त्यांत फ्रेंच बादशहानें दोन वर्षांत आपलें सैन्य रोम शहरामधून काढून नेण्याचें कबूल केलें, पण तें अशा शर्तीवर, कीं रोमन लोकांच्या अभिप्रायाची पर्वा न करितां पोपास त्याचे गादीवर सुरक्षित ठेवण्याचें अश्लाघ्य काम व्हिक्टर राजानें आपले माथीं घ्यावें; व तेरा वर्षेपावेतों हें काम करण्या-करितां फ्रेंच बादशहाला जो खर्च झाला होता त्याची फेड करण्यासाठीं एक मोठी रक्कम राजानें बादशहास द्यावी. ह्या तहांतील एवढ्याच शर्ती प्रसिद्ध करण्यांत आल्या होत्या. कारण आपल्या देशावर चालून आलेल्या फ्रेंच लोकांचा पाय एकदांचा निघतो आहे असें पाहून लोक त्या शर्ती आनंदानें कबूल करितील, असें राजास वाटलें. मध्यइतालींतील लोकांनीं रोम शहरीं राजधानी नेण्यासाठीं ओरड चालविली होती, ती

बंद पाडण्यासाठीं त्या तहांत असेंही कलम घातलें होतें कीं, इतउत्तर राजधानीचा मान फ्लॉरेन्स शहराकडे असावा. तहांत आणखी असें ह्मटलें होतें कीं 'महाराज व त्यांचे थोर दोस्त अशी उमेद राखतात कीं ह्या व्यवस्थेनें इतालीचे जे मोठमोठे फायदे होतील ते लक्षांत आणून पोपच्या कोरड्या हक्कांस मान देण्यांत आला आहे ही गोष्ट लोक पसंत करतील.' ह्या तहांतल्या दुसऱ्या कांहीं शर्ती* गुप्त ठेवण्यांत आल्या होत्या. रोम ताब्यांत ठेवण्याकरितां जो खर्च झाला होता, त्याबद्दल पीडमॉन्टचा बराच मोठा भाग फ्रान्सास देण्याचें ठरलें होतें; व सन १८१५ सालीं आस्ट्रियानें व्हेनीशिया प्रांत बळकाविला होता, त्याजवरील त्याचा हक्क बिनतक्रार कबूल करण्यांत आला होता. राजाचें हें कारस्थान सिद्धीस गेलें असतें; पण माझीनी डोळ्यांत तेल घालून बसलेला होता, त्याला ह्या गुप्त तहाची माहिती लागली. त्यानें त्यांतील मजकूर प्रसिद्ध केला, त्यामुळें लोकांच्या अंगाचा तिळपापड होऊन ते इतके खवळून गेले, कीं ज्या प्रधानानें त्या तहावर सही केली होती (हा पूर्वीं 'तरुण इताली,' ह्या मंडळीचा सभासद असून ती मंडळी सोडून गेलेला होता, व त्याचें नांव व्हॉयकौंट व्हेनोस्टा असें होतें.) त्यास असल्या आणीबाणीच्या प्रसंगीं कारस्थानी लोकांचें मायपोट जें 'असत्य' त्याचा स्वीकार करावा लागला. त्यानें लोकसभेंत शपथपूर्वक सांगितलें कीं माझिनीचें ह्मणणें अगदीं खोटें आहे. ह्या त्याच्या ह्मणण्याचा प्रतिध्वनी सर्व राजपक्षीय वर्तमानपत्रकारांनीं करून, स्वदेश सोडून हद्दपार होऊन राहिलेल्या लोकमान्य देश-

---

* या गुप्त अटींच्या अन्वयें, आपण व्हेनीशिया जिंकण्याचा प्रयत्न करणार नाहीं इतक्यापुरतेंच व्हिक्टर इम्यान्युअल राजानें आपणाला बांधून घेतलें असें नाहीं, तर इतालींतील 'चळवळी मंडळी' व्हेनिसवर हल्ला करूं लागल्यास त्यांस अटकाव करण्याचेंही त्यानें कबूल केलें; आणि इतकेंही करून त्या मंडळीनें व्हेनिस व रोम घेऊन इतालीचें ऐक्य केलेंच, तर फ्रान्सची सरहद्द पुनः ठरविण्यास आपण तयार होऊं असेंही त्यानें कबूल केलें. नवीन सरहद्द ठरविण्याची वेळ आल्यास लिगुरियाच्या किनाऱ्यावरील साव्होना नांवाच्या गांवापासून तों सेशिया नदीपर्यंत पसरलेला पीडमॉंटचा सगळा भाग फ्रान्सला देण्यांत यावयाचा होता. या व्यवस्थेच्या योगानें अपीनाइन्स पर्वतांतील सगळे घाटरस्ते व आल्प्सपर्वतांतील सेंटबर्नार्डचा घाट फ्रान्सच्या ताब्यांत गेले असते.

भक्तावर शिव्यांची गर्दी केली. कारण त्यानें.' सर्व इंगित बाहेर काढून सैतानाची दाढी हिसकली होती.'

राजानें ही समजून उमजून केलेली लबाडी पाहून माझिनीस वाटलें कीं प्रजासत्तेचा झेंडा उभारण्याची वेळ आतां येऊन ठेपली. त्यानें पूर्वी दिलेल्या वचनाप्रमाणें आपल्या ह्या विचाराची प्रसिद्धपणें सूचना दिली. 'सरकार, पार्लमेन्ट व लोक ह्या सर्वांनीं इतालीदेश एक राष्ट्र करून रोम शहर त्याची राजधानी करण्याची प्रतिज्ञा केली आहे. पण हल्लीं करण्यांत आलेल्या तहानें, ह्या सर्वांनीं मिळून दिलेल्या गंभीर वचनांचा भंग होत आहे. एका पक्षानें कराराचें उल्लंघन केलें असतां दुसरा पक्ष त्या करारांतून मुक्त होतो, हें सर्वांस ठाऊक आहेच. आह्मी प्रजासत्तावाद्यांनीं लोकमत शिरसा मान्य केलें होतें. परंतु ह्या तहानें आतां आह्मी मोकळे झालों आहों. आह्मीं शपथ घेतली होती कीं विद्यमान सरकाराशीं मिळून, किंवा त्याची मदत न घेतां स्वतंत्रपणें, किंवा प्रसंग पडल्यास त्याच्या मर्जीविरुद्ध इताली देश एकवट करूं. पण हा तह अंमलांत येईल तर राहिलेल्या तिसऱ्या मार्गाचें आह्मी आतां अवलंबन करूं.' पूर्वी प्रजासत्ताक पक्षाचा असून त्याचा त्याग केलेल्या क्रिस्पी नांवाच्या एका गृहस्थास त्यानें एक अनावृत पत्र लिहिलें होतें, त्यांत तो ह्मणतो, इतालीची एकी करण्याचा आव दाखवून आपला स्वार्थ साधून घेणारांचा देशकार्याशीं अर्थाअर्थी संबंध नाहीं, व राज्यक्रान्ती करण्याशिवाय आतां तरणोपाय नाहीं, असें लोकांस दाखवून देणें, हाच काय तो इताली एकवट करण्याचा रस्ता आतां उरला आहे. आस्ट्रियाच्या जोकडाखालीं मट्टयास आलेल्या व्हेनीशियन लोकांशीं संप करून आस्ट्रियावर व्हेनिस प्रांतामध्यें लोकांनीं हल्ला केला पाहिजे. रोमशहरावरील इतालियन लोकांचा हक्क पुढें करून तें शहर परत जिंकिलें पाहिजे. हल्लीं तें धर्मसंबंधी जुलुमाचें माहेरघर होऊन बसलें आहे, तेथें धर्मस्वातंत्र्य स्थापन केलें पाहिजे, व एखाददुसऱ्या प्रांताच्या पसंतीनें नव्हे, तर संपूर्ण राष्ट्राच्या एकमतानें, अशी राज्यपद्धती घालून दिली पाहिजे कीं, भविष्यकालीं ती आपलें स्वतःचें आणि राष्ट्राचें रक्षण करूं शकेल. 'कसेंही करून एवढें कराच, मग त्यापायीं तुह्मांस कसलेंही नुकसान सोसावें लागो. चला, तुमच्या मार्गांत जीं

विघ्न येतील त्यांचा विध्वंस करण्यास सिद्ध व्हा. राजा आडवा आल्यास त्यासही हात दाखवा. तुह्मांस ईश्वराची आणि तुमच्या देशमातेची शपथ आहे. असल्या बागुलबोवास भिऊं नका; तर उठा आणि प्रजासत्तेचा जयघोष करा." असा माझिनीनें लोकांस कळकळीनें उपदेश केला. ह्या पत्रावरून नेपोलियनच्या प्रधानाकडून इतालियन सरकाराकडे एक खरमरीत खलीता आला. त्यांत त्या सरकारास अशी सूचना करण्यांत आली होती कीं लोक जर कांहीं चळवळ करितील तर तिचा बीमोड करून टाकावा. कारण तिजवरून असें दिसेल कीं, तद्नुसार वागण्याचें सामर्थ्य राजाच्या अंगीं नाहीं. लोकांस अशी सक्त समजूत द्यावी कीं, इतालीची राजधानी फ्लॉरेन्स येथें नेण्याचें ठरविलें आहे त्या विचारांत आतां फेरबदल व्हावयाचा नाहीं; व रोम शहर कधींकाळीं इतालीची राजधानी होईल अशी लोकांनीं अगदीं आशा बाळगतां कामा नये. त्या खलित्यांत राजास असेंही बजाविण्यांत आलें होतें कीं त्याच्या कबजांत प्रजा न राहून जर पोपच्या गादीला धक्का पोंचला तर एकटें फ्रान्सच नव्हे, पण युरोपांतील सर्व कॅथोलिक धर्मानुयायी राजे त्याजवर तुटून पडण्यास कमी करणार नाहींत. हा खलीता येऊन पोंचल्यामुळें लोकपक्षावर पुन्हां जुलूम होऊं लागला हें सांगणें नलगे. इतालींत प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्याच्या कामीं सिसिलियन लोकांचा नेहमीं पहिला पाय असे, त्यामुळें राजाविषयीं त्यांचें मन उत्तरोत्तर विटत चाललें होतें. ह्या वर्षी ते आपल्यापुरती स्वतंत्र राज्यक्रांती करण्यासाठीं बंड केल्याशिवाय राहतेना; परंतु माझिनीनें त्यांच्या विनवण्या केल्या कीं तुह्मीं बंड केल्यास इताली देशाची एकी होण्याच्या कामीं हरकती येतील, त्यामुळें ते स्वस्थ राहिले.

ह्या ठिकाणीं एक महत्वाची गोष्ट पुनः सांगून ठेविली पाहिजे ती अशी कीं, देशाचें हित एकीकडे ठेवून इतालियन सरकारास हा काळपावेतों जें मनसोक्त वर्तन चालवितां आलें, तें गुप्त कारस्थानांच्या जोरावर चालवितां आलें. या गुप्त कारस्थानांच्या योगानेंच युरोपांतील सर्व स्वायत्तसत्ताक राजांस वाटेल तसा जुलूम करितां येतो. राजपक्षीय वर्तमानपत्रें, व वकील, प्रतिनिधी, कारभारी वगैरे प्रतिष्ठित नांवें धारण करणारी मंडळी ह्या सर्वांनीं मिळून सरकारच्या अंतस्थ हेतूंविषयींची खरी बातमी लोकांस कधींही न देण्याचा व त्यांस फसविण्याचा विडाच उचल-

लेला होता. अखेर इतालियन राष्ट्राच्या हिताची व इजतीची अत्यंत खराबी करणारे सर्व तह कायम होऊन आजूबाजूच्या राष्ट्रांनीं त्यांस आपली संमतीही दिली, तेव्हां मुकाट्यानें मान वांकवून झालें तें ठीकच झालें असें ह्मणून स्वस्थ बसणें, किंवा बंड करणें ह्याशिवाय लोकांस मार्गच उरला नाहीं.

माझिनीस फर्माविलेली मरणाची शिक्षा कायम होती. सन १८६६ सालीं मेसिना येथील रहिवाशांनीं, ती शिक्षा आपल्यास मान्य नाहीं असें जाहिर रीतीनें सांगून इतालियन पार्लमेंटांत आपल्या तर्फे माझिनीस प्रतिनिधी निवडिलें; परंतु लोकांची ही आज्ञा मान्य करण्याचें त्यानें नाकारिलें. तो ह्मणाला, इताली देशास परत येण्याची परवानगी मिळाली तरी आपणास अंतःकरणपूर्वक राजनिष्ठेची शपथ पार्लमेंटांत बसते वेळीं घेतां येणार नाहीं. इताली देश एकवट आणि प्रजासत्ताक करण्याचें व्रत आपण चवतीस वर्षांपासून धारण केलेलें आहे. मध्यंतरीं राजसंस्था कायम ठेवून तिच्या नांवानें इताली देश एकवट करण्याचा जेव्हां लोकांनीं उपक्रम केला, तेव्हां लोकमत प्रमाण मानणें आपलें कर्तव्य समजून त्यांच्या त्या प्रयत्नास आपण मदतही केली होती, व ज्या मार्गानें जाऊन राजास इताली देश एकवट करितां आला असता, तो मार्गही आपण त्यास दाखवून दिला होता. तथापि, आपण घेतलेल्या व्रताचा अद्याप कधींही भंग केलेला नाहीं. सर्व लोकांनीं रोम शहर इतालीची राजधानी करण्याचें एकमतानें ठरविलें असतां राजानें ती गोष्ट जुमानिली नाहीं; पोपची सत्ता कायम राखण्यासंबंधानें झालेल्या तहास त्यानें आपली संमती दिली आहे; व व्हेनिसची सुटका करण्यासाठीं लोकांचे पैसे पाण्यासारखे ओतून उभें केलेलें सैन्य त्यानें बरतर्फ केलें आहे; तेव्हां सर्व इतालियन लोकांनीं पसंत केलेली नसून, इतालीच्या एका प्रांतानें * ठरविलेली राज्यपद्धति आपणांस कबूल आहे अशी शपथ मी कधींही घेणार नाहीं.

* हा प्रांत पीडमॉन्ट होय. इतालीची विद्यमान राज्यपद्धति सन १८४८ सालीं लोकांनीं चार्लस आल्बर्ट राजापासून जुलुमानें व घाईनें ठरवून घेतलेली होती. त्या वर्षीं, एक तर लोकांचें म्हणणें कबूल करावें, नाहींपेक्षां गादीस मुकावें अशी वेळ इतालींतील सर्व राजास येऊन ठेपली होती.

शेवटीं त्यानें लिहिलें कीं 'माझी अशी पूर्ण खात्री झाली आहे कीं, इताली देश एकछत्री, स्वतंत्र आणि बलाढ्य करून त्याची भरभराट करण्यास लागणारा वकूब राजाच्या अंगीं नाहीं. सबब, मीं अशी शपथ घेतली तर राजकीय कामांत लबाडी करून अनीतीचें उदाहरण आपल्या इतालियन देशबांधवांस घालून दिल्याबद्दल मला जन्मभर पश्चात्ताप होईल.'

सन १८६६ सालीं आस्ट्रिया आणि प्रशिया ह्या देशांमध्यें लवकरच लढाई जुंपण्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं, तेव्हां लोकांनींही आस्ट्रियाशीं लढाई करण्याविषयीं ओरड सुरू केली, व त्यांचा शब्द मोडण्याचा राजाला हिय्या होईना. या युद्धाच्या वेळीं आस्ट्रियाची धांदल उडाली, तेव्हां ज्या अनुकूल संधीची आतुरतेनें वाट पाहत बसण्याचें राजानें मिष केलें होतें ती संधी, तो सोन्याचा दिवस, अगदीं नजीक येऊन ठेपला. ह्या वेळीं आस्ट्रियाच्या अंमलाखालीं असलेले इतालीचे प्रांत परत मिळविण्याचा यत्न आपण न करणें ह्मणजे तें काम करावयास लोकांस सांगण्यासारखें होतें; व तसें केलें असतां परिणामीं व्हिक्टर राजास आपल्या गादीस मुकावें लागलें असतें.

सन १८४७–४८ सालीं राष्ट्रक्षोभसिंधूस अशी भयंकर भरती आली होती कीं, तिच्या लोंढ्यानें दक्षिण व मध्य इतालींतील ज्या ज्या राजांनीं त्याच्या वेगास उघडपणें प्रतिरोध करण्याचा प्रयत्न केला त्या सर्वांस गट्ट केलें. व्हिक्टर इमान्युअल राजा हा त्या सर्वांपेक्षां अधिक कावेबाज असल्यानें त्या लोंढ्याचा मार्ग सोडून बाजूस उभा राहिला; व दुसरे राजेलोक त्या लोंढ्यांत गटांगळ्या खात असतां, त्यांच्या डोक्यावरचे मुकुट काढून घेऊन ते लोकांची देणगी ह्मणून त्यानें प्रसिद्धपणें आपल्या डोक्यावर चढविले. नंतर, तो लोंढा स्वतःच्या सिंहासनाकडे वळला आहे, व तो आतां आपणास आटोपणार नाहीं असें जेव्हां त्यास दिसलें, तेव्हां त्यानें आपलें सिंहासन त्या ओघावर तरतें सोडून प्रवाह नेईल तिकडे त्याला जाऊं दिलें. थापाथापी करण्याची विद्या त्यास उपजतच अवगत होती. वास्तविकपणें, लोकमतप्रवाहापुढें त्याचें कांहीं चालत नसतांही, 'पहा एखाद्या नावेप्रमाणें मी आपलें सिंहासन हवें तिकडे नेतों आहें,' असें मधूनमधून त्यानें ओरडतच असावें.

ह्या लढाईसंबंधानें माझिनीनें कांहीं सुरेख पत्रें लिहिलीं आहेत, त्यांत

इतालियन लोकांस त्यानें सूचना दिली आहे कीं, त्यांनीं आपल्या देशांत फ्रेंचांस पाय ठेवूं देऊं नये, नाहीं तर त्या 'थोर मनाच्या दोस्ता'स त्याच्या कामगिरीबद्दल कांहीं प्रांत देणें त्यांना भाग पडून त्यांत इतालीची शोभा राहणार नाहीं. प्रशियाशीं तह करण्यासंबंधानें त्या पत्रांत माझिनीनें आपलें प्रतिकूळ मत दिलें आहे. तो ह्मणतो, 'इतालियन लोकांनीं हें लक्षांत बाळगावें कीं पोलंड देशाचा पाडाव करून त्यास परतंत्र करण्यांत प्रशियाचें अंग होतें. प्रशियांतील दीन प्रजेनें स्वातंत्र्यासाठीं जेव्हां ओरड चालविली तेव्हां तिजवर जुलूम व रक्तपात करून त्यानें ती बंद पाडिली. आपले प्रांत परत मिळविण्यासाठीं असल्या राजाशीं सलोखा करणें उचित नाहीं; व केलाच तर त्याचें प्रायश्चित्त लागलेंच भोगावें लागेल. कारण जर्मन संयुक्तराष्ट्र ट्रीस्ट आणि ट्रेन्टिनो ह्या प्रांतांवर आपला हक्क सांगत आहे, व त्या राष्ट्राच्या इच्छेस अनुसरून त्याची मदत आपण घेतली तर ते प्रांत आपणांस सोडून द्यावे लागतील. आस्ट्रियाशीं लढाई चालविण्यासाठीं इतालीनें स्वतःच कंबर बांधली पाहिजे. ह्या कामीं कोणाशीं एकोपा करणें जरूरच पडेल, तर आस्ट्रियाचें जूं ज्यांच्या मानेवर जुलमानें ठेवण्यांत आलें आहे अशा लोकांशीं मात्र तो न्याय्य व सुरक्षित होईल. आपापल्या घराण्यांचें वर्चस्व वाढविण्यासाठीं राजे लोक लढूं लागले असतां जुलमानें त्यांच्या अंमलाखालीं राहत असलेली त्यांची प्रजा त्या लढायांकडे ढुंकून पाहणार नाहीं; कदाचित् ती त्यांस प्रतिकूळही होईल. पण इतालियन लोक आपलें राष्ट्र स्वतंत्र करण्यासाठीं लढूं लागतील तर, आस्ट्रिया आणि तुर्कस्थान ह्यांनीं आपसांत वांटून घेतलेल्या हंगेरी, बोहीमिया, सर्व्हिया, रोमानिया, व दक्षिणेकडील स्लेव्होनिआ वगैरे प्रांतांतील लोक इतालीस अनुकूल होतील एवढेंच नव्हे, पण तींत इतालीची फत्ते होण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं तर इतालीस उत्तम मदतही देतील. ह्या लढाईस राष्ट्रीय स्वरूप येण्यासाठीं लोकांनीं मोठमोठ्या जमावांनीं स्वसंतोषानें लढण्यास सिद्ध होऊन राजाच्या सैन्यास मदत केली पाहिजे.'

ज्या वर्तमानपत्रांत माझिनीचें हें पत्र छापण्यांत आलें होतें, तीं सरकारानें ताबडतोब जप्त केलीं. तथापि त्यामुळें सर्व राष्ट्रास असें स्फुरण चढलें कीं, लढाईखात्याच्या प्रधानाकडे स्वयंसेवकांच्या पलटणींत दाखल होण्यासाठीं पंच्याण्णव हजार लोकांचे अर्ज आले; तेव्हां तो प्रधान घाबरला,

व ह्मणाला कीं 'हा प्रकार असाच चालूं देतां कामा नये. हा सगळा देशच सैन्यांत भरूं पाहत आहे.' या लोकांपैकीं बहुतेकांस नाहीं ह्मणून सांगून फारच थोड्यांस पलटणींत दाखल करण्यांत आलें; व ज्यांस पलटणींत दाखल केलें होतें, त्यांची राजापाशीं यथास्थित सैन्य आहे अशी हळूहळू समजूत घालून त्यांपैकीं बऱ्याच जणांस वाटेस लाविलें. बाकी जे थोडे राहिले होते त्यांस ग्यारिबॉल्डीच्या ताब्यांत देऊन जेथें खास सैन्याचें पाठबळ त्यांस मिळणार नाहीं अशा आल्प्स पर्वतांतील कांहीं जोखमाच्या ठिकाणीं त्यांस हत्यारेंपात्यारेंदेखील धड न देतां पाठविण्यांत आलें. मेसिना येथील शहरवाशांनीं माझिनीस स्वदेशीं येण्याची बंदी झाली होती तीविरुद्ध आपलें मत प्रसिद्ध करण्याची पुन्हां एक संधी साधून त्यास पूर्वीप्रमाणें इतालियन पार्लमेंटांत आपल्या वतीनें प्रतिनिधी निवडिलें. पार्लमेंटांतील राजपक्षीय पोटबाबू सभासदांच्या बहुमतानें ही निवडणूक रद्द झाली; परंतु लोक इतके चवताळून गेलेले होते कीं, राजास आस्ट्रियाशीं पूर्वी तह केला असतांही लढाई करणें भाग पडलें. राजाच्या अंगांत स्वदेशाभिमानाचा यत्किंचित लेश असता तर, प्रशियाच्या सैन्यापुढें आस्ट्रियाची अवचित गाळण झाली, ती पाहून फ्रान्सची पर्वा न करितां लढाई चालू ठेवण्याचा त्यानें निश्चय केला असता. परंतु असें केल्यानें लोकांच्याही अंगांत स्वाभिमानाचें वारें भरलें असतें, व ह्या गोष्टीची राजास आस्ट्रियापेक्षांही जास्त भीति वाटत असे. सेनापती मेडिसाय ह्यानें निकरानें आणि मनापासून लढाई चालविली, व ट्रेन्टिनो प्रांतामध्यें शत्रूचा सप्पा उडविला; पण राजास तें नको होतें; त्यामुळें मेडिसाय याचें विजयी सैन्य ट्रेन्टो शहरानजीक जाऊन ठेपतें तोंच राजानें तें एकाएकीं परत बोलावून घेतलें, व इतालीच्या स्वातंत्र्यासाठीं आपले प्राण बळी देण्यास ज्या बऱ्याच लोकांनीं खुशीनें कंबर बांधिली होती त्या आल्प्स पर्वतांमधील शूर लोकांस दगा देऊन पुन्हां आस्ट्रियाच्या स्वाधीन करण्यांत आलें. प्रशियाचा जय झाल्यामुळें ऱ्हाइन नदीच्या कांठच्या प्रांतांवर झडप घालून आस्ट्रिया व प्रशियाच्या भांडणांत आपला लाभ करून घेण्याचें लुई नेपोलियनास साधेना. तेव्हां ही लढाई बंद करण्याची त्याची इच्छा होतीच. त्यामुळें इतालियन मुख्य सेनापती ला-मार्मोरा आणि आरमारावरील मुख्य सरदार पर्सानो ह्यांनीं कस्टोझा आणि लीसा येथें निमूटपणें आपला पराभव होऊं

दिला. आपल्या सरदारांचा हा अपजय कसा झाला ह्याचें लोकांस मोठें गूढ पडलें. तो पराभव इतका लाजिरवाणा होता कीं त्यांत कांहीं तरी दगा असावा अशी लोकांत चर्चा सुरू झाली; व ज्यांनीं जाणूनबुजून आपल्या डोळ्यांवर पांघरूण घेतलें होतें अशा लोकांशिवाय बाकी सर्वांस माझिनीचें गुप्त तहासंबंधाचें पूर्वीचें ह्मणणें खरें वाटूं लागलें. ह्यानंतर काउन्ट बिस्मार्क यानें ज्या गोष्टी उघडकीस आणिल्या त्यांमुळें तर माझिनीच्या ह्मणण्याच्या खरेपणाविषयीं मुळींच संदेह उरला नाहीं. बिस्मार्कनें असें प्रसिद्ध केलें कीं, 'आल्प्स पर्वतापासून तों समुद्रापर्यंत इताली देश स्वतंत्र करण्यासाठीं लढाई करण्यांत येत आहे असें जें व्हिक्टर राजाकडून ह्मणण्यांत येत होतें, तो सर्व नाटकी प्रकार होता. वस्तुतः राजा आणि लुई नेपोलियन ह्यांच्यामध्यें पूर्वींच असें ठरून चुकलें होतें कीं, प्रशियाचा एकदां मोड झाला, ( आणि तो होणारच अशी त्यांना खात्री होती ) कीं प्रशियाशीं राजानें जो एकोपा केला होता त्यांतून आपलें अंग काढून घ्यावें; व्हेनिश प्रांत बळकाविण्याचा नेपोलियन बादशहाचा कावा साधण्यासाठीं फ्रान्सास मोकळें मैदान करून द्यावें; व ह्या कामागिरीच्या बदल्यांत व्हिक्टर राजानें आस्ट्रियाच्या ताब्यांत असलेला व्हेनिस प्रांत आपणाकडे घ्यावा.

व्हिक्टरराजा आतां कसकसे फांसे टाकीत आहे हें पाहण्यासाठीं माझीनी लक्ष लावून बसला असल्यानें, व इतालियन लोकांस त्यानें वेळेवर इशारत दिली असल्यानें ठरलेला बेत राजास पुरतेपणीं सिद्धीस नेतां येईना. इतालियन सैन्य रणांत उभें असतां व लोकही सावध असतां आपल्यासाठीं कबूल करून घेतलेला पीडमॉन्ट प्रांत घशांत घालण्यास लुई नेपोलियनची हिंमत चालेना. वर सांगितलेल्या नाटकाचा पहिला अंक नुकताच आटपला होता; पण लढाई चालू ठेवण्यापासून लुईला आतां कांहीं फायदा झाला नसता; व आस्ट्रियाचा फार नाश होऊन तो जेरीस आल्यानें त्यानें व्हेनिस प्रांत फ्रान्सास दिला, व फ्रान्सनें तो इतालीच्या तोंडावर टाकला. 'भुकेलें भूत कोंडोळयास राजो' अशी ह्मण आहे; त्याप्रमाणें इतालियन लोकांची जरी पुरती कुरकूर मिटली नाहीं तरी त्यांनीं तेवढ्यावरच समाधान मानून घेतलें, व अखेर कटांत सामील असलेल्या ट्रेन्टिनोमधील शूर लोकांस आस्ट्रियाच्या स्वाधीन करण्यांत आलें.

सर्व इताली देश स्वतंत्र होईपर्यंत लढाई चालू ठेवण्याचें राजास भाग पाडण्यासाठीं, किंवा राजाचें कांहीं एक चालूं न देतां ती आपणच होऊन सुरू ठेवण्याचें अवसान लोकांच्या अंगांत आणण्यासाठीं माझिनीनें आपली पराकाष्ठा केली; पण राजभक्त वर्तमानपत्रें, पार्लमेंटांतील बहुतेक सभासद, आणि इतालींतील उदरपरायण व स्वाभिमानशून्य लोक, ह्या सर्वांनीं एकच कल्होळ करून बिचाऱ्या तोंडघशीं पडलेल्या ट्रेन्टिनो प्रांतांतील लोकांचा आक्रोश कोणाच्या कानीं येऊं दिला नाहीं. राष्ट्राच्या कर्तव्याविषयीं लोकांस उपदेश करणाऱ्या माझिनीवर त्यांनीं शिव्याचा भडिमार सुरू केला, व 'उदार दोस्त' व 'इतालीचा समशेरबहाद्दर' ह्यांचे पोवाडे गाण्यास पुन्हां प्रारंभ केला; व व्हेनीशिया प्रांत 'जिंकून' घेतल्यामुळें इताली देश एकछत्री करण्याचें काम पूर्ण झालें, असें सर्वांनीं मिळून चोहोंकडे प्रसिद्ध केलें. इकडे परदेशांत भटकत फिरून आपल्यावर तोंड सोडणाऱ्या माझिनीस शांत करण्याच्या आशेनें राजानें त्याच्या सर्व अपराधांची क्षमा केल्याबद्दलचा एक जाहिरनामा प्रकट केला. लोकांच्या शिव्या किंवा ओंव्या ह्या दोहोंविषयींही माझीनी सारखाच उदासीन असे. त्याचा एकसारखा आक्रोश सुरू होता कीं, आल्प्स पर्वतांतील घाट ह्मणजे इतालीचें नाकें होय; तें नाकें अद्याप दरोडेखोरांच्याच हातीं राहिलें आहे. इतालियन लोकांनीं आपल्या देशाचा बोटाएवढा तुकडाही दुसऱ्याच्या ताब्यांत असूं देतां कामा नये. ह्या विषयासंबंधानें एक लेख लिहून झाल्यावर तो एकदां सहजगत्या ह्मणाला, 'माझ्या ऐकण्यांत नुकतेंच असें आलें आहे कीं, मला माफी देण्यांत आली आहे. माझें सर्व आयुष्य देशसेवेंत खर्च झालें आहे. आतां माझा घटकाभर दिवस उरला आहे. इताली देशावर मीं प्राणापलीकडे प्रेम ठेविलें, व सर्वांनीं हात टेकले असतां एकट्यानें इताली एकछत्री करण्याचा उपदेशद्वारा व अन्य रीतींनीं प्रयत्न केला, ह्या भयंकर अपराधाबद्दल मला आतां जी क्षमा करण्यांत येत आहे, ती उरलेल्या थोड्याशा आयुष्यासाठीं कबूल करून मी आपल्या पांढऱ्या केंसांस लाज आणीन असें ज्या कोणास माझी माहिती आहे त्यांस कधींही वाटणार नाहीं. घटकाभर मी तेंही करीन असें गृहीत धरिलें तरी, पराजय, विश्वासघात, आणि याचना,

ह्या गोष्टींची ज्या दिवशीं इताली देशास लाज वाटेनाशी होईल त्या दिवशीं त्याचें तोंड पाहण्याचादेखील मला किळस येईल.'

वर लिहिलेल्या तीन्ही गोष्टींची इतालीस लाज वाटली नाहीं; तेव्हां माझिनीनें उघड रीतीनें लिहिलें कीं, राजसंस्थेच्या हातून इतालीची एकी होईल कीं नाहीं हें पाहण्याची वेळ आतां राहिली नाहीं. तो ह्मणाला, 'सन १८५७ सालापासून इताली देशांतील प्रजासत्तावाद्यांनीं आपलीं खासगी मतें एका बाजूस ठेवून सरकारास चांगली मदत दिली, त्याबद्दल त्यांची स्तुती करावी तेवढी थोडी आहे. इतालीची एकी व्हावी ह्मणून त्यांनीं आपल्या मतांचा प्रसार करण्याचेंही सोडून दिलें. एकी करण्याचें काम राजाकडे सोंपविणें राष्ट्रानें पसंत केलें, तेव्हां त्याचा परिणाम काय होतो तो पाहत ते स्वस्थ राहिले. राजा आणि त्याचें मंत्रिमंडळ ह्यांनीं जेव्हां असें प्रसिद्ध केलें कीं, आस्ट्रियाकडे गेलेले प्रांत परत मिळण्यासाठीं लढाई करण्याचा आपला इरादा आहे, तेव्हां त्यांस आपलें वचन मोडण्यास कांहीं निमित्त मिळूं नये ह्मणून प्रजासत्तावाद्यांनीं हवा तसा जुलूमही सोशिला. कारण त्यांस माहीत होतें कीं, इतालीची प्रतिष्ठा व सुरक्षितपणा हीं त्या लढाईवर अवलंबून होतीं. स्वदेशहित लक्षांत वागवून जर ती लढाई करण्यांत आली असती, तर आमच्या देशाची एकी होऊन लोकांस स्वातंत्र्यही प्राप्त झालें असतें. ह्या लढाईची तयारी करण्यास राजास पांच वर्षांचा अवकाश मिळाला होता. पैसा महामूर होता. वाटेल तो हुकूम बजावण्यास पार्लमेन्ट सभा हात जोडून उभी होती; व सर्व इताली देश आपले प्राण आणि धन खर्च करण्यास तयार होता. अशी स्थिति असतांही परिणाम काय झाला? महाराजांनीं लढाई सुरू केली त्या वेळीं त्यांजपाशीं साडेतीन लक्ष सैन्य, दहा हजार राष्ट्ररक्षक (नॅशनल् गार्ड्स्), व ग्यारिबॉल्डीच्या ताब्यांत तीस हजार स्वयंसेवक इतकी फौज होती. शिवाय प्रसंग पडल्यास सर्व राष्ट्र मदत करण्यास सिद्ध होतें. तथापि कस्टोझा आणि लीसा येथें पराभव पावून (हे पराभव कसे झाले हें समजत नाहीं) फ्रान्सकडून इशारा होण्याबरोबर महाराजांनीं लढाईतून माघार घेतली. आमच्या सरहद्दीच्या आंत ट्रेन्टिनो हा प्रांत असतां तो सोडून देण्यास त्यांस लाज वाटली नाहीं; व नेपोलियननें धिक्कारपूर्वक त्यास व्हेनिस प्रांताची भिक्षा घातली ती त्यांनीं पदर पसरून घेतली.'

राष्ट्र एकछत्री करण्याचें काम राजाच्या हातून होण्याची आशा आतां नष्ट झाल्यामुळें माझिनीनें या वेळीं असें प्रसिद्ध केलें कीं, आपल्या देशाची एकी व स्वातंत्र्य ह्यांची खरी किंमत जे समजत असतील त्यांस तीं साध्य करून घेण्याचा एकच उपाय उरला आहे. तो प्रजासत्ताक राज्य स्थापण्याचा उपदेश सुरू करणें हा होय.

ह्याच वर्षी पालर्मो शहरानें बंड केलें. परंतु त्याचा कित्ता दुसऱ्या प्रांतांनीं न घेतल्यामुळें त्या शहरावर गोळ्यांचा मारा सुरू करून तें हस्तगत करून घेऊन तेथें शांतता करण्याच्या कामासाठीं राजास प्रचंड सैन्य पाठवितां आलें. तेथें लष्करी कायदा सुरू करण्यांत आला, व अद्यापही* त्याचा अंमल जारी असून लोक नेहमीं दंगेधोपे करीत असतात.

ग्यारिबॉल्डीचे रंग क्षणोक्षणीं बदलत असल्यानें राष्ट्रीयपक्षामध्यें दुही माजली, व फाटक्यातुटक्या मूठभर लोकांनिशीं त्यानें पोप व त्याचे कैवारी फ्रेंच लोक ह्यांच्या हातून रोम शहर सोडविण्याच्या अविचाराच्या प्रयत्नाला हात घातला, ह्या गोष्टी येथें सांगत बसण्याची गरज नाहीं. माझिनीचे सतत परिश्रम पूर्ववत् चालू होते, व प्रजापक्षीय वर्तमानपत्रद्वारा त्यानें लोकांच्या कानींकपाळीं एकसारखी ओरड चालविली होती, तिजमुळें इतालियन लोकांच्या मनांत स्वदेशप्रीति जागृत होऊन त्यांस आपलें महत्व कळूं लागलें होतें. इतालीमध्यें जे समजंस लोक होते त्यांस राष्ट्रीयप्रश्नाशिवाय दुसरें कांहींएक सुचेनासें झालें होतें. ग्यारिबॉल्डी जर माझिनीशीं मिळून चालता, तर ह्या दोघांच्या वजनामुळें सर्व राष्ट्रांत अशी चळवळ सुरू झाली असती कीं, आपली गादी सुरक्षित ठेवण्यासाठीं राजास देशकार्य पुन्हां हातीं घेणें भाग पडलें असतें. ग्यारिबॉल्डीचा अंतःस्थ हेतु कांहीं असो; पण एवढें खरें आहे कीं, कमी महत्वाचे राजकीय प्रश्न एकीकडे ठेवून केवळ आपल्या देशाखातर आपल्याभोंवतीं सैन्य जमा करण्याचें तो कबूल करीना. पोपच्या अधिकारास धक्का लागूं न देण्याचें राजानें पत्करिलें होतें. त्याजकडून पोप महाराजांस वारंवार आश्वासन मिळत असे कीं, गुरुचरणीं माझी भक्ति दृढ आहे. असें असतांही राजाच्या नांवानें लोक जमा करण्याचा आपला आग्रह ग्यारिबॉल्डी सोडीना. राजा आंतून आपल्याकडचाच आहे, व फ्रान्सास

* मूळ ग्रंथ लिहिला गेला त्या वेळीं.

वाईट न वाटावें एवढ्यासाठीं तो वरपांगी आपल्याशीं सामना करणार आहे, ही जुनी भाकडकथा ग्यारिबॉल्डी आपल्या अनुयायांस अद्यापही सांगत होता. पूर्वीं ह्या थापेवर भरंवसा ठेविल्यामुळें लोक फसले होते. त्यांचा आतां ह्या गोष्टीवर विश्वास बसेना. आपला जीव धोक्यांत घालून महाराजांच्या मुकुटास नवीन रत्नें लटकावून देण्यावांचून प्रजापक्षीय लोकांचें कांहीं अडलें नव्हतें. अशा रीतीनें लोकांची फाटाफूट झाल्यानें एकजुटीनें एखादें मोठें काम हातीं घेणें अशक्य झालें. वर लिहिलेल्या प्रकारामुळें ग्यारिबॉल्डीच्या अनुयायांत दृढनिश्चय मुळींच उरला नाहीं. हें पाहून त्या धूर्त राजानें ग्यारिबॉल्डी लोकांस सांगत फिरत आहे तें खरें आहे असें भासविण्याकरितां त्यास उघड रीतीनें लोक गोळा करूं दिले. ह्या बिचाऱ्या देशनिष्ठ लोकांच्या नशीबीं फ्रेंच पलटणींच्या हातून कत्तल होण्याचें लिहिलें होतें. ग्यारिबॉल्डी सरहद्द ओलांडून पुन्हां देशीं आल्याबरोबर राजानें त्यांस कैद करून आलेग्झांड्रिआ किल्यावर नेऊन ठेविलें; जणूं काय राजा हा फ्रान्सचा कोतवालच होता. माझीनी त्या मोहिमेच्याविरुद्ध होता; तथापि राजभक्त वर्तमानपत्रकारांनीं तिचें पाप माझिनीच्या डोक्यावर लादलें, हें सांगणें नकोच. पुढील वर्षाच्या इतिहासांत, झडत्या, धराधरी, कांहीं खरे व पुष्कळ काल्पनिक कट, प्रजापक्षीय वर्तमानपत्रांच्या व हत्यारांच्या जप्त्या ह्यांची एकच गर्दी उडाली आहे. भ्रष्ट व जुलमी सरकाराच्या अंमलाखालीं राहिल्यानें लोकांच्या नैतिक विचारांचा ऱ्हास होत चालला होता. तथापि माझिनीच्या कुडींत प्राण होता तावत्कालपर्यंत इतालियन लोकांच्या मनांतून राष्ट्रीय व ऐक्यसंबंधीं विचारांचा सर्वथैव लोप होऊं शकला नाहीं, ह्या गोष्टीची वर लिहिलेल्या जप्त्या वगैरेंवरून चांगली साक्ष पटते.

माझिनीच्या 'अनर्थकारक' वजनाचा इतालिअन सरकारास बींमोड करतां येईना, तेव्हां त्याची नालस्ती करण्याचें काम त्यानें चालविलें, व खून आणि लूट करण्यासाठीं एका जबरदस्त कटांत सामील असल्याचा त्याजवर आरोप ठेवून, स्वित्झरलंड देशांतून त्यास हांकून देण्याविषयीं राजानें तेथील सरकाराकडे मागणी केली. माझिनीनें एक पत्र प्रसिद्ध करून ह्या आरोपाचा जबाब दिला. तें पत्र त्यानें आपल्या शत्रूंस उद्देशून लिहिलेलें होतें. त्या पत्रांत तो ह्मणतो:—

'तुमच्या वर्तमानपत्रांतून जे मजवर नुकतेच आळ आणण्यांत आले आहेत त्यावरून तुमच्या अंगांत नीति, धैर्य, आणि अक्कल ह्यांचा अभाव आहे असें ह्मणावें लागतें. हे आरोप खोटे आहेत असें तुम्हांस माहीत असतां तुह्मी ते सांगत फिरतां, त्याअर्थी तुमच्यांत नीति नाहीं. सर्व राज्य-सूत्रें तुमच्या हातीं आहेत, तुमचा खजीना भरपूर आहे, व लष्कर तुमच्या आज्ञेंत आहे. असें असून आमच्यावर तुह्मी कोणतें हत्यार उचलतां ह्मणाल, तर राजास न शोभणाऱ्या अशा शिव्या व हेर हें होय. तेव्हां तुमचा दुसरा इलाज चालत नाहीं हेंच खरें कीं नाहीं? आज वर्षानुवर्ष तुह्मी स्वतः लोकांस फसवीत आलां आहां. असें असतां, हे आळ खरे आहेत, व मारेकरी घालणें, लूटफाट करणें, असलीं कामें मी व माझे मित्र यांच्या हातून घडूं शकतील ही गोष्ट लोकांस खरी वाटेल ह्मणून तुह्मी समजतां, तेव्हां तुमची अक्कल काय सांगावी? द्रव्यतृष्णेनें जीं दोनचारशें माणसें तुमची सेवा बजावीत असतील, (व असल्या माणसांचा आम्हांस खप लागलाच, तर तीं उद्यां आमचीही गुलामगिरी करण्यास तयार होतील) त्यांची गोष्ट सोडून द्या; पण बाकीचे लोक तुम्हांस पुरतेपणीं ओळखीत आहेत, व आम्हांसही ते हळूहळू ओळखूं लागले आहेत. प्रधानगिरीच्या किंवा दुसऱ्या अधिकारपदावरून उतरतांनां तुमचा तळीराम कसा गार झालेला होता, व उलट त्याच स्थितींत आमच्या थैलीस कशी क्षयाची भावना झाली होती, हें लक्षावधि लोकांनीं पाहिलें आहे. आमच्या पक्षापैकीं कित्येक लोक देशोधडीस लागून अन्नान्न करीत प्राणास मुकले, हें लोकांच्या कानीं आलेलें आहे. आम्ही सर्वज्ञ नाहीं. मनुष्यमात्राप्रमाणें आमच्या हातून चुका घडलेल्या असतील; परंतु लोकांस हें पूर्णपणें समजलें आहे कीं स्वतः मौजा मारण्यासाठीं किंवा खासगी सूड उगविण्यासाठीं आम्ही लोकांचें किंवा देशाचें नुकसान केलेलें नाहीं.' लोकांमध्यें चोहोंकडे जी अस्वस्थता आणि चळवळ सुरू होती, व जिच्यायोगानें राजपक्षीय लोक अगदीं घाबरून गेले होते, तिजविषयीं माझिनीनें आपल्या पत्रांत लिहिलें आहे कीं, 'हम करे सो कायदा ही राज्यपद्धति इतालींत सुरू आहे; उच्चकुलांत जन्म किंवा गर्भश्रीमंती हीं असल्याशिवाय सरकारांत रिघाव होत नाहीं; मोठ्यापासून तों लहानापर्यंत लांचलुचपतीचा प्रकार सुरू आहे; संपत्तीचें उत्पादन

व तिचा विनिमय करितांनां कामकऱ्यांस पदोपदीं कायद्याच्या अडचणी आहेत; लोक अज्ञानांधकारांत बुडालेले असतां, ( त्यांनीं स्वतंत्र होऊं नये म्हणून ) त्यांच्यांत शिक्षणाचा प्रसार मुळींच करण्यांत येत नाहीं; व हत्यारें बाळगण्याचा आणि पार्लमेन्टांत आपल्यातर्फे प्रतिनिधी निवडून पाठविण्याचा हक्क बहुजनसमूहास नाहीं. ह्या सर्व गोष्टी इतालियन लोकांस डोळ्यासमोर दिसत आहेत. तेव्हां वरचेवर राज्यक्रांती व बंडें करण्याचे प्रयत्न होत आहेत ह्यांत नवल तें कोणतें ? लोकांमधील अस्वस्थता व्यापारधंद्यास व सुखशांतीस अनर्थावह आहे ही गोष्ट खरी; पण जेथें सरकारास आपलें कर्तव्य समजत नाहीं, व तें लोकांच्या हक्कांची बेधडक पायमल्ली करितें, तेथें लोक बेदिल असलेच पाहिजेत.'

मिलन येथें बंड करण्याचा नुकताच एक प्रयत्न झाला होता, व त्यांत अंग असल्याचा माझिनीवर आरोप आला होता. ह्या गोष्टीस उद्देशून तो लिहितो, 'तुम्हांस धास्ती पडण्यासारखें कांहींही घडो, त्याची जबाबदारी तुम्ही बिनचूक माझ्या डोक्यावर ठेवितां, तेव्हां नाइलाजास्तव मला स्वतःविषयीं लिहावें लागत आहे कीं, मी तुमचा कट्टा दुस्मान आहें, व जिवांत जीव आहे तोंपर्यंत मी असाच राहीन; तुमचा आणि माझा कधींही समेट व्हावयाचा नाहीं, सर्व राष्ट्राच्या डोळ्यांदेखत तुम्हीं माझ्या देशाची अब्रू ठार केली आहे. माझ्या देशास महत्पद प्राप्त होण्याची वेळ ईशकृपेनें अगदीं समीप येऊन ठेपली होती, ती मागें लोटण्यासाठीं तुम्ही आपली पराकाष्ठा करून चुकलां आहां. अहाहा ! काय त्या वैभवाची थोरवी सांगूं ? तें आपल्या देशास प्राप्त होणार एवढें भाकित कळल्याबरोबर मीं आपलें तन मन व धन हीं सर्व त्या कामीं अर्पण केलीं, व कसलेंही नुकसान झालें तरी त्याच्या शतपट मोबदला आपणास मिळेल असें समजून चाललों. इताली देशाच्याठायीं जरी माझी निस्सीम भक्ति आहे, व जे त्याची निंदा करितात, त्यांत अनीतीचा प्रसार करितात व त्यास भलत्याच मार्गास लावितात अशांस पाहून जरी माझ्या तळव्याची आग मस्तकास जाते, तथापि तुमच्याविरुद्ध राष्ट्रद्रोही साधनांचा मीं कधींही उपयोग केला नाहीं; ज्यांच्या खरेपणाविषयीं माझ्या मनाची पक्की खात्री झाली नव्हती असले अरोप मीं तुह्मांवर कधींही आणिले नाहींत; व कांहीं वर्षांपूर्वी नवीन राज्यपद्धती घालून देण्याचा तुह्मीं आव घातला,

तेव्हां तसें करण्यास तुह्मांस हरकत केली नव्हती. सन १८४८ सालीं तुह्मीं शपथपूर्वक असें जाहिर केलें कीं इतालीदेश एकछत्री करण्यासाठीं आपण आस्ट्रियाशीं लढाई सुरू केली आहे, व ती संपल्यानंतर राज्यपद्धती ठरविण्याचें काम देशाकडे सोंपविण्यांत येईल, त्या वेळीं तसेंच सन १८५९ आणि १८६१ सालीं तुह्मीं आपल्या अधिकाऱ्यांकडून असें प्रसिद्ध करविलें कीं 'राजापाशीं सैन्य आहे, खजीना आहे व कित्येक वर्षे तयार होत असलेली युद्धोपयोगी सामग्री आहे; व लोकांना ज्या गोष्टी हव्या आहेत त्या (रोम शहर, आल्पसपर्वताचे नाकें, राष्ट्रीय स्वातंत्र्य, व व्यक्तीचे हक्क) प्राप्त करून घेण्यासाठीं तुह्मांस जे श्रम पडतील व खर्च होईल त्यापेक्षां कमी श्रमानें व खर्चानें आणि विशेष खात्रीनें राजा त्या प्राप्त करून देऊं शकेल, व तसें करण्याची त्याची इच्छाही आहे.' ह्या थापा मला स्वतःला खऱ्या वाटल्या होत्या असें नाहीं; परंतु लोकांनीं तुमच्यावर भरंवसा ठेविला, सबब मी तुमच्याविरुद्ध गेलों नाहीं. शिवाय तुम्हीं दिलेल्या वचनाप्रमाणें कांहीं तरी करून दाखविण्याची संधि तुह्मांस मिळाली पाहिजे, असेंही मला वाटत होतें. सबब प्रजासत्तेसंबंधानें मीं एक शब्दही काढिला नाहीं, व लढाईच्या कामीं आणि दक्षिण व मध्य इताली ताब्यांत घेण्याच्या कामीं माझ्यानें झाली तेवढी मदत मीं तुह्मांस केली, व माझ्या अंतःस्थ खटपटी किंवा ज्यांला कट अशी संज्ञा तुह्मांस देतां आली असती अशा सर्व गोष्टी मीं अगदीं बंद ठेवल्या होत्या. तुमचे हेतु बाहेर पडत तोंपर्यंत मी स्वस्थ बसून राहिलों; व माझा पूर्वीचा क्रम मला जर नाइलाजानें चालू करावा लागला, तर त्याबद्दल तुह्मांस आगाऊ सूचना देण्याचेंही मीं वचन दिलें.

'नंतर सन १८६१ सालच्या अखेरीच्या सुमारास मीं प्रजासत्तेचा बावटा उभारला. इतालीचें जें कांहीं बरें वाईट व्हावयाचें आहे तें प्रजासत्तेपासूनच होईल, प्रजासत्ताक राज्यव्यवस्था हितकर आहे, असा ज्यांचा विश्वास आहे त्यांच्या नांवानें एक जाहिरनामा प्रकट करून त्यांत मीं तुह्मांस उद्देशून लिहिलें कीं 'तुह्मांस आमच्याशीं लढावयाचेंच आहे, तर आतां दोन हात होऊं द्या. आम्ही दंड थोपटून उभे आहों. तुम्ही व आम्ही यांपैकीं राष्ट्रद्रोही कोण? तुमच्याआमच्यामध्यें सलोखा करण्याचे सर्व उपाय सरत तोंपर्यंत शांत राहून, ह्यानें नाहींतर त्यानें गुण येईल म्हणून सर्व

प्रयत्न करून पाहणारे व सर्वस्वीं हिरमोड झाल्यानंतर मात्र तुमच्याशीं उघड वैर करणारे आह्मी? किंवा आमच्यांपैकीं कित्येकांनीं देशहितासाठीं पाण्याप्रमाणें आपलें रक्त सांडून आयती तयारी करून दिली तिचा फायदा करून घेणारे, भोळ्या भावानें तुह्मांवर विश्वास टाकणाऱ्या इतालियन लोकांची मान कापणारे, आम्ही स्वस्थ बसलों आहों अशी संधी पाहून मोठ्या सैन्यासह येऊन प्रचंड राजसत्तेचें जूं इतालियन लोकांच्या गळ्यांत अडकविणारे, व पुन्हां त्यांसच 'आम्ही तुमचें काय लागतों? आम्ही राजाच्या पक्षाचे आहों' असें ह्मणणारे, व आह्मांस 'तुम्ही दरोडेखोर आणि खुनी आहां' म्हणून उलटून गोष्टी सांगणारे असे तुह्मी? रोम शहरास लोक पवित्र मानीत आहेत. त्याचा महिमा कायम ठेवणें तुमच्या हातीं होतें. त्या शहरानें दोनदां सुधारणेला चालन दिलें आहे. त्यासंबंधाचे जे इतिहास उपलब्ध आहेत ते वाचले असतां त्या शहराविषयीं पूज्यबुद्धि उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं. पण तोंडानें एक ह्मणत असतां, हातानें दुसरीच गोष्ट करणाऱ्या तुम्हीं त्या शहराचें नांव धुळीस मिळवून ज्याचा अधिकार हल्लीं नामशेष उरला आहे, अशा पोपच्या स्वाधीन तें केलें आहे, व फ्रेंच प्रधानानें तुह्मांस रोम शहर कधींही परत मिळावयाचें नाहीं असें सांगितलें तें तुह्मी निमूटपणें ऐकून घेऊन बसलां आहां.

'एकी करण्यासाठीं आह्मी इतके दिवस कंठशोष करीत आहों. व आमच्या पक्षाच्या लोकांनीं तिजसाठीं आपले प्राण व धन खर्चीं घातलें आहे, ह्या गोष्टींमुळें लोकांच्या मनांत एकी करण्याविषयीं जी दृढ इच्छा उत्पन्न झाली आहे, तिच्यायोगानें तुमचें बरेंच काम होऊन तुमच्या हातांत जणूं एक मोठी शक्ति आली, व लोकांचीं मनें आपल्याकडे ओढण्यास ती एक प्रकारचा पाश होऊन, कधीं काळीं आपलें राष्ट्र कृतार्थ होणार अशाविषयीं आपणास हमीच मिळाली होती. परंतु तुम्हांस लोकांवर जुलूम करण्याची व हरएक काम अर्धे टाकण्याची संवय लागून गेली असल्यामुळें आह्मीं रंगारूपास आणलेल्या राष्ट्रैक्याची तुम्हीं राळ करून टाकली. इताली देश एकछत्री करण्याचें सोडून देऊन त्याचें संयुक्त राष्ट्र करण्याचें वेड लोकांच्या मनांत आतां भरलें आहे. हाच क्रम जर सुरू राहिला तर लोकांचा सर्वस्वी घात होईल. तुमच्या पूर्वजांनीं केलेल्या घडामोडींचा चित्तवेधक इतिहास तुमच्यापुढें होता. त्याजवरून इतालियन

लोकांच्या राजकीय स्थितीचीं जीं दोन अवियोज्य तत्वें—राष्ट्रीय व स्थानिक स्वराज्य (ग्रामसंस्था)—त्या दोहोंमध्यें सुधारणा करून शाश्वत एकी कशी करावी हें तुह्मांस समजलें असतें. परंतु तुह्मीं प्रतिनिधी निवडण्याचा हक्क विशिष्ट वर्गाच्या लोकांस मात्र दिला. त्यामुळें, व तुमच्या अधिकाऱ्यांची अरेरावी व लष्करी लोकांचा जुलूम ह्यांमुळें सर्व ग्रामसंस्था मृतप्राय झाल्या आहेत. राष्ट्राच्या कारभारांत सर्व लोकांचा हात असावयाचा, तो न ठेवितां तुह्मीं राज्यपद्धती अगदीं संकुचित करून ठेविली. बरें ती तरी लोकांच्या सल्ल्यानें ठरविण्यांत आली आहे काय? नाहीं. तर एकीसाठीं लोकांत चळवळ सुरू होण्यापूर्वी, त्यांचीं मनें भयभीत झालीं असतां, मिलन शहराचा घात करणाऱ्या राजानें दरडावणी दाखवून जशी सांगितली तशी ती निमूटपणें ठरविलेली होती. सारांश इतालीमधील राष्ट्रीय अंकुराचा तुह्मीं उच्छेद करून टाकिलेला आहे. माझ्या आयुष्याचा जो घटका अर्धी घटका दिवस उरला असेल तो एका कमी महत्वाच्या राजकीय प्रश्नासाठीं मी खर्चूं इच्छीत नाहीं. प्रजासत्ताक राज्याची स्थापना कांहीं वर्षें किंवा महिने आगेमागें झाली ह्मणून काय झालें? थोड्याच अवकाशांत ती होणार हें खचित आहे. ती गोष्ट घडवून आणण्याचें काम मी कालाकडे आणि तुमच्या हातून घडणाऱ्या चुकांकडे सोंपवितों. लोकांच्या एखाद्या हक्कासंबंधीं किंवा वसुलासंबंधीं प्रश्नाचा उलगडा, हळूहळू लोकमतांत सुधारणा झाली ह्मणजे होईल, असें ह्मणून तो प्रश्न लांबणीवर टाकितां येतो; परंतु देशाच्या अब्रूसंबंधाच्या प्रश्नाची तशी ढकलपट्टी करितां येत नाहीं. अब्रूची हानि हा एक प्रकारचा भिरडभुंगा आहे. तो एकदां कां एखाद्या देशास लागला, ह्मणजे वेळींच जर त्याचा समाचार घेतला नाहीं, तर तो सर्व राष्ट्रास पाळांमुळांसुद्धां पोखरून टाकतो. आपल्या अंगांत प्रतिकार करण्याची धमक असतां एखाद्या देशाचे लोक जर दुसऱ्या देशानें केलेला अपमान मुकाट्यानें सहन करून बसतील, आपण स्वतंत्र राहून आपल्या देशाचें बरें वाईट करण्याचें सामर्थ्य अंगांत असतां जर ते लोकांच्या तोंडाकडे पाहत राहून, ते टाकतील तेवढ्याच स्वातंत्र्याच्या तुकड्यावर समाधान मानून राहतील, तर त्यांचा सर्वस्वी नाश झालाच असें समजा. ते निस्सत्व होऊन जाऊन त्यांस बरे दिवस येण्याची आशाच करावयाला नको.

'आमच्या पक्षापैकीं लॅमॅनेस हा अत्यंत थोर गृहस्थ होता. पण आतां आह्मांस त्याचा विसर पडला आहे. त्यानें मरणापूर्वी थोडया दिवसांवर लोकांस उद्देशून ह्मटलेले शब्द वारंवार वर्तमानपत्रद्वारा लोकांच्या कानीं आणल्याशिवाय आह्मी राहणार नाहीं. उघड रीतीनें आम्हांस तसें करूं देण्यांत न आल्यास आह्मी आपले लेख गुप्तपणें चोहोंकडे पाठवूं. लॅमेनेस ह्मणतो—'हें लक्षांत ठेवा कीं, तुमच्या हालअपेष्टांची सीमा होऊन, ह्यापुढें तुमच्यानें दुःख सहन होत नाहीं अशी स्थिति झाल्यानें, तुम्हांवर जुलूम करणारांनीं हिसकावून घेतलेले हक्क परत मिळविण्याचा तुम्ही जेव्हां जेव्हां निश्चय कराल, तेव्हां तेव्हां 'बंडखोर' 'राष्ट्रद्रोही' असा काळा टिळा तुमच्या कपाळीं लावण्यास जुलमी सत्ताधारी कमी करावयाचे नाहींत; पण विचार करा कीं बंड ह्मणजे काय? आपला खरा धनी असेल त्यावर उठणें ह्मणजे बंड होय. आपला धनी आस्ट्रिआ नव्हे, आपले धनी सर्व इतालियन लोक होत. तेव्हां लोकच स्वतःविरुद्ध बंड करितात हें कसें जुळतें? आपण बंडखोर नव्हे; तर लोकांची पायमल्ली करून आपली तुंबडी भरणारे, व कपटानें किंवा जुलुमानें लोकांवर आपलें वर्चस्व स्थापणारे बंडखोर होत. लोकांनीं तें वर्चस्व मोडून काढणें ह्मणजे शांततेचा भंग करणें असा अर्थ होत नाहीं. देवाच्या घरचा न्याय असाच आहे, व त्याच्या प्रेरणेप्रमाणें ते वागतात असें ह्मणण्यास हरकत नाहीं.'

'लोक तुमच्या बाजूस आहेत काय? तुमची जबरदस्त शक्ति व फार दिवसांपासून चालत आलेला दरारा (ह्या दोन गोष्टींचा पुष्कळांच्या मनांवर मोठा अंमल असतो) ह्यांची गोष्ट सोडा; पण प्रजेपैकीं बहुजनसमाज तुमच्याकडचा आहे काय? जर नाहीं तर आमच्या नांवानें कां खडे फोडतां? आह्मांस जें बरें वाटतें त्याचा आह्मी लोकांस उपदेश करितों, त्यांत तुमचा काय ह्मणून संताप होतो व तुह्मीं कां घाबरतां? आह्मांस वाटेल तो उपदेश करण्याची मोकळीक द्या; वर्तमानपत्रद्वारा लेख लिहूं द्या; ते जप्त करूं नका; आमचीं राजकीय मतें कांहींही असोत, त्यांचा प्रसार करण्यासाठीं मंडळ्या स्थापन करण्याची आह्मास बंदी करूं नका; आह्मांस व्यक्तिस्वातंत्र्य द्या; आमच्या घराच्या झाडेझडत्या घेऊं नका; आम्ही बंडावा करतों या मिषानें आह्मांस तुरुंग दाखवूं नका; आमचा पत्र-

व्यवहार फोडून पाहूं नका; हा लेख लिहिणारास (मला) एका शहरांतून दुसऱ्या शहरांत फिरूं द्या, व प्रजासत्तेसंबंधानें माझें ह्मणणें ऐकण्याची ज्यांची इच्छा असेल त्यांस सभा भरविण्याचा हक्क द्या. असें होईल तर गुप्त कट न करण्याचें आह्मी तुह्मांस वचन देऊं; व ज्यास तुह्मी बंड अशी संज्ञा देतां त्याची तयारी करणार नाहीं. तुह्मी आमच्या प्रयत्नास हवें तें नांव द्या. वास्तविक ह्मटलें ह्मणजे आमच्या देशाची राज्यपद्धती मूळापासून सुधारण्याच्या कामास लोकांनीं आरंभ केलेला होता, तो तुह्मीं दाबून टाकिला आहे; व आह्मी त्याचें पुनरुज्जीवन मात्र करीत आहों.

'इंग्लंड देशाप्रमाणें तुम्हीही विचारस्वातंत्र्याचा हक्क कां मान्य करीत नाहीं? माझा हा लेख तुह्मी काय ह्मणून जप्त करणार? सैन्यांतील लोकांनीं आमचीं वर्तमानपत्रें वाचणें ही गोष्ट तुह्मी गुन्हा कां ठरवितां? स्वित्झर्लंडमधून मला हांकून लावण्यास तुह्मी तेथील सरकारास कां लिहितां? एखादा स्विस मनुष्य राजसंस्था स्थापण्याचा उपदेश करितो ह्मणून त्यास इतालींतून हांकून लावण्याविषयीं तेथील सरकाराकडून कधीं तुह्मांस लिहून आलें आहे काय?

'पण छेः; तुमच्या हातून वरील एकही गोष्ट व्हावयाची नाहीं. तसें करावयाचें तुमच्या मनांत असलें तरी तुमच्या हातून व्हावयाचें नाहीं. तुमची सत्ता लोकांस थोडीच पसंत आहे? बळी तो कान पिळी ह्या न्यायानें तुमचा अंमल चालला आहे, तो चालेल तेथपर्यंत चालूं द्या. आज आह्मीं तुमच्याशीं नुसत्या शब्दांनीं वाद चालविला आहे; पण तुह्मीं रोम शहर शत्रूच्या स्वाधीन केलें आहे, इतालीच्या नांवास कलंक लाविला आहे, आमच्या स्वातंत्र्याची परकीयांकडून पायमल्ली करवीत आहां, आमच्या प्रांतांचा बिनधोकपणें क्रयविक्रय चालविला आहे, आमच्या देशाचा खजीना कोरडा पाडिला आहे, आमच्या सैन्याची मानहानी करून त्यास खालीं पहावयास लाविलें आहे, व राज्यकारभारांतून लोकांचा हात अजीबात काढून टाकला आहे; ह्या सर्वांचें उसनें फेडण्यासाठीं जर आह्मी एखादे दिवशीं दंड थोपटून तुमच्यासमोर मैदानांत उभे राहिलों, तर मात्र कुरकुरूं नका.

'इतालियन लोकांस तुमची राज्यव्यवस्था मुळींच पसंत नाहीं. ह्या एका गोष्टीपायींच तुमची समाप्ति व्हावयाची आहे असें खास समजा. देशाच्या

हल्लींच्या स्थितीचें कारण तरी त्यांतच आहे; व आमच्या अबाधित हक्कांचा-ही ह्याच गोष्टींत अंतर्भाव झालेला आहे.' या पत्राच्या शेवटीं माझीनी लिहितो, 'तुमच्या नशीबीं काय लिहिलें आहे तें मला कळून चुकलें, त्याप्रमाणें ह्या सर्व गोष्टी तुह्मांस स्पष्टपणें सांगितल्या पाहिजेत असें मला वाटलें. माझ्या समजुती काय आहेत व तुह्मीं आणिलेल्या आरोपांस मी किती तुच्छ लेखितों हें यावरून तुह्मांस समजेल. नुकताच जो लोकांनीं अकालीं उठाव केला होता, आणि ज्यानें तुमची गाळण करून सोडिली आहे, त्याला मी व माझे मित्र अगदीं विरुद्ध होतों. तुह्मीं मजवर आणिलेल्या आरोपांतून स्वतःला मुक्त करण्याच्या इच्छेनें ही गोष्ट मी तुह्मांस सांगत आहें, असें समजूं नका. तुमचा पाडाव करण्याच्या कामीं मदत करण्यास आपणास आतां हरकत नाहीं असें मला वाटलें कीं त्या क्षणींच, इतालियन ह्या नात्यानें, तसें करणें आपलें कर्तव्य आहे, असें मी समजेन, व त्याबद्दल माझ्या अंतःकरणास तिळभरही वाईट न वाटतां उलट तें शांत आणि प्रसन्न राहील.

इतालियन लोकांची स्वातंत्र्यप्रियता माझिनीच्या अंगीं मूर्तिमंत वसत होती. बड्या लोकांच्या हातीं सर्व सत्ता असल्यानें रयतेच्या हक्कांची जी पायमल्ली होते, तिचें पूर्ण निदर्शन त्या वेळेच्या इतालीमधील राजसत्तेंत दिसून येतें. माझिनीच्या चरित्रांत ह्या दोन विरोधी गोष्टींचा झगडा अव्वलपासून अखेरपर्यंत दिसून येतो. माझिनीच्या उपदेशामुळें लोकांच्या अंगांत राष्ट्रीयत्वाचें वारें भरून सन १८४८ सालीं आपलें कर्तव्य करण्यासाठीं जेव्हां त्यांनीं हत्यार उचलिलें तेव्हां दुसऱ्या राष्ट्राची मदत नसतांही त्यांस जिकडे तिकडे जय मिळाला. परंतु परकीयांच्या जुलुमांतून मुक्त झाल्यानें आतां आपण स्वतंत्र झालों ह्या आनंदाच्या धुंदींत, राज्याच्या अंतर्व्यवस्थेंत आपले हक्क संभाळण्याचें भान त्यांस राहिलें नाहीं, आणि लढाया करून मिळविलेल्या यशाचा फायदा स्वतःला करून घेण्याचें सोडून कष्टार्जित स्वातंत्र्य पीडमाँटचा राजा चार्लस आल्बर्ट याच्या पदीं त्यांनीं अर्पण केलें. पण, लोकांस या युद्धांत यश मिळाल्यानें प्राचीन प्रजासत्ताक राज्यव्यवस्था सुरू करण्याविषयीं त्यांच्या मनांत प्रेरणा उत्पन्न झाली आहे तिचा बीमोड करण्यासाठींच आपण या वेळीं पुढें सरसावलों आहों, असें चार्लस आल्बर्टनें युरोपांतील इतर राजांस त्या वेळींच कळविलें होतें. राष्ट्रानें संपादिलेला हक्क त्यानें चार्लस आल्बर्टच्या स्वाधीन केला;

त्याच राष्ट्रास परकीयांच्या ताब्यांत देऊन त्यानें लोकांचे उपकार फेडिले. दहा वर्षांनंतर माझिनीच्या सतत परिश्रमानें जेव्हां पुन्हां इतालियन लोकांच्या स्वातंत्र्याभिमानानें पेट घेतला तेव्हां मुख्य प्रधान कॅव्होर ह्यास दिसून आलें कीं, राजानें पूर्वीप्रमाणेंच ह्या वेळींही स्वातंत्र्यप्रियतेचा आव विशेष ऐटीनें आणला पाहिजे, व लोकांचा पुढाकार घेतला पाहिजे; नाहींपेक्षां कोणी तरी भलताच मनुष्य लोकांचें धुरीणत्व पटकावून बसेल. 'आपण होऊन एखादी मसलत रचण्याचें कॅव्होरच्या अंगीं मुळींच ज्ञान नाहीं, परंतु दुसऱ्यानें रचलेल्या मसलतीपासून आपला स्वार्थ साधून घेण्याच्या कामीं त्याचा हातखंडा आहे' असें माझिनीनें कॅव्होरच्या संबंधानें ह्मटलें आहे तें अगदीं यथार्थ आहे. माझीनी ह्मणतो, 'लोकांच्या हातून काम करून घेण्याची राजाची मर्जी नव्हती, व पुढें मागें जरूर लागल्यास लोकांच्याविरुद्ध आपणास कोणाचें तरी पाठबळ मिळवून ठेवावें असें त्यास वाटत होतें, ह्मणून त्यानें फ्रेंच बादशहाशीं लबाडीचे तह करून त्यास आपलासा करून घेतलें, व ज्यानें रोमशहर पोपास बळी दिलें त्याचा कुटिल मतलब साधण्यासाठीं इतालियन सैन्य त्याच्या स्वाधीन केलें.' लुई नेपोलियननें एकाएकीं लढाई बंद पाडल्याबरोबर राजानेंही आपण होऊन हातीं घेतलेलें काम अर्धेंच सोडून दिलें, व 'इलाज नाहीं तरच तें पुन्हां हातीं घेण्याचा निश्चय केला.' तें काम पुन्हां हातीं घेण्यास राजास भाग पाडण्याच्या उद्योगास माझीनी ह्यापुढें लागला. राजानें नाइलाजास्तव सन १८६६ सालीं लढाई सुरू केली. ही लढाई, फ्रेंच बादशहाकडून इशारा मिळाल्याबरोबर कशी एकदम बंद पडली, व इतालीच्या पुत्रांच्या रक्तानें नुकताच न्हालेला व्हेनीशियन लॉंबर्डी प्रांत फ्रेंच राजाची देणगी ह्मणून स्वीकारण्याचें अधमपणाचें काम राजानें कबूल केलें, वगैरे गोष्टी पूर्वीं येऊन गेल्याच आहेत.

मरणापूर्वी एक वर्ष माझिनीनें लिहिलें कीं 'एखाद्या गोष्टीच्या कारणाकडे लक्ष न देतां, जे फक्त तिच्या परिणामाकडेच दृष्टी पोंचवितात, ते राजाची मर्जी प्रसन्न करून घेण्यासाठीं आज वाटेल तें ह्मणोत; परंतु खऱ्या इतिहासांत पुढील गोष्टी निर्विवाद येतील. त्या ह्या कीं लोकांच्या मनांत सर्व इताली देश एकछत्री करण्याचें असून आस्ट्रिया, फ्रेंच बादशहा आणि पोप, ह्या सर्वांशीं मसलत करून इतालीस असलेल्याच स्थितींत ठेवण्या-

साठीं राजानें कृष्णकारस्थानें सुरू ठेविलीं होतीं; फ्रेंच लोकांच्या मनांत मध्य इतालीमध्यें बोनापार्टाच्या घराण्यास अनुकूळ अशा राज्यव्यवस्थेची स्थापना करण्याचें असून, आमच्या उपद्व्यापी राज्यकर्त्यांनीं ही गोष्ट कबूलही केली होती; परंतु बड्या लोकांखेरीज बाकीचे सर्व लोक या विचारास प्रतिकूल असल्यामुळें तो ढांसळून पडला; दक्षिण इतालीची सुटका आमच्या लोकांनीं आणि स्वयंसेवकांनीं केली; टस्कनी व जिनोआ प्रांतांवर हल्ले करण्याची लोकांनीं कडेकोट तयारी केल्यामुळें, व ग्यारिबॉल्डीचा हेतु उघड दिसून आल्यामुळें राजास पोपाच्या मुलुखावर स्वारी करणें भाग पडलें; व्हेनिस शत्रूशीं सामना करून मिळविलेलें नसून फ्रेंच बादशहानें इतालीस त्याची भिक्षा घातली आहे; कॅलाब्रिया प्रांतामध्यें लुटारू लोकांनीं आडून चालविलेली लढाई, पिआसेंझा आणि पेव्हिया ह्या शहरांवर झालेले हल्ले, व अशाच प्रकारची दुसऱ्या शहरांतून उठलेली धामधूम आणि पारिसमध्यें एकाएकीं प्रजासत्तेची स्थापना होणें, ह्या गोष्टी जर घडून आल्या नसल्या तर आजमितीसही रोम शहर आमची राजधानी झालें नसतें. ( १८७१ ).

सन १८७० सालीं माझिनीस इंग्लंड सोडून सिसिली बेटास जावें लागलें. सॅव्हॉय घराण्याच्या अंमलाखालीं लोकांचे विचार व नीति हीं दिवसेंदिवस भ्रष्ट होत चाललीं होतीं, व परराष्ट्रांकडून इतालीच्या एकामागून एक अशा मानखंडना होत असतांही लोकांस त्यांजविषयीं कांहीं वाटेनासें झालें होतें. माझिनीला आजपर्यंत कमी दुःखें भोगावीं लागलीं होतीं असें नाहीं; परंतु लोकांची ही नीच स्थिती पाहून तर त्याच्या दुःखाचा कळस झाला, आणि त्यास इताली देशास जन्मभूमी ह्मणण्याची लाज वाटूं लागली. अडीच कोटी लोकांचें राष्ट्र जर आपला, आपल्या सैन्याचा, व आपल्या स्वयंसेवकांचा झालेला अपमान पाहून मुकाट्यानें बसेल तर त्याची पदोपदीं मानहानि होणें हें अगदीं योग्य आहे, असें जरी माझीनी मोठ्या खेदानें कबूल करी, तथापि त्याचा स्वभाव न्यायी असल्यामुळें त्यास ह्याचा दोष लोकांकडे आहे असें वाटत नसे. तो ह्मणे कीं 'यथा राजा तथा प्रजा' ह्या न्यायानें राजा जाईल त्याच मार्गानें बहुजनसमाजही जात असतो. इताली देशाचे तुकडे जरी आतां सांधल्यासारखे होते, तथापि लोक अद्याप एकजीव झाले नसून तीनशें वर्षांपूर्वी

पोप व आस्ट्रिया ह्यांच्या अमदानींत लोक जे एकदां झोंपीं गेले होते ते अद्याप जागृत झाले नव्हते, व आपलें सामर्थ्य किती आहे व आपलें कर्तव्य काय आहे हें त्यांस कळलें नव्हतें, हें माझिनीला ठाऊक होतें. तो ह्मणे कीं, देशाची अशी स्थिति असण्याचें मुख्य कारण राज्यकर्त्यांची भ्रष्टता आणि अनीति हें होय. कित्येक दिवसपर्यंत सिसिलीमध्यें व मुख्यत्वेंकरून पाळर्मो शहरामध्यें मधूनमधून दंगेधोपे होत, व लोकांचीं मनें अस्वस्थ होत, हें पाहून इतालीचें सरकार घाबरून गेलें होतें, आणि पाळर्मो येथील सुभेदाराच्या जागीं सेनापति मेडिसाय यास नेमणें अवश्य झालें होतें. इतालीच्या राजातर्फे सिसिली बेटावर अंमल करण्यासाठीं ज्यांची ज्यांची नेमणूक झाली होती, त्या सर्वांमध्यें मेडिसाय ह्याचा लोक फारच तिरस्कार करीत व त्यास भीत. कारण राजाची सत्ता राखण्यासाठीं हवीं तशीं क्रूर कृत्यें करण्यास तो मागें घ्यावयाचा नाहीं हें सर्वांस माहीत होतें. सिसिली बेट इतालीपासून निराळें करून तेथें प्रजासत्ताक राज्य स्थापण्याकरितां बंड करण्याविषयीं आपली संमती देण्यास सिसिलियन लोकांनीं माझिनीस पुष्कळ वेळां विचारिलें होतें. परंतु सगळा इताली देश एकदम एकवट केला पाहिजे, अशी सबब सांगून त्यानें आपलें अनुमोदन त्यांस कधींही दिलें नाहीं. कांहीं काळपर्यंत लोक त्याच्या ह्मणण्याप्रमाणें वागले. परंतु अखेर सरकाराविरुद्ध उठण्याचा निश्चय केलेल्या लोकांनीं त्यास सांगून पाठविलें कीं, ज्या तारखेस बंड उठावयाचें आहे, ती तारीख ठरून चुकली आहे; तुह्मी आह्मांस येऊन मिळावें असें आमचें आग्रहपूर्वक ह्मणणें आहे; तथापि तुह्मी न आलां तरी आमचा झालेला बेत फिरावयाचा नाहीं. यावर माझिनीनें उत्तर धाडिलें कीं 'केवळ सिसिली बेटासाठीं बंड न करितां सगळ्या इताली देशासाठीं तुह्मीं उठावें.' लोकांमध्यें असलेल्या आपल्या वजनाचा ह्या बंडास पूर्ण उपयोग व्हावा ह्मणून, कांहीं झालें तरी बंडवाल्यांस जाऊन मिळण्याचा त्यानें निश्चय केला. बंडवाल्यांस यश येईल अशी त्यास मुळींच आशा नव्हती; व ह्या झटापटींत आपणास मृत्यु आला तर फारच चांगलें होईल, असा त्याचा आशय सन्निध असलेल्या कित्येक गृहस्थांस त्याच्या बोलण्यांत दिसून आला.

ज्या मनुष्यानें माझिनीचा घात केला तो गृहस्थ सरकारचा हेर आहे

असें माझिनीस पुष्कळांनीं सांगितलें होतें; व आपणासही त्या मनुष्याविषयीं स्वभावतःच कंटाळा आणि तिरस्कार वाटतो असें तो ह्मणत असे. परंतु माझिनीचा स्वभाव फार थोर असल्यानें तो ही गोष्ट बाहेर दिसूं देत नसे. तरी त्याजवर माझिनीचा पूर्ण विश्वास कधींच बसला नाहीं; व त्यामुळें दुसऱ्या लोकांचा ज्यांत संबंध होता अशीं गुह्यें माझिनीनें त्यास कधीं सांगितलीं नाहींत. तो ह्मणत असे कीं 'मला जिवें मारण्याची शिक्षा झाली होती, तेव्हां मी कोणीकडे फिरत होतों हें त्यास माहीत होतें, तरी माझ्या जिवास कधींही धक्का लागला नाहीं; तेव्हां माझ्या एकट्याच्या जिवापुरता त्याजवर विश्वास ठेवण्यास हरकत नाहीं.' माझिनीच्या ह्या ह्मणण्यांत दोन चुका होत्या. एक तर तो स्वतः फार थोर स्वभावाचा असल्यानें त्या कृष्णसर्पाचा दुष्टपणा त्यास पूर्णपणें कळला नव्हता; दुसरें असें कीं जोंपर्यंत आपणास झालेली मृत्यूची शिक्षा कायम होती तोंपर्यंत आपणास पकडून दिलें असतां एकदां एक ठरीव रक्कम कायती त्या गृहस्थास बक्षीस मिळती; परंतु आपल्या बेतांची वेळोवेळीं सरकारास जोंपर्यंत तो बातमी देत होता तोंपर्यंत त्यास सरकाराकडून प्रतिमासिक वेतन मिळत होतें; तेव्हां आपणास त्या वेळीं पकडून देण्यापेक्षां जिवंत राहूं देण्यांतच त्याचा विशेष फायदा होता, ही गोष्ट माझिनीच्या लक्षांत आली नाहीं असें दिसतें.

जलमार्गानें प्रवास करीत असतां माझिनीस पकडून एका लढाऊ गलबतांत घालून गाएटा येथें नेण्यांत आलें. तेथील किल्ला, समुद्रांत दूरवर गेलेल्या एका खडकाच्या टोंकावर बांधलेला असून अतिशय मजबूत आहे. त्या किल्ल्याच्या अतिशय उंच आणि अवघड अशा बुरुजामध्यें माझिनीस ठेवण्यांत आलें होतें. येथून पाहिलें ह्मणजे वर आकाश आणि खालीं पाणी मात्र दिसे. ह्या भूशिरावर जिकडे तिकडे जंगी तोफा लाविल्या असून तेथें पुष्कळ लढाऊ शिपाई होते, व बुरुजाखालीं नजर फेंकल्यास समुद्रांत पांच लढाऊ आगबोटी होत्या त्या दिसत असत.

सेनापती मेडिसाय ह्याच्या हुकुमावरून माझिनीस पकडण्यांत आलें होतें, त्यावरून असें स्पष्ट दिसून आलें कीं, मेडिसाय ह्यास बंडाची बातमी लागलेली असून तो सावध होता. त्यानें इतालीमधून लष्करी मदतही मागवून ठेविली होती; तेव्हां पालर्मो येथें होणारें बंड अर्थातच

झालें नाहीं. परंतु आतां सरकारास दुसरीच एक अडचण पडली. माझिनींचें आतां काय करावें हें सरकारास सुचेना. कारण त्याची प्रकृति बिघडून जर त्याचें कांहीं बरेंवाईट झालें, तर सरकारानें त्यास कांहीं तरी करून ठार मारिलें असें लोक ह्मणाल्याशिवाय राहणार नाहींत, अशी सरकाराची पक्की खात्री होती; तेव्हां सुमारें दोन महिन्यांनीं राजास पुत्र झाल्याची संधी साधून माझिनीस पुन्हां बंधमुक्त करण्यांत आलें, व त्याच्या सर्व अपराधांबद्दल त्यास क्षमा करण्यांत आली. त्याचा अपराध कोणता ह्मणाल तर इताली देशावर त्याचें 'आपल्या प्राणापेक्षांही अधिक प्रेम होतें' हा होय.

इतालीच्या नांवाला न जागणाऱ्या आपल्या देशबांधवांकडून आपल्या सुटकेबद्दल आनंदप्रदर्शन करून घेणें माझिनीस आवडलें नाहीं. ह्मणून गाएटा येथून तो अगदीं पहांटेस निघून गेला. रोम येथील क्यांपाना (प्रेतें पुरण्याची जागा) मधून जातांनां त्याजबरोबर त्याचा फक्त एक मित्र होता. माझीनी तुरुंगांत असतां ह्या मित्रास मात्र माझिनीकडे जाण्याची परवानगी मिळालेली होती. लहानपणीं ज्या रोम शहराचा माझिनीस निदिध्यास लागलेला होता, व ज्याच्याविषयीं त्याची विलक्षण पूज्यबुद्धि होती, त्या रोम शहराचें हें शेवटचें दर्शन होय ही गोष्ट माझिनीस या वेळीं पुरतेपणीं समजली होती, व त्यास गहिंवर दाटून तो स्तब्ध होत्साता त्या शहराकडे टक लावून पाहत चालला असतां त्यानें किंवा त्याच्या मित्रानें तोंडांतून एक अक्षरही काढिलें नाहीं. हा सर्व प्रवास करीत असतां माझिनीची मुद्रा शांत आणि उदास दिसत होती.

पुन्हां रोम शहरामध्यें प्रवेश करण्याची माझिनीची इच्छा नव्हती. राजसंस्थेनें विटाळलेल्या रोम शहरांत प्रवेश करण्यापेक्षां त्याचें मुळींच दर्शन न घेणें बरें असें तो ह्मणत असे, हें पूर्वी सांगितलेंच आहे. तथापि तो ज्या आगगाडींतून जात होता ती त्या दिवशीं रोम येथेंच थांबल्यानें व शहराच्या दरवाज्याबाहेर उतरण्यास जागेची सोय नसल्यानें जिनोआस जाणारी दुसरी गाडी निघेपर्यंत तेथें राहणें त्याला भाग पडलें. शहरांत शिरल्यावर जो पथिकाश्रम पहिल्यानें लागला तेथें उतरून आपलें कांहीं तरी नांव सांगून आपण कोण आहों ह्या गोष्टीचा त्यानें कोणास थांग लागूं दिला नाहीं.

जिनोआ येथें गेल्यावर तो थोडे दिवस एका मित्राच्या घरीं एकांतांत राहिला, व रात्रीं आपल्या मातुश्रीच्या थडग्याचें दर्शन घेऊन तो इंग्लंडास जाण्यास निघाला. तेथें पूर्ववयांत परिचय झालेल्या मित्रांच्या समागमें कांहीं दिवस राहण्याचा त्याचा इरादा होता. या मित्रांविषयीं त्याचा ग्रह फारच चांगला असून त्यांचा प्रेमातिशय पाहून मला आपल्या जन्मभूमीच्या वियोगदुःखाचें विस्मरण होतें असें तो नेहमीं ह्मणत असे. ही गोष्ट त्या मित्रांस निरंतर भूषणावह होईल यांत संशय नाहीं. तरुणपणीं ज्याप्रमाणें त्यानें आपल्या सर्व सुखांवर लाथ मारिली होती, त्याप्रमाणेंच वृद्धापकाळींही विश्रांती घेणें एकीकडे ठेवून स्वदेशसेवेसाठीं तो इंग्लंड सोडून लवकरच लुगानो शहरीं गेला. तेथें प्रजासत्ताक मताचें 'ला रोमा, देल पोपोलो' ह्मणजे 'लोकांचें रोम' ह्या नांवांचें वर्तमानपत्र त्यास चालवावयाचें होतें, व रोम शहरामध्यें प्रजासत्तेचा जाहिरनामा ज्या दिवशीं लाविला होता त्याच्या वर्षतिथीच्या दिवशीं त्या पत्राचा पहिला अंक बाहेर पाडण्याचा त्याचा विचार होता. इंग्लंड सोडून जाण्याच्या आदले दिवशीं त्यानें लिहिलें कीं, 'गेल्या दहा वर्षांत झालेल्या चुका, लोकांचे भ्रम व अज्ञान, आणि अनीतिमान पुढाऱ्यांनीं इतालीच्या नवीन पिढीस लाविलेलें भलतेंच वळण, ह्या सर्व गोष्टींवरून माझी खात्री होऊन मला मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें कीं, राजकीय बाबतींत, मला वाटत होतें त्यापेक्षां माझे देशबंधु फारच मागसलेले आहेत. इतालीस स्वतंत्र करण्याच्या कामास ह्यापूर्वीं केव्हांच आरंभ होऊन ह्या वेळेपर्यंत तें संपत आलें पाहिजे होतें असा माझा समज होता; पण लोकांस त्यासंबंधानें अद्याप पुष्कळ गोष्टी शिकावयाच्या आहेत अशी आतां माझी खात्री झाली आहे.' पूर्वीं पुष्कळ वेळां अपयश आलें असतांही, व लोक कृतघ्न झाले असतांही वर लिहिलेल्या प्रकारचें शिक्षण देण्याच्या कामीं आपलें अल्प अवशिष्ट आयुष्य घालविण्याचा त्यानें निश्चय केला. तो ह्मणतो 'ऐहिक सुखाच्या आमिषास भुलून, किंवा काळें पाणी किंवा बंदिवास अशा दुःखाच्या डोंगरास भिऊन, आपलें खरें मत लपविण्याचें किंवा इष्टकार्य चोरून ठेवण्याचें ज्यांच्या स्वप्नींही कधीं आलें नाहीं, असे कसोटीस उतरलेले लोक हें वर्तमानपत्र चालविणार आहेत. सर्व इताली देश एकछत्री करून त्यांत प्रजासत्ता स्थापणें, हा आमचा उद्देश होय. त्या कामास पंचवीस वर्षां-

पूर्वींच सुरुवात होऊन चुकली आहे. राजसंस्थेमध्यें असलेल्या दुःखांचा प्रत्यक्ष अनुभव आल्याशिवाय लोक जागे व्हावयाचे नाहींत, असा विचार करून प्रजासत्तेसंबंधानें लेखद्वारा उपदेश करण्याचें काम जरी मध्यंतरीं आह्मीं मोठ्या कष्टानें एकीकडे ठेविलें होतें, तरी त्याचा आम्हीं पूर्णपणें त्याग कधींच केला नव्हता.

'गेल्या दहा वर्षांत घडून आलेल्या गोष्टींवरून आतां आमच्या मतांच्या सत्यतेविषयीं आमची पूर्ण खात्री होऊन चुकली आहे; व चाळीस वर्षांपूर्वी फडकाविलेलें, परंतु मध्यंतरी गुंडाळून ठेविलेलें निशाण आतां आह्मीं पुन्हां मोकळें सोडिलें आहे.' माझिनीच्या असें लक्षांत आलें कीं, इतिहासपरिपाठानें व स्वभावतः जरी इतालियन लोकांची धांव प्रजासत्तेकडे आहे, तथापि राजसंस्थेच्या अत्यंताभावानें युक्त जी प्रजासत्ता तीच काय ती खरी प्रजासत्ता हा सिद्धांत इतालियन लोकांच्या मनांत नीटपणें बिंबला नव्हता. त्यामुळेंच तूर्त पुढें आलेली अडचण टाळण्याकरितां, केवळ सकृद्दर्शनीं दिसणाऱ्या हिताकडे लक्ष देऊन त्या लोकांनीं राजसंस्था पत्करली होती. सबब लोकांच्या उन्नतीची मूळभूत अशी जी प्रजासत्ताक राज्यव्यवस्था, तिजविषयीं लोकांस उपदेश करण्याचें काम विलक्षण धैर्यानें व दीर्घोद्योगितेनें त्यानें पुन्हां हातीं घेतलें. तो ह्मणतो, 'इतिहासाच्या अवलोकनानें असें दिसून येतें कीं, एकट्या इतालींतच नाहीं, पण सगळ्या युरोपखंडभर प्रजासत्तेची स्थापना व्हावी असा ईश्वरी नेमानेम आहे, व ती गोष्ट भविष्यकाळीं घडून आलीच पाहिजे. परंतु त्या प्रजासत्तेचा पाया धर्मतत्वांवर असल्याविना ती चिरस्थायी होणार नाहीं. तें धर्मतत्व तत्ववेत्त्यांना आपल्या कल्पनातरंगांत दिसणारें नव्हे, तर ईश्वरानें आपल्या हातानें मानवी स्वभावांत रोपलेली, व जिच्या योगानें 'नर अपनी करनी करे तो नरका नारायन बन जाय' ह्या साधूक्तीप्रमाणें मनुष्य आपली करणी करून जिच्यायोगानें स्वतःची उन्नती साधितो, ती प्रगमनेच्छा तें होय. ह्या पायावर रचलेल्या प्रजासत्तेचें, उच्चतम स्वतंत्रता प्राप्त करून घेऊन तिच्या द्वारें सर्व धर्मांत प्रतिपादन केलेली जी सर्व मानवी जातीची समता ती घडवून आणणें, हें फळ होय. मनुष्यांचें व देशांचें एकमेकांशीं संघट्टन होईल तितकें वाढवून त्याच्या साहाय्यानें आपणांस हा मनुष्यांमधील व देशांमधील न्यूनाधिकभाव काढून टाकावयाचा आहे.

अशा रीतीनें उभारलेली प्रजासत्ता केवळ राजकीय नव्हे, तर एक टोले-जंग धर्मसंस्थाही होईल.

'लोकांचें रोम' हें वर्तमानपत्र काढण्याच्या कामीं माझिनीनें अत्यंत परिश्रम केले. ह्या मुदतींत त्याची प्रकृति अगदीं क्षीण झालेली होती, व त्यास वारंवार दुखणें येऊन भयंकर वेदना होत असत. असें असतांही त्यानें केलेले श्रम पाहून त्याच्या अंगीं लोकोत्तर सामर्थ्य होतें असें ह्मट-ल्यावांचून राहवत नाहीं. अखेरीस त्यास कांहींसा आराम वाटूं लागला; तेव्हां त्यानें आपल्या इंग्लंडांतील मित्रांस, नजीक आलेल्या एका उत्सवा-च्या प्रसंगीं मी तेथें येणार आहें, ह्मणून लिहिलें. अनेक साहसें करीत असतां व अडचणींतून पार पडत असतां जेव्हां जेव्हां त्यास फुरसत मिळे तेव्हां तेव्हां तो ह्या उत्सवाकरितां इंग्लंडास जात असे. त्याची शरीर-प्रकृति अतिशय क्षीण झालेली असल्यानें त्या ऋतूमध्यें त्यानें आल्प्सपर्वत ओलांडणें सुरक्षित नव्हतें, तरी तो तिकडे जाण्यास निघालाच. इंग्लंडां-तील उत्सव आटपून तो परत स्वदेशीं आला. पण वाटेंतील थंडीचा त्याच्या प्रकृतीवर परिणाम होऊन त्यास प्ल्युरिझी नांवाचा रोग झाला, आणि ता. १० मार्च सन १८७२ रोजीं त्या आजारानें तो पिसा येथें मृत्यु पावला.

त्याचें आयुष्य सर्वसंग परित्यागकरून अव्यभिचारी अशा एकनिष्ठेनें आपलें कर्तव्य करण्यांत गेलें होतें; व मृत्युसमयींही त्याच्या जिव्हाग्रीं स्व-देशाविषयींचेच शब्द घोळत होते. ह्या पुरुषाचें चरित्र म्हणजे, शुद्ध व निष्कलंक अशा स्वार्थपराङ्मुखतेचा एक नमुना आहे. माझिनीचें प्रेत अपी-नाइन्स पर्वतांमधून जिनोआ येथें नेण्यांत आलें तेव्हां रस्त्यांतून जागजागीं लोकांचे थवेच्याथवे बाहेर येऊन आपली त्याजविषयींची पूज्यबुद्धी व्यक्त करूं लागले. माझिनीचा अवतार झाला नसता तर इताली ह्या नांवानें एका स्वतंत्र देशाचा बोध न होतां तें केवळ एक भूगोलविषयक संज्ञा होऊन राहिलें असतें. देशबांधवांच्या सेवेमध्यें आपलें शरीर झिजविणाऱ्या व शरपं-जरीं पडूनही देशाची चिंता वाहणाऱ्या माझिनीस राजानें थोडया महिन्यांपूर्वी अन्यायानें कैद केलें, तेव्हां ज्या लोकांनीं चकारशब्दही काढिला नव्हता, त्यांच्याचपैकीं, ऐंशीं हजार लोक त्याच्या शवाबरोबर जिनोआस गेले.

माझिनीच्या चरित्रांत करुणरस ओतप्रोत भरलेला आहे. त्याची प्रकृति अत्यंत नाजूक असल्यानें वारंवार त्यास दुखणें येऊन पीडा सोसावी लागत असे. देशोन्नतीचा हृद्रोग त्यास लागून त्याचें काळीज करपून गेलें होतें. इतालियन राष्ट्रांत वसत असलेल्या सद्गुणांची तो केवळ मूर्तिच होता, तरी देखील सर्व राष्ट्राचा त्याजविषयीं फार गैरसमज झालेला होता. तथापि तो डगला नाहीं; मोठ्या हिंय्यानें त्यानें तुमुल युद्ध सुरू ठेवून अखेरीस जय मिळविला. आणीबाणीच्या वेळीं क्वचित् प्रसंगीं त्याची बाजू बसरल्यासारखी दिसे, परंतु तो पुन्हां सर्व सावरून घेई. स्वसंरक्षणाचें त्याचें हत्यार ह्मटलें ह्मणजे त्याचें निर्मळ आणि पवित्र असें अंतःकरण मात्र होतें. त्याचा ईश्वरावर पूर्ण हवाला होता; व आपलें कर्तव्य एकनिष्ठेनें करावें, तें करितांनां दुनियेची पर्वा करूं नये, हें त्यास चांगलें ठाऊक होतें. ऐहिक मोहक वस्तूंचा त्याच्या मनावर मुळींच पगडा चालत नसे. हिऱ्याच्या किसानें मात्र हिरा घांसला जातो. माझिनीच्या अंगीं आपल्या इच्छेस अधीन ठेवण्याचें सामर्थ्य फार जबरदस्त होतें. त्याची सहनशक्ति पराकाष्ठेची होती. त्याचा एकदां झालेला निश्चय कल्पांतींही ढळत नसे. त्याच्या वृत्तींत उच्छृंखलपणा अगदीं नव्हता. स्वतःच्या अंतःकरणप्रवृत्तीस प्रमाण मानून जगाकडे लक्ष न देतां एका देवावर भिस्त ठेवणाऱ्या थोर लोकांच्या पंक्तीस बसण्याची त्याची योग्यता आहे. तो जात्या प्रेमळ स्वभावाचा होता. स्वतःच्या निस्स्वार्थपणामुळें आपल्या बरोबरीच्या इतर लोकांपेक्षां आपण वरचढ आहों असें जरी त्यास वाटे, तथापि भविष्यकाळीं मनुष्यजात उच्च पदास जाऊन पोंचणार आहे ह्मणून तीवर त्याचें फार प्रेम असे. तथापि त्याच्या आजूबाजूस जीं माणसें होतीं त्यांपैकीं फारच थोड्यांविषयीं त्याचें मत चांगलें होतें; आणि अशा लोकांशीं त्याचें अंतःकरण मोकळें असणें शक्यच नव्हतें. सर्व लोकांनीं आपापलें कर्तव्य करणें ह्यांतच सर्व मानवजातीचें कल्याण आहे असें समजून त्याप्रमाणें आचरण करूं लागणें, व त्यायोगें, भूगोलरचनापरत्वें झालेले राष्ट्रांचे व देशांचे भेद मोडून जाऊन सर्व मानवजातीनें एका आईबापांच्या लेंकरांप्रमाणें गुण्यागोविंदानें नांदणें ही उदात्त कल्पना त्याच्या डोळ्यांपुढें अहर्निश उभी होती.

माझिनीला सर्व आयुष्यामध्यें प्रापंचिक सुख माहीत नसल्यानें स्वतः-संबंधाच्या गोष्टींस तो कधींच महत्व देत नसे. त्यास अन्यायाचा तिरस्कार असून न्यायाची अत्यंत आवड असे. मृत्यु आज येवो किंवा शंभर वर्षांनीं येवो, परंतु जन्मास आलेल्या प्राण्यास तो येणार खचित. तेव्हां तसल्या अपरिहार्य गोष्टींविषयीं विचार करीत न बसतां जन्मास आल्याचें कांहीं तरी सार्थक करण्यास झटावें असें त्यास वाटत असे. त्यामुळें कोणत्याही क्षणीं मृत्यु येणार असला तरी तो त्याबद्दल निर्भय व निर्धास्त असे. 'बोले तैसा चाले' ह्या तुकोबाच्या वचनाप्रमाणें, स्वतःच्या उपदेशास अनुसरून त्याचें वर्तन असे. त्याच्या हातांत लेखणी आली ह्मणजे ती तरवारीची बरोबरी करीत असे. प्रपंचार्णवामध्यें प्रचंड झंझावातानें हवें तसें तुफान झालें तरी त्यास न जुमानतां जे तिराप्रमाणें पार जातात त्या थोर पुरुषांची योग्यता माझिनीच्या अंगीं होती. स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीशिवाय तो कधींही कोणास नमला नाहीं.....एखाद्या महत्कार्याच्या कल्पनेचा प्रथम मानसिक क्षितिजावर उदय व्हावा, व ती वाढत जाऊन तिनें इंद्रियें, मन आणि बुद्धि या सर्वांस व्यापून टाकावें, आणि अखेरीस त्या पुरुषाचें ति-जशीं जसें तादात्म्य व्हावें, त्याचप्रमाणें माझिनीचीही स्थिति झाली होती. सर्व मानवजातीचा पुढाकार इटाली देशाकडे आणून तो इतर सर्व रा-ष्ट्रांस सन्मार्ग दाखविणारा होईल असें करणें, ही प्रचंड कल्पना त्याच्या मनांत उद्भवली होती; परंतु ती त्याच्या आयुष्यांत त्यास खरी करून दाखवितां येईना, तेव्हां त्याच्या आत्म्यास वेदना होऊं लागल्या. त्याच्या विशाळ बुद्धीस त्या कल्पनेचें तेव्हांच ग्रहण झालें, परंतु इतरांस तें हो-ईना, तेव्हां अर्थातच त्यास तळमळ लागली; व हिऱ्याच्या किसानें हि-ऱ्यास घांसावें त्याप्रमाणें त्याच्याच मनांत उद्भवलेली कल्पना त्याच्याच मनास ग्रासूं लागली.

त्याची राहणी एखाद्या विरक्त पुरुषाप्रमाणें असून तो आपल्या शरी-रास अगदीं जपत नसे. तथापि दुसऱ्याविषयीं त्याचें अंतःकरण एखाद्या स्त्रीप्रमाणें कोमळ असे. त्याचा बांधा सुरेख असून तो नाकाडोळ्यांनीं नीटस होता. त्याचे डोळे पाणीदार असून, त्यांत त्याच्या मनोवृत्ती एखा-द्या आरशाप्रमाणें प्रतिबिंबित दिसत. त्याचें हास्य तर इतकें मनोहर असे

ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

कीं त्याचें वर्णन करितां येत नाहीं. ह्या सर्व गोष्टींमुळें माझिनीचें स्वरूप फारच मनोरम असून त्याची आबालवृद्धांवर तावडतोब छाप उठत असे.

येणेंप्रमाणें ह्या थोर पुरुषाचें चरित्र थोडक्यांत सांगितलें आहे. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ' हें वाक्य जणूं माझिनीसच उद्देशून लिहिलें आहे असें कोणास वाटणार नाहीं?

समाप्त.

# बडोदें येथील सद्विचारिणी सभेच्या व इतर उपयुक्त ग्रंथांच्या प्रकाशनार्थ स्थापन झालेली

# ग्रंथसंपादक व प्रकाशक मंडळी–बडोदें.

## मंडळीचा उद्देश.

सद्यःस्थितींत ग्रंथप्रसारासारखें ज्ञानवृद्धीस दुसरें साधन नाहीं, व ज्ञानसंपन्नतेशिवाय राष्ट्रोन्नति होणें शक्य नाहीं. रानटी स्थितींतील देश ऊर्जितावस्थेस कसे आले, व आपला एके काळीं सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचलेला हा हिंदुस्थान देश हल्लींच्या प्रसंगीं एक मागसलेलें राष्ट्र असा कां गणिला जात आहे, याचा विचार केला असतां सहज दिसून येईल कीं, देशी भाषेंत असाव्या तितक्या व त्या प्रकारच्या ग्रंथांची उणीव, हें ह्या निकृष्टावस्थेचें अंशतः बीज आहे. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांत तद्देशीय भाषांतून लिहिलेल्या ग्रंथांच्या संग्रहाची व आपल्या देशांतील भाषांतून लिहिलेल्या ग्रंथांची जर तुलना केली, तर वरील विधान अक्षरशः खरें आहे अशी कोणाचीही खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं.

२. आतां कोणत्याही भाषेंत ग्रंथवृद्धि होणें ही गोष्ट शिक्षणप्रसारावर सर्वांशीं अवलंबून असते, हें तत्व सर्वांस सम्मत आहे; तथापि शिक्षणप्रसाराच्या मानानें मराठी भाषेंत ग्रंथरचनेचें मान किती मागसलेलें आहे, याचा विचार केला असतां महाराष्ट्रीयांस तरी खालीं मान घालण्याचाच प्रसंग येईल असें फार दुःखानें ह्मणावें लागतें!

३. तसेंच वाचकवर्गाची या कामीं उदासीनता, किंबहुना वाचकांचा अभाव, हें हल्लींच्या ग्रंथदारिद्र्याचें सबळ कारण ह्मणून नेहमीं पुढें आणण्यांत येतें. परंतु दिवसेंदिवस शिक्षणप्रसार जास्त होत गेल्याकारणानें लोकांमध्यें वाचनेच्छाही वाढत्या प्रमाणावर आहे; इतकेंच नाहीं, तर परभाषांतून व मुख्यत्वें इंग्रजी भाषेंतील ग्रंथांतून ज्यांनीं परिश्रमानें ज्ञानप्राप्ती करून घेतली आहे, अशा अलीकडील विद्वानांचे लेख व भाषणें वाचण्याचा व ऐकण्याचा प्रसंग, शुद्ध मराठींत अथवा संस्कृतांत ज्यांना शिक्षण

मिळालें आहे, अशा लोकांना वारंवार येत गेल्याकारणानें परकी भाषेंत ज्ञानाचा काय ठेवा आहे तो जाणूं इच्छिणाऱ्या लोकांची संख्या दिवसें-दिवस वाढत्या प्रमाणावर आहे.

४. साधारण जनसमूहांत ऐतिहासिक, शास्त्रीय वगैरे ग्रंथ वाचण्याची अभिरुचि फार कमी आहे, व त्यांची प्रवृत्ति नाटकें, कादंबऱ्या वगैरे जेणें-करून मनोरंजन होईल अशीं पुस्तकें वाचण्याकडे जास्त आहे, असें पुष्कळांचें मत आहे; व कांहींअंशीं तें खरें आहे, असें कबूल करावें लागतें. साधारण जनसमूहाची कोणतीही प्रवृत्ति एकाएकीं बदलणें कठिण आहे; तथापि आमच्या मतें ही प्रवृत्ति हळूहळू बदलणें शक्य आहे. प्रारंभीं ऐ-तिहासिक, शास्त्रीय वगैरे विषय या लोकांपुढें, कादंबऱ्या, वीरपुरुषांचीं चरित्रें, इत्यादि मनोरंजक पुस्तकांच्या रूपानें ठेविले असतां, हळूहळू गहन विषयांवरील ग्रंथ वाचण्याची अभिरुचि त्यांच्यामध्यें कांहीं काळानें जागृत होईल, असा आमचा समज आहे; व ह्याच विचारानें आह्मीं या कामास सुरुवात केली आहे.

---

## मंडळीचे नियम.

(१) लोकोपयोगी विषयांवर ग्रंथ तयार करविणें, व चांगल्या ग्रंथ-कारांनीं लिहिलेले ऐतिहासिक, शास्त्रीय, व तात्विक विषयांवरील ग्रंथ, त्यांस योग्य मोबदला देऊन हक्कांसुद्धां त्यांजपासून विकत घेणें, व छापून प्रसिद्ध करणें.

(२) मंडळीनें प्रसिद्ध केलेल्या ग्रंथांचा सर्वत्र प्रसार व्हावा, व लो-कांस अल्प किंमतींत त्यांचा लाभ घेतां यावा, ह्मणून ग्रंथांची किंमत होई-ल तितकी कमी (ह्मणजे इंग्लिश साइझच्या आठ पृष्ठांस अर्ध्या आण्यापेक्षां जास्त नाहीं इतकी) ठेवणें.

(३) या कृत्यास मदतीदाखल शंभर किंवा त्यापेक्षां अधिक रक्कम देणारे गृहस्थ या संस्थेचे हितचिंतक गणणें, व त्यांस त्या रकमेबद्दल दर-साल दर शेंकडा ३ टक्केप्रमाणें व्याज देऊन शिवाय या मंडळीच्या देख-रेखीखालीं जितके ग्रंथ निघतील, त्यांच्या लागतील तितक्या प्रती कायमच्या वर्गणीदाराच्या भावानें देणें.

(४) ह्या उद्योगांत जो फायदा राहील त्यांतील निम्मा भाग चांगल्या

ग्रंथकारांच्या ग्रंथांस उत्तेजन देण्याकरितां वेगळा राखून ठेवणें व निम्मा भाग भांडवलांत जमा करणें.

( ९ ) ग्रंथांची निवड करणें, आलेल्या ग्रंथांचें परीक्षण करणें, चांगल्या ग्रंथकारांस उत्तेजन देणें, उपयुक्त ग्रंथांचें भाषांतर करविणें वगैरे व्यवस्था खालीं लिहिलेल्या मंडळीच्या विचारानें व देखरेखीखालीं होईल.

---

अध्यक्ष.

श्रीमंत रा. ब. संपतराव गायकवाड.
एफ. आर. एस. एल., व एफ. आर. जी. एस., बॅरिस्टर-ॲट-लॉ.

सभासद.

रा. ब. रघुनाथ महादेव केळकर.
रा. सा. शंकर मोरो रानडे, बी. ए.
रा. सा. महादेव राजाराम बोडस, एम. ए., एलएल. बी.
डा. कृष्णराव विनायक धुरंधर, एल. एम्. ॲण्ड एस.
रा. सा. बाळाजीराव जाधव, बी. ए., बी. एल्.
प्रोफेसर भास्कर रामचंद्र आर्ते, एम. ए.
प्रोफेसर पांडुरंग भिकाजी नाईक, बी. ए.
डा. रामचंद्र नारायण जाधव, एल. एम. ॲण्ड एस.
रा. सा. नानासाहेब शिंदे, बॅरिस्टर-ॲट-लॉ.
रा. सा. नारायण महादेव समर्थ, बी. ए., एलएल. बी.
रा. सा. हरी बाळकृष्ण तळवलकर, बी. ए., एलएल. बी.
रा. सा. शंकर विष्णु पुराणिक, बी. ए.
डा. गंगाधर बाळकृष्ण परांजपे, एल. एम. ॲण्ड एस.
रा. सा. गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.
रा. सा. नागेश विनायक बापट.
रा. सा. भानु केशव गांगनाईक.
रा. रा. मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, बी. ए.
रा. रा. शंकर विठ्ठल कदम कातरणीकर, बी. ए.
रा. रा. दत्तात्रय कोंडो घाटे, बी. ए.
रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे.

परीक्षक मंडळीचे चिटणीस.

रा. सा. शंकर मोरो रानडे, बी. ए.
रा. रा. मुकुंद बाळकृष्ण गुर्जर, बी. ए.
रा. रा. दामोदर सांवळाम यंदे.

---

## कायमच्या वर्गणीदारांकरितां मुद्दाम केलेले विशेष सवलतीचे नियम.

ह्या मंडळीच्या देखरेखीखालीं प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांचा लाभ वाचनेच्छु व गुणज्ञ लोकांस अल्प किंमतींत घेतां यावा, आणि ग्रंथप्रकाशनाचें काम निर्विघ्न चालावें, ह्मणून कायमच्या वर्गणीदारांकरितां खालीं लिहिल्याप्रमाणें विशेष सवलतीचे नियम केले आहेत.

१. कायमचे वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं आपलें नांव दाखल करण्यास प्रथमतः एकच वेळ एक रुपया प्रवेश फी भरली पाहिजे. त्याबद्दल त्यांस छापील पावती मिळेल.

२. कायमच्या वर्गणीदारांस मंडळीचें प्रत्येक पुस्तक—आठ पृष्ठांस फक्त पाव आणाप्रमाणें किंमत आकारून पाठविण्यांत येईल. बाहेरगांवच्या लोकांस पोष्टखर्च वेगळा पडेल. पांच प्रती एकत्र मागविणारांस पोष्टखर्च मुळींच पडणार नाहीं. (पुस्तक तयार होतांच त्यांस आगाऊ सूचना देण्यांत येईल.)

३. कायमच्या वर्गणीदारांस जीं पुस्तकें पाठवावयाचीं तीं नेहमीं मोहरेदार कागदावर छापलेलीं, व सोनेरी नांव एम्बॉस करून कापडी मजबूत पुठ्यांत बांधलेलीं, ज्यांस लायब्ररी एडिशन ह्मणतात अशीं पाठविण्यांत येतील. त्यांच्या पुस्तकाच्या किंमतीवर बाइंडिंग वगैरेची आकारणी मुळींच चढविली जाणार नाहीं. (पुस्तक तीनशें पृष्ठांच्या आंत झाल्यास मात्र साधी पण मजबूत बांधणी केली जाईल.)

टीपः—वर दर्शविलेलीं आठ पृष्ठें इंग्लिश साइझचीं समजावयाचीं आहेत. (नमुन्यादाखल आम्हीं छापलेला हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास, पहिला भाग, **मुसलमानी रियासत** हा पाहावा. ह्याच साच्याचीं व अशाच बांधणीचीं पुस्तकें कायमच्या वर्गणीदारांस मिळतील व त्यांची किंमत ८ पृष्ठांस पाव आणाप्रमाणें पडेल.)

४. कायमच्या वर्गणीदारांचीं नांवें प्रत्येक पुस्तकांत छापिलीं जातील.

५. कायमच्या वर्गणीदारांकडे जें पुस्तक पाठवावयाचें तें परीक्षक मंडळीनें पसंत केलेलेंच पाठविण्यांत येईल, व तें त्यांस नाकारतां येणार नाहीं. (सबंध वर्षांत सुमारें पांचपांचशें पृष्ठांचीं तीन किंवा चारच पुस्तकें तयार होऊं शकतील; त्या मानानें पाहतां कायमच्या वर्गणीदारांस सालीना तीन किंवा चार रुपये फार तर भरावे लागतील.)